# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

सत्र–३ पेपर क्रमांक ३

# भारतातील सामाजिक समस्या

**(Social Issues in India)**

सत्र–४ पेपर क्रमांक ५

# लिंगभाव आणि हिंसाचार

**(Gender and Violence)**

**बी. ए. भाग–२ : समाजशास्त्र**

(शैक्षणिक वर्ष २०२०–२१ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२२
बी. ए. भाग २ (पेपर ३ व ५) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : २००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN-

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## समाजशास्त्र अभ्यासमंडळ

अध्यक्ष **– डॉ. मच्छिंद्र सकटे**

सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज, उंब्रज, जि. सातारा

- **डॉ. अरुण विठ्ठल पौडमल**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज (के.एम.सी.)
  कोल्हापूर
- **प्रा. डॉ. जे. एच. कराडे**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती प्रतिमा शहाजीराव पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. संजय हिंदुराव शिंदे (सनदे)**
  सरदार बाबासाहेब माने कॉलेज,
  रहिमतपूर, जि. सातारा
- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती के.आर.पी. कन्या महाविद्यालय,
  उरुण-इस्लामपूर, जि. सांगली.
- **डॉ. सतीश सर्जेराव देसाई**
  एस. एम. डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज,
  मिरज, जि. सांगली

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागांतर्गत बी.ए. पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या आणि समाजशास्त्र विषयाची निवड केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मी मनःपूर्वक स्वागत करतो. शिवाजी विद्यापीठाचा समाजशास्त्र विषयाचा विद्यमान पदवी अभ्यासक्रम एकूण तीन वर्षांचा असून समाजशास्त्र विषयाची बी.ए. पदवी संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांना एकूण सोळा पेपर्सचा अभ्यास करावा लागतो.

जून २०२१ पासून बी. ए. भाग-२ साठी सत्र क्र. ३ समाजशास्त्र पेपर क्रमांक ३ ''भारतातील सामाजिक समस्या'' आणि सत्र क्र. ४ समाजशास्त्र पेपर क्रमांक ५ ''लिंगभाव आणि हिंसाचार'' हा अभ्यासक्रम लागू करण्यात आला आहे. या दोन्ही पेपर्सचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यांना भारतीय समाजाचे यथार्थ आकलन होईल. यादृष्टिकोणातूनच या अध्ययन साहित्याचे लेखन अत्यंत सुलभपणे केलेले आहे.

शिवाजी विद्यापीठ दूर शिक्षण योजनेअंतर्गत स्वयंः अध्ययन साहित्य निर्मिती करणेसाठी मा. कुलगुरू यांचे प्रोत्साहन व मौलीक सहकार्य लाभले. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी समाजशास्त्र विभाग प्रमुख, दूरशिक्षण केंद्राचे संचालक आणि कार्यालयीन सेवक यांनी बहुमोल सहकार्य केले आहे. सहलेखकांनीही लेखनकार्यात बहुमोल योगदान दिलेले आहे. या सर्वांचे संपादक म्हणून मी मनःपूर्वक आभार मानतो.

■ **संपादक** ■

**प्रा. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**पेपर–३ : भारतातील सामाजिक समस्या**
**पेपर–५ : लिंगभाव आणि हिंसाचार**
**बी. ए. भाग–२ : समाजशास्त्र**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–३ घटक क्रमांक | सत्र–४ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **प्रा. बबन रणजित पाटोळे**<br>समाजशास्त्र सहाय्यक प्राध्यापक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ | ३ |
| **श्रीमती मिना सावंत**<br>म. ह. शिंदे महाविद्यालय, तिसंगी | २ | २ |
| **प्रा. रमेश पाटील**<br>कुसूमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली | ३ | ४ |
| **डॉ. विनोदकुमार धोंडिराम कुंभार**<br>पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव | ४ | – |
| **प्रा. मच्छिंद्र सकटे**<br>सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज, उंब्रज, जि. सातारा | – | १ |

■ **संपादक** ■

**प्रा. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सत्र–३ : पेपर–३** | |
| | **भारतातील सामाजिक समस्या** | |
| १. | सामाजिक समस्या | १ |
| २. | सामाजिक सांस्कृतिक समस्या | १७ |
| ३. | सामाजिक आर्थिक समस्या | ४१ |
| ४. | सामाजिक वैधानिक समस्या | ६६ |
| | **सत्र–४ : पेपर–५** | |
| | **लिंगभाव आणि हिंसाचार** | |
| १. | लिंगभाव आणि हिंसाचार | ८९ |
| २. | कौटुंबिक हिंसाचार | १०३ |
| ३. | महिलांवरील हिंसाचार | १३१ |
| ४. | कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा होणारा छळ | १६९ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१९-२० पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १
# सामाजिक समस्या
## ( Social Issues )

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ सामाजिक समस्याचे स्वरूप

१.२.२.सामाजिक समस्यांचे वर्गीकरण

१.२.३ सामाजिक समस्येच्या अध्यायनाची गरज

१.३ सारांश

१.४ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

१.५ सरावासाठीचे प्रश्न

१.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

**१.० उद्दिष्ट्ये :**

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास–

१. सामाजिक समस्येचे स्वरूप समजून घेता येईल .

२. सामाजिक समस्येचे वर्गीकरण करता येईल.

३. सामाजिक समस्येच्या अध्ययनाची गरज समजावून घेता येईल.

**१.१ प्रास्ताविक :**

सामाजिक समस्या हा समाजशास्त्रातील अतिशय महत्त्वाचा असा विषय मानला जातो. सामाजिक समस्येचा आहे व्यक्तीवर परिणाम होतो तसेच त्याचा परिणाम संपूर्ण अथवा समग्र समाजावर होऊन समाजातील प्रत्येक व्यक्ती ही समस्याग्रस्त बनते. सामाजिक समस्याचे स्वरूप हे व्यापक आहे. जगामध्ये असा कोणताही देश सामाजिक समस्या पासून अलग नाही किंवा त्या समस्येतून सुटलेला नाही. राज्य असो देश असो अथवा विश्व असो यांना कोणती ना कोणती सामाजिक समस्या असते. या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहणे गरजेचे

असते. सामाजिक समस्या मानवनिर्मित असल्यामुळे त्याचे परिणाम मानवी समाजाला भोगावेच लागतात यातून सामाजिक विस्कळीतपणा निर्माण होऊन सामाजिक स्वास्थ्य बिघडते. प्राचीन काळात ज्याप्रमाणे सामाजिक समस्या होत्या त्याप्रमाणे आधुनिक समाजात ही विविध सामाजिक समस्या आहेत. काळानुरूप प्राचीन काळातील समस्या आज असतीलच असे नाही परंतु बदलत्या काळात सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय या परिस्थिती नुसार सामाजिक समस्यांचे स्वरूप बदलले आहे.१९ व्या शतकात सती प्रथा, बालविवाह, अस्पृश्यता, केशवपन, विधवा विवाह इत्यादी सामाजिक समस्या होत्या. मात्र अलीकडे या सामाजिक समस्या कमी प्रमाणात आढळून येतात. सामाजिक बदलानुसार कुटुंब विघटन,बालगुन्हेगारी, लोकसंख्येची समस्या, बेकारी, घटस्फोट, काळाबाजार, भ्रष्टाचार, शेतकरी आत्महत्या, नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या इत्यादी अनेक नवीन समस्या निर्माण झाल्या यावरुन हे सांगता येते की, प्रत्येक कालखंडात सामाजिक समस्या येतात सामाजिक समस्यांचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अध्ययन समाजशास्त्रात केले जाते.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ सामाजिक समस्याचे स्वरूप

भारतातील सामाजिक समस्यांचा विचार करणे हे आधुनिक काळात फारच गरजेचे आहे. कारण भारतातील सामाजिक प्रश्न दिवसागणिक अधिक गंभीर होत जात आहेत. सामाजिक समस्या मानवनिर्मित असतात. भारतातील बहुतांशी सामाजिक समस्या गुंतागुंतीच्या समाजरचना मुळेच निर्माण झालेल्या दिसून येतात. सामाजिक समस्या मानवी समाज इतक्या प्राचीन आहेत. मानवी जीवनाच्या प्रत्येक कालखंडामध्ये सामाजिक समस्यांचे स्वरूप हे निरनिराळे आहेत. उदा. गरीबी बेकारी हे प्रश्न समाजातील बहुसंख्य लोकांना भेडसावत असल्यामुळे या प्रश्नांना सामाजिक समस्या म्हणून ओळखले जाते. दिवसेदिवस माणसाच्या गरजा वाढत आहेत. मानवी समाजाच्या घरचा एखाद्या समाजातील संस्था आणि संस्कृती या प्रसंगी समायोजन करण्यात अयशस्वी ठरतात तेव्हा त्या अशा समाजात विविध स्वरूपाच्या सामाजिक समस्या निर्माण होतात. सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेच्या माध्यमातून समाज व्यवस्थेमध्ये सामाजिक विघटन घडून येते. या विघटनाच्या प्रक्रियेमुळे किंवा प्रभावामुळे सामाजिक समस्या निर्माण होतात. सामाजिक समस्या प्रती लोकांना आकर्षित करण्यामध्ये जनसंचार माध्यम, टेलिव्हिजन, वृत्तपत्रे, रेडिओ यांची भूमिका हि महत्वपूर्ण आहे.

**सामाजिक समस्यांचा अर्थ : (Meaning of Social Problems)**

सामाजिक समस्यांचा अभ्यास करत असताना सर्वप्रथम सामाजिक समस्या म्हणजे कार्या विषयी जाणून घेणे महत्त्वाचे असते. कोणतीही समस्या ही सामाजिक समस्या असेलच असे नाही, परंतु समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून सदर समस्यांचे निराकारण करणे गरजेचे असते. व्यक्ती समूह दैनंदिन जीवनात समस्या हा शब्द नेहमी वापरत असतो. परंतु कोणतीही समस्या ही सामाजिक समस्या होऊ शकत नाही. म्हणून सामाजिक समस्येचे आकलन करत असताना त्या समस्यांचा अभ्यास करणे गरजेचे बनते. सामाजिक समस्या समजून घेत असताना विविध समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक समस्यांच्या व्याख्या स्पष्ट केले आहेत. त्या व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर सामाजिक समस्यांचा अर्थ स्पष्ट होतो.

### १) मर्टन आणि निसबेट : (Murton and Nisbet)

सामाजिक समस्या म्हणजे एखाद्या समाजातील लक्षणीय संख्येच्या व्यक्तीच्या सामाजिक वर्तनातील बिघाड किंवा पथभ्रष्टता, जी त्या समाजातील इतर अनेक सदस्यांना गंभीर परिणाम भोगावयास लावते. मूलत सामाजिक समस्या या नैतिक समस्या होत.

(Breakdowns or deviations in social behaviour involving a considerable number of people, which are serious concern to many members of the society in which the abbreviations occur. At bottom social problem are problems of moral value - **RANisbet**).

### २) फुल्लर आणि मेयर्स : (Fuller and Myers)

एखाद्या समाजातील बहुसंख्य सदस्य जेव्हां व्यवहाराच्या पद्धतीला किंवा परिस्थितीला आपत्ती कारक अथवा योग्य मानतात, तेव्हा त्या सामाजिक समस्या होत तसेच त्या समस्येचे निराकरण करण्यासाठी आणि त्याची व्याप्ती कमी करण्यासाठी सुधारात्मक धोरणे, योजना व प्रत्यक्ष सेवा कार्याची आवश्यकता आहे. अशी त्या सदस्यांची मान्यता असते. (Social problems are behaviour patterns or conditions that are considered objectionable or underdesirable by many members of a society. Dear members recognise that the corrective policies, programs and services are necessary to cope with and reduce the the scope of this problem.R.C.Fuller and Myers).

### ३) हॉर्टन आणि लेस्ली – (Horton and Leslie)

समाजातील लक्षात घेण्यायोग्य बहुसंख्य व्यक्ती वर परिणाम करणारी अवांछनीय अशी परिस्थिती की, ज्या संदर्भात सामूहिक सामाजिक क्रियेद्वारे काहीतरी उपाययोजना करण्याची आवश्यकता वाटू लागते अशा परिस्थितीला सामाजिक समस्या म्हणतात. (A social problem is a s affecting a significant number of people in waves considered undesirable, about which please felt something can be done through collective social action(Hurton and Leslie).

### ४) विल्यम स्कॉट : William Scoot

अशी कोणतीही अनिष्ठ परिस्थिती की जी, समुदायातील बहुसंख्य लोकांना असे वाटते आणि तिच्या पुनर्रचनेसाठी सामूहिक कृती ची आवश्यकता असते.

### ५) तपन मोहंती :

समाजातील एखाद्या भागात एकोपा टिकून ठेवण्याच्या बाबतीत समाजव्यवस्थेला आलेल्या अपयशामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत सामाजिक समस्या समजतात.

### ७) वॉलेस विव्हर :

उद्दिष्टपूर्तीच्या मार्गात होणारे अडथळे, संघर्ष, तणाव अथवा नैराश्य निर्माण करणारी कोणतीही परिस्थिती म्हणजे सामाजिक समस्या होय.

**सामाजिक समस्याचे स्वरूप : (Nature of social problems)**

### १) बहुसंख्य लोकांची स्वीकृती :

एखाद्या व्यक्तीचे वर्तन योग्य आहे असे दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला वाटल्याने ते वर्तन योग्य आहे किंवा सामाजिक समस्या आहे हे समजणे बरोबर नाही. म्हणून ते ठरविण्यासाठी त्या प्रकारचे वर्तन अयोग्य आहे असे समाजातील बहुसंख्य लोकांना स्वीकारावे लागेल तर त्या वर्तनास सामाजिक समस्या म्हणता येईल. कोणतीही समस्या जोपर्यंत समाजातील बहुसंख्य लोकांना घातक वाटत नाही तोपर्यंत तिला सामाजिक समस्या मानले जात नाही. भारतीय समाजामध्ये अशाच प्रकारच्या अनेक समस्या आजही अस्तित्वात आहेत त्यामध्ये निरक्षरता, अंधश्रद्धा, जातीयता, अस्पृश्यता. या समस्या समाजातील बहुसंख्य लोक समूहाला सामाजिक समस्या आहेत याची जाणीव झाली नाही. भारतीय समाजात अशा विविध प्रश्ना विषयी तज्ञ व्यक्ती अथवा प्रभावशाली व्यक्ती या प्रथांचे विवेचन करतात तेव्हा आणि या प्रथेवर टीका करतात त्यासाठी बैठका, सभा दूरचित्रवाणी, समाजमाध्यमे, वृत्तपत्रे या माध्यमातून आपले मत प्रसारित करतात तेव्हा त्या समस्यांची दाहकता आणि अनिष्टता उघड करतात तेव्हा ती सामाजिक समस्या ठरत असते.

### २) सामाजिक मूल्यांशी विसंगती :

मूल्य हे व्यक्तीचे नैतिक वर्तन ठरते ते व्यक्तीसाठी आदर्श असते. मूल्यानुसार व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वामध्ये परिवर्तन घडून येत असते व व्यक्तीच्या जीवनाला स्वतंत्र दिशा प्राप्त होत असते. समाजातील सभासदाचे कोणते वर्तन योग्य किंवा अयोग्य आहे याची निर्धारण सामान्यपणे केलेल्या सामाजिक मूल्याच्या आधारे निश्चित केले जाते. त्यामुळे लोकांना सामाजिक प्रमाण के व मुले यांना लक्षात ठेवून आपले वर्तन करावे लागते अशी अपेक्षा समाजाची असते. समाजातील काही व्यक्ती मुद्दामून सामाजिक मूल्यांच्या विरुद्ध वर्तन करतात. त्यामुळे समाजात अनेक प्रश्न निर्माण होतात. थोडक्यात सामाजिक मूल्यांच्या विपरीत वर्तन केल्यामुळे जी सामाजिक विघटन करणारी परिस्थिती निर्माण होते ती म्हणजे सामाजिक समस्या होय.

### ३) उपाययोजनाची जाणीव :

सामाजिक समस्येचे स्वरूप ठरवीत असताना.कोणत्याही समस्येवर उपाय योजना ठरवणे गरजेचे असते.म्हणजे जो पर्यंत उपायाची योग्य वेळी जाणीव होत नाही किंवा बहुसंख्य लोकांना त्यांची गरज वाटत नाही तोपर्यंत विशिष्ट सामाजिक परिस्थिती व सामाजिक समस्या म्हणता येणार नाही. समाजात विविध प्रकारच्या सामाजिक समस्या निर्माण झालेल्या असतात. परंतु त्या समस्या आपोआपच नष्ट होत नाहीत. समस्यांचे निवारण करण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या उपाययोजनांची गरज भासते. उदा. वाढती लोकसंख्या ही एक सामाजिक समस्या आहे, आणि ही समस्या सोडवण्यासाठी विविध स्वरूपाच्या उपाययोजना कराव्यां लागतात.

### ४) सामाजिक सापेक्षता :

सामाजिक समस्यांचे स्वरूप समाज समाज समाजानुसार भिन्न भिन्न असू शकते. नीती आणि आणि अनितेच्या कल्पना वेगवेगळे असतात. उदा. भारतातील काही राज्यांमध्ये मध्यपान करणे हा गुन्हा समजला जातो परंतु अमेरिकेसारख्या देशातील समाजामध्ये मद्यपान करणे ही समाजमान्य गोष्ट आहे. म्हणून सामाजिक समस्यांचे स्वरूप समाज सापेक्ष असते.

### ५) सामाजिक आणि नैसर्गिक समस्या :

काही विचारवंतांच्या मते गुन्हेगारी, मद्यपान, भिक्षा वृत्ती, लोकसंख्या वाढ, बेरोजगारी यासारख्या सामाजिक समस्या मानवनिर्मित आहेत. तर दुष्काळ महापूर चक्रीवादळ भूकंप यातून होणारा निर्माण ज्या समस्या आहेत त्या समस्या नैसर्गिक स्वरूपाच्या आहेत. त्यांना सामाजिक समस्या म्हणता येणार नाही परंतु काही विचारवंतांच्या मते नैसर्गिक समस्यातूनच सामाजिक समस्यांची निर्मिती होत असते व त्यातून समाजामध्ये पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होतो. म्हणून त्याला सामाजिक समस्या संबोधता येईल.

### ६) समाजावर अनिष्ट परिणाम :

प्रमाणक्काचे उल्लंघन करणारे वर्तन हे सामाजिक समस्येच्या निर्मितीला कारणीभूत ठरते. समाजाची व्यवस्था सुरळीत असावी या करता विविध प्रकारची प्रमाणे असतात. या प्रमाणकानुसार समाजातील सभासदांनी वर्तन केल्यास समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण होते. परंतु जेव्हा या मूल्यांच्या विरोधात वर्तन केले जाते त्याचा अनिष्ट परिणाम समाजातील बहुसंख्य लोकांवर पडतो. म्हणूनच निर्माण झालेली ही परिस्थिती समाजातील सभासदांना योग्य वाटते. निर्माण झालेली ही परिस्थिती नष्ट कशी करता येईल याचा विचार केला जातो. सामाजिक समस्येचा अनिष्ट परिणाम हा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या समाजावर पडतो.

### ७) सामूहिक सामाजिक क्रिया :

समाजातील विविध सामाजिक समस्या व्यक्तिगत पातळीवर सोडवता येत नाहीत. सामाजिक समस्या सामाजिक कारणामुळे निर्माण झालेल्या असतात. त्यामुळे त्या समस्या सोडवण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक असते. सामूहिक क्रियेच्या माध्यमातून समस्या सोडवण्यास संदर्भात प्रयत्न झाल्यास ती समस्या सोडवणे सहज शक्य होते. उदाहरणार्थ भ्रष्टाचार, मद्यपान, बालगुन्हेगारी, वाढती लोकसंख्या इत्यादी सामाजिक समस्या या व्यक्तिगत पातळीवर सोडवणे अशक्य आहे त्यासाठी सामूहिक सामाजिक क्रियेची आवश्यकता भासते.

## सामाजिक समस्येची कारणे : Causes of Social Problems

सामाजिक समस्या या मानवनिर्मित असतात त्या समाजातून उत्पन्न झालेल्या असतात. साहजिकच त्यामुळे कोणतीही सामाजिक समस्या निर्माण होण्यामागे त्या समाजातील सामाजिक परिस्थिती जबाबदार असते. कोणत्याही एका विशिष्ट प्रकारच्या कारणातून व त्याच्या परिणामातून सामाजिक समस्या निर्माण होत नाही. तर विविध घटकाच्या प्रभावातून या समस्या उगम होत असतात. अनेक घटक त्यासाठी जबाबदार असतात त्या

घटकांचे विश्लेषण खालीलप्रमाणे करता येईल.

**१) सामाजिक परिवर्तन :**

सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजरचनेत संरचनेत झालेला बदल होय. परिवर्तनशीलता ही प्रत्येक समाजाची प्रवृत्ती आहे. त्याशिवाय कोणत्याही समाजात स्थिरता राहू शकत नाही. म्हणजे समाज हा एकाच अवस्थेत अधिक काळ राहण्यासाठी त्यामध्ये सातत्याने परिवर्तन होत असते कारण परिवर्तन हा निसर्गाचा एक नियम आहे. समाज व्यवस्था हे देखील त्याला अपवाद असू शकत नाही. १९९१ च्या जागतिकीकरणाने विविध व्यवसाय वरती म्हणजेच हस्त उद्योगावरती त्याचा विपरीत परिणाम झाला. त्यामुळे एकीकडे प्रगती तर दुसरीकडे अनेक बेकारीच्या समस्या निर्माण झाल्या. जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण या धोरणामुळे संपूर्ण समाजामध्ये संरचनात्मक बदल घडून आला.

**२) सामाजिक विघटन :**

हिंदू समाज हा संघटन आणि विघटन यासारख्या प्रक्रियेतून जात आहे. विघटन म्हणजे संघटित नाही. जेव्हा समाजाची सुरळीत अशी व्यवस्था विस्कळीत होते त्यावेळी समाजाची विघटन झाले असे समजावे. नैसर्गिक संकटाबरोबर सामाजिक, आर्थिक संकटामुळे विघटनाची प्रक्रिया जोर धरू शकते. राजकीय संकटामुळे १९४७ मध्ये हिंदुस्तानची जी फाळणी झाली त्यातून भारत आणि पाकिस्तान अशा दोन राष्ट्राची निर्मिती झाली. राजकीय धोरणामुळे हिंदू आणि मुस्लिम यांचे भारत आणि पाकिस्तानमध्ये स्थलांतर झाले. या स्थलांतरामुळे भारतामध्ये मोठ्या प्रमाणात पाकिस्तान मधील लोक निर्वासित म्हणून आलेत. अशा लोकांची पुनर्वसनाची समस्या मोठ्या प्रमाणात भारतामध्ये निर्माण झाली. याबरोबरच नैसर्गिक कारणामुळे देखील सामाजिक समस्यांची निर्मिती होते.

**३) व्यक्तिगत विघटन :**

व्यसनाधीन लोक मानसिक विकृती असलेले लोक जुगार आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा भरणा समाजामध्ये अधिक झाल्यास समाजात विविध प्रकारच्या समस्या उद्भवतात. अशा व्यक्ती आपल्या व्यक्तिगत जीवनात वैफल्य या भावनेने पछाडलेले असल्यामुळे त्यांची वर्तणूक सामाज विघातक बनते. त्यामुळे समाजात सामाजिक समस्या निर्माण होण्यास पोषक वातावरण तयार होते.

**४) मूल्यसंघर्ष :**

कोणत्याही समाजव्यवस्थेत व्यक्तीने मूल्य प्रमाणक व्यवस्थेनुसार वर्तन करणे अपेक्षित असते. ही वर्तन प्रणाली सामाजिकीकरण प्रक्रियेद्वारा व्यक्तीवर बिंबवली जाते. परंतु समाज हा परिवर्तनशील आहे. ज्यावेळेस समाजात परिवर्तन करून येते त्या वेळी समाजातील जुनी प्रमाणक व्यवस्था व नवीन प्रमाणक व्यवस्था यात संघर्ष घडून येतो. प्रत्येक समाजामध्ये अनेक प्रकारचं गट आणि उपगट असतात. त्या सर्वांची मूल्ये सारखीच असत नाहीत. त्यामुळे परस्परांमध्ये मूल्यसंघर्ष निर्माण होतो. उदाहरणार्थ धर्म, जात, भाषा, प्रदेश इत्यादी आधारावर मूल्य संघर्ष निर्माण होतो त्यातून समाजात जातीय दंगली, धार्मिक, भाषिक आणि प्रांतिक वाटचाल यासारख्या समस्या

निर्माण होतात. त्यातून विविध समस्यांची निर्मिती होते समाजातील बहुसंख्य लोक जुन्या मूल्य प्रमाणक व्यवस्थेला चिकटून असतात त्यामुळे समाजात मूल्य संघर्ष निर्माण होतो.

**५) नियमबाह्य वर्तन :**

सामाजिक नियमांचे समाजातील सर्वच व्यक्ती कडून काटेकोरपणे पालन होऊ शकते असे नाही. अशा व्यक्ती कायद्याचे उल्लंघन करू शकतात याचा अर्थ असा की, ज्या व्यक्ती नियमबाह्य वर्तन करतात त्या शारीरिक व मानसिकदृष्ट्या निरोगी असू शकत नाहीत. तेव्हा अशा पध्दतीने रॉबर्ट मर्टन यांनी नियमबाह्य वर्तनाचे समाजशास्त्रीय विवेचन केलेले आहे. काही वेळेस मानसिक अस्वस्थता विचलित असलेल्या व्यक्तीकडून नियमबाह्य वर्तन घडते. कारण त्या व्यक्तीस सामाजिक नियमांचे भान राहत नाही. बऱ्याचदा व्यक्ती नियमबाह्य मार्गाने आपल्या मर्यादा तोडत असतात. त्यामुळे समाज व्यवस्था कोलमडते. त्यातून समाजात अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात. उदाहरणार्थ गुन्हेगारी आणि भ्रष्टाचार ही प्रवृत्ती नियमबाह्य वर्तनातूनच उद्भवलेली समस्या आहे.

**६) सांस्कृतिक पाश्चायन :**

कोणत्याही समाजात सांस्कृतिक परिवर्तन होताना संस्कृतीचे सर्व भाग समान गतीने बदलत नाहीत. संस्कृती जीवनव्यापी असून, जीवनावरील सर्व भागांमध्ये होणारे परिवर्तने समान गतीने न झाल्यास काही भाग पुढे जातात किंवा काही भाग तसेच म्हणजे मागे राहतात. यालाच सांस्कृतिक पशच्यायन म्हटले जाते. भारतीय समाजात तर सांस्कृतिक पशच्यायनाने अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्याचे आढळते. ब्रिटिश राज्य सत्तेत भौतिक संस्कृती झपाट्याने बदल झाला. आगगाडी, बस यांनी वाहतूक सुरू झाली पण त्यासाठी लागणारी शस्त्र नियम पालन सामाजिकता लोकांनी स्वीकारलेली नाही. औद्योगिककरणाने सर्व लोकांना काम मिळाले. त्याचबरोबर रिकाम्या वेळेचा उपयोग करण्याची साधने उपलब्ध झाली नाहीत. स्त्रियांना शिकून नोकरी करण्याच्या बाबतीत समाज बदलला पण अन्य बाबतीत स्त्री-पुरुषांची जुनीच मापे राहिले आहेत.

**७) सामाजिक कायदे आणि बंधने :**

सध्याचे राज्य स्वतःला कल्याणकारी राज्य म्हणून घेते. सामाजिक सुधारणा पुनर्रचना विकास करण्याची जबाबदारी आज राज्यावर आहे. समाज हित डोळ्यासमोर ठेवून राज्य अनेक कायदे करते पण तो कायदा होताच त्यातून नवीन समस्या जन्माला येतात. उदाहरणार्थ मद्यपान बंदी केल्याने दारू पिणाऱ्याची, विकणाऱ्यांची संख्या वाढल्याने गुन्हेगारीचे प्रमाण वाढले. सुवर्ण नियंत्रकांच्या कायद्याने सोनारांना बेकार केले व सोन्याचा चोरटा व्यापार सुरू झाला. बेकारी भत्ता दिल्याने लोकांची इतका वृत्ती वाढीस लागली असेही लोक म्हणू लागले. थोडक्यात जसेच्या जसे कायदे करतील. बंधने घातली जातील. तसतशा सामाजिक समस्या निर्माण होताना आढळतात. सामाजिक समस्यांची उपज ही विविध मुद्यांच्या आधारे होत असते त्याला काही सांस्कृतिक घटक, सामाजिक घटक, आर्थिक घटक, राजकीय घटक व संरचनात्मक घटक जबाबदार असतात या कारणातून सामाजिक समस्या निर्माण होत असतात.

### १.२.२ सामाजिक समस्यांचे वर्गीकरण

समाज हा सामाजिक संबंधांचे जाळे आहे. समाज हा याच सामाजिक संबंधातून निर्माण होत असतो. समाज निर्मितीची प्रक्रिया आहे प्रदीर्घ गुंतागुंतीची आणि दीर्घकालीन असते. व्यक्तीच्या अस्तित्वाशी आणि सातत्याची तसेच व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासाची संबंधित मूलभूत गरजा असतात आणि या गरजांची पूर्तता करण्यासाठी समाजामध्ये सामाजिक संबंध निर्माण होत असतात. परस्परांच्या आंतरक्रियेतून आणि सामाजिक संबंधातून समाज अस्तित्वात येत असतो. सामान्यपणे समाज आणि सामाजिक संबंधांमध्ये आदर्श अशा आचार विचार आणि त्यांच्या विरोधी परिस्थिती निर्माण होते त्या परिस्थितीला सामाजिक समस्या म्हणून संबोधले जाते. समाज सातत्याच्या निर्मितीबरोबरच सामाजिक समस्या निर्माण झालेल्या आहेत सहाजिकच, सामाजिक समस्या मानवी समाजाइतकाच प्राचीन आहेत. मानवी समाजाच्या विकासाच्या प्रत्येक कालखंडात कमी-अधिक प्रमाणात सामाजिक समस्या प्रचलित होत्या. भारतात एकोणिसाव्या शतकात सती प्रथा, बालविवाह, अस्पृश्यता या सारख्या अनेक गंभीर सामाजिक समस्या होत्या. तर आज कौटुंबिक हिसाचार, बेकारी, बालगुन्हेगारी, भ्रष्टाचार यासारख्या समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. सामाजिक समस्या सार्वत्रिक आणि सर्वकालिक आहेत. परंतु प्रत्येक समाजात आणि प्रत्येक कालखंडात सामाजिक समस्यांचे स्वरूप सारखे नसते याची चर्चा आपण केलीच आहे. नैसर्गिक आणि सामाजिक परिस्थितीमध्ये सतत परिवर्तन होत असल्यामुळे समाजाची मूल्ये व प्रमाणात त्यामध्ये बदल होतात वा नव्या जुन्या मूल्यात संघर्ष निर्माण होतो व त्यातून काही समस्या निर्माण होतात. जगातील सर्वच देशात प्रत्येक मानवी समाजात कोणत्या ना कोणत्या सामाजिक समस्याला त्या देशाला, व्यक्तीला आणि त्या राज्याला सामोरे जावे लागतेच. इतर देशांपेक्षा भारतीय समाजात काही विशिष्ट सामाजिक समस्या समोर आहेत, ज्या आपल्या विशिष्ट सांस्कृतिक व सामाजिक संरचनेत निर्माण झालेल्या आहेत. समाज ज्या सामाजिक समस्यांचा सामना करतो त्या सर्वसाधारण विविध स्वरूपाच्या असतात. या सर्व सामाजिक समस्या विविध प्रकारच्या सामाजिक समतेच्या वर्गीकरणात विभागल्या जातात. सामाजिक समस्यांचे प्रकार केस आणि फुल्लर व मायर्स यांनी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**अ) कलॅरेन्स मार्शल केस :** यांनी सामाजिक समस्यांच्या संरचनात्मक आधारावर सामाजिक समस्येचे वर्गीकरण चार भागात केले आहे.

१) भौतिक पर्यावरणाच्या घटकातून उद्‌भवणाऱ्या समस्या.

२) लोकसंख्येमुळे उगम पावणाऱ्या समस्या.

३) अशक्त सामाजिक संघटनामुळे निर्माण झालेल्या समस्या.

४) समाजाच्या सांस्कृतिक मुल्यात निर्माण झालेल्या अथवा संघर्षातून उद्‌भवणाऱ्या समस्या.

**ब) फुल्लर व मायर्स :** यांच्या मते प्राथमिक आधारावर सामाजिक समस्याची तीन प्रकारात विभागणी करता येते.

**१) भौतिक समस्या :** भौतिक भौतिक प्रकारच्या समस्या सर्वसाधारणपणे पर्यावरणीय प्रकारच्या

परिस्थिती निर्माण होतात. या समस्या मुल्यसंघर्षावर आधारित नसतात. उदाहरणार्थ भूकंप, दुष्काळ, महापूर, अवर्षण, वादळ इत्यादी.

**२) सुधारात्मक समस्या :** सुधारात्मक समस्यांच्या दुष्परिणामांची जाणीव समाजातील लोकांकडे असते. या समस्या विरोधी लोकाकडे कोणतीच निश्चित अशी उपायोजना असत नाही. उदाहरणार्थ गुन्हेगारी, दारिद्र्य, एड्स, मादक पदार्थ सेवन वैगेरे.

**३) नैतिक समस्या :** नैतिक समस्या समाज मूल्यांशी संबंधित असतात. या समस्यांच्या कारणाशी सामान्य लोकांमध्ये सहमती असत नाही जुगार,घटस्फोट वगैरे. समाजामध्ये सर्व प्रकारच्या सामाजिक समस्या आढळत असतात. या सामाजिक समस्या पासून मुक्त असा कोणताही समाज नाही. सामाजिक समस्यांचे स्वरूप हे संमिश्र स्वरूपाचे असते. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय घटकांच्या मुळे सुद्धा सामाजिक समस्या निर्माण होतात तर, काही तज्ञांच्या मते, जलद परिवर्तन, दोन पिढ्यांतील अंतर, सामाजिक संस्थांचे असमायोजन, मूल्य संघर्ष अशा प्रकारच्या परिस्थितीमुळे समाजामध्ये विविध सामाजिक समस्या उद्‌भवत असतात. केस आणि फुलर व मायर्स यांनी केलेल्या सामाजिक समस्यांच्या वर्गीकरण आवरून सर्वसाधारणपणे सामाजिक समस्या पुढील प्रकारांमध्ये विभागता येतील.

**१) भौतिक किंवा पर्यावरणीय समस्या :**

भौगोलिक किंवा भौतिक परिस्थिती मध्ये जेव्हा कमी-अधिक प्रमाणात बदल होतात त्यातून पर्यावरणीय समस्या निर्माण होत असतात. ज्वालामुखी उद्रेक, पूर, भूकंप, दुष्काळ, महापूर वादळ, यासारख्या समस्या या निसर्गातील होणाऱ्या बदलामुळे अस्तित्वात येत असतात त्याचबरोबर पर्यावरण प्रदूषण परिस्थिती जेव्हा अस्तित्वात येते तेव्हाही विविध सामाजिक समस्यांची निर्मिती होत असते. उदाहरणार्थ वैश्विक तापमान वाढ, महापुर,महामारी, इत्यादी.

**२) परंपरागत समस्या :**

भारतीय समाज व्यवस्था किंवा कोणत्याही मानवी समाजात काही पारंपारिक समस्या आपल्याला भेडसावतात त्यामध्ये अंधश्रद्धा, स्त्रीभ्रूण हत्या, बुवाबाजी, भोंदूगिरी, भिक्षा वृत्ती, अवैज्ञानिकता.

**३) आर्थिक प्रकारच्या समस्या :**

भारत हा विकसनशील देश असल्यामुळे भारतामध्ये जगातील लोकसंख्येचे प्रमाण दुसऱ्या क्रमांकावर आहे. प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात संसाधनाच्या उपलब्धते नुसार प्रतिकूल आर्थिक समस्या निर्माण होऊ शकतात. याचं परिस्थितीतून या समस्या निर्माण झालेल्या आहेत. भारतामध्ये संपत्तीचे असमान वितरण होत असल्यामुळे दारिद्र्य बेकारी गुन्हेगारी भिक्षा चोरी झोपडपट्टी अशा अनेक समस्या निर्माण होतात.

**४) औद्योगिकीकरण आणि नागरीकरण आतून निर्माण झालेल्या समस्या :**

औद्योगिकीकरणामुळे नवनवीन उद्योगधंद्याची निर्मिती होते. त्यामुळे नागरिकीकरणाला चालना मिळते.

नवनवीन तंत्रज्ञानामुळे कुटीर उद्योग बंद पडतात आणि अद्यावत तंत्रज्ञान व प्रचंड प्रमाणात असलेली यंत्रसामग्री यामुळे बेकारीची समस्या निर्माण होते. वाढत्या शहरीकरणातून झोपडपट्टी, घरांची टंचाई, ऊर्जा टंचाई, वाहतुकीचा ताण, अपघात, कामगार समस्या, आरोग्याचे प्रश्न, जल प्रदूषण, हवा प्रदूषण, पाणी प्रदूषण, सामाजिक विघटन अशा विविध समस्या निर्माण होतात.

**५) राजकीय स्वरूपाच्या सामाजिक समस्या :**

राजकीय सत्ता प्राप्त करण्याच्या अनुषंगाने अनेक सामाजिक समस्या यांना प्रोत्साहन दिले जाते. हे प्रोत्साहन हे राजकीय हेतूने दिले जाते त्यामुळे अनेक गंभीर स्वरूपाच्या समस्या निर्माण होतात. राजकीय पक्ष निवडणुका राजकीय सत्ता राजकीय महत्वकांक्षा यातून राजकीय प्रकारच्या विविध समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते. उदा. सांप्रदायिकता, दहशतवाद, प्रांतवाद इत्यादी.

**६) धार्मिक समस्या :**

धर्म माणसाचे वर्तन नियंत्रित करत असतो. जगात असा एकही देश नाही ज्या देशांमध्ये धर्माचे अस्तित्व नाही. धर्म माणसाच्या अस्तित्वाचे मुख्य अंग मानले जाते. वास्तविकपणे अलौकिक शक्ती वरील श्रद्धा म्हणजे धर्म होय. धर्मामुळे व्यक्ती वर्तनामध्ये आपलेपणा प्रेम-भाव, मानवता, समता प्रस्थापित होणे अपेक्षित असते, परंतु या धार्मिकततून अनेक सामाजिक समस्या उद्‌भव होताना दिसून येतात स्वतःचे स्वार्थी वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी समाजामध्ये धार्मिक तेढ निर्माण केली जाते. त्याच बरोबर धार्मिकता मूलतत्त्ववाद, सांप्रदायिक दंगली, अंधश्रद्धा, भिक्षा वृत्ती आणि दहशतवाद पसरवला जातो.

**७) नैतिक समस्या :**

समाजामध्ये नैतिक्ता ही व्यक्तिच्या समाज मूल्यांशी निगडित असते. मूल्याच्या विरोधी वर्तन केल्यामुळे काही समस्या निर्माण होतात. उदाहरणार्थ व्यसनाधीनता, वेश्यावृत्ति, बाल दुरुपयोग, बलात्कार इत्यादी.

**८) सामाजिक स्वरूपाच्या समस्या :**

व्यक्ती समूह यांच्या परस्पर संबंधातून समाज अस्तित्व टिकून राहते. सामाजिक संबंधांमध्ये बाधा आल्यास सामाजिक संबंध यामध्ये विस्कळीतपणा निर्माण होऊन सामाजिक संरचनेला बाधा होते, तेव्हा सामाजिक विघटन घडून येत असते. समाजव्यवस्थेतील सामाजिक नियंत्रणाचे साधने प्रभावहीन बनू लागतात परिणामी, सामाजिक समस्यांची निर्मिती होते. गुन्हेगारी, भ्रष्टाचार, काळाबाजार, हुंडाबळी, स्त्रिया विरोधी, हिंसात्मक कृत्य या सारख्या अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. थोडक्यात, सामाजिक समस्या ही एकूण समाजाला धोका किंवा अडथळा निर्माण करणारी सामाजिक समस्या मांनली जाते. सामाजिक समस्या ही राष्ट्रहितामध्ये अडथळे आणते. सामाजिक समस्या मुळे मानवी हक्कांचे उल्लंघन होते. सामाजिक समस्या मुळे अनेक प्रकारच्या समस्या मूलभूत असल्या तरी त्याचे निराकरण करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते समाजशास्त्रज्ञ यांचे सातत्याने प्रयत्न सुरू असतात.

### १.२.३ सामाजिक समस्येच्या अध्ययनाची गरज : (Need of study of Social Issues)

सामाजिक समस्यांचे अस्तित्व हे समाजामध्ये चिरकाल असते. समाजामध्ये अनेक सामाजिक समस्या असतात. उदाहरणार्थ. गरीबी, बेरोजगारी, जातीभेद, दारिद्र्य, कुपोषण, महागाई, हुंडा, अंधश्रद्धा, निरक्षरता ज्या देशात राज्यात अनेक सामाजिक समस्या निर्माण होत असतात. अशा ठिकाणी या समस्येविषयी निश्चित अशी ध्येयधोरणे आखलेली नसतात. सामाजिक परिवर्तनही मंदगतीने होत असते सहाजिकच या प्रक्रिया वरती अनेक सामाजिक घटकांचा प्रभाव होत असतो. त्यामुळे सामाजिक समस्यांचे प्रमाण हे कमी होते. सामाजिक समस्यांची जाणीव ही भारतीय समाज व्यवस्थेमध्ये फारच उशिराने झाल्याचे दिसून येते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे जेव्हा बुद्धिप्रामाण्यवादास महत्त्व देण्यात येऊ लागले तेव्हा या समस्यांचे प्रकटीकरण झाले. सामाजिक समस्या या प्रश्नाकडे स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणावे तितके लक्ष दिले गेले नाही. कारण भारतीय समाज हा रुढीप्रिय, दैववादी, या विचारांच्या कक्षेत अडकल्यामुळे त्याचबरोबर समाजात उद्‌भवणाऱ्या समस्या दैवी कोपाने वाढवतात या श्रद्धेतून त्याचे निराकरण होते अशा ही धारणा होत्या कर्म तसे फळ भोगावे लागतात अशा भावनेतून सामाजिक समस्यांना प्रोत्साहन मिळाल्याचे दिसून येते. परंतु भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये समाजशास्त्र या अभ्यासाच्या अध्ययनाची सुरुवात १९१९ पासून झाली त्यानंतर अनेक सामाजिक समस्यांच्या वरती प्रकाश टाकण्यात आला. समाजशास्त्र मध्ये समाजाचा अभ्यास तार्किक दृष्ट्या केला जातो त्याचे स्वरूप व्यापक असते. समाजशास्त्र मध्ये सामाजिक संबंध समूह संस्था कार्य सामाजिक प्रक्रिया सामाजिक परिवर्तन या विविध अंगाने समाजाचा अभ्यास केला जातो. त्यामुळे सामाजिक समस्या समाजशास्त्रात होतो. मानवी समाजात स्थैर्य आणि व्यवस्था निर्माण करणाऱ्या घटकांचा अभ्यास सामाजिक शास्त्रांमध्ये होत असतो कारण समाजशास्त्र हे सामाजिक स्थिती आणि गती याचा अभ्यास करते. ज्या समाजात वेगाने परिवर्तन होते त्या समाजात सामाजिक विघटनाची प्रक्रिया ही वेग घेत असते. या प्रक्रियेत अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. त्यामुळे समाजात अस्थैर्य निर्माण होते. सामाजिक समस्येने अनेक लोकांचे कौटुंबिक विघटन घडून येते म्हणून अशा सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे हे समाजशास्त्राचे अत्यंत महत्त्वाचे अभ्यास क्षेत्र बनले आहे. ज्या विशिष्ट सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीत समाजशास्त्राचा उदय आणि आरंभ झाला हे पाहिले असता सामाजिक समस्याच्या अभ्यासात समाजशास्त्र प्रारंभी पासून त्याचे असणारे महत्त्व हे लक्षात येते. समाजशास्त्राचा उदय एकोणिसाव्या शतकात झाला हा उदय एकोणिसाव्या शतकात प्रामुख्याने यूरोपात झाला. नंतर जगभरात समाजशास्त्राचा विकास झाला. पुढे भांडवलशाही अर्थव्यवस्था, औद्योगिकीकरण, नागरीकरण यासारख्या प्रक्रियामधून सामाजिक परिवर्तन वेगाने होऊ लागले. पण त्याचबरोबर नव्या बदलांनी सामाजिक जीवन स्थैर्य व शांतता अव्यवस्था ज्या समस्या निर्माण झाल्या. सामाजिक विघटनातून अनेक नव्या समस्या निर्माण झाल्या. समाजात नेमके काय घडत आहे हे जाणून घेण्याची आणि नव्या बदलाची जुळवून घेता येईल याविषयी गंभीरपणे विचार करण्याची आवश्यकता अनेक समाजशास्त्रज्ञांना जाणवू लागली. त्यातून समाजाविषयीचे नवीन शास्त्र समाजशास्त्र उदयाला आले आणि विकसित झाले. समाजशास्त्राच्या विकासाचा मागील प्रमुख प्रेरणा म्हणजे त्या काळात सामाजिक समस्या जाणून घेणे व त्याचे निराकरण करून त्यावर उपाय योजना शोधून काढणे हे होय. आज भारतातील सामाजिक समस्या पैकी काही समस्या या सार्वत्रिक स्वरूपाच्या आहेत यामध्ये कौटुंबिक विघटन, बेकारी, बेरोजगारी, दारिद्र्य, कुपोषण,

महागाई, अनारोग्य, घटस्फोट, बाल गुन्हेगारी, भ्रष्टाचार, झोपडपट्टी, मद्यपान, जुगार, भिक्षावृत्ती, वृद्धांच्या समस्या इत्यादी. या समस्या बरोबरच भारतीय समाजात इतर समस्याही आहेत त्यामध्ये लोकसंख्याचा स्फोट, अनुसूचित जाती जमातीच्या समस्या, अस्पृश्यता जातीयता हुंडाबळी अल्पसंख्यांकांचे प्रश्न, भाषावार प्रांत रचना, राष्ट्रीय एकात्मता विविध सामाजिक समस्या अध्ययन करणे आणि साऱ्या समस्या समजून घेऊन त्याचे निराकरण करण्याची उपाय शोधून काढणे या दृष्टीने समाजशास्त्र सतत अध्ययन करत असते. सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी सामाजिक विचारवंतांनी आपले योगदान विविध सिद्धांताच्या आधारे दिले आहे. त्यामध्ये बी. आर. आंबेडकर, ऑगस्त कॉम्स, मॅक्स वेबर, ईमील डुरखैम कार्ल मार्क्स या विचारवंताने सामाजिक समस्यांचे निराकरण करण्याचे तसेच सामाजिक सिद्धांताच्या व सामाजिक पुनर्निर्मितीचा विचार मांडला. महात्मा गांधी व तात्कालीन लोकांनी मध्यपान, जातीयता स्त्रियांची दुःखे यासारख्या प्रश्नाकडे लक्ष वेधून घेतले तथापि ब्रिटिश राज्यकर्ते याबाबत उदासीन राहिले त्यामुळे हे प्रश्न कायम राहिले. जलद गतीने होणारे औद्योगीकरण आणि नागरीकरण त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्या जितक्या प्रखरतेने पाश्चात्य राष्ट्रातून जाणवल्या नाहीत. कारण सुरुवातीला भारतात औद्योगिकीकरणाची प्रक्रिया संथ गतीने होत होती. पाश्चात्य राष्ट्रप्रमाणे कल्याणकारी राज्याच्या कल्पनेची सुरुवात झाली. त्यामुळे सामाजिक समस्यांची चिकित्सा करून निराकरण करण्याचे प्रयत्न या राष्ट्रातून झाले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात सरकारने जरी कल्याणकारी राज्याची कल्पना स्वीकारली असली तरी देशासमोरील विविध सामाजिक समस्यांचे निराकरण करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली असली तरी निर्वासितांचा प्राधान्याचा प्रश्न, अन्नधान्याचा प्रश्न, संस्थांन विलीनीकरणाचा प्रश्न यासारख्या ज्वलंत प्रश्नांना त्यावेळच्या सरकारांना सामोरे जावे लागत होते. उपरोक्त प्रकारच्या कारणांमुळे सामाजिक समस्यांचा विचार करणे त्याकडे लक्ष केंद्रित करण्यास दिरंगाई झाली. असे असले तरी आता मात्र सामाजिक समस्यांचे अध्ययन याची नितांत आवश्यकता असल्याचे दिसून येते. समाजशास्त्र सामाजिक समस्यांचा अभ्यास करतच असते. पण त्याचबरोबर सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते, पत्रकार, सामान्य लोक हे सामाजिक समस्यांची दाहकता समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न करतात. त्यावरील उपायाबाबतचा महत्वाचा विचार ही करतात. इतर सामाजिक शास्त्रे सामाजिक समस्यांचा अभ्यास करत असली तरी त्यांच्या अभ्यासाला विशिष्ट बाजूच्या मर्यादा असतात. समाजशास्त्र असे शास्त्र आहे की, त्यामध्ये मानवाच्या सर्वच प्रकारच्या सामाजिक समस्यांची कारणे त्याच समाजावरील त्यांचे परिणाम यांचे वस्तुनिष्ठ विश्लेषण देतात. समाजातील व्यक्ती समूह संस्था तसेच समग्र समाजावर सामाजिक समस्यांचे कोणते ना कोणते परिणाम होतात याचे अध्ययन समाजशास्त्रज्ञ करतात. मानवी समाजातील सामाजिक समस्यांचे गांभीर्य लक्षात घेता सामाजिक समस्यांच्या अध्ययनाची आवश्यकता लक्षात येते. समाज विकासासाठी सामाजिक पुनर्निर्मिसाठी सामाजिक प्रश्नांच्या अध्ययनाची नितांत आवश्यकता आहे. भारतीय संविधानात कल्याणकारी राज्य त्याच बरोबर मार्गदर्शक तत्वे हे राज्याच्या कल्पनेचे ध्येय बाळगले असून लोकांना अधिकाधिक सेवा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सोपवली आहे. आधुनिक कल्याणकारी राज्याच्या कल्पनेत आर्थिक राहणीमान, सार्वजनिक आरोग्य,व स्वास्थ वैद्यकीय मदत,कामगार कल्याण, समाज कल्याण व समान शिक्षण यासारख्या विधायक संरक्षणात्मक सोयीची उभारणी यांचा समावेश होतो.

**१) सामाजिक परिवर्तन :**

मानवी समाज हा परिवर्तनशील आहे. मानवी समाजामध्ये सातत्याने परिवर्तन होत असते सामाजिक विकासाला गती मिळत असते. ह्या या गतिशील तेथूनच अनेक समस्या निर्माण होत असतात. या निर्माण होणाऱ्या समस्याकडे लक्ष केंद्रीत करणे गरजेचे असते. समाजाचा विकास साध्य करायचा असेल तर येणाऱ्या समस्यांचे निराकरण शोधले पाहिजे म्हणूनच सामाजिक समस्यांच्या अध्ययनाची निकड आहे. त्यामुळे समाजाच्या विकासाची पावले गतिशील बनतील.

**२) बदलती मूल्य व्यवस्था :**

सामाजिक मूल्ये सामाजिक वर्तनामध्ये परिवर्तन घडवून आणत असतात. सामाजिक मूल्यात बाधा झाल्यास समाज जीवन विस्कळीत होते. सामाजिक जीवन विस्कळीत झाल्यास संघटन निर्माण होणार नाही. सामाजिक मूल्ये बदलली की व्यक्तीचा दर्जा भूमिका यामध्ये बदल होतो. जुन्या व नव्या मूल्यात संघर्ष निर्माण झाला की सामाजिक विघटनाची प्रक्रिया सुरू होते. या प्रक्रिये बरोबरच कौटुंबिक विघटन, वृद्धांच्या समस्या, ताणतणाव, घटस्पोट अशा अनेक समस्या त्यांचे निराकरण करण्यासाठी सामाजिक समस्या अभ्यासावे लागतात.

**३) आर्थिक विकास :**

सामाजिक समस्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी आर्थिक प्रतिकूल परिस्थिती ही जबाबदार असते. समाजात असणाऱ्या आर्थिक विषमता, वाढती लोकसंख्या, यातून अनेक आर्थिक समस्या निर्माण होतात त्यामध्ये भ्रष्टाचार गुन्हेगारी बेकारी दारिद्रय या प्रकारच्या समस्या यांचा समावेश होतो. देशाच्या आर्थिक विकासात या समस्या अडथळा आणतात म्हणून सामाजिक समस्यांच्या अध्ययनाची आवश्यकता आहे.

**४) सामाजिक व राजकीय सुरक्षा :**

व्यक्ती आणि समाज यांच्या परस्पर संबंधातून आणि सहकार्यातून कोणताही समाज आकाराला येत असतो. परस्पर संबंधाच्या सानिध्यातून विविध सामाजिक प्रक्रिया निर्माण होत असतात. दर्जा आणि भूमिका, नियोजन व प्रमाणके, मुल्ये किंवा सांस्कृतिक मुल्ये वगैरे माध्यमातून सामाजिक संरचना अस्तित्वात येते. परंतु जेव्हा व्यक्ती व समाजाचे परस्पर संबंध विस्कळीत होतात, तेव्हा सामाजिक समस्या निर्माण होतात. हुंडाबळी भ्रष्टाचार या समस्या निर्माण होतात. सामाजिक समस्या सोडवण्याचे प्रभावी साधन म्हणून राजकीय घटकाकडे पाहिले जाते. यासाठीच तर सामाजिक समस्यांच्या अध्ययनाचे आवश्यकता आहे त्यामुळे समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण होण्यास मदत होते.

**५) शासकीय योजना :**

समाजात उद्‌भवणाऱ्या समस्या सर्वव्यापी असतात या समस्या विविध असू शकतात त्यामध्ये मानसिक रोग, ताणतणाव, आत्महत्या, बेरोजगारी, दारिद्र्य, कुपोषण, भ्रष्टाचार, कौटुंबिक विघटन ,घटस्फोट. इत्यादी. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी समाजशास्त्र दृष्टिकोनातून अध्ययनाची गरज असते. या समस्यांच्या अभ्यासाच्या आधारावरच शासकीय पातळीवर ती धोरण राबवण्यास मदत होऊ शकते.

### ६) कायदेशिर दक्षता :

सामाजिक समस्यांच्या अध्ययनामुळे समाजातील वास्तविक परिस्थितीची जाणीव शासनापर्यंत पोहोचवली जाऊ शकते व तिथे आवश्यक अशा प्रकारच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी कायदेशीर इलाजही करता येऊ शकतो. समाजातील उद्भवणाऱ्या समस्या यांचे निराकरण करण्यासाठी कायदेशीर मार्ग हा अंतिम असतो. त्यामुळे सामाजिक समस्याच्या अभ्यासाची मदत अशा परिस्थितीत नक्की होऊ शकते. सर्वच कायद्यांची निर्मिती सामाजिक समस्या व परिस्थितीत नक्की होऊ शकते त्यामुळे कायदेतज्ज्ञांना सामाजिक समस्यांचे अध्ययन करणे नितांत गरजेचे असते.

थोडक्यात, समाजाची जडण-घडण करण्यासाठी व समाज विकास करण्यासाठी त्याचबरोबर समाजाची गरजांची पूर्ती करण्यासाठी सामाजिक समस्यांच्या अध्ययनाची आवश्यकता आहे. वंचित, गरजू, अपंग, असमायोजित यांना सहाय्य करण्यासाठी आणि संरक्षण देण्यासाठी त्यांचे अध्ययन करणे गरजेचे असते. कल्याणकारी राज्यात ही जबाबदारी सर्व राज्यांची म्हणून स्वीकारण्यात आलेली आहे. सर्वांची किमान मूलभूत गरज, सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय सुविधा,कामगार कल्याण, समाज शिक्षण या सर्व गोष्टीचा विचार समाजशास्त्रात केला जातो. या सर्व क्षेत्रांमध्ये सुधारणा आणि परिवर्तन व्हावे यादृष्टीने समाजशास्त्रात व समाजकार्य यांची ओळख आपल्याला दिसुन येते. समाजशास्त्र हे आता उपयोजित शास्त्र झाल्यामुळे त्याची व्याप्ती वाढली आहे त्याचबरोबर समाजशास्त्र मध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनातून व बुद्धिप्रामाण्याच्या आधारावर अध्ययन होते. सहाजीकच समाजकार्याप्रमाणे समाजशास्त्रातील अभ्यासात वैज्ञानिक दृष्टिकोनातून समस्यांचे अध्ययन यांची आवश्यकता निर्माण झाली आहे. दारिद्र्य, बेकारी, वेश्यावृत्ति, कौटुंबिक  समस्या, वांशिक समस्या, गुन्हेगारी, अस्पृश्यता वंचितांचे प्रश्न दहशतवाद इत्यादी समस्या यांचे विश्लेषण करून त्यांची सोडवणूक करण्यासाठी व त्यावर उपाययोजना करण्यासाठी सामाजिक समस्यांचे अध्ययन करणे आवश्यक बनले आहे. आणि हे समाजशास्त्राच करू शकते त्यासाठी समाज समजून घेणे महत्त्वाचे असते. समाजशास्त्राच्या माध्यमातून त्याचा सुव्यवस्थित अभ्यास करता येतो. सामाजिक समस्यांच्या अध्ययनामध्ये समाजशास्त्रज्ञांची अशी भूमिका असते की, समस्या विषयी जाणीव जागृती निर्माण करणे, सामाजिक समस्यांचे निराकरण याचे स्पष्टीकरण देणे. समाजात उत्पन्न होणाऱ्या समस्या यांचे तटस्थ आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून अध्ययन करणे अत्यावश्यक आहे.

## १.३ सारांश

सामाजिक समस्यांचे स्वरूप हे व्यापक असते. समाजशास्त्राच्या अभ्यासामध्ये सामाजिक समस्या महत्वपूर्ण असा एक विषय आहे. दारिद्र्य, बेकारी, गरिबी, भ्रष्टाचार याविषयी आपण सविस्तर आढावा घेतला आहे.समाजशास्त्रज्ञ प्रस्तुत समस्यांचे तटस्थरित्या आणि वैज्ञानिक दृष्टीकोनातून अध्ययन करत असतात आणि त्या समस्याचे निराकरण व्हावे या दृष्टीकोनातून प्रयत्न करत असतात. सामाजिक समस्या देशाच्या, व्यक्तीच्या आणि समाजाच्या विकासामध्ये अडथळा असते. वास्तविकपणे सामाजिक समस्या मानवतेला धोकादायक असतात म्हणून सामाजिक समस्यांचा निपटारा करण्यासाठी शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला जातो. म्हणून या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणे गरजेचे असते. कारण या समस्या मानव निर्मित असल्यामुळे त्याचे परिणाम माणसालाच भोगावे

लागतात यातून अनेक समस्या व कौटुंबिक विघटन घडून येत असते.

**१.४ (अ) स्वयं अध्ययन प्रश्न (खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा)**

१) सामाजिक समस्यांचे स्वरूप कोणत्या प्रकारचे असते?

२) कोणत्या बाबींमुळे समाज स्वास्थ्य बिघडते.

३) एकोणिसाव्या शतकात कोणत्या सामाजिक समस्या होत्या.

४) सामाजिक समस्या म्हणजे एखाद्या समाजातील लक्षणीय संख्येच्या व्यक्तीच्या सामाजिक वर्तनातील बिघाड किंवा पथभ्रष्टता, जी त्या समाजातील इतर अनेक सदस्यांना गंभीर परिणाम भोगावयास लावते. मूलतः सामाजिक समस्या या नैतिक समस्या होत ही व्याख्या कोणी दिली.

५) समाजातील लक्षात घेणे योग्य क्रियाशील विचारवंतांचे लक्ष दज्या सामाजिक परिस्थितीकडे वेधले जाते आणि त्या संदर्भात सामूहिक किंवा इतर कोणतीही क्रिया वा इतर उपाय करण्याची आवश्यकता असते हि व्याख्या कोणी दिली.

६) अशी कोणतीही अनिष्ठ परिस्थिती की जी, समुदायातील बहुसंख्य लोकांना असे वाटते आणि तिच्या पुनर्रचनेसाठी सामूहिक कृतीची आवश्यकता असते ही व्याख्या कोणी दिली.

**१.४ (ब) स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे**

१) व्यापक

२) सामाजिक

३) सती प्रथा, बालविवाह, अस्पृश्यता, केशवपन, विधवा विवाह.

४) रॉबर्ट मर्टन आणि निसबेट

५) केस

६) विल्यम स्कॉट : **William Scoot.**

**१.५ सरावासाठीचे प्रश्न (दीर्घोत्तरी प्रश्न )**

१) सामाजिक समस्यांचे स्वरूप स्पष्ट करा.

२) सामाजिक समस्यांच्या वर्गीकरणाची चर्चा करा.

३) सामाजिक समस्यांच्या अध्ययनाची गरज याविषयी चर्चा करा.

### १.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) जी. एल. शर्मा : सामाजिक मुद्दे, २०१७. रावत पब्लिकेशन जयपुर.

२) राम आहुजा : सामाजिक समस्या २०००, रावत पब्लिकेशन,जयपुर.

३) राम आहुजा : सोशल प्रॉब्लेम इंन  इंडिया, रावत पब्लिकेशन, जयपुर.

४) राजविवेक एस. : समकालीन भारतीय मुद्दे (समस्या एवं समाधान), २०१३-१४ सिविल सर्विसेस, टाइम्स न्यू दिल्ली.

* * *

# घटक - २
# सामाजिक सांस्कृतिक समस्या
# ( Socio-Cultural Issues )

**संप्रदायवाद : अर्थ, कारणे आणि उपाययोजना**

**( Communalism : Meaning Causes and Remedy )**

**घटक संरचना : (Struclure)**

२.१ प्रस्तावना

२.२ उद्दिष्ट्ये

२.३ विषय विवेचन

  २.३.१ संप्रदायवादाचा अर्थ : कारणे आणि उपाययोजना

  २.३.२ स्त्रीभ्रुण हत्या : कारणे आणि उपाययोजना

२.४ सारांश

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ

२.७ चिंतन व कार्य

२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

**२.१ प्रस्तावना : (Book Introduction)**

भारत देश अनेकविध, धार्मिक, सांस्कृतिक, पारंपरिक भिन्नतेतून निर्माण झालेला आहे. प्रदिर्घकाळ हे भिन्नत्त्व जपत हे भिन्न समुदाय एकमेकांत मिसळून गेले आहेत. तरीही स्वधर्मश्रेष्ठत्त्वाची भावना, इतर धर्मांची शिकवण, श्रद्धा, धर्मपालनाचे रिवाज यातल्या टोकाच्या भिन्नत्त्वामुळे सांप्रदायिकता वाढून बऱ्याचवेळा बहुसंख्यांक समुदायाकडून आपल्याला एकाकी पाडले जात आहे. पक्षपातीपणा केला जात आहे. समुदायाच्या उन्नतीत, अडथळा निर्माण केला जात आहे. अशा प्रकारे भावना अल्पसंख्यांक समुदायात निर्माण होते. या सांप्रदायिक तणावात या ना त्या कारणाने संघर्षाची ठिणगी पडते तेव्हा समाजामध्ये सांप्रदायिक हिंसाचार, दंगलींना तोंड फुटते. बेसुमार जीवित व वित्त हानी होते. मानवता धोक्यात येते. शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो.

परिणामी द्वेषभावना वाढीस लागते आणि संप्रदायवाद अधिक धारदार बनतो. धार्मिक विभीन्नता असलेल्या भारतासारख्या देशात राजकीय ताकद प्रबळ करण्यासाठी याचा पुरेपुर वापर करतात. लोकांच्या धार्मिक भावनांचा राजकिय पक्ष व नेते पद्धतशीरपणे वापर करून घेण्यासाठी आपण या घटकामध्ये सांप्रदायवादावरील उपाययोजनांचा अभ्यास करणार आहोत.

भारतीय समाज व संस्कृतीच्या जडण-घडणीतून निर्माण झालेली समस्या म्हणजे संप्रदायवाद व स्त्रीभ्रुणहत्या होय. सांप्रदायिकता ही अतिशय गुंतागुंतीची धार्मिक भिन्नतेतून निर्माण झालेली सामाजिक समस्या होय. याला सामाजिक, धार्मिक बाजू आहे तशीच सामाजिक-सांस्कृतिक बाजूही आहे. समुह श्रेष्ठतावाद, राजकिय दूराग्रह, इतर समुदायांकडे पाहण्याची पूर्वग्रहदूषित व संकुचित वृत्ती-प्रवृत्ती यातून संप्रदायवाद वाढीस लागतो. सांप्रदायिक तणावाचे रूपांतर दंगलीत वा हिंसाचारात होण्यास एखादं छोटं कारणही पुरेसे असते. सांप्रदायिकता जेवढी तिव्र तेवढा सांप्रदायिक हिंसाचाराची तिव्रता अधिक असते. त्यामुळे समाजात विस्कळीतपणा येतो. पराकोटीचा विध्वंस देशाच्या एकतेला अखंडतेला आव्हान ठरतो. म्हणूनच या प्रकरणात संप्रदायवादाची संकल्पना व अर्थ आपण समजून घेणार आहोत. तसेच संप्रदायवादाची कारणे व त्यावरील उपाययोजनाचा अभ्यास करणार आहोत.

स्त्रीभ्रुणहत्या ही लिंगभेदभावातून निर्माण होणारी सामाजिक-सांस्कृतिक समस्या आहे. स्त्री-पुरूष हा जैविक भेद आहे. पण स्त्रीत्त्व व पुरूषत्त्वाची जडण-घडण, समाजाच्या अपेक्षेनुसार होत असते. त्यावर सांस्कृतिक रूढी, प्रथा-परंपरा, रिती-रिवाज यांचा प्रभाव असतो. पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांचा दर्जा दुय्यम आहे. पुरूष उच्च स्थानी व स्त्री कायम दुय्यम स्थानी आहे. गेली चार दशकं भारतातील स्त्रियांचं प्रमाण सातत्याने घटत आहे. नविन तंत्रज्ञानाने लिंगनिदान करणे व गर्भपात करणे सहज शक्य होऊ लागलं आहे. मुलीचा जन्माआधीच या जगात प्रवेश नाकारणारी समस्या स्त्रीभ्रुणहत्या समोर आली आहे. मुलींची घटती संख्या समाजावर अनेक प्रतिकूल परिणाम करू शकते. म्हणून आपण स्त्रीभ्रुणहत्येचा अर्थ, कारणे व उपाययोजनांचा अभ्यास करणार आहोत.

### २.२ उद्दिष्टे :

या घटकाच्या अध्ययनानंतर आपल्याला

१) संप्रदायवादाचा अर्थ कारणे आणि उपाययोजना समजून घेता येईल.

२) स्त्रीभ्रुणहत्या : अर्थ कारणे आणि उपाययोजना समजून घेता येईल.

### २.३ विषय विवेचन :

या घटकाचा अभ्यास तीन भागात विभागण्यात आला आहे. पहिल्या भागात संप्रदायवादाचा अर्थ स्पष्ट करण्यात आला आहे. दुसऱ्या भागात संप्रदायवादाच्या कारणांचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे. तिसऱ्या

भागात संप्रदायवादावरील उपाययोजनांचे विवेचन केले आहे. त्याचबरोबर स्त्री भ्रूणहत्या कारणे आणि उपाययोजना याची चर्चा केली आहे.

काही अपवादात्मक समाज सोडले तर जगात सर्वत्रच लिंगआधारित भेदभाव अथवा विषमता आढळून येते. स्त्री-पुरूषांमध्ये निसर्गत: असणारी असमानता सन्माननिय मानली जाते. कारण ती मानववंश वृद्धीसाठी आवश्यक आहे. त्यामुळे प्राचीन कालखंडात स्त्रीचा दर्जा उच्च होता. त्यानंतर हळूहळू स्त्रीच्या दर्जात घसरण सुरू झाली. स्त्री म्हणजे परक्याचं धन, कुटुंबावरचं ओझं, घराण्याची अब्रु या चौकटीत बंदिस्त झालेली स्त्री नकोशी झाली. याउलट मुलगा म्हणजे मालमत्तेचा वारस, वंशाचा दिवा, कुटुंबाचा पोषणकर्ता व संरक्षणकर्ता यामुळे मुलांच्या जन्माचे स्वागत होऊ लागले. स्त्री ही सर्वस्वी पुरूषांच्या अधीन राहणारी त्याची दासी बनली. स्त्री माणूस आहे. तिच्या ठायी बुद्धी, भावना, विचार, धैर्य, करूणा, स्नेह असे गुण आहेत. याचा समाजाला विसर पडू लागला. तिचे अस्तित्त्व उपभोगाचे साधन एवढेच उरले. स्वातंत्र्यानंतर भारतात स्त्रियांना समानतेचं स्थान प्राप्त झालं. स्वातंत्र्यापूर्वी व नंतरही स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाच्या, अत्याचाराच्या विरोधात कायदे केले गेले. तरीही स्त्रियांवरील अत्याचारात वाढच होताना दिसून येते. कायदे स्त्रियांना संरक्षण देऊ शकले नाहीत. समाजाची मानसिकता, स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन यात बदल झाला नाही आणि स्त्रियांवरील अत्याचारामध्ये हिंसेचे क्रुर पाशवी रूप स्त्रीभ्रुणहत्येच्या रूपाने समोर आले. म्हणूनच आपण स्त्रीभ्रुणहत्या ही समस्या अभ्यासणार आहोत. त्यामध्ये स्त्रीभ्रुणहत्येचा अर्थ, स्त्रीभ्रुणहत्या होण्यामागील कारणे व स्त्रीभ्रुणहत्या समस्येवरील उपाययोजना यांचा अभ्यास करणार आहोत.

१९ व्या शतकात पितृसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रीचे स्थान दुय्यम होते. जे पुरूषी ते श्रेष्ठ आणि जे बायकी ते कनिष्ठ अशी मनोधारणा पुरूषांची व स्त्रियांचीही झाली होती. त्यानंतर सातत्याने स्त्रियांचे समाजातील स्थान इतके खालावत गेले की 'मुलगी' नकोशी ठरू लागली आणि नव्या तंत्रज्ञानानं जन्माला येण्याआधीच त्यांना नाहीसे करता येऊ लागले. आज स्त्रीभ्रुणहत्या समस्येने गंभीर रूप धारण केले आहे म्हणून आपण स्त्रीभ्रुणहत्येचा अर्थ व या समस्येची व्यापकता विशद करणार आहोत. दुसऱ्या भागामध्ये परामर्श घेणार आहोत व तिसऱ्या भागामध्ये स्त्रीभ्रुणहत्या रोखण्यासाठी करण्यात येतील अशा उपाययोजनांचे विवेचन केले जाणार आहे.

### २.३.१ संप्रदायवादाचा अर्थ, कारणे आणि उपाययोजना (Meaning of Communalism) :

सांप्रदायिकता व संप्रदायिक हिंसाचार ही आपल्या देशात घडणारी बाब एक सामाजिक घटना आहे. संप्रदायिकता भारतीय समाजसंरचनेशी व त्या होणाऱ्या परिवर्तनाशी एकरूप झालेली आहे. संकुचित प्रादेशिक व सांस्कृतिक ऐक्यभावना जेवढी प्रबळ तेवढा सांप्रदायिक तणाव वाढतो. भारतामध्ये पंजाब, आसाम, केरळ, गुजरात, तामिळनाडू, व काश्मिर या राज्यात स्वहितरक्षण व वर्चस्वाच्या भावनेतून सांप्रदायिक हिंसाचाराच्या घटना घडत असतात. धार्मिक व पारंपरिक कट्टरतेमुळेच भारतात सामाजिक परिवर्तनात अडथळा निर्माण होतो. संप्रदायवाद नागरी भांडवलशाही पद्धतीत खोलवर रूजलेला आहे. त्यामुळेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, व जमात-ए-इस्लामी य सांप्रदायिक संघटना अस्तित्त्वात येतात. नागरी भांडवलसाठी समाजातील लोकांच्या धार्मिक भावनांचा वापर करून लाभ उठविण्याचा प्रकार शिष्टजनांकडून होत असतो. अशा लोकांकडून लोकशाही असो

वा नोकरशाही धर्मनिरपेक्षतेचा केवळ आभास निर्माण केला जातो. हे लोकसत्तेपुढे झुकतात कारण अधिकार व सत्ता हाच त्यांचा परमेश्वर असतो. सांप्रदायिक शक्ती, मुक्त विचार, लोकशाहीचे तत्त्व मानत नाहीत. फक्त राजकियता व स्वार्थ यांच्यासाठी महत्त्वाचा असतो. त्यामुळे सांप्रदायिक शक्ती अधिक प्रबळ होतात. म्हणूनच संप्रदायवाद या गुंतागुंतीच्या सामाजिक घटनेचा अर्थ समजून घेण्यासाठी काही व्याख्यांच्याद्वारे संप्रदाय वादाचे स्वरूप समजून घेता येईल.

**१) लुईस ड्युमा –** '' सांप्रदायिकता म्हणजे निश्चयपूर्वक आग्रही स्वरूपाचा राजकिय समुदाय होय ''

(Louis Dumont - Communalism is a afftrmation and assertion of the religious community as a political group.)

**२) बिपीनचंद्र –** '' एखाद्या लोकसमुहातील सदस्य विशिष्ट धर्माचे अनुयायी असल्यामुळे त्यांचे सामाजिक, राजकिय आणि आर्थिक हितसंबंध समान आहेत अशी श्रद्धा म्हणजे संप्रदायवाद होय.'' (Bipinchandra - Communalism is the belif that because a group of people follow a particular religion they have as a result, common social political and economic interests.)

**३) रणधीर सिंह –** '' एक विचारप्रणाली आणि वर्तनरीत यादृष्टीने, समकालीन भारतातील संप्रदायवाद म्हणजे शक्तीशाली सरंजामशाही, वसाहतवादाचा वारसा लाभलेल्या सखोल धार्मिक विभाजन झालेल्या आणि ऐतिहासिकदृष्ट्या विशिष्ट स्वरूपाचा भांडवलशाही विकास होत असलेल्या देशातील सत्ताधारी राजकारणाचा एक पैलू आहे. '' (Randhirsingh - Communalism in contemporary India as a ideology and practice is above all an aspect of the polities of the ruling classes in a society with a massive feadal colonial inhorltance deep religious divisions and undergoing its own historlcally specific form of sapalist capatalist development.)

वरील विश्लेषणातून सांप्रदायिकता म्हणजे काय हे समजून येईल खालील काही मुद्द्यांचा अभ्यास केल्यास सांप्रदायिकतेचे स्वरूप अधिक स्पष्ट होईल.

१) धर्म, भाषा, जात, वंश यासारख्या निकषावर एका समुदायातील लोक दुसऱ्या समुदायाविरोधात वर्तन करतात.

२) संप्रदायिकता म्हणजे दोन समुदायातील भिन्नत्त्वामुळे निर्माण झालेला संशय, विद्वेष, शत्रुत्त्व आणि संघर्षाची भावना होय.

३) भारतात संप्रदायवादाचा प्रमुख आधार धर्म आहे.

४) धर्मरक्षणापेक्षा विशिष्ट हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी सांप्रदायिक शक्ती धर्माच्या नावावर राजकिय सत्ता व नेतृत्त्व टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतात.

५) धर्मावर श्रद्धा ठेवणे, धर्मास अनुसरून वर्तन करणे हे धार्मिकतेचे लक्षण आहे. परंतू राजकिय स्वार्थासाठी धर्माचा साधन म्हणून वापर करणाऱ्या व्यक्ती धार्मिक नसतात तर सांप्रदायिक असतात.

६) धार्मिक भावनेने केलेले व्यक्तिगत अथवा सामुहिक वर्तन, पूजा, यज्ञ, होम, प्रार्थना, नमाज पठण,

विशिष्ट पोशाख परिधान करणे याला कर्मकांड म्हंटले जाते. परंतु सामुहिक कर्मकांडाला जेव्हा राजकिय स्वरूप प्राप्त होते तेव्हा सांप्रदायिकता प्रबळ होते.

७) सांप्रदायिक विचारसरणी एखाद्या देशापुरती मर्यादित नाही. ही विचारसरणी राष्ट्रहितविरोधी असली तरी नेते व पक्ष तिचा वापर राजकारणात शत्रु सारखा करतात.

८) मूलतत्त्ववादाचा संप्रदायवादाशी जवळचा संबंध आहे. मूलतत्त्ववाद सत्तेशी व धर्माशी निगडीत असतो. मूलतत्त्ववादी सत्ता मिळवण्यासाठी त्यावर नियंत्रण ठेवतात.

**अ) संप्रदायवादाची कारणे (Causes of Communalism) :**

भारतामध्ये विविधतेत एकता आहे असे अभिमानाने म्हटले जाते. परंतू प्रांतवाद, भाषावाद, जातीयवाद सातत्याने प्रकट होताना दिसतो. यावेळी एकतेची भावना कमकुवत असल्याचे दिसते. देशाचे ऐक्य धोक्यात येते तेव्हा समस्याजनक परिस्थितीला सामोरे जावे लागते. भारतामध्ये विविध धर्मामध्ये भिन्नत्त्व आहे, संघर्ष आहे, तसा संघर्ष विविध धर्मातील विभिन्न पंथामध्येही घडून आला आहे. हिंदू धर्मातील शैव व वैष्णव पंथामध्ये मुस्लिमांच्या शिया व सुन्नी पंथामध्ये तसेच ख्रिश्चनांच्या प्रोटेस्टंट व कॅथॉलिक पंथामध्येही संघर्ष घडत गेले आहेत हे इतिहास सांगतो. परंतु भारतावर दूरगामी, दिर्घकालीन परिणाम करणारा भिषण हिंसाचारात रूपांतर होणारा हिंदू-मुस्लिम संघर्ष हा व्यापक आहे. भारतात मुख्यत: हिंदू-मुस्लिम सातत्याने व मोठ्या प्रमाणात दिसतो. या सांप्रदायिकतेची व सांप्रदायिक हिंसाचारास पोषक ठरणारी आहेत. आपल्याला खालील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) धार्मिक भिन्नत्त्वातून निर्माण होणारा दुरावा :**

भारतातील बहुसंख्याक हिंदू व लोकसंख्येने दुसऱ्या स्थानी असणारे मुस्लिम यांच्या प्रथा, परंपरा, श्रद्धा रितीरिवाज, पोषाख, विचारसरणी यामध्ये प्रचंड तफावत आहे. हिंदू बहुदेवतावादी मूर्तीपूजेत रमणारे, गाय देवतेसमान मानणारे, पुर्नजन्मावर विश्वास असणारे व विवाह व संस्कार मानणारे आहेत. तर मुस्लीम ऐकेश्वरवादी, मूर्तीपूजा न मानणारे, 'कुराण' या धर्मग्रंथातील वचनानुसार कोटेकोर आचरण करणारे, विवाह हा करार मानणारे, दोन्ही समुदायांच्या भाषेत भिन्नता, जीवन जगण्याची पद्धती वेगळी. हिंदुमध्ये सण-उत्सव सार्वजनिकरित्या साजरे करण्यावर भर या सगळ्या बाबी दोन्ही धर्मामध्ये टोकाचे भिन्नत्त्व दाखवतात. त्यातूनच दुसऱ्या समुदायाविषयी त्यांच्या विचारसरणी विषयी खरे-खोटे पूर्वग्रह ठरलेले आहेत. त्यामुळे शुल्लक घटनेतूनही या दोन्ही समुदायांमध्ये तणाव निर्माण होतो.

**२) ऐतिहासिक घटनांचा प्रभाव :**

भारताच्या प्राचीन व मध्ययुगीन कालखंडातील इतिहास दोन्ही समुदायात कटुतेची भावना वाढवतो. हा इतिहास ब्रिटिश इतिहासकार जेम्स मिल्ट यांनी मांडला. प्राचीन हिंदू संस्कृती अत्यंत आदर्शवादी व समृद्ध होती असे हिंदू संप्रदायवादी अभिमानाने मांडतात. परंतू मुस्लिमांच्या आक्रमणामुळे हि संस्कृती लयास गेली. याउलट मुस्लीम संप्रदाय असे मानतो की भारतीय संस्कृती समृद्ध करण्यात मुस्लीम राजवटीचे महत्त्वाचे योगदान आहे. या मुस्लीम राजवटी व मोगल सम्राटांचे राज्य आदर्श होते असे मानणारे मुस्लीम आहेत. परंतु मुस्लीम आक्रमकांनी

हिंदूंना सक्तीने धर्मांतर करायला लावले. हिंदूंची मंदिरे लुटली, उद्ध्वस्त केली. हिंदू स्त्रियांशी जबरदस्तीने विवाह केले. मुस्लिमांना विरोध करणाऱ्यांना मोठ्या अन्यायाला, छळाला सामोरे जावे लागले हा इतिहास हिंदू समुदायात कटुता निर्माण करतो. याचा फायदा घेत काही संघटना हा इतिहास विसरू देत नाहीत. द्वेषाची भावना निर्माण करतात.

स्वातंत्र्यलढ्यात हिंदू-मुस्लिम खांद्याला खांदा लावून लढले होते. त्यांची एकी जड जावू लागल्यावर 'फोडा आणि राज्य करा' या नितीचा ब्रिटिशांनी अवलंब केला. मुस्लिमांमध्ये तुम्ही अल्पसंख्य आहात. तुम्हांला डावलले जाणार अशी असुरक्षिततेची भावना निर्माण केली. परिणामी मुस्लीम नेत्यांनी आपल्या राजकिय मागण्या पुढे रेटण्यासाठी ' मुस्लिम लिगची ' स्थापना केली. हिंदूनींही अखिल भारतीय संघटना स्थापन केली. महमदअली जीना यांच्या विचारातून द्विराष्ट्र सिद्धांत मांडला गेला. पूर्ण स्वातंत्र्य व धर्माच्या आधारावर विभागणी अशा मागण्या त्यांनी केल्या. फाळणीच्या रूपाने मुस्लिम नेत्यांनी धर्माला माध्यम बनवून राजकिय महत्त्वकांक्षा पूर्ण केली. फाळणीच्या काळात प्रचंड, अमानुष असा हिंसाचार घडून आला. कत्तली, बलात्कार, जाळपोळ अशा घटनांचे घाव दोन्ही समुदायांच्या स्मरणात कायमचे उरले. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर मोठ्या प्रमाणात मुस्लीम समुदायाने भारतात राहणे पसंत केले. परंतू या ऐतिहासिक घटना, घडामोडींचा प्रभावा विविध प्रसंगात, सांप्रदायवादाच्या रूपाने प्रकट होताना दिसतो.

**३) मुस्लीम समुदायाची अलगतावादी प्रवृत्ती :**

मानवतावादी म्हणविणाऱ्या बिटिशांनी आपल्या कुटनितीद्वारे मुस्लीम समुदायात संप्रदायवाद रूजविला. त्यांच्यामध्ये हिंदूबद्दल दुरावा निर्माण झाला. त्यांनी आपल्या जगण्यात अलगतावादी प्रवृत्ती निर्माण केली. असे मुस्लीम राष्ट्रीय प्रवाहापासून अलिप्त फटकून राहू लागले. बहुसंख्य मुस्लीम समुदाय धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादी विचारसरणी व राष्ट्रीय राजकारणापासून दूर राहतात. त्यांनी आपली स्वतंत्र जीवनपद्धती स्विकारली आहे. स्वतंत्र अस्तित्त्व व स्वतंत्र ओळख असण्याबाबत ते आग्रही असतात. काही मुस्लीम संघटना मुलतत्त्ववादाचे समर्थन करतात. यामुळे दोन्ही समुदायात दुरावा व अविश्वासाची भावना निर्माण होते जी सांप्रदायवादाच्या वाढीस कारणीभूत ठरते.

**४) सांप्रदायिक पक्ष व संघटनांचा प्रभाव :**

भारतामध्ये ' धर्म ' हे राजकिय सामाजिकत्त्वाचे महत्त्वाचे साधन आहे. भारतीय राजकिय पक्ष व संघटनांच्या विचारसरणीत त्याचे प्रतिबिंब दिसून येते. दोन्ही समुदायातील राजकिय नेतृत्त्व अभिजन वर्गाकडे असलेले दिसते. आपले राजकिय हितसंबंध जोपासण्यासाठी ते धर्माचा वापर करतात. संप्रदायवादातून घडून येणारा हिंसाचार, त्याची भिषणता याची जाणीव त्यांना असते. सांप्रदायिक हिंसाचारात त्यांचा धर्माशी संबंध नाही, खऱ्या अर्थाने धार्मिक नाहीत तेच पुढे असतात. असे नेते समाज, पोलीस, न्यायलय यांना वेठीस धरतात. बेलगाम वक्तव्य करतात. अशा नेतेमंडळींच माध्यमातून उन्नत्तीकरण होत असतं. भारतामध्ये अनेक सांप्रदायिक संघटना कार्यरत आहेत. मुस्लीम लीग, जमात-ए-इस्लामी, हिंदू महासभा, अकाली दल, विश्व हिंदू परिषद इ. अशा संघटना कधी उघड तर कधी छुप्या कारवाया करत असतात. त्यामुळे सांप्रदायिकतेत वाढ होते. स्वत:ला धर्म निरपेक्ष म्हणवणारे

राजकिय पक्षही निवडणूकी दरम्यान सांप्रदायिक संघटनांशी युती करून सत्ता मिळवण्याचा प्रयत्न करतात. स्वत: धार्मिक नसलेले हे नेते सामान्य जनतेला धर्माचे आवाहन करून निवडणुका लढवतात. सामान्य जनतेलाही हा उमेदवार आपल्या जातीचा आहे, धर्माचा आहे ही पात्रता पुरेशी वाटते असे पक्ष संघटना व त्यांची नेतेमंडळी केवळ राजकिय महत्त्वकांक्षेपोटी धर्माला माध्यम बनवतात. त्यामुळे संप्रदायवाद वाढीस लागतो.

**५) दारिद्र्य व बेकारी :**

कोणत्याही समाजात मोठ्या प्रमाणात दारिद्र्य व बेकारी असेल तर आत्मविश्वासाअभावी नैराश्यजनक प्रवृत्ती निर्माण होते. जेथे मागासलेपणा, निरक्षरता, दुर्लक्षितता आहे, तेथे बहुसंख्येने युवक बेरोजगार असतील तर ते सहजपणे मुलतत्त्ववाद पसरवणाऱ्या धार्मिक संघटनांच्या जाळ्यात सहजपणे अडकतात. भारतात असा बेकार युवकांचाच वापर सांप्रदायिक दंगलीच्यावेळी करून घेतला जातो. स्वातंत्र्यापूर्वी पासून मुस्लिमांच्या तुलनेत हिंदूचा आर्थिकस्तर उंचावलेला होता. हिंदू चांगल्या पदावर नोकरीत व व्यापार उद्योगात वरच्या स्थानी असल्याने आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत होते. स्वातंत्र्यानंतर जमिनदारीचा कायदा व इतर धोरणांमुळे मुस्लिमांचे पिढ्यान्‌पिढ्याचे उद्योग-व्यवसाय अडचणीत आले. स्वातंत्र्यानंतर आर्थिक विकासाची मर्यादित संधी त्यांना लाभली. याशिवाय बहुसंख्य मुस्लीम आधुनिक, विज्ञानवादी, तत्त्वज्ञानाच्या शिक्षणापासून दूर राहिला आहे. त्यांच्या शैक्षणिक मागासलेपणामुळेही त्यांचा आर्थिक स्तर उंचावलेला नाही. या समुदायात असलेली आर्थिक सामाजिकदृष्ट्या वंचिततेची भावना त्यांच्या मनात हिंदूबद्दल आकस निर्माण केले हे सांप्रदायितेचे कारण ठरते.

**६) हिंदूत्त्ववादी विचारसरणीचा वाढता प्रभाव :**

हिंदूत्त्ववादी विचारसरणीमध्ये झालेली वाढ व हिंदूत्त्ववादी प्रवृत्तीचे बळकटीकरण यातून सांप्रदायिक तणाव वाढीस लागतो. हिंदू महासभा, विश्व हिंदू परिषद, हिंदू धर्मरक्षा समिती, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यासारख्या धार्मिक संघटना हिंदूना अनुकूल निर्णय घेतले जावे यासाठी सरकारवर दबाव टाकण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या विचारधारेनुसार प्रत्येक मुस्लीम पाकिस्तान धार्जिणा व देशविरोधी असतो. दोन देशात क्रिकेटची मॅच चालू असेल तरी त्याला दोन देशातील युद्धाचे स्वरूप दिले जाते. अशा घटना अल्पसंख्याकाविषयी द्वेषाची भावना निर्माण करतात. त्यातून हिंदूत्त्ववादी सांप्रदायिक शक्तीचे बळकटीकरण केले जाते. अल्पसंख्याकांना दिले जाणारे संरक्षण व सवलती यांना ते विरोध करतात. टोकदार हिंदूत्त्ववादी अंधभक्ती सांप्रदायिकवादास कारणीभूत ठरते.

**७) राजकारणाचे सांप्रदायिकरण :**

भारतीय निवडणुकीचे राजकारण म्हणजे अमर्याद पैशाची उधळण व अत्यंत टोकाची तीव्र स्पर्धा होय. विविध राजकिय पक्ष निवडणुका जिंकण्यासाठी बेकायदेशीर साधने व बऱ्यावाईट मार्गांचा अवलंब करतात. मतांचे राजकारण करण्यासाठी सांप्रदायिक तणाव, दंगली घडवून आणल्या जातात. प्रत्येक राजकिय पक्ष जाती धर्माचा वापर करून निवडणुका लढवतात. राजकारणाचे झालेले सांप्रदायिकरण भारतात संप्रदायवाद वाढवते. कोणताही पक्ष वा नेता हिंसाचारात वा दंगलीत निष्पापांचे बळी जातात याची पर्वा करत नाहीत. आपला राजकिय स्वार्थ साधताना फक्त आपल्या हितसंबंधाचाच विचार केला जातो.

**८) देशाच्या अंतर्गत घटना-घडामोडीत इतर देशांचा हस्तक्षेप :**

भारतात घडणाऱ्या घटना. घडामोडीत व अंतर्गत राजकारणात शेजारील देश हस्तक्षेप करतात. त्यांच्याकडून सातत्याने गैरसमज व संशयाचे वातावरण निर्माण होईल अशा अफवा पसरवल्या जातात. भारतात अराजकता माजावी, सांप्रदायिक तणाव निर्माण व्हावा. यादृष्टीने प्रयत्न केले जातात. शिख अतिरेकी व पाकिस्तान भारतातील युवकांना देत असलेल्या चिथावणीमुळेच पंजाब व जम्मू-काश्मिर मध्ये सांप्रदायिक हिंसाचार घडून आले. सीमाभागातील देशांकडून केला जाणारा हस्तक्षेप थोपवता येत नाही. अरबराष्ट्रे अशाच प्रकारे पेट्रोलचा पैसा भारतात मशिदी बांधण्यासाठी पुरवतात व संशयास्पद वातावरण निर्माण करतात. भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे हे साऱ्या जगाला माहित असताना भारत व पाकिस्तान संघर्षास धर्मच कारण असल्याचे जगासमोर मांडले जाते. भारतात धार्मिक विसंवाद जीवंत ठेवण्यात बाहेरच्या काही देशांचे हितसंबंध गुंतले आहेत.

**९) उद्योगधंद्यामध्ये विशिष्ट समुदायाची मक्तेदारी :**

भारतामध्ये विशिष्ट जाती-धर्माच्या लोकांची विशिष्ट व्यापार, उद्योग, कारागिरी, व्यवसायावर मक्तेदारी निर्माण झाली आहे. त्या व्यवसायात शिरणाऱ्या इतर जाती-धर्मियांना आपला जम बसवता येत नाही. त्यामुळे त्यांच्यात वितुष्टता निर्माण होते व संप्रदायवाद वाढतो. भारतात मिरज, अलिगढ, मालेगाव, भिवंडी या शहरातून अनेक पिढ्यांपासून काही विशिष्ट उद्योगधंद्यात जम बसवलेले मुस्लीम आहेत. त्यांच्यातील आर्थिक संपन्नता व सामाजिक दर्जातील वाढीमुळे ते राजकारणात उतरू लागले आहेत. ते स्थानिक पातळीपासून केंद्रीय स्तरापर्यंत राजकिय घडामोडीत सहभागी होतात. त्यांच्या राजकिय महत्त्वकांक्षा वाढतात. अशा लोकांचे परंपरागत व्यापार, व्यवसाय वा राजकारणातील प्रस्थ कमी व्हावे असे स्पर्धकांना वाटत असते. तेव्हा संप्रदायवादास चालना दिली जाते. लोकांची माथी भडकवली जातात. अशा भागात दंगली, हिंसाचार घडवून आणल्या जातात.

### २.३.३ संप्रदायवादावरील उपाययोजना (Remedy of Communalism) :

धार्मिक विसंवादामुळे समाजामध्ये दुही माजते. सांप्रदायिक तणाव निर्माण होतो. अशावेळी एखादी क्षुल्लक घटनेचे रूपांतर सांप्रदायिक हिंसाचारात करते. संपूर्ण समाज, शहर गाव, कुटुंब उद्धस्त होतात. सामाजिक ताणतणावात वाढ होते. तरूणांमध्ये सुडाची प्रेरणा निर्माण होते. डोळ्यासमोर घडलेला हिंसाचार, जाळपोळ, भोसका-भोसकी, लुटालुट, रक्तपात, स्त्रियांवरील बलात्कार यामुळे मानसिक धक्का बसतो. हिंसाचारातून वाचलेले काही कायमचे मानसिक रोगी बनतात. हिंसाचारात उत्पादनश्रम गटातील व्यक्ती मोठ्या प्रमाणात बळी जातात किंवा जखमी होतात. तेथील आर्थिक घडी बसवणे खूप अडचणीचे ठरते. अशा समाजाला पुन्हा उभं करणं, गुन्हेगारांना शिक्षा करणं, पुन्हा शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी शासनाला प्रचंड आर्थिक भार सहन करावा लागतो. सांप्रदायिक दंगलीनंतर दोन्ही समुदायातील दुरावा वाढीस लागतो. धार्मिक कर्मकांडास अधिक चालना मिळते. देशाच्या प्रगतीत, वैज्ञानिक प्रगतीत अडथळे निर्माण होतात. देशाच्या धर्मनिरपेक्ष तत्त्वास व राष्ट्रीय एकात्मतेस धोका पोहोचतो. म्हणून या समस्येवरील उपाययोजनांचा गांभिर्याने विचार करणे गरजेचे आहे. संप्रदायवादावरील उपाययोजना खालील प्रमाणे स्पष्ट करता येतात.

**१) कुटुंबातून सुयोग्य व्यक्तीमत्त्वाची जडण-घडण :**

व्यक्तिचे व्यक्तिमत्त्व, विचारसरणी, मते, प्रवृत्ती यावर कुटुंबाचा जबरदस्त प्रभाव असतो. कुटुंबिय कट्टर धार्मिक व इतर धर्मियांकडे पूर्वग्रहदूषितपणे पहात असतील तर मुलांची जडण-घडण तशीच होते. मुलांना वाढविताना त्यांना धार्मिक पूर्वग्रहापासून दूर ठेवले तर त्यांच्यात मानवतावादी मुल्यांची जोपासना होईल. मानवाप्रती संवेदनशीलता असणारे व्यक्तीमत्त्व समाजीकरणाच्या प्रक्रियेतून घडवता येईल. कुटुंबिय जर दुसऱ्या जाती-धर्माच्या कार्यक्रमात, सण-समारंभामध्ये सहभागी होत असेल तर मुलांना एकमेकांच्या रितीरिवाजांची, प्रथापरंपरांची ओळख होते व एकमेकांकडे पाहण्याची संशयीवृत्ती नष्ट होते. धर्म जरी वेगळा असला तरी तीही माणसे आहेत. त्यांनाही आपल्या सारखी सुखदु:खे आहेत याची ओळख झाल्याने मुलांमध्ये सहिष्णु, उदारमतवादी, सर्वांना सामावून घेणारी विचारसरणी रूजते. सुयोग्य व्यक्तीमत्त्व घडवण्यात कुटुंबाने महत्त्वाचा वाटा उचलल्यास पूर्वग्रहातून होणारे धार्मिक भेदभाव कमी होतील.

**२) शिक्षण व्यवस्था व शिक्षकांची महत्त्वपूर्ण भूमिका :**

विद्यार्थी शिक्षण घेत असताना दिर्घकाळ शिक्षण प्रक्रियेत असतो. यावेळी त्याला लाभणारे वर्गमित्र, शिक्षक व अभ्यासक्रमातून झालेले संस्कार यांचा त्याच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पडतो. शैक्षणिक संस्थामधून सर्वांना समान कोणत्याही भेदभावापासून दूर ठेवणारे शिक्षण मिळाले पाहिजे. शिक्षकांनी जात, धर्म, पूर्वग्रह या पासून दूर राहून जीवन जगण्याचे शिक्षण विद्यार्थ्यांना दिले पाहिजे. अभ्यासक्रमातून विज्ञान, तंत्रज्ञानाचे आधुनिक शिक्षण देतानाच मुल्यांची जोपासना करणारे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे. अभ्यासक्रमातून जेव्हा सर्व धर्मांचा तुलनात्मक अभ्यास केला जाईल तेव्हा प्रत्येक धर्म कल्याणकारी आहे याची जाण निर्माण होईलच पण त्याबरोबर एकमेकांच्या धार्मिक कर्मकांडाकडे संशयीवृत्तीने पाहण्याचा दृष्टिकोन बदलेल. राजकारणात धर्माचा वापर स्वार्थासाठी केला जातो. याची जाणीव त्यांना शिक्षणातून होईल तेव्हा सुजाण नागरिक निर्माण होतील. धार्मिक दंगलीतील अशी कितीतरी उदाहरणे आहेत की जात-धर्म विसरून इतरांचे प्राण वाचवले आहेत. मदत केली आहे. हा त्यांच्यावर झालेल्या मानवतावादी संस्कारांचा परिणाम असतो.

**३) राष्ट्रीय एकात्मतेची भावना रूजवणे :**

भारतामध्ये मोठ्या प्रमाणात विविधता आहे. परंतू जाती-धर्मभेद, भाषावाद, प्रांतवाद याच्या रूपाने कधी ना कधी संघर्ष होत असतो. तरीही स्वातंत्र्यानंतरही ही अखंडता टिकून आहे. याचा अभिमान हा राष्ट्राभिमान असतो. यातूनच धर्म, पंथ, जात यापेक्षाही राष्ट्रहित महत्त्वाचे आहे याची जाणीव लोकांना होते तेव्हा राष्ट्रीय एकात्मता निर्माण होते. यातून आपले राष्ट्र, राष्ट्राची लोकशाही घटना, धर्मनिरक्षतेचे तत्त्व याविषयी अभिमान जागृत होईल. विविधतेने एकता हे मूल्य जेव्हा रूजेल तेव्हा राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण होईल.

**४) समान विकासावर भर देणे :**

भारतामध्ये आर्थिक व सामाजिदृष्ट्या मागास राहिलेले व शिक्षणाच्या संधीपासून वंचित राहिलेल्या तुलनात्मकरित्या आर्थिक दर्जा खालावलेल्या मुस्लीम समुदायाचा अभ्यास करून त्यांना आपला दर्जा उंचावण्यासाठी

विशेष संधी, सवलती दिल्या पाहिजेत. रंथनाथ मिश्रा समितीने मुस्लीम समुदायाच्या मागासलेपणाचा अभ्यास करून त्यांना राज्य व केंद्र सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण द्यावे अशी शिफारस केली. सांप्रदायिक हिंसाचारातून निष्पाप व दुर्बल समुदायाची मोठी हानी होते. त्यांच्यावर अन्याय होतो. अशावेळी त्यांना न्याय देण्यासाठी चौकशीसाठी शासनाने आयोग नेमावेत. गुजरात दंगलीनंतर चौकशीसाठी व अन्यायग्रस्त लोकांना न्याय देण्यासाठी नानावटी समिती नेमण्यात आले. तसेच २००५ मध्ये मुस्लीम समुदायाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी सच्चर समिती नेमण्यात आली. या समितीने मुस्लीम समुदायाचा दर्जा उंचावण्यासाठी अनेक उपाययोजना सुचवल्या व विकासाच्या प्रवाहात सामावून घेण्यासाठी मार्ग सुचवले. अशा पद्धतीने विविध आयोग व समित्यांच्या शिफारशीनुसार मुस्लीमांना आपला दर्जा उंचावण्यासाठी संधी प्राप्त करून दिल्यास सामाजिक एकता प्रस्थापित होईल.

**५) सांप्रदायिक पक्ष व संघटनांवर बंदी घालणे :**

संप्रदायवादाच्या वाढीचे प्रमुख कारण सांप्रदायिक पक्ष व संघटना आहेत. म्हणूनच शासनाने अशा पक्ष व संघटनांवर त्यांच्या विध्वंसक कारवाया व छुप्या अर्जेंड्यावर बारकाईने लक्ष ठेवले पाहिजे. अशा संघटनांचे नेते प्रक्षोभक विधाने व वक्तव्य करून धार्मिक भावना कलुषित करतात. अशा नेत्यांवर कायदेशीर कारवाई होईल याची काळजी घेतली पाहिजे. सांप्रदायिक दंगलीत, हिंसाचारात या संघटनांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग असतो अशा संघटना व पक्षांवर बंदी घातल्यास कडक कायदेशीर कारवाई केल्यास समाजावर त्याचे सकारात्मक परिणाम होतील.

**६) बेरोजगार तरूणांना विधायक कामात गुंतवणे :**

संधीसाधू राजकारणी व धर्मगुरू हे बेरोजगार तरूणांचा वापर विध्वंसक कारवायात करून घेतात. बेकारी, रिकामेपण, आर्थिक विवंचनेत अडकलेल्या तरूणांची माथी भडकवली जातात. असे सक्रिय कार्यकर्ते सांप्रदायिक हिंसाचाराच्या अग्रभागी असतात. अशा तरूणांना किमान विधायक राष्ट्रीय कामात गुंतवण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्या कार्यक्षमतेस वाव मिळेलच शिवाय विधायक कामातून राष्ट्रवादाची भावना रूजेल. मंदिर-मस्जिदीपेक्षा मुलभूत गरजा, आरोग्य, शिक्षण महत्त्वाचे आहे. याची जाणीव त्यांना होईल पोकळ धर्माभिमान आपल्याला व कुटुंबाला उध्वस्त करतो हे जेव्हा त्यांना समजेल तेव्हा असे बेकार तरूण स्वार्थी राजकारणाचे बळी ठरणार नाहीत.

**७) साहित्य व चित्रपट माध्यमांचा सकारात्मक उपयोग :**

आपल्या देशात अनेक संत, महात्मे होऊन गेले त्यांनी आपल्या विचारातून, लेखणीतून, साहित्यातून उदारमतवादी, सहिष्णू, मानवतावादी मूल्य रूजवण्याचा प्रयत्न केला. अशा साहित्याचा प्रसार, प्रचार झाला पाहिजे. काही लेखक, कवी आपल्या लिखाणातून अनेक समस्या, प्रश्न, धर्म, ज्ञान, राजकारण यावर भाष्य करतात. ज्यातून धार्मिक सुसंवादाचे पूल बांधले जातात. द्वेषाने मूठभर लोकांचा फायदा होतो व संपूर्ण समाज भरडला जातो. याचे वास्तव चित्रण समाजाच्या पोषणासाठी उपयुक्त असते अशा साहित्याला पुरस्कृत केले पाहिजे.

भारतामध्ये मनोरंजनाचे माध्यम म्हणून चित्रपट अत्यंत लोकप्रिय आहेत जे चित्रपटाच्या माध्यमातून समाजातील वास्तव्यावर प्रकाश टकाला जातो. त्यातून लोकशिक्षणच होत असते. समाजाची मानसिकता बदलून सहिष्णुता, मानवतावाद, बंधुभाव, देशप्रेम चित्रपटातून प्रभावीपणे रूजते.

**८) जनसंपर्क माध्यमांची जबाबदारी व त्यांच्यावर अंकुश ठेवणे आवश्यक :**

जनसंपर्क माध्यमे देशात घडलेल्या घटना, घडामोडींचे विश्लेषण करत असतात. अलिकडच्या काळात इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वेगवान प्रसार झाला आहे. शे-दोनशे वाहिन्यांच्या या जमान्यात आपलेच चॅनेल अग्रभागी असावे यासाठी त्यांच्यात स्पर्धा असते. अशावेळी कशाचेही तारतम्य न बाळगता अतिरंजित बातम्या सांगितल्या जातात. नेत्यांनी केलेल्या प्रक्षोभक विधानाचे वारंवार प्रक्षेपण केले जाते. एखाद्या घटनेत माणसाच्या जीवापेक्षाही त्याचा धर्म कोणता याविषयी उथळ चर्चा केली जाते. अशा बाबी समाजातील विसंवाद, सांप्रदायिक तणाव वाढीस पोषक ठरतात म्हणूनच जनसंपर्क माध्यमांनी जबाबदारपणे, नि:पक्षपातीपणे, घटनेचे वास्तव दर्शविणाऱ्या बातम्या प्रसारित केल्या पाहिजेत. सांप्रदायिक दंगली प्रसंगी तारतम्य बाळगून बातम्या प्रसारित केल्यास दंगली आटोक्यात येऊ शकतात. काही वेळा राजकिय पक्ष माध्यमांना हाताशी धरून अवास्तव, भडक बातम्या देतात याचे समाजावर विपरीत परिणाम होतात म्हणून जनसंपर्क माध्यमे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे यावर शासनाचा त्यावरील अंकुश त्यावर असला पाहिजे.

**९) सांप्रदायिक दंगलीत पोलीसशासन यंत्रणेचा कार्यक्षम सहभाग :**

पोलीस आपल्या गुप्तहेर व खबऱ्यांद्वारे गुन्हेगारी कृत्यांचा शोध घेत असतात. त्याचपद्धतीने सांप्रदायिक तणाव निर्माण झाल्याचा सुगावा लावून ते दंगली व हिंसाचार रोखू शकतात. ज्या भागात दंगली घडल्या तेथे नि:पक्षपातीपणे दंगलखोरांना पकडणे व त्यांना न्यायालयासमोर विनाविलंब उभे करण्याची काळजी घेतली पाहिजे. अशा घटनात स्वतंत्र न्यायालये स्थापून, गुन्हेगारांना कायद्यातील आधार घेवून सुटता येऊ नये याची दक्षता घेतली पाहिजे. अशा गुन्हेगारांना कडक शासन होते असे लक्षात आल्यास इतर दंगलखोरांवर वचक बसेल. याशिवाय दंगलीत झळ बसलेल्यांना वेळीच मदत करणे, त्यांना नोकरीमध्ये संधी देणे, त्यांचे व्यवसाय पुन्हा उभे करण्यासाठी आर्थिक मदत केल्यास त्यांना दिलासा मिळेलच व शासनावरील विश्वास वाढेल. भिवंडी सारख्या संवेदनशील भागात पोलीस यंत्रणेने दोन्ही समुदायातील मान्यवर व्यक्तींना घेऊन माहिती समिती स्थापन करून दंगल रोखण्याचा प्रयत्न केला. त्याच पद्धतीने संवेदनशील क्षेत्रात, गावात दोन्ही समुदायातील मान्यवर व्यक्तींना एकाच व्यासपीठावर आणल्यास धार्मिक सण, उत्सवाच्या प्रसंगीही शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित होईल. प्रक्षोभक कृत्य वक्तव्य करणाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पकडता येते. अशा समाजकटंकांवर कोणतीही दयामाया न दाखवता कठोर कारवाई केली पाहिजे. पोलीस व शासनसंस्थेने अशाप्रकारे कार्य केल्यास त्यांच्यावर निरपराध जनता विश्वास ठेवते.

### २.३.२ स्त्रीभ्रुणहत्या : अर्थ, कारणे व उपाययोजना

### (Female Foeticide : Meaning, Causes and Remedy)

#### अ) स्त्रीभ्रुणहत्या : अर्थ (Female Foeticide : Meaning) :

वास्तवता लिंगनिदान या शब्दातच मुलगा व मुलगी हा भेदभाव आढळतो. स्त्रियांचा दर्जा सातत्याने खालावत चाललेल्या पुरूषसत्ताक भारतीय समाज व्यवस्थेत मुलगी हे नको असणारे अपत्य आहे. तिच्या जन्माचे कधीच स्वागत होत नाही. पूर्वी भारतातील काही राज्यांमध्ये स्त्री अर्भकांच्या जन्मानंतर लगेच हत्या केल्या जात. आज सर्वच समाजात गर्भलिंगनिदान तंत्रामुळे स्त्रीभ्रुणहत्या हा अमानुष प्रकार, समाजामध्ये रूढ झाला आहे. त्यामुळे गर्भजलचिकित्सा व सोनोग्राफी तंत्राचा वापर करून गर्भलिंगनिदान व गर्भपाताने मुलगी नष्ट करणे सोपे झाले आहे. भारतीय समाजामध्ये धोकादायकरित्या स्त्रियांच्या प्रमाणात घट होत आहे. यामुळेच स्त्रीभ्रुणहत्या ही समस्या निर्माण झाली आहे. ''गर्भलिंगनिदान करून बेकायदेशीररित्या मुलीचा गर्भ काढून टाकणे, नष्ट करणे म्हणजे स्त्रीभ्रुणहत्या होय.'' स्त्री-पुरूष प्रमाणाचा समतोल बिघडण्याचे मुख्य कारण स्त्रीभ्रुणहत्या होय. नैसर्गिकरित्या जन्मणाऱ्या मुलींचे प्रमाण अभ्यासल्यास असे दिसते कि गेल्या दशकभरात 'एक कोटी' मुलींना या जगात प्रवेश करण्यापूर्वीच नष्ट केले आहे. कायदा होऊनही मुलगी नकोच म्हणणारे पालक व वैद्यकिय ज्ञानाचा बाजार मांडणारे तज्ञ कायद्यातील पळवाटांचा फायदा घेत हा मानवतेला काळिमा फासणारा धंदा करतात. मुळात समाजाचीच मानसिकता मुलींच्या जन्मावर उठली असल्याने या समस्येने गंभीर रूप धारण केल्याचे दिसते.

#### स्त्रीभ्रुणहत्या समस्येची व्यापकता :

प्राचीन काळात बरोबरीचा असलेला स्त्रीचा दर्जा उत्तर वैदिक कालखंडापासून खालावत गेला. पितृसत्ताक व्यवस्थेत स्त्रियांचं आस्तित्व चूल आणि मूल या मर्यादेत गृहित धरलं जाऊ लागलं. १९ व्या शतकातील समाजसुधारकांच्या प्रयत्नामुळे स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर स्त्रियांना संरक्षण देणारे अनेक कायदे करण्यात आले. म्हणून स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रमाण कमी झाले असे म्हणता येत नाही. उलट विविध रूपातील अत्याचाराचे प्रकार म्हणजे स्त्रीभ्रुणहत्या होय. गेल्या सहा दशकातील लिंग गुणोत्तराच्या आकडेवारीतून असे निष्पन्न होते की दर हजारी पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण सातत्याने घटत आहे. (United Nations Fund for Population Activities) च्या अंदाजानुसार २००१ ते २००२ या वर्षात भारतात ६ लाख मुलींना जन्मालाच येऊ दिलेलं नाही. अर्थतज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते भारताने आतापर्यंत ३१ दशलक्ष मुली हरवल्या आहेत. त्यातूनच नाहिशा होणाऱ्या मुली (Missing Girls) ही संकल्पना पुढे आली. मुलींच्या आरोग्याकडे व विकासाकडे हेतुपूर्वक केले जाणारे दुर्लक्ष याचे कारण आरोग्य सुविधा व पोषणापासून स्त्रिया वंचित रहात असतील तर यांचा मृत्यूदर वाढतो. याचा अनुभव ० ते ६ वयोगटातील मुला-मुलींच्या बाललिंग गुणोत्तराच्या नामावलीतून येतो. नैसर्गिकरित्या मुलींमध्ये असणाऱ्या प्रतिकार क्षमतेमुळे १०५० मुलींमागे १००० मुलं हे नैसर्गिक प्रमाण आहे. परंतू मुलींच्या आरोग्याबाबत केलेल्या भेदभावामुळे १९९१ च्या जनगणनेतील बाललिंग गुणोत्तर राजस्थान - ८८३, महाराष्ट्र - ८८३, पंजाब - ८७५, व हरियाणा - ८१९ इतकं घटलं होतं. त्या दशकामध्ये पंजाब, हरियाणात ''आज ५००

रू. खर्च करा व भविष्यात खर्च होणारे ५ लाख रू. वाचवा'' अशा जाहिराती उघडपणे केल्या जात.

स्वातंत्र्यानंतर भारतात गर्भपाताला कायदेशीर परवानगी नव्हती तेंव्हा अघोरी, अशास्त्रीय मार्गाचा अवलंब करून गर्भपात केले जात. त्यामुळे स्त्रीच्या जीवास धोका पोहचत असे. संसदेमध्ये यावर चर्चा झाली व १९७१ मध्ये MTP (Medical Termination of Pregnancy Act) कायदा पास झाला. गर्भपाताला कायदेशीर मान्यता मिळाली. लोकसंख्या धोरणानुसार छोट्या कुटुंबाचे महत्त्व वाढले होते. त्यासाठीही उपयुक्त ठरले. त्यापूर्वीच वैद्यकिय क्षेत्रामध्ये 'गर्भजल परीक्षा'(Amnioccentesis) हे नव तंत्र भारतात आलं होतं. गर्भातील विकृती शोधणे व त्यानंतर गर्भपात डॉक्टरांच्या सल्ल्याने केला जात असे. परंतू गर्भजल परीक्षेतून गर्भाचे लिंग ही कळत असे. गर्भजल परीक्षेमुळे लिंगनिदान करणे शक्य झाले. १९८१ मध्ये मुंबईतील एका बहुराष्ट्रीय कंपनीतील पुरूष कर्मचाऱ्यांची वैद्यकिय प्रतीपूर्ती बिले येत. त्यातील बहुसंख्य बिलं पत्नीच्या गर्भपाताची व त्यापूर्वी केलेल्या चाचणीची असत. याचा शोध या कंपनीने एका स्त्री संघटनेच्या मदतीने केला असता गर्भलिंगनिदान केले जात असल्याचे उघडकीस आले. त्यानंतर गर्भलिंगनिदान विरोधी अभियानाने जोर धरला. परंतू भारतात १९९० पासून गर्भजलपरीक्षा केली जात होती व गर्भपाताचा कायदा हा १९७१ मध्ये करण्यात आला. सुशिक्षित, उच्च-मध्यमवर्गीय छोट्या कुटुंबाला पसंती देऊ लागले होते परंतू 'मुलगा' हेच त्यांचे हवे असणारे अपत्य होते. पहिली मुलगी असल्यास लिंगनिदानाचे प्रमाण अधिक होते.

याचकाळात (Ultra Sound Sconograply) तंत्रज्ञान भारतात दाखल झाले. सोनोग्राफी अतिशय सोपी व प्रयोगशाळेची गरज नसलेली पद्धती होती. त्यामुळे ग्रामीण भागातही ही सोनोग्राफी केंद्र वाढायला लागली. १९८० दशकात खाजगी लिंगआधारीत केंद्राचा भारतभर प्रसार झाला. 'सेहत' (सेंटर फॉर इनक्वायरी इन टू हेल्थ अँड अलाईड थीम्स, मुंबई) या संस्थेने महाराष्ट्रामध्ये लिंग गुणोत्तर प्रमाणाचा अभ्यास केला. त्यांच्या निष्कर्षानुसार १५% टक्के गर्भपात हे कायद्यानुसार होतात. महाराष्ट्रासाठी ही धोक्याची घंटा होती. म्हणूनच १९८८ मध्ये महाराष्ट्राने लिंगआधारीत गर्भपात विरोधी कायदा केला. अशा प्रकारचा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य ठरले. पुढे इतर राज्यांनीही कायदे केले. भारतभर लागू होणारा १९९४ चा जन्मपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंध कायदा (Pre-Natal Dignostic Techniques Act 1994) लागू करण्यात आला. या कायद्याने लिंगनिवड करणारे केंद्र, लिंगनिदान करणारी व्यक्ती, मध्यस्थी करणारी व्यक्ती, स्वत: गर्भवती स्त्री, सोनोग्राफी सेंटर्सची जाहिरात करणारे यांना दोषी धरले जात होते. परंतू २००१ च्या जनगणनेतून मुलीचं प्रमाण घटलेलंच आढळून आलं. पंजाब - ७९८, हरियाणा - ८२०, गुजरात - ८८३, हिमाचल प्रदेश - ८९७ अशी काही राज्यात मुलींच्या प्रमाणात चिंताजनक घट दिसून येत होती. महाराष्ट्र ही त्यावेळी ९३३ वर असमाधानकारक स्थितीत होते. हे आकडे कायदा धाब्यावर बसवला जातोय याचे निदर्शकच होते. म्हणूनच २००५ साली पुन्हा कायद्यात दुरूस्ती करून PCPNDT (Pre-Conception and Pre-Netal Duagnostic Techniques Act 2003) गर्भधारणापूर्व आणि प्रसुतिपूर्व गर्भलिंग निदान कायदा कडक करण्यात आला. यामध्ये कृत्रीम गर्भधारणेसाठी सुद्धा लिंगनिवड केली जात असल्याने त्याचाही या कायद्यात समावेश करण्यात आला.

Year wise Child sex ratio and overall sex ratio in India.

| Year | Female sex ratio | Child sex ratio |
|---|---|---|
| 1961 | 941 | 976 |
| 1971 | 930 | 964 |
| 1981 | 934 | 962 |
| 1991 | 929 | 945 |
| 2001 | 933 | 927 |
| 2011 | 940 | 914 |

Source : Census of India - 1961 to 2011

PCPNDT **कायद्यानुसार काही महत्त्वाच्या तरतूदी करण्यात आल्या.**

१) गर्भधारणेनंतर व गर्भधारणापूर्व गर्भलिंग निवड चाचणीवर बंदी घालण्यात आली.

२) सोनोग्राफी सेंटर्सची नोंदणी आवश्यक करण्यात आली.

३) अल्ट्रासाऊंड मशिन विक्रीवर निर्बंध कडक झाले व त्याच्या विक्रीस नोंदणी बंधनकारक करण्यात आली.

४) अशाप्रकारे कायदाभंग करण्याऱ्यांवर कायदेशीर कारवाई व शिक्षेची तरतूद करण्यात आली.

५) वैद्यकिय व्यवसायिकास ३ वर्षे पर्यंत कारावास व १०,००० रू. पर्यंत दंड तसेच पुढील अशा प्रत्येक अपराधास पाच वर्षापर्यंत कारावास व एक लाख रू. पर्यंत दंडाची तरतूद करण्यात आली.

६) या कायद्याअंतर्गत सर्व गुन्हे दखलपात्र मानले जातात.

७) अशा प्रकारचा गुन्हा अजामीनपात्र मानला जातो.

८) अशा प्रकारचा गुन्हा आपसात मिटवता येत नाही.

९) गर्भलिंग चाचणीची जाहिरात करणाऱ्यास तीन वर्षापर्यंत कारावास व १०,००० रू. पर्यंत दंड होऊ शकतो.

**स्त्रीभ्रुणहत्ये संदर्भात निदर्शनास येणारे ठळक मुद्दे :**

१) ० ते ६ वयोगटातील बाललिंग गुणोत्तर सातत्याने घटते आहे.

२) विकसीत व आर्थिकदृष्ट्या सबल असलेल्या भौगोलिक क्षेत्रामध्ये लिंगनिदान व स्त्रीभ्रुणहत्येचे प्रमाण जास्त आहे.

३) पंजाब, हरियाणा, महाराष्ट्र, गुजरात या विकसीत राज्यात मुलींच्या लिंग गुणोत्तरात घट दिसून येते.

४) शिक्षित, उच्चवर्गीय कुटुंबामध्ये लिंग निदानाचे प्रमाण जास्त आहे.

५) शिक्षित मातांना दुसरी मुलगी नको असते.

६) १९९१ मध्ये ८५० प्रमाण असणारा एकच असणारा एकच जिल्हा होता २००१ पर्यंत यामध्ये ४५ जिल्ह्यांची भर पडली.

७) जिथे सहजपणे सोनोग्राफी सेंटर्स आहेत असे विकसीत, संपन्न जिल्हे, तालुके मुलींच्या प्रमाणात घट दाखवतात.

८) ज्या राज्यात स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावलेला आहे तिथे स्त्री-पुरूष प्रमाणात असमतोल आढळत नाही.

मुलींची घटणारी संख्या ही आणिबाणीची स्थिती मानून भविष्याचा विचार केला गेला नाही तर निकोप, सुदृढ समाजाच्य विकासास खीळ बसणार आहे व अनेक भयावह प्रश्न समाजासमोर उभे ठाकणार आहेत. जेवढं मुलींचे प्रमाण घटेल तेवढा स्त्रियांचा दर्जा खालावत जाणार आहे. तिच्यावरील अत्याचारात, हिंसाचारात वाढच होईल. पुरूषांना लग्नासाठी मुली मिळणार नाहीत. परिणामी समलैंगिकतेत वाढ होण्याची शक्यता आहे. काही राज्यात लग्नासाठी मुली मिळत नाहीत म्हणून इतर राज्यातून गरीब मुली आणल्या जात आहेत. स्त्रीचं वस्तुकरण होत आहे. यापलिकडे जाऊन या प्रश्नातून अनेकपतित्वाची प्रथा निर्माण होईल.

स्त्रीभ्रुणहत्या समस्येची व्यापकता अभ्यासता स्त्रियांच्या जगण्यावर उठणारं हे तंत्रज्ञान कायद्याच्या जरबे अभावी गुन्हेगारांना मोकाट सोडते आहे. यामध्ये डॉक्टरांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते पण बऱ्याचवेळा समोरच्याची मागणी व आर्थिक फायदा बघितला जातो. लिंगनिदानाच्या बाबतच्या रेकॉर्डमध्ये घोटाळा करतात. लिंगनिदान केल्यावर सांकेतिक भाषेचा वापर केला जातो. अनेक मध्यस्थ यांत गुंतलेले असतात. कायद्याच्या कचाट्यात सापडू नये याची ते दक्षता घेतात.

**ब) स्त्रीभ्रुणहत्या समस्या : कारणे**

स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतीय स्त्रीच्या जीवनामध्ये खूप मोठे बदल झाले. परंतू स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन जुनाच परंपरागत आहे. आजही स्त्रीचा कोणी पालक असावा. ती कुणा पुरूषाच्या अधिपथ्याखाली असावी अशी समाजाची भावना आहे. आजही समाज जीवनाच्या सर्वच क्षेत्रात स्त्री पुरूषांपेक्षा कमी दर्जाची मानली जाते. स्त्री माणूस आहे याचा समाजाला विसर पडत चालला आहे. एक उपभोगाची वस्तू एवढेच तिचे अस्तित्त्व उरले आहे. इतकं नगण्य स्थान असणारी स्त्री जन्मालाच येऊ नये यासाठी स्त्रीभ्रुणहत्या मोठ्या प्रमाणात घडून येत आहेत. म्हणूनच या समस्येच्या मुळाशी जाण्यासाठी आपण इथे स्त्रीभ्रुणहत्येस पोषक असणाऱ्या कारणांचा अभ्यास करणार आहोत.

**१) पुरूषप्रधान समाज व्यवस्था :**

पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत 'मुलगा' हे हवे असणारे अपत्य आहे. कारण मुलगा कुटुंबाचा वारस, भविष्यात कुटुंबाचा सांभाळ करणारा मानला जातो तर स्त्री परक्याचे धन असते. तिचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल. तिच्याकडे कितीही बौद्धिक क्षमता असली तर कुटुंबासाठी जगणारी, पती परमेश्वर मानणारी, स्वत:चे स्वतंत्र अस्तित्त्व नाकारणारी स्त्री भारतीय समाजात आदर्श मानली जाते. पुरूषप्रधान व्यवस्था स्त्रीला या भूमिकेतून बाहेर पडू देत नाही. स्त्री विवाहीत असणं, तिला मुलं असणं, त्यातही मुलगा असणारी स्त्री असेल तर समाजात प्रतिष्ठा मिळते. या सर्व बाबी पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत मुलगी नको हाच संदेश देणाऱ्या आहेत.

**२) मुलगी नको ही मानसिकता :**

भारतीयांच्या दृष्टीने मुलगी म्हणजे परक्याचं धन आहे. घराण्याची अब्रु त्यामुळे कुटुंबाला तिचा सांभाळ काचेच्या भांड्यासारखा करावा लागतो. विवाह ही स्त्रीसाठी अत्यावश्यक बाब असल्याने त्यासाठी हुंड्याच्यारूपाने कुटुंबाला आधीपासूनच आर्थिक तरतूद करावी लागते. याशिवाय मुलीला कुणी फसवू नये, फूस लावू नये, जाती-धर्माबाहेर जाऊन विवाह करू नये, स्वत: विवाह ठरवण्याचं स्वातंत्र्य घेऊ नये यासाठी तिच्यावर अनेक बंधने घालावी लागतात. याचा ताण कुटुंबावर असतो. याशिवाय समाजात स्त्रियांवरील छळाच्या, अत्याचाराच्या घटना घडतात. त्यापासून मुलींना संरक्षित करण्याचाही ताण कुटुंबावर असतो. शेवटी सगळे करून मुलगी सुखी होईल याची खात्री कुटुंबाला नसते. म्हणूनच समाजात मुलगी नकोच ही मानसिकता निर्माण होते.

**३) सांस्कृतिकदृष्ट्या मुलास प्राधान्य :**

पूर्वीपासून भारतीय संस्कृती मुलाच्या जन्मास प्रथम पसंती देते कारण मुलगा आई-वडिलांचा वृद्धापकाळी सांभाळ करतो, कुटुंबाचा वारसा चालवतो, वंशपरंपरा त्याच्याद्वारेच राखली जाते अशी ठाम समजूत आहे. याशिवाय प्राचीन हिंदू परंपरेनुसार मृत्यूनंतर मुलाने अग्नि दिल्यास, पिंडदान केल्यास मोक्ष मिळतो. आत्मा मुक्त होतो. यावर अजुनही समाजाचा विश्वास आहे. म्हणून काही सांस्कृतिक, प्रथा-परंपरांचे पालन पुत्रप्राप्तीनेच होऊ शकते या विचाराने मुलगा हा हवाच असतो.

**४) स्त्रियांचा दुय्यम दर्जा :**

भारतीय समाजातील स्त्रीचा आरोग्य, शिक्षण, संपत्ती, रोजगार समाजातील स्थान या प्रत्येक ठिकाणी भेदभावपूर्ण वागणूक दिली जाते. जन्मापासून तिच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. शिक्षणापासून वंचित ठेवले जाते. स्त्रियांना नोकरी व रोजगाराच्या संधी नाकारल्या जातात अथवा मोबदला कमी दिला जातो. तिचा उत्पादक कामामध्ये सहभाग नसतो. निर्णय प्रक्रियेत तीला सहभागी करून घेतले जात नाही. स्त्रियांचा दुय्यम दर्जा मुलगी नको या मानसिकतेशी येतो. कारण ज्या राज्यात इतर देशात स्त्रियांचा दर्जा उंचावला आहे तिथे स्त्री-पुरूष प्रमाणात समतोल असल्याचे आढळून येते.

**५) हुंडा प्रथा :**

हिंदू संस्कृतीनुसार मुली आणि विवाह हा पवित्र संस्कार मानला जातो. मुलीचे सालंकृत कन्यादान केले जाते. अलंकार, वस्तू व पैसे यांसह केलेले कन्यादान महत्त्वाचे ठरते. त्यातूनच आजतागायत हुंडा देण्याची प्रथा समाजात रूजली आहे. आज समाजातील शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या संपन्न अशा उच्चभ्रु वर्गामध्ये मुलीला हुंडा दिल्याचं प्रदर्शन मांडल जात. हुंडा देणारा पिता प्रतिष्ठित म्हणून मिरवतो. याचा परिणाम ग्रामीण, आदिवासी, मध्यमवर्गीय, कष्टकरी वर्गावरही झालेला आहे. या समुदायातूनही हुंडा देणे आवश्यक मानल जाऊ लागले आहे. तर काही वेळा हुंड्याअभावी मुलींच्या विवाहामध्ये अडथळा येत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मुलगी म्हणजे हुंडा कुटुंबावरील आर्थिक भार या विचारातून मुलीचा जन्मच नाकारला जात आहे.

**६) प्रथा, परंपरा व जाती-धर्माचे दडपण :**

भारतीय समाजात निपुत्रिक स्त्रीस हिन वागणूक दिली जाते. त्याबरोबरच अपत्यप्राप्तीपेक्षाही पुत्रप्राप्ती महत्त्वाची मानली जाते. तिच्यापोटी पुत्र जन्मला नाही तर तीला अपमानास्पद वागणूक मिळते. जोपर्यंत मुलगा होत नाही तोपर्यंत तिच्यावर बाळंतपण लादल्याचं पूर्वीच्या कित्येक घटनातून दिसतं. मुलगा नाही झाला तर सवत आणतील अथवा नवरा आपल्याला टाकून देईल व परितक्तेचं आयुष्य जगावं लागेल याचं दडपण स्त्रीवर असत. याशिवाय जात व धर्मपालनाची जबाबदारी स्त्रियांवरच आहे असे मानले जाते. बऱ्याचवेळा जातपंचायती, धर्मगुरू पारंपारिक रिती-रीवाज, रूढींचे पालन करण्याबाबत आग्रही असतात. या दडपणातूनच स्त्रिया शिक्षण व रोजागाराच्या संधीपासून वंचित राहतात.

**७) स्त्रियांवरील अत्याचारात वाढ :**

स्त्री सातत्याने कोणत्या ना कोणत्या स्वरूपाच्या अत्याचाराला बळी जात असते. म्हणून स्त्रियांवरील अत्याचाराविरूद्ध अनेक कायदे केले गेले. पण कायदा स्त्रीला सुरक्षितता देऊ शकला नाही. आजही स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रमाण पाहिले तर ते वाढतच चालल्याचे दिसते. हुंडाबळी, स्त्रीस होणारी मारहाण, कौटुंबिक हिंसाचार, छेडछाड, विनयभंग, बलात्कार असे गुन्हे तिच्याविरोधी घडतच असतात. त्यामुळे स्त्रिया समाजात असुरक्षित आहेत. लहान मुली लैंगिक दुरूपयोग व शारिरीक हिंसेला बळी पडण्याची शक्यता तर प्रौढपणी विविध प्रकारच्या अत्याचाराची भिती असते त्यामुळे स्त्रिया समाजामध्ये सर्वात जास्त असुरक्षित मानल्या जातात.

**८) सहज उपलब्ध होणारे तंत्रज्ञान :**

लहान-लहान गावापासून मोठ्या शहरांमध्ये गर्भलिंग चिकित्सा केंद्रे सहजपणे उपलब्ध झाली आहेत. केंद्र सरकारच्या नोंदीनुसार भारतात ३६००० सोनोग्राफी मशिन्स आहेत जी आवश्यकतेपेक्षा जास्त आहेत. बऱ्याच वेळा तेथे छुपा गर्भलिंग निदानचा धंदा चालतो. डॉक्टर, मध्यस्थ वा ग्राहक या सर्वांनाच फायद्याचे ठरेल असे पॅकेज दिले जाते. त्यामुळे चाचणी करणे व गर्भपात करणे या पॅकेजमुळे सहज शक्य होते.

### ९) गर्भवती स्त्रीची अगतिकता :

या पुरूषसत्ताक व्यवस्थेने ज्या प्रकारचे आयुष्य स्त्रीच्या वाट्याला आणलेले असते. तसे आयुष्य आपल्या मुलीच्या वाट्याला येवू नये. या मानसिकतेतून गर्भवती स्त्री स्त्रीभ्रुणहत्येत सहभागी होते. काही वेळा नको असलेल्या बाळंतपणातून सुटका झाल्याचा आनंद ती मानते. या व्यवस्थेने स्त्रीला इतके अगतिक बनवलेले असते की या सर्वात ती आपला सहभाग नोंदवते.

### १०) उपभोगवादी संस्कृती :

जागतिकीकरणानंतर उपभोगवादी संस्कृती रूजत चालली आहे. उपभोगवाद मानवतेपेक्षा पैसा, स्वसुख केंद्रस्थानी मानतो. अशा समाजात ज्या स्त्रीला गौण स्थान आहे. माणूस म्हणून सर्वात शेवटी विचार केला जातो. व तिच्याकडे केवळ उपभोगाची वस्तू म्हणून पाहिलं जातं. उपभोगवादी संस्कृती स्त्रीला अगदी नगण्य मानत आहे.

## क) स्त्रीभ्रुणहत्या : उपाययोजना (Female Foeticide : Remedy)

भारतीय समाजात स्त्रीभ्रुणहत्या या समस्येने गंभीर रूप धारण केलेले आहे. कारण समाजातील मुलींच्या प्रमाणात सातत्याने घट होत आहे. कायदा आहे त्याची अंमलबजावणी काटेकोर व्हायला हवी. तितकेच हा प्रश्न सामाजिक, सांस्कृतिक जडणघडणीतून निर्माण झालेला आहे. यामुळे त्यावर उपाययोजना करताना सामाजिक-सांस्कृतिक विचारसरणी, रूढी, परंपरा, जीवन पद्धती यात बदल घडवून आणणे आवश्यक आहे.

### १) स्त्री-पुरूष समतेचे मूल्य रूजवणे :

भारतीय संविधानात स्त्री-पुरूष समानतेचं तत्त्व स्विकारल आहे. तसं प्रत्यक्ष जीवनातही स्त्री-पुरूष दोघांनीही समानतेने प्रत्येकाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवले पाहिजे. स्त्री आणि पुरूष या दोघांचेही स्थान समाजामध्ये महत्त्वाचे आहे. कुणीही श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नाही. हे मूल्य रूजवण्यासाठी समाजातून, कुटुंबातून प्रयत्न व्हायला पाहिजेत. स्त्रियांचा अनादर करणारे वक्तव्य व वर्तन यावर पुरूषांनी बंधन घालून स्त्रियांकडे सन्मानाने पाहिलं पाहिजे. यातून स्त्रीविरोधी पुरूषमानसिकता बदलेल.

### २) स्त्री शिक्षणावर भर देणे :

स्त्री साक्षरता व जननक्षमता यांचा संबंध अनुकूल असल्याचे जगातच नाही तर भारतातही सिद्ध झाले आहे. भारतीय पुरूषांच्या तुलनेत स्त्रीशिक्षणाचे प्रमाण कायम कमीच राहिले आहे. म्हणूनच स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणारे तीला स्वयंपूर्ण बनवणारे शिक्षण दिले पाहिजे. केरळ सारख्या राज्यात स्त्री साक्षरता, स्त्रियांचा दर्जा, स्त्री रोजगाराचं प्रमाण जास्त आहे. त्यामुळे तिथे स्त्रियांच प्रमाण पुरूषांच्या तुलनेत जास्त असल्याचे दिसते. म्हणूनच स्त्रियांना सर्वार्थाने सक्षम करणाऱ्या शिक्षणावर भर देणे गरजेचे आहे.

### ३) स्त्री आरोग्य प्रश्नास प्राधान्य देणे :

भारतीय पारंपारिक दृष्टीकोनातून ''स्त्रीला पौष्टिक आहाराची गरज नसते. ती जन्मत: सुदृढ असते.'' या

विचारातून तीला पोषक आहारापासून वंचित ठेवले जाते. तिच्या आरोग्य समस्येकडे दुर्लक्ष केले जाते. स्त्रियांच्या वाट्याला येणारे कष्ट, लवकरच्या वयात होणारे लग्न, लादले जाणारे मातृत्त्व यामुळे स्त्रियांचे आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. तसेच बालमृत्यू, मातामृत्यूचेही प्रमाण वाढते. माता-बालसंगोपनावर शासन लक्ष पुरवत असले तरी युनिसेफच्या म्हणण्यानुसार भारतात ५ वर्षाच्या आतील मुलींच्या मृत्यूचे प्रमाण जास्त आहे. म्हणूनच खालच्या स्तरातील, कनिष्ठ वर्गातील मुलींच्या पोषण, कुपोषण, आरोग्य, शिक्षण यावर जास्त लक्ष केंद्रीत केल्यास मुलींचा आरोग्यप्रश्न प्राधान्याने सुटेल.

**४) स्त्रियांना सुरक्षित वातावरण निर्माण करणे :**

महिलांवर होणारे अत्याचार स्त्रियांच्या संचार स्वातंत्र्यावर बंधने आणतात. असुरक्षितता असेल तर मुली शिक्षणासाठी, रोजगारासाठी बाहेर पडू शकत नाहीत. मुलींच्या संचारासाठी सुरक्षित पर्यावरण निर्माण करणे ही समाजाची जबाबदारी आहे. स्त्रियांविरोधी घडलेल्या गुन्ह्यातील आरोपींना विनाविलंब शिक्षा झाल्यास व पोलिसयंत्रणा व न्याययंत्रणा सक्षमपणे काम करतात याचा अनुभव आल्यास महिलांसाठी समाजात सुरक्षित वातावरण होईल.

**५) सोनोग्राफी सेंटर्स व वैद्यकिय कर्मचाऱ्यांवर अंकुश :**

आज गावा-गावातून सोनोग्राफी सेंटर्स आहेत. शासन व आरोग्य विभागाची यंत्रणा अशा सेंटर्सवर बारकाईने लक्ष ठेवतात. त्यांचे रेकॉर्ड तपासतात. परंतू समाजातील काही प्रतिष्ठित व्यक्तींची यावर नजर असेल तर गुन्ह्यावर मोठ्या प्रमाणात अंकुश ठेवता येईल. त्या-त्या कार्यक्षेत्रातील उच्चपदस्थ महिला, महिला डॉक्टर्स, सामाजिक कार्यकर्त्या, महिला वकील वा कायदेतज्ञ यांचे अशा सेंटर्सवर लक्ष आहे या जाणिवेतून तेथील बेकायदेशीर कृत्यांना आळा बसेल.

**६) स्त्रियांचे सक्षमीकरण :**

स्त्रियांच्या बाबत केल्या जाणाऱ्या भेदभावपूर्ण विषम वागणुकीमुळे स्त्रियांचा दर्जा खालावत चालला आहे. म्हणूनच शासनाने महिला सक्षमीकरण धोरण राबवले. स्त्रियांचा विकास हा स्त्री शिक्षण, तिला अर्थाजनाची प्राप्त होणारी संधी व निर्णय प्रक्रियेतील तिच्या सहभागावर अवलंबून आहे. त्यामुळे स्त्रीला संधी देताना तिच्या हक्कापासून, अधिकारापासून व विशेष सवलतीपासून तिला वंचित ठेवलं जात नाही ना हे पाहणं गरजेचं आहे. स्त्रियांना शिक्षणापासून राजकारणापर्यंत प्रत्येक ठिकाणी अग्रक्रमाने संधी प्राप्त झाल्यासा ती खऱ्या अर्थाने सक्षम होईल.

**७) PCPNDT ACT-1994/2020-21 कायद्याची काटेकोर अंमलबजावणी :**

स्त्रीभ्रुणहत्येस जबाबदार प्रमुख घटक म्हणजे आधुनिक तंत्रज्ञान व डॉक्टर्स होय. त्यामुळे उच्चशिक्षीत डॉक्टर मंडळींनी आर्थिक लोभापेक्षा मानवतेच मूल्य जपणं आवश्यक आहे. बऱ्याचवेळा डॉक्टर व इतर कर्मचाऱ्यांना प्रशासकिय यंत्रणा पाठीशी घालते. अशा गुन्ह्यांमध्ये पोलीस व प्रशासनाने आपले हितसंबंध बाजूला ठेवून

कारवाई केली पाहिजे. अशा गुन्ह्यात सापडलेल्या आरोपींवर कारवाई होताना दिरंगाई होऊ नये. आरोपींना झालेली शिक्षा, न्यायालयात शिक्षा दिल्यावर केलेली अंमलबजावणी या गोष्टी समाजापर्यंत पोहचल्या पाहिजेत. त्यामुळे अशा रॅकेटमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींवर जरब बसेल. ग्राहक असणारे पालक, डॉक्टर्स, मध्यस्थ, इतर तंत्रज्ञ यांच्यावर वचक बसल्याशिवाय स्त्रीभ्रुणहत्येसारखे गुन्हे रोखता येणार नाहीत. यासाठी (PCPNDT) कायद्याची कठोर व काटेकोर अंमलबजावणी अत्यावश्यक आहे.

**८) सामाजिक प्रबोधन :**

शासन व स्वयंसेवी संस्थांनी स्त्रीभ्रुणहत्या, स्त्रियांचे घटते प्रमाण याबाबत घोषवाक्य, भित्तीचित्रे, लघुपट, जाहिराती, संदेशाच्या माध्यमातून समाज प्रबोधन केल्यास ते प्रभावी ठरते. निकोप, निरोगी, समृद्ध समाज निर्मितीसाठी स्त्रियांचे असणारे महत्त्व जनजागृतीच्या माध्यमातून स्पष्ट केले पाहिजे. त्यासाठी दूरचित्रवाणी, रेडिओ, समाजमाध्यमे 'मुलगी वाचवा ' अशी चळवळ उभी करता येईल.

याशिवाय २०११ साली झालेल्या जनगणनेनंतर सावित्रीबाई फुले जयंती ३ जाने रोजी 'सावित्रीच्या लेकी' हे अभियान 'बेटी बचाओ बेटी पढाओ' म्हणून सुरू करण्यात आले. २०१४ साली पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी केंद्रशासनातर्फे मुलींच्या संख्येत वाढ व्हावी यासाठी 'बेटी बचाओ बेटी पढाओ' हे अभियान सुरू केले. त्यामुळे देशातील १०० जिल्हे मुलींची संख्या वाढवण्यासाठी निवडले व त्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर सोपवण्यात आली.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये शहरातील सर्व सोनोग्राफी सेंटर्स केंद्रीय यंत्रणेशी जोडून सोनोग्राफी सेंटर्सच्या गैरवापरावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न कलेक्टर श्री. लक्ष्मीकांत देशमुख यांनी केला. शेवटी कायद्याची अंमलबजावणीच काम आरोग्य यंत्रणा, शासन करेल पण वैद्यकशास्त्रातील नितीमुल्यांना जागून डॉक्टरांनी काम केले तर हा प्रश्न बराचसा आटोक्यात येईल. कुटुंब व समाजाच्या योगदानातून प्रबोधनातून लिंगभेदभाव नष्ट करता येईल.

**२.५ सारांश :**

भारतातील संप्रदायवादास धर्म जबाबदार नाही तर कर्मकांडातील भेदभाव, अज्ञानी, धर्मश्रद्धाळू अनुयायांचा वापर करून घेणारा पुरोहित वर्ग, आपली राजकिय पकड घट्ट करण्यासाठी, सत्ता प्राप्तीसाठी स्वार्थी राजकारणी धर्माचा वापर करतात. धार्मिक विसंवादातूनच देशाच्या प्रगतीत, वैज्ञानिक विकासात अडथळा निर्माण होतो. खरतर जगातील सर्व धार्मिक विचारसरणीत कल्याणकारी तत्त्व आहे. धर्माच्या अभ्यासकांनी सर्वसामान्यांचे याबाबत प्रबोधन केले पाहिजे. हिंसेच्या, द्वेषाच्या कल्लोळात धर्मातील मानवतावादी विचार कानावर पडत नाहीत. तेव्हा खरी धार्मिकता संपते व धार्मिक विसंवादास सुरूवात होते. हेच भारतीय संप्रदायवादाचे फलित आहे.

या घटकामध्ये आपण स्त्रीभ्रुणहत्या या समस्येचा अर्थ स्त्रीभ्रुणहत्येची कारणे व त्यावरील उपाययोजना पाहिल्या. प्रामुख्याने भारतीय समाजात होत असणारी लिंग भेदभाव, समाजात स्त्रियांना मिळणारी विषम वागणूक, स्त्रियांना समाजात असणारे दुय्यम स्थान यामुळे स्त्रियांना समानतेतून मिळणाऱ्या संधीपासून वंचित रहावे लागते.

केवळ उपभोगाचं साधन एवढच तिच स्थान उरत. अशावेळी स्त्रियांवरील विविध अत्याचाराच प्रमाण वाढतं. स्त्री घरात, घराबाहेर असुरक्षित असतेच पण स्त्रीभ्रुणहत्येच्या रूपान मातेच्या गर्भातही ती असुरक्षित बनते. स्त्री-पुरूष असंतुलन, स्त्रियांचं घटतं प्रमाण समाजावर प्रतिकूल परिणाम घडवून आणत आहेत आणि भविष्यातही गंभीर परिणामांना तोंड द्यावं लागणार आहे म्हणून स्त्रीभ्रुणहत्येची कारणे व त्यावरील उपाययोजनांचा अभ्यास आपण या घटकामध्ये केला आहे.

### २.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न (Check your Progress) :

**(अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) भारतातील संप्रदायवादाचा प्रमुख आधार कोणता?

२) धर्मरक्षणापेक्षा संप्रदायवादात काय महत्त्वाचे असते?

३) धार्मिक कर्मकांडे सांप्रदायिकतेस कधी कारणीभूत ठरतात?

४) मूलतत्त्ववाद कशाशी निगडीत असतो?

५) कोणत्या धर्माच्या पंथांमध्ये हा संघर्ष झाल्याचे आढळून आले आहे?

६) हिंदू व मुस्लीम विवाहसंस्थेतील प्रमुख भिन्नता कोणती?

७) हिंदू व मुस्लिमांच्यात वितुष्ट निर्माण करण्यासाठी ब्रिटिशांनी कोणती निती अवलंबली?

८) स्वातंत्र्यापूर्वी आपल्या राजकिय मागण्यांसाठी मुस्लिमांनी कोणता राजकिय पक्ष स्थापन केला?

९) बहुतांशवेळा निवडणुकांमध्ये उमेदवार निवडीसाठी कोणती पात्रता महत्त्वाची मानली जाते?

१०) काश्मिरमधील संप्रदायवाद वाढीस कोणत्या देशाचा हस्तक्षेप कारणीभूत ठरतो?

११) भारतीय मुस्लीम पुरूष विवाहासाठी कोणत्या कायद्याचा आधार घेतात?

१२) मोहल्ला समिती कशासाठी उपयुक्त आहे?

१३) सुरूवातीच्या काळात गर्भलिंग निदानासाठी कोणते तंत्र वापरले जात होते?

१४) २००१ ते २००७ या वर्षात किती मुली जन्मच घेऊ शकल्या नाहीत?

१५) हरवलेल्या मुलींची संकल्पना कुणी मांडली?

१६) नैसर्गिकरित्या मुला-मुलींच्या जन्माच प्रमाण किती असतं?

१७) १९९१ च्या जनगणनेत मुलींचं लिंगगुणोत्तर घटणारी राज्य कोणती?

१८) गर्भजलपरीक्षा व सोनोग्राफी हे तंत्रज्ञान मुख्यत: कशासाठी उपयुक्त आहे?

१९) भारतात गर्भलिंगनिदान कायदा कोणत्या राज्यात व किती साली प्रथमत: चालू करण्यात आला?

२०) PNDT कायदा भारतभर कधी लागू झाला?

२१) २००३ च्या PCPNDT कायद्यात कशाचा समावेश करण्यात आला?

२२) 'स्त्रीभ्रुणहत्या' गुन्ह्यातील आरोपीस जास्तीत जास्त किती शिक्षा होते?

२३) बाललिंग गुणोत्तरात मुलींचे प्रमाण (० ते ६ वय) घटण्याचे कारण कोणते?

२४) स्त्रीभ्रुणहत्येस पोषक क्षेत्र कोणते आहे?

२५) 'केरळ' राज्यात स्त्री-पुरूष प्रमाणात समतोल आढळण्याचे कारण कोणते?

२६) 'मुलगी नको' या मानसिकतेमागील दोन कारणे सांगा?

२७) स्त्रीभ्रुणहत्या रोखण्याऱ्या महत्त्वाच्या दोन उपाययोजना कोणत्या?

**स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answer to check your Progress) :**

**एका वाक्यात उत्तरे**

१) धर्म हा भारतातील संप्रदायवादाचा प्रमुख आधार आहे.

२) संप्रदायावादात धर्मरक्षणापेक्षा राजकिय सत्ता व नेतृत्त्व टिकवणे महत्त्वाचे आहे.

३) धार्मिक कर्मकांडांना राजकिय स्वरूप प्राप्त होते तेव्हा ती सांप्रदायिकतेस कारणीभूत ठरतात.

४) मूलतत्त्ववाद धर्म व सत्तेशी निगडीत असतो.

५) हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन धर्माच्या पंथामध्ये संघर्ष घडून आला आहे.

६) हिंदू धर्मामध्ये विवाह हा संस्कार मानला जातो तर मुस्लीम धर्मामध्ये विवाह हा करार मानला जातो.

७) हिंदू-मुस्लिमांमध्ये वितुष्ट निर्माण करण्यासाठी 'फोडा आणि राज्य करा' ही निती ब्रिटिशांनी अवलंबली.

८) मुस्लिमांनी आपल्या मागण्यांसाठी 'मुस्लीम लिग' पक्षाची स्थापना केली.

९) आपली जात व धर्म ही पात्रता निवडणुकीमध्ये उमेदवार निवडीसाठी महत्त्वाची मानली जाते.

१०) काश्मिरमधील संप्रदायवाद वाढीस पाकिस्तान हस्तक्षेप करत असतो.

११) भारतीय मुस्लीम पुरूष विवाहासाठी शरियत या धार्मिक कायद्याचा आधार घेतात.

१२) दोन समुदायात समन्वय साधून दंगल रोखण्यासाठी मोहल्ला समिती उपयुक्त ठरते.

१३) सुरूवातीच्या काळात गर्भजलचिकित्सा हे तंत्र गर्भलिंग निदानासाठी वापरले जात होते.

१४) २००१ ते २००७ या वर्षात ६ लाख मुली जन्मच घेऊ शकल्या नाहीत.

१५) हरवलेल्या मुलींची संकल्पना डॉ. अमर्त्य सेन यांनी मांडली.

१६) नैसर्गिकरित्या १०५० मुलींमागे १००० मुलं हे जन्मप्रमाण असतं.

१७) १९९१ च्या जनगणनेत राजस्थान, पंजाब, हरियाणा व महाराष्ट्र या राज्यात मुलींचं लिंगगुणोत्तर घटलं.

१८) गर्भातील भ्रुणात विकृती असल्यास गर्भजल चिकित्सा व सोनोग्राफी तंत्र उपयुक्त ठरतं.

१९) भारतात गर्भलिंगनिदान कायदा प्रथम महाराष्ट्रात १९८८ साली करण्यात आला.

२०) PNDT कायदा भारतभर १९९४ साली लागू करण्यात आला.

२१) २००३ च्या PCPNDT कायद्यात प्रसुतीपूर्वच नाहीतर गर्भधारणापूर्व लिंगनिवडीस प्रतिबंध करण्यात आला.

२२) स्त्रीभ्रुणहत्येच्या गुन्ह्यातील आरोपीस ५ वर्षापर्यंत कारावास व एक लाख रू. पर्यंतचा दंड ही शिक्षा होऊ शकते.

२३) ० ते ६ वयातील बाललिंग गुणोत्तरात मुलींचे प्रमाण घटते कारण मुलींच्या पोषण व आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते.

२४) सोनोग्राफी सेंटर्सची सहज उपलब्धता व विकसीत जिल्ह्यांच्या ठिकाणी स्त्रीभ्रुणहत्येचे प्रमाण जास्त आहे.

२५) स्त्रियांचा उच्च दर्जा, स्त्री साक्षरता व स्त्री रोजगाराचे प्रमाण जास्त असल्याने केरळ राज्यात स्त्री–पुरूष समतोल आढळतो.

२६) पुरूषप्रधान समाजव्यवस्था व स्त्रियांचा दुय्यम दर्जा ही कारणे मुलगी नको ही मानसिकता निर्माण करतात.

२७) PCPNDT कायद्याची कठोर अंमलबजावणी समाजप्रबोधन केल्यास स्त्रीभ्रुणहत्या रोखता येतील.

**२.७ सरावासाठी प्रश्न (Exercise/Home Assignment) :**

१) संप्रदायवादाचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करा.

२) संप्रदायवादाची कारणे विशद करा.

३) संप्रदायवादावरील उपाययोजना उपयोगता स्पष्ट करा.

४) स्त्रीभ्रुणहत्येचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करा.

५) स्त्रीभ्रुणहत्येची कारणे विशद करा.

६) स्त्रीभ्रुणहत्ये समस्येवरील उपाययोजना स्पष्ट करा.

**चिंतन व कार्य**

१) संप्रदायीक दंगलीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याची माहिती मिळवा.

२) प्रत्येक धर्मात केल्या जाणाऱ्या मानवतावादी कार्याची माहिती गोळा करा.

३) आपल्या परिसरातील अंगणवाडीतील मागील काही वर्षातील ० ते ६ वयोगटाचे बाललिंग गुणोत्तरातील चढ उतार अभ्यासा.

४) पहिलं अपत्य मुलगी असणाऱ्या दांपत्याशी चर्चा करा. मुलींविषयी नकारात्मक दृष्टीकोन असणाऱ्या दांपत्याचं प्रबोधन करा.

**अधिक वाचनासाठी पुस्तके : (Suggested Readings)**

१) कोंडेकर ए. वाय. मारूलकर विषय : भारतीय सामाजिक समस्या, फडके प्रकाशन.

२) मायी सुनिल : भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, डायमंड पब्लिकेशन्स पुणे-२००९

३) राम आहुजा : सामाजिक समस्याए, रावत पब्लिकेशन्स, न्यू दिल्ली.

४) साळुंखे सर्जेराव : समकालीन भारतातील सामाजिक समस्या, नरेंद्र प्रकाशन, पुणे.

५) टि. के ओमान (अनु. संगीता फाटक) : भारतीय समाजिक समस्या व वाद, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

६) आशा खांडेकर-गवई : महिलांच्या मानवाधिकांचे उल्लंघन, सुगावा प्रकाशन पुणे.

७) भागवत विद्युत : स्त्री प्रश्नाची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

८) आ. ह. साळुंखे : हिंदू संस्कृती आणि स्त्री, लोकवाङ्मयगृह, पुणे.

९) देहऽराय स्वाती, तांबे अनघा : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ.

* * *

# घटक – ३
# सामाजिक – आर्थिक समस्या
# (Socio - Economic Issues)

**अनुक्रमणिका**

३.० प्रस्तावना

३.१ उद्दिष्टे

३.२ विषय विवेचन

३.२.१ दारिद्र्य : अर्थ, कारणे आणि उपाययोजना

दारिद्र्याची संकल्पना/अर्थ

३.२.२ बेरोजगारी : अर्थ, कारणे आणि उपाययोजना

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठीचे प्रश्न

३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.१ प्रस्तावना ( Introduction) :

या प्रकरणामध्ये आपण सामाजिक-आर्थिक समस्या/मुद्दे म्हणून दारिद्र्य व बेरोजगारी या दोन समस्यांचा आढावा घेणार आहोत. या दोन्हीही समस्या भारताच्या सामाजिक-आर्थिक समस्या आहेत. त्यात प्रामुख्याने दारिद्र्य हा भारतीय समाज व्यवस्थेचा स्थायीभाव असलेला दिसून येतो. भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये दारिद्र्य ही एक प्रमुख समस्या म्हणून समाविष्ट झाली आहे. दारिद्र्याचे स्वरूप केवळ आर्थिक नसून ते राजकीय-मानसिक, श्रमिक, वैज्ञानिक, सामाजिक अशा घटकांवर अवलंबून असते. दारिद्र्याचा परिणाम हा व्यक्तीचे आरोग्य, तिचे राहणीमान, शिक्षणाचे प्रमाण, सामाजिक परिस्थिती यासारख्या बहुतेक सर्वच घटकांवर होत असतो. समाजातील प्रमुख सामाजिक-आर्थिक प्रश्न म्हणून या घटकांत आपण दारिद्र्याचा अर्थ, दारिद्र्याची कारणे व दारिद्र्य

निर्मुलनासाठी उपाय यांचा अभ्यास करणार आहोत.

तसेच दुसरी सामाजिक-आर्थिक समस्या म्हणून बेरोजगारी या समस्येचा अभ्यास करणार आहोत. भारतीय अर्थव्यवस्थेसमोर निर्माण झालेल्या समस्यामुळे देशाच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होतो आणि या सर्व समस्यांचे मूळ बेरोजगारीत आढळते. भारत देशात शेती, उद्योग व सेवा क्षेत्रात पुरेशा प्रमाणात रोजगार संधी निर्माण न होऊ शकल्याने देशातील बेरोजगारीचे प्रमाण वाढत गेले. ११ व्या पंचवार्षिक योजनाकाळात देशातील उपलब्ध श्रमशक्तीपैकी ८.२ कोटी लोक बेरोजगार होते. बेरोजगारीमुळे व्यक्तीचे उत्पन्न, उत्पादकता, आरोग्य व मानसिकतेवर प्रतिकूल परिणाम होतात. त्याचा परिणाम समाज व्यवस्था व अर्थव्यवस्थेवर होतो. म्हणून एक प्रमुख सामाजिक-आर्थिक प्रश्न म्हणून या घटकात आपण बेरोजगारीचा अर्थ, बेरोजगारीची कारणे व बेरोजगारीवरील उपाय-योजना यांचा अभ्यास करणार आहोत. या घटकांच्या अभ्यासामुळे दारिद्र्य व बेरोजगारी या दोन प्रमुख समस्यांच्या अभ्यासाला मदत होणार आहे.

### ३.२ उद्दिष्टचे (Objectives) :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास

१) दारिद्र्याची संकल्पना, कारणे आणि उपाययोजना समजून घेता येईल.

२) बेरोजगारीचा अर्थ आणि उपाययोजना समजून घेता येईल.

### ३.२ विषय विवेचन (Presentation of Subject Matter) :

भारतीय समाजातील सामाजिक-आर्थिक समस्या म्हणून दारिद्र्य व बेरोजगारी या दोन समस्यांचा अभ्यास या घटकांत करणार आहोत. दारिद्र्य ही एक गंभीर सामाजिक समस्या आहे. मनुष्याच्या प्रमुख मुलभूत गरजा यामुळे पूर्ण होत नाहीत. सर्वसामान्य जीवन जगताना अनेक मुलभूत गोष्टींची कमतरता दारिद्र्यामुळे निर्माण होत असते. या घटकांत आपण दारिद्र्याची संकल्पना, दारिद्र्याची कारणे व दारिद्र्य निर्मुलनाचे उपाय यांचा अभ्यास करणार आहोत. यामुळे आपणास दारिद्र्याची संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होईल.

बेरोजगारी ही एक प्रमुख सामाजिक समस्या आहे. बेरोजगारी, दारिद्र्य, गुन्हेगारी, व्यसनाधिनता अशा अनेक समस्यांना चालना देऊ शकते. बेरोजगारीमुळे सर्वसामान्य आर्थिक जीवन जगणेही शक्य नसते त्यामुळे या घटकांत आपण बेरोजगारीचा अर्थ, बेरोजगारीची कारणे व बेरोजगारीवरील उपायांचा अभ्यास करणार आहोत. या अभ्यासामुळे आपणास बेरोजगारीचे मुळ स्वरूप स्पष्ट होण्यास मदत होईल.

### * दारिद्र्याची समस्या :

दारिद्र्य ही आर्थिक समस्या आहे. त्याचप्रमाणे सामाजिक समस्यादेखील आहे. दारिद्र्य किंवा गरीबी व्यक्तीला मिळणाऱ्या अत्यल्प उत्पन्नामुळे निर्माण होते. उलट कमी असल्यामुळे व्यक्ती आपल्या जीवनावश्यक गरजांची पूर्तता करू शकत नाही. सामान्यपणे ज्यांना आपल्या मुलभूत स्वरूपाच्या जीवनावश्यक अशा गरजांची

पूर्तता करता येत नाही. अशांचा समावेश 'दरिद्री व्यक्ती' या सदरात करावा लागतो. या समाजातील बहुसंख्य लोकांना किमान पातळीवरचे आर्थिक जीवन जगता येत नाही. अशा समाजाला 'दरिद्री समाज' म्हणत येईल

विसाव्या शतकातील ज्या समस्येने अर्थतज्ञ व समाजशास्त्रज्ञांचे सर्वाधिक लक्ष वेधले आहे आणि ज्या समस्येची सोडवणूक योग्य प्रकारे केली गेली नाही तर सर्वांच्या चिंतेची व चिंतनाची समस्या बनणार आहे. ती समस्या म्हणजे दारिद्र्याची समस्या होय. दारिद्र्याची समस्या निर्माण होण्यास आर्थिक कारणांबरोबरच सामाजिक कारणेदेखील जबाबदार आहेत. दारिद्र्याच्या समस्येतून गुन्हेगारी, व्यसनाधिनता, आत्महत्या, भिक्षावृत्ती, अनारोग्य अशा अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. म्हणून समाजशास्त्रज्ञांच्या मते, दारिद्र्य ही केवळ आर्थिक समस्या नाही तर ती एक सामाजिक समस्या देखील आहे. दारिद्र्यातून व्यक्तिगत आणि सामाजिक विघटनाला चालना मिळू शकते. म्हणून दारिद्र्य ही गंभीर सामाजिक समस्या आहे. यानंतर आपण दारिद्र्याची संभाव्यता, कारणे व उपायांचा अभ्यास करणार आहोत.

**※ दारिद्र्याची संकल्पना/अर्थ :**

दारिद्र्य ही एक सामाजिक आर्थिक समस्या आहे. त्यामुळे तिचा अभ्यास समाजशास्त्राबरोबर अर्थशास्त्रातही केला जातो. व्यक्तीचे एकूण उत्पन्न, खर्च, उपभोग, मुलभूत गरजा आणि उत्पन्नाची साधने यामुळे अर्थशास्त्रात दारिद्र्याचा विचार होतो. तर व्यक्तीचे राहणीमान, शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, सामाजिक संबंध, सामाजिक दर्जा व सामाजिक सरंचना यावर एकूण सांपत्तिक स्थितीचा प्रभाव पडत असल्यामुळे समाजशास्त्रात ही समस्या महत्त्वाची मानली जाते. प्रत्येक व्यक्तीला जीवंत राहण्यासाठी किंवा सामान्य जीवन जगण्यासाठी काही आवश्यक गरजांची पूर्तता होणे महत्त्वाचे आहे. मोटार, स्कूटर, फ्रिज, टी. व्ही., मनोरंजन या गोष्टी आवश्यक आहेत. परंतु या वस्तू जीवनावश्यक नाहीत. व्यक्तीला आपल्या जीवनाचा एक किमान स्तर टिकवून ठेवण्यासाठी अन्न, वस्त्र आणि निवारा या गोष्टी आवश्यक असतात. जेव्हा स्वत: व्यक्ती आणि तिच्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या या आवश्यक गरजांची पूर्तता होत नाही. त्यामुळे व्यक्तीला किमान आर्थिक पातळीवरचे जीवन देखील जगता येत नाही. तेव्हा या अवस्थेस दारिद्र्य असे म्हणतात.

अनेक विचारवंतांनी दारिद्र्याची समस्या व संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. सामान्यपणे दारिद्र्य ही एक अशी स्थिती आहे, कि जी एखाद्याकडे काय आहे व काय असावे, याबाबतीत विसंगती निर्माण करते. हेन्री बरस्टेन यांनी दारिद्र्याचे पुढील निदर्शक मांडले आहेत. त्यात प्रामुख्याने उपजिवीकेच्या साधनांची कमतरता, पैसा-जमीन यासारख्या साधनसंपत्तीचा अभाव, असुरक्षिततेची व नैराश्याची भावना तसेच साधन-संपत्तीच्या अभावामुळे सामाजिक संबंधात येणारे अडथळे इ. गोष्टी निदर्शक मांडल्या आहेत. दारिद्र्याच्या संदर्भात आर्थिक दृष्टीकोनातून अर्थशास्त्रज्ञांनी व्याख्या दिल्या आहेत. त्याचप्रमाणे गिलिन व गोडार्ड यांनी समाजशास्त्रीय दृष्टीने व्याख्या दिल्या आहेत. सामाजिक समस्या या दृष्टीने दारिद्र्याचा अभ्यास करीत असताना या व्याख्या लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

*** दारिद्र्याची व्याख्या :**

**१) गिलीन आणि गिलीन :** ''दारिद्र्य ही एक अशी परिस्थिती आहे कि, ज्यामुळे कोणतीही व्यक्ती अपुरे उत्पन्न किंवा गैरवाजवी खर्चामुळे स्वत:चा जीवनस्तर उंचावू शकत नाही. व्यक्ती स्वत:ची मानसिक तंदुरूस्ती टिकवून ठेवू शकत नाही. तसेच ते ज्या समाजाचे सदस्य आहेत त्या समाजाच्या जीवनमुल्याप्रमाणे योग्य प्रकारे काम करू शकत नाहीत. ''

**२) गोडार्ड :** ''एक व्यक्ती आणि तिच्यावर अवलंबून असणारे इतर लोक यांचे स्वास्थ्य, आरोग्य व त्यांची कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तुंचा अपुरा पुरवठा म्हणजे दारिद्र्य होय.''

**३) मायकेल हॅरिग्टंन :–** ''विशिष्ट समाजातील मुल्ये, विश्वास आणि प्रचलित तंत्रज्ञानाशी मिळत्या–जुळत्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण आणि मनोरंजनापासून वंचित असणे म्हणजे दारिद्र्य होय.''

**४) अमर्त्य सेन :–** ''एखाद्या व्यक्तिला त्यांनी जोपासलेल्या मुल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्र्य होय.''

**५) ॲडम स्मिथ :–** ''ज्या व्यक्ती उत्तम प्रकारे जीवन जगण्यासाठी आवश्यक वस्तुंचा पुरवठा करता येत नसल्यामुळे गुणवत्ताहिन वस्तुंवर जगतात त्यांनी दरिद्री असे म्हणतात.''

वरील कारणावरून दारिद्र्याचा अर्थ स्पष्ट होतो. दारिद्र्य ही अशी परिस्थिती किंवा अवस्था असते कि, ज्यावेळी व्यक्तीच्या उत्पन्नामध्ये व्यक्ती स्वत:च्या आणि आपल्या कुटुंबातील सदस्यांच्या आवश्यक गरजांची पूर्तता करू शकत नाहीत. त्यामुळे व्यक्ती व तिच्या कुटुंबातील सदस्य किमान आर्थिक जीवन व्यतित करू शकत नाहीत. दारिद्र्यामुळे लोकांना आपल्या मुलभूत गरजादेखील पूर्ण करता न आल्याने जीवनाचा एक न्यूनतम स्तर देखील टिकवून ठेवता येवू शकत नाही. त्यामुळे, अशा लोकांना योग्य आहार, पुरेशी जीवनसत्त्वे, प्रथिने व उष्मांक मिळत नसल्याने त्यांचे आरोग्य धोक्याचे बनते. त्यामुळे दारिद्र्य ही गंभीर सामाजिक समस्या आहे.

**दारिद्र्याचे प्रकार :**

जगातील अनेक देशांत मोठ्या प्रमाणात दारिद्र्य आहे. या दारिद्र्याचे मोजमाप करणे सोपे नाही. वरील समस्यांवरून दारिद्र्याचा अर्थ स्पष्ट होतो. मात्र, निरपेक्ष दारिद्रय व सापेक्ष दारिद्रय दोन संकल्पना अभ्यासल्यानंतर दारिद्र्याचा अर्थ स्पष्ट होईल.

**१) निरपेक्ष दारिद्र्य :–** व्यक्तीला आपल्या किमान मुलभूत गरजा भागविण्यासाठी काही किमान उत्पन्न मिळणे गरजेचे असते. जर त्या व्यक्तीचे उत्पन्न किमान पातळीपेक्षाही कमी असेल तर ती व्यक्ती निरपेक्ष दृष्टीने दरिद्री समजली जाते. दारिद्र्यरेषा निश्चित करताना किमान मुलभूत गरजा किंवा किमान राहणीमानाची पातळी निश्चित केली जाते. याचाच अर्थ दारिद्र्यरेषा निश्चित करावी लागते. दारिद्र्य रेषेच्याखाली उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीला गरीब मानले जाते. व्यक्तीला किती कॅलरीज अन्न मिळाले पाहिजे, किमान वस्त्र व निवारा यांची उपलब्धता झाली पाहिजे, हे त्यांच्या किमान मुलभूत गरजांच्या निश्चितीसाठी आवश्यक असते. या किमान गरजा

भागविण्यासाठी किती खर्च लागेल हे दारिद्र्यरेषेच्या निश्चितीने ठरविले जाते. अशाप्रकारे निरपेक्ष दारिद्र्यामुळे दरडोई उत्पन्न, दरडोई उपभोग खर्च, अन्नधान्याचा दरडोई उपभोग, व्यक्तीला मिळणाऱ्या दरडोई कॅलरीज इत्यादींची कल्पना येते.

**२) सापेक्ष दारिद्र्य :–** समाजातील आर्थिक स्तरावरील असमानता किंवा विषमतेवर सापेक्ष दारिद्र्य अवलंबून असते. एक व्यक्ती किंवा गटाच्या आर्थिक क्षमतेची तुलना जेव्हा दुसऱ्या व्यक्ती किंवा गटाशी केली जाते तेव्हा परस्पर तुलनेच्या आधारे कमी किंवा निम्न स्तरातील उत्पन्न गटातील व्यक्ती किंवा समुहाला दरिद्री मानले जाते. यालाच सापेक्ष दारिद्र्य म्हटले जाते. उदा– 'अ' नावाच्या उद्योगपतीकडे ५० लाख रू. कार आहे. सापेक्ष अर्थाने 'ब' नावाचा उद्योगपती स्वत:ला 'अ' नावाच्या उद्योगपतीपेक्षा गरीब मानतो. अमेरिकेतील गरीबांचे उत्पन्न देखील भारतीय मध्यम वर्गीयापेक्षा जास्त आढळते. ही सापेक्ष दारिद्र्याची उदाहरणे आहेत. दारिद्रय ही संकल्पना खऱ्या अर्थाने श्रीमंत–गरीब या भेदावरून ठरत असली तरी सापेक्ष दारिद्र्य ही संकल्पना दारिद्र्याचे निश्चित स्पष्टीकरण करण्यास असमर्थ ठरते.

**दारिद्र्य रेषा** (Poverty Line) **:**

दारिद्र्याची संकल्पना नेमकी स्पष्ट होण्यासाठी दारिद्र्यरेषेचा वापर केला जातो. प्रत्येक व्यक्तीला तिच्या शरीरासाठी आवश्यक असणारे उष्मांक (Calories) देणाऱ्या आहारासाठी महिन्याला जो मासिक उपभोग खर्च येतो. यावरून दारिद्र्यरेषा निश्चित केली जाते. म्हणजेच किमान जीवन जगण्यासाठी मुलभूत प्राथमिक वस्तू व सेवांची उपभोग खर्चाची कमीत–कमी पातळी ज्या रेषेने दर्शविली जाते तिला दारिद्र्य रेषा म्हणतात. एखाद्या कुटुंबाला महिन्याकाठी किमान आवश्यक असणाऱ्या अन्न, वस्त्र, निवारा, पाणी, शिक्षण, आरोग्य इत्यादी वस्तुंचे प्रमाण ठरविले जाते. नंतर त्याचे किंमतीत रूपांतर करून जगण्यासाठी किती किमान रक्कम आवश्यक आहे हे निश्चित केले जाते. ती निश्चित रक्कम दारिद्र्य रेषा निश्चित करते. ज्यांचे उत्पन्न या रक्कमेपेक्षा कमी आहे. अशी व्यक्ती दारिद्र्यरेषेखाली आहे असे मानले जाते.

दारिद्र्याचे मापन करण्यासाठी काही निकष ठरवून त्या आधारे दारिद्र्याची पातळी ठरविली जाते. ते निकष पुढीलप्रमाणे आहेत.

**(अ) दरडोई उष्मांकाचे सेवन :–** डॉ. वि. म. दांडेकर यांनी हा निकष मांडला. मनुष्याला जगण्यासाठी उष्मांकांची (Calories) गरज असते. उष्मांकाच्या आधारे दारिद्र्यरेषा निश्चित करता येते. योजना आयोगाच्या मते ग्रामीण भागात प्रत्येक व्यक्तीला रोजच्या आहारातून २४०० उष्मांक प्रत्येक दिवशी तर शहरी भागात २१०० उष्मांक प्रत्येक दिवशी मिळाले पाहिजेत. म्हणून ज्यांना एवढा उष्मांक मिळत नाही त्यांना दरिद्री समजले जाते.

**(ब) दरडोई उपभोग खर्च :–** अर्थशास्त्रज्ञांच्या मते प्रत्येक व्यक्तीला अन्नाबरोबरच वस्त्र, निवारा, आरोग्य, मनोरंजन अशा बाबींची गरज असते. त्यामुळे दारिद्र्यरेषा निश्चित करताना उष्मांकाबरोबरच या बाबींचा विचार करणे महत्त्वाचे आहे.

**(क) दरडोई उत्पन्न :–** डॉ. रथ यांनी दरडोई उत्पन्नाचा निकष वापरून एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या देशातील लोकसंख्येने भाग दिल्यास दरडोई उत्पन्न मिळते. डॉ. दांडेकर व रथ यांनी दरडोई उत्पन्नाच्या निकषावरून १९६८–६९ मध्ये दारिद्र्यरेषा निश्चित केली.

**(ड) राहणीमानाचा दर्जा :–** एखादी व्यक्ती आवश्यक सुख–सोई किती प्रमाणात पूर्ण करते त्यावर व्यक्तीचे राहणीमान अवलंबून असते. अपुरे अन्न, हलके कपडे, अयोग्य निवास, कमकुवत आरोग्य, आजारपण ही निम्न राहणीमानाची लक्षणे आहेत. ही लक्षणे दरिद्री लोकांत आढळतात. दारिद्र्याचे मोजमाप करण्यासाठी हा निकष योग्य वाटला तरी लोकांचे राहणीमान दर्जाचे मोजमाप करणे कठीण आहे.

वरील सर्व दारिद्र्य निश्चितीचे निकष विचारात घेतल्यास असे दिसून येते कि, ज्या व्यक्तींना किमान आर्थिक पातळीवरचे जीवन जगता येत नाही त्यांना दरिद्री म्हटले जाते. त्यात त्या व्यक्तीचे दरडोई उष्मांकाचे सेवन, दरडोई उत्पन्न व दरडोई उपभोग खर्च व एकूण राहणीमान याचा विचार करून दारिद्र्यरेषा निश्चित केली जाते.

वरीलप्रमाणे आपण दारिद्र्याचा अर्थ, व्याख्या, प्रकार व दारिद्र्य रेषा याचा अभ्यास करून दारिद्र्याची संकल्पना समजून घेतली आहे.

**१) दारिद्र्याची कारणे :**

दारिद्र्याच्या कारणांचा विचार वेगवेगळ्या दृष्टीकोनातून केला जातो. सर्व सामाजिक समस्यांमध्ये दारिद्र्य ही एक गंभीर सामाजिक–आर्थिक समस्या आहे. पारंपारिक समाजात दारिद्र्याकडे एक शाप म्हणून पाहिले जात होते. मात्र, आधुनिक समाजात व्यक्तीला रोजगार मिळविण्यात आलेले अपयश, आर्थिक विषमता, संधीचा अभाव, शिक्षणाचा अभाव, अन्याय अशा अनेक अर्थाने दारिद्र्याकडे पाहिले जाते. व्यक्तीगत जीवन व सामाजिक परिस्थिती या दृष्टीकोनातून दारिद्र्याच्या कारणांचा आढावा घ्यावा लागेल. दारिद्र्य समस्या सोडविण्यासाठी अनेक शासकीय प्रयत्न, शोध व संशोधकाकडून प्रयत्न झाले आहे. त्यात प्रामुख्याने डेव्हिड एल्श व राम आहुजा यांनी दारिद्र्याच्या कारणांचा आढावा घेतला आहे. त्याचा आपण विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

**(अ) डेव्हिड एल्श :** यांनी दारिद्र्याची व्यक्ती, संस्कृती किंवा उपसंस्कृती आणि समाजरचना अशी तीन कारणे सांगितली आहेत ती पुढीलप्रमाणे.

**१) व्यक्ती :–** व्यक्तीच्या व्यक्तीगत जीवनावर आधारीत व्याप्तीसाठी जी विचारसरणी सांगितली जाते त्यावरून दारिद्र्य निश्चित होवू शकते. सर्वसाधारणपणे व्यक्तीचे कौशल्य, कार्यक्षमता, प्रयत्नशीलता, ध्येयवादी वृत्ती, नकारात्मक दृष्टीकोन, मिळणारी संधी अशा अनेक गोष्टीवर व्यक्तीचे यश–अपयश अवलंबून असते. मात्र व्यक्तीने आर्थिक स्थिती सुधारण्याचे प्रयत्न न करणे, आळशी असणे, निर्णय क्षमतेचा अभाव, आलेली संधी सोडून देणे, दैववादी असणे अशा विविध बाबींमुळे व्यक्तीची आर्थिक स्थिती दरिद्री बनते. म्हणजेच व्यक्ती दारिद्र्यासाठी कारणीभूत ठरते.

**२) दारिद्र्याची संस्कृती अथवा उपसंस्कृती :–** समाजातील व्यक्तींच्या राहणीमानाचे स्वरूप कसे आहे. याच्याशी दारिद्र्याचा संबंध येतो. समाजातील अनेक लहान–मोठ्या समुहातील अनेक व्यक्ती कपडे, राहणीमान, विचार श्रद्धा व जीवनमुल्यात सहजासहजी बदल करीत नाहीत. उलट आहे त्या परिस्थितीत राहण्याचा प्रयत्न करतात. त्यांना ते राहणीमान सुरक्षित वाटते. 'ऑक्सर लुईस' यांनी १९५९ मध्ये मेक्सिकोमधील झोपडपट्ट्यात केलेल्या अभ्यासात असे आढळून आले कि, गरीब लोक आपले राहणीमान बदलू नये म्हणून आपल्या आर्थिक दर्जात बदल करण्याचे टाळतात आणि त्यामुळेच अशा व्यक्ती नेहमीच दारिद्र्यात राहतात. म्हणजेच गरीबांची जीवन जगण्याची स्वत:ची संस्कृती अथवा उपसंस्कृती असते. त्यामुळेच लुईस यांनी गरीबांच्या प्रतिकूल जीवन जगण्याच्या पद्धतीला दारिद्र्याची संस्कृती म्हटले आहे. अशाप्रकारे गरीबांना त्यांचे स्वत:चे एक प्रकारचे राहणीमान असते व ते टिकविण्याचा प्रयत्न देखील केला जातो. यालाच दारिद्र्याची संस्कृती/उपसंस्कृती म्हटले जाते.

**३) समाज रचना :–** आधुनिक समाजशास्त्रज्ञ समाज रचना हे दारिद्र्याचे कारण मानतात. समाजातील गरीबीला पोषक सामाजिक परिस्थिती, बेरोजगारी, कमी वेतनावर करावे लागणारे काम, कुशल मनुष्यबळाचा अभाव, कौशल्यांचा अभाव, पारंपारिक व्यवसाय व समजातील सामाजिक संस्था यामुळे दारिद्र्य कमी होत नाही. समाजातील काही घटक आपल्या सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय स्वार्थासाठी दारिद्र्याची परिस्थिती टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. उदा. भारतात अनेकवेळा विविध राजकीय पक्ष दारिद्र्य निर्मुलनासाठी विशेष प्रयत्ना करीत नाहीत. कारण दारिद्र्यात असणारा वर्ग त्यांना मतदानासाठी सहजपणे वापरता येवू शकतो. म्हणजेच दारिद्र्य असणारी एक विशिष्ट समाज रचना टिकवून ठेवण्याचा केला गेलेला प्रयत्न हे दारिद्र्याचे एक प्रमुख कारण आहे.

**(ब) राम आहुजा :** यांनी दारिद्र्याची आर्थिक, लोकसंख्यात्मक व सामाजिक कारणे सांगितली आहेत. ती पुढीलप्रमाणे.

**१) आर्थिक कारणे :–** सामान्यपणे दारिद्र्याची आर्थिक कारणे संबंधित असतात. व्यक्तीचे उत्पन्न, कार्यक्षमात व राहणीमानाचा दर्जा अशा घटकांवर दारिद्र्याचे स्वरूप निश्चित होत असते. व्यक्तीचा आर्थिक दर्जा ठरवणारे घटक पुढीलप्रमाणे आहेत.

**(अ) अपुरा विकास :**

भारतातील दारिद्र्याला सर्वच क्षेत्रातील अपुरा विकास हे आर्थिक कारण जबाबदार आहे. विविध पंचवार्षिक योजना तसेच राज्यांचे विविध प्रकल्प याद्वारे देशात विकासाचे विविध प्रकल्प राबविण्यात आले तसेच दारिद्र्यातील व्यक्तींचा आर्थिक दर्जा सुधारण्यासाठी विविध कार्यक्रम आखले गेले होते. यातील अनेक कार्यक्रमाला आलेले अपयश दारिद्र्य कारणीभूत ठरले आहे. अर्थव्यवस्थेचा विकास होण्यासाठी औद्योगिक उत्पन्न वाहतूक आणि दळणवळण साधनांत वाढ, रोजगार व्यवसायाचा विकास, लघुउद्योगांना चालना, कर्जपुरवठा, अनुदान, शेती क्षेत्राचा विकास, सेवा क्षेत्राचा विस्तार तसेच मानवी साधनसंपत्तीचा विकास अशा घटकांचे

योगदान आवश्यक असते. याबरोबरच आर्थिक विकासाच्या विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी शासकीय पातळीवर दूरदृष्टी व उदासीनतेचा अभाव असणे गरजेचे असते अन्यथा दारिद्र्याचे प्रमाण वाढत जाते.

**२) वाढती महागाई व भांडवलाचा अभाव :–** अपुरा पुरवठा व वाढती मागणी यामुळे जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती वाढतात. याबरोबरच अन्य कारणांनी महागाई वाढते. याचा परिणाम कनिष्ठ आर्थिक स्तरातील लोकांना जीवनावश्यक वस्तू मिळवण्यासाठी स्वत:चे उत्पन्न अपुरे ठरते. यातून दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येत वाढ होते. व्यक्तीगत पातळीवर अपुरे आर्थिक उत्पन्न जसे दारिद्र्याला कारणीभूत ठरते तसेच देशाच्या पातळीवर अपुरे भांडवल समाजाच्या विकासात अडथळा बनते. भारतात निर्यातीचे प्रमाण हे आयातीपेक्षा कमी आहे. निर्यातीचे प्रमाण कमी असल्याने परकीय चलनाचा अभाव निर्माण होतो. आयातीसाठी कर्जे काढावी लागतात. देशांतर्गत आर्थिक विकास व निर्यात वाढीसाठी औद्योगिक क्षेत्रात वाढ करणे आवश्यक असते. मात्र अपुऱ्या भांडवलामुळे औद्योगिक क्षेत्र, सेवा क्षेत्र तसेच इतर क्षेत्रात वाढ न झाल्याने अशा समाजात गरीबी वाढत जाते.

**३) कुशल मनुष्यबळाचा अभाव :–** जेव्हा व्यक्तीजवळ योग्य व रोजगाराभिमुख शिक्षण, पात्रता आणि कौशल्य यासारख्या घटकांचा अभाव असतो तेव्हा अशा व्यक्ती योग्य स्वरूपाचा रोजगार मिळवण्याच्या दृष्टीने असमर्थ ठरतात. तसेच औद्योगिक क्षेत्र, सेवा क्षेत्र व शेतीक्षेत्रात रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने योग्य संधी लोकांना उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. बेरोजगारी आणि अल्प स्वरूपाची रोजगारी याचा देशाच्या आर्थिक वाढीवर परिणाम होत असतो. आज भारतात कुशल मनुष्यबळास पुरेश्या नोकऱ्या उपलब्ध नाहीत. भांडवलाच्या अभावामुळे स्वयंरोजगार तसेच लघुउद्योग निर्माण करता येत नाहीत. त्यामुळे अकुशल मनुष्यबळाबरोबरच कुशल मनुष्यबळास देखील दारिद्र्यात जीवन जगावे लागत आहे.

**४) बेकारीत वाढ :–** भारतात जेव्हा यांत्रिकीकरण सुरू झाले तेव्हा पारंपारिक हस्तव्यवसाय, कुटीरोद्योग यावर परिणाम होवून अनेक कारागीर बेकार झाले. पुढे स्वातंत्र्योत्तर काळात शेतीचे यांत्रिकीकरण होऊ लागल्याने शेतातील रोजगार कमी होवून शेतमजूर बेकार झाले. शहरात औद्योगिक क्षेत्रात वाढ झाली. मात्र, ज्या तुलनेत औद्योगिक क्षेत्रात वाढ न झाल्याने लाखो तरूण बेकार आहेत. याशिवाय स्वयंचलित यंत्रे, संगणकीकरण यामुळेदेखील कामगारांना बेकार व्हावे लागत आहे. तसेच रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक आहे. त्या वेगाने होत नसल्याने बेकारी प्रचंड प्रमाणात वाढून दारिद्र्याचे प्रमाण वाढत आहे.

**५) पारंपारिक शेती व्यवसाय :–** भारत हा शेतीप्रधान देश आहे. आजही ६५ टक्के लोक या व्यवसायावर अवलंबून आहेत. या लोकसंख्येत अत्यल्प शेती असणारे व शेतमजुरांचे प्रमाणा सर्वाधिक आहे. शेतीत अत्यल्प उत्पन्न व केवळ सुगीच्या वेळीच मिळणारे काम यामुळे अल्पभूसंधारक व शेतमजूर गरीब राहतात. तसेच जी शेती केली जाते ती परंपरागत व नैसर्गिक लहरीवर आधारीत असल्याने दारिद्र्यात भर पडते. याबरोबरच शेती व शेतकऱ्यांविषयी अपुऱ्य योजना, सुधारीत बी–बियाणे व खते यांचा अभाव, तंत्रज्ञानचा अभाव, अपुरे भांडवल, बाजारपेठांचे अज्ञान, हमीभावाची अशाश्वती अशा अनेक बाबींमुळे शेती व्यवसायात आर्थिक विकासाची गती मंद राहीली आहे. परिणामी पारंपारिक शेती हे दारिद्र्याचे प्रभावी कारण बनले आहे.

**(क) लोकसंख्यात्मक कारणे :**

भारतात लोकसंख्येची होणारी प्रचंड वाढ दारिद्र्याला कारणीभूत ठरत आहे. कारण लोकांच्या मुलभूत गरजांवर होणारा खर्च सातत्याने वाढत आहे. या मुलभूत गरजांच्या किंमतीवर लोकसंख्यात्मक घटकांचा परिणाम होवून समाजातील बहुसंख्य लोक गरीबीतच राहत आहेत. आज लोकसंख्येच्या वाढत्या प्रभावामुळे समाजाचा किमान विकास, रोजगार संधी, शिक्षण, आरोग्य व निवासाच्या सोई लोकांना मिळत नाहीत. आज कुटुंबात एकाच मिळवत्या व्यक्तीवर आधारीत असणाऱ्यांची संख्या वाढत असल्याने त्याचा परिणाम कुटुंबातील आरोग्य, शिक्षण व राहणीमानावर झाला आहे.

वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक बाबी दुर्मिळ होत चालल्या आहेत. दारिद्र्यामुळे लोकांना योग्य व पुरेसा आहार मिळत नाही. दूषित वातावरणात रहावे लागते. लोकांचे आरोग्य व कार्यक्षमतेवर त्याचा परिणाम होवून आर्थिक उत्पन्न घटते. दारिद्र्य व आरोग्याचा जवळचा संबंध आहे आणि आर्थिक उत्पन्नाचा शिक्षणाशी संबंध आहे. त्यामुळे कमी उत्पन्नामुळे शिक्षण नाही, शिक्षण नसल्याने रोजगार नाही, रोजगार नसल्याने गरीबी वाढते. म्हणूनच लोकसंख्यात्मक घटक गरीबीला कारणीभूत ठरतात.

**(ड) सामाजिक कारणे :**

समाजातील अंधश्रद्धा, दैववाद, परंपरावाद, जातीयवाद, सांप्रदायिकता व प्रादेशिकवाद अशा अनेक कारणांमुळे देखील गरीबांचे प्रमाण वाढत जाते. या सामाजिक घटकांमुळे व्यक्तीची मानसिकता संकुचित व पूर्वग्रहदूषित बनते याचा परिणाम व्यक्तीच्या कार्यक्षमतेवर व दृष्टीकोनावर होवून गरीबी वाढीते. अनेक वेळा दैववाद व परंपरेमुळे लोकांच्यात स्थितीशीलता येते. यामुळे लोक प्रयत्नवादी बनत नाहीत. जातीव्यवस्थेमुळे व्यक्तिगत गुणवत्तेपेक्षा जातीचे व्यवसाय कारण्यात प्राधान्य दिले गेले. पारंपारिक व्यवसायामुळे नवीन तंत्र व मंत्राचा वापर केला गेला नाही. त्यामुळे केवळ जगण्याच्या गरजा पूर्ण करण्याला प्राधान्य दिले गेले. धर्म व प्रथा-परंपरेच्या प्रभावामुळे समाज स्थितीशील बनला. संयुक्त कुटुंब पद्धतीमुळे निष्क्रियता व आळशी प्रवृत्ती वाढली. स्त्रियांना नेहमीच पुरूषांची मालमत्ता समजून शिक्षण व विकासापासून सुरू ठेवले गेले. याशिवाय दुसऱ्या प्रदेशात काम करता येणार नाही अशा अवास्तव भीतीमुळे लोकांची कार्यक्षमता कमी होते. अशा अनेक सामाजिक कारणांमुळे दारिद्र्य वाढत जाते.

**(इ) नैसर्गिक व इतर कारणे :**

महापूर, दुष्काळ, भूकंप, मृत्यू, नैसर्गिक साधनसंपत्तीची कमतरता, वाळवंटी प्रदेश, प्रतिकूल हवामान अशा कारणांमुळेदेखील गरीबी वाढत जाते. या बरोबरच सामाजिक विषमता, भांडवलाचा अभाव, भ्रष्टाचार, शेतजमिनीचे असमान वाटप, राज्यांच्या समतोल विकासात अडथळे, निरक्षरता, दोषपूर्ण शिक्षणव्यवस्था, आरोग्य सुविधांचा अभाव, विविध शासकीय योजनांतील अपयश, आर्थिक विषमता अशा अनेक कारणांमुळे गरीबी वाढतच जाते.

अशा प्रकारे व्यक्तीगत, आर्थिक, सामाजिक, लोकसंख्यात्मक व नैसर्गिक कारणामुळे दारिद्र्याचे प्रमाण सातत्याने वाढत जात आहे.

*** दारिद्र्य निर्मुलनासाठी उपाय योजना :**

भारत देशात दारिद्र्याची समस्या गंभीर स्वरूप धारण करीत आहे. ही समस्या सोडविण्यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात केंद्र व राज्य सरकारने अनेक प्रकारच्या शासकीय पातळीवर उपाय योजना अंमलात आणल्या आहेत. या योजनांच्या माध्यमांतून प्रामुख्याने ग्रामीण व शहरी समुदायातील दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न होत आहे. त्या उपाय-योजना पुढीलप्रमाणे आहेत.

**(अ) शासकीय उपाय-योजना :**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर गरीबी निर्मुलनासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. त्यात पंचवार्षिक योजना, राष्ट्रीयीकरण तसेच २० कलमी कार्यक्रमाद्वारे गरीबी निर्मुलनाचे प्रयत्न केले गेले. त्याबरोबरच पुढील योजना राबविण्यात आल्या आहेत.

**१) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP)**

**(Integrated Rural Development Programme) :-**

भारत सरकारने दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचे उत्पन्न वाढवणे, रोजगार उपलब्ध करून देणे, ग्रामीण कुटीरोद्योगांना चालना देणे, अनुसूचित जाती-जमातीच्या कुटुंबांचे उत्पन्नात वाढ करणे. या प्रमुख उद्देशातून मार्च १९७६ मध्ये २० निवडक जिल्ह्यांमध्ये हा कार्यक्रम सुरू केला. पुढे २ ऑक्टोंबर १९८० पासून महात्मा गांधीच्या जयंतीनिमित्त सर्व देशांत हा कार्यक्रम लागू केला.

**२) किमान गरजा योजना (MNP) (Minimum Need Programme) :-**

ग्रामीण दारिद्र्य कमी करण्यासाठी १९७४-७५ पासून ही योजना सुरू केली. त्यात शिक्षण, पाणी-पुरवठा, आरोग्य, रस्ते, घरकुल, वीज, गलिच्छ वस्ती सुधारणे इ. किमान गरजांच्या पूर्ततेसाठी काही खर्चाची तरतूद करण्यात आली.

**३) गरीबी हटाव कार्यक्रम :-**

१९ मार्च १९७१ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी 'गरीबी हटाव' कार्यक्रमाला प्रारंभ केला. १९७५ मध्ये गरीबी निर्मुलनाचा २० कलमी कार्यक्रम तयार करून त्याची अंमलबजावणी संपूर्ण देशात केली.

**४) जवाहर रोजगार योजना :-**

दरिद्री कुटुंबातील किमान एका व्यक्तीस वर्षाकाठी ५० ते १०० दिवसासाठी त्याच्या घराजवळच रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी एप्रिल १९८९ मध्ये या योजनेची घोषणा करण्यात आली. या योजनेअंतर्गत ५०% काम महिलांसाठी राखीव ठेवून या योजनेची जबाबदारी ग्रामपंचायतीवर सोपविण्यात आली होती.

**५) महिला व बालविकास योजना :-**

ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण व बँकेकडून अर्थसहाय्य देण्यासाठी १९८२ मध्ये ही योजना सुरू करण्यात आली. या योजने अंतर्गत गरोदर मातांचे पोषण, बालकांना पोषण आहार, आरोग्य तपासणी असे उपक्रम राबविण्यात आले.

**६) राष्ट्रीय ग्रामीण युवक स्व-रोजगार प्रशिक्षण योजना**

**(TRYSEM - Training of Rural Youth for Self Employment) :-**

ग्रामीण युवकांना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण देण्यासाठी ही योजना १५ ऑगस्ट १९७९ मध्ये सुरू करण्यात आली. कमी उत्पन्न गटातील बेरोजगार व्यक्तींना स्वत:चा उद्योग सुरू करता यावा यासाठी ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेत दारिद्र्यरेषेवरील अनुसूचित जाती-जमाती, महिला, अपंग यांना प्राधान्याने समाविष्ट करून विविध व्यवसायांचे प्रशिक्षण दिले गेले. याचा परिणाम ग्रामीण भागात अनेक तरूणांनी स्वत:चा रोजगार सुरू केला.

**७) ग्रामीण भूमिहीन रोजगार कार्यक्रम :-**

१९८३ पासून ग्रामीण भागात भूमिहीन शेतकरी, स्त्रिया, मागास जाती-जमातीच्या लोकांना रोजगाराची संधी देण्यासाठी हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम व ग्रामीण भूमिहीन रोजगार कार्यक्रम पुढे एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमात समाविष्ट केले गेले.

**८) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम :-**

१९७७ मध्ये ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांना रोजगार उपलब्ध करण्यासाठी हा कार्यक्रम सुरू झाला. मात्र १९८० मध्ये तो राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रमात समाविष्ट केला गेला.

**९) अंत्योदय अन्न योजना :-**

२५ डिसेंबर २००१ मध्ये ही योजना सुरू करण्यात आली. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना अन्न उपलब्ध करून देणे हा योजनेचा प्रमुख उद्देश होता.

**१०) इतर शासकीय योजना :-**

१ एप्रिल १९९९ रोजी स्वर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार योजना लागू करण्यात आली. तसेच १ डिसेंबर १९७७ पासून स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना सुरू करण्यात आली. याबरोबरच राष्ट्रीय सामाजिक सहकारी योजना (१५ ऑगस्ट १९९५), वाल्मीकी आंबेडकर आवास योजना (२००५), संजय गांधी निराधार योजना, अवर्षण भागासाठी कार्यक्रम, शेतीला बारमाही पाणीपुरवठा अशा अनेक योजना लागू करण्यात आल्या आहेत.

भारत सरकार व राज्य सरकारांच्या मार्फत अनेक शासकीय योजना लागू करण्यात आल्या. त्याचबरोबर राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा - २०१३, माध्यान्ह भोजन योजना - १९९५, सर्वांसाठी घर योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी कायदा, जनधन योजना, उज्वला गॅस योजना, मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया या योजनांना चालना देण्यात आलेली आहे. त्यातील काही योजना प्रभावशाली ठरल्या. मात्र, परिपूर्ण दारिद्र्य निर्मुलन या विविध योजनाद्वारे शक्य झाले नाही.

**(ब) इतर उपाय :**

दारिद्र्य निर्मुलनाच्या वरील शासकीय योजनांबरोबर खालील इतर उपायांचा आपण विचार करणार आहोत.

**१) लोकसंख्या नियंत्रण :–** वाढती लोकसंख्या अनेक समस्यांना कारणीभूत ठरते आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नवाढीस बाधा आणण्याचे काम वाढती लोकसंख्या करते. त्यामुळे लोकसंख्या नियंत्रणाचे कायदे करणे तसेच लोकसंख्यावाढीचे दुष्परिणाम लोकांना पटवून देणे, लोकसंख्या शिक्षण सक्तीचे प्राथमिक शिक्षण जाणीव-जागृती अशा उपायांची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. लोकसंख्यावाढीमुळे महागाई, बेकारी, दारिद्रय अशा समस्या निर्माण होतात म्हणून लोकसंख्या नियंत्रण करणे आवश्यक आहे.

**२) कृषिक्षेत्राचा विकास :–** भारतातील ६५% लोकसंख्या ग्रामीण समुदायात राहते. ग्रामीण समुदाय प्रामुख्याने शेती व शेतीपूरक व्यवसायावर आपले आर्थिक जीवन जगतो. त्यामुळे शेती विकास, सिंचन प्रकल्प, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, भांडवलाची उपलब्धता, हमीभाव, बाजारपेठा, मार्गदर्शन केंद्रे अशा विविध बाबींना चालना देवून कृषिक्षेत्राचा विकास केल्यास दारिद्र्य निर्मूलन शक्य होईल.

**३) रोजगार संधी :–** आज ग्रामीण, आदिवासी व शहरी समुदायात बेरोजगारी प्रचंड वाढली आहे. त्यासाठी विविध उद्योगधंदे व शेती क्षेत्रात वाढीला चालना देवून रोजगाराला संधी देणे गरजेचे आहे. लघुउद्योग, कुटिरोद्योग, ग्रामीण उद्योगांना आर्थिक मदत देणे. याबरोबरच रोजगार हमी योजना, स्वयंरोजगाराला प्रोत्साहन, प्रशिक्षण, कर्जपुरवठा, अनुदान देणे अशा पद्धतीने रोजगार संधी निर्माण करणे आवश्यक आहे.

**४) अभिवृत्तीत बदल :–** दारिद्र्याची समस्या ही संपूर्ण समजाची समस्या आहे. शासन धोरणकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, प्रशासनातील नोकरवर्ग, जमीनदार अशा सर्वच समाजघटकांनी आपल्या अभिवृत्तीत बदल करून दारिद्र्य निर्मुलनासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. बेकारी आर्थिक विषमता व दारिद्र्य या प्रमुख समस्या सोडविण्यासाठी मानवतावादी दृष्टीकोनातून सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसेच प्रत्यक्षात दारिद्र्यात असणाऱ्या लोकांनी देखील आपली अभिवृत्ती बदलत प्रयत्नवादी बनले पाहिजे. शिक्षण, आरोग्य, प्रयत्नात सातत्य, कष्ट या मार्गाने दारिद्र्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला पाहिजे व यासाठी शासन व समाजाचेदेखील सहकार्य अपेक्षित आहे.

दारिद्र्य निर्मुलनासाठी सर्वात महत्त्वाचे म्हणजे विविध शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. तसेच समाजातील विविध घटकांना या योजनांची माहिती देणे, जाणीव-जागृती करणे यासाठी प्रयत्न

होणे गरजेचे आहे. याशिवाय इतर उपायांचादेखील विचार महत्त्वाचा आहे. ज्यावेळी सर्वांना हा प्रश्न गंभीर आहे याची जाणीव होईल व सर्वच समाजघटक त्यांच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न करतील त्यावेळी दारिद्र्य निर्मूलन शक्य होईल.

**२) बेरोजगारी (Unemployment) :**

बेरोजगारीची समस्या जागतिक स्वरूपाची आहे. अविकसीत, विकसनशील, राष्ट्रांबरोबरच विकसीत राष्ट्रांतदेखील ही समस्या आढळते. कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेसमोर दारिद्र्य, आर्थिक विषमता आणि बेरोजगारी तीन प्रमुख समस्या असतात. मात्र, प्रत्येक देशातील बेरोजगारीचे स्वरूप एकसारखे असू शकत नाही. भारतातील बेरोजगारी ही प्रामुख्याने दारिद्र्य आणि औद्योगिक मागासलेपणाशी संबंधित आहे. तर विकसीत राष्ट्रातील बेरोजगारी ऐच्छिक, अनैच्छिक, संघर्षजन्य व संरचनात्मक स्वरूपाची असते. अप्रगत देशांमध्ये तसेच भारतासारख्या देशात जी बेरोजगारी आढळते ती वस्तुंची मागणी कमी असल्यामुळे नसते. कारण अशा देशामध्ये सर्वच वस्तुंचा तुटवडा असतो. असे असूनही बेरोजगारी वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे भांडवलाचा अभाव, तसेच उद्योगधंद्यांना आवश्यक असणाऱ्या मुलभूत सोयींचा अभाव असतो. त्यामुळे औद्योगिकरण, व्यापारवृद्धी, सेवाक्षेत्राचा विकास, शेतीक्षेत्राचा विकास करणाऱ्यांमध्ये अडथळा येतो. त्यामुळे दारिद्र्य आर्थिक विषमतेबरोबरच बेरोजगारी वाढते.

**बेरोजगारीचा अर्थ :**

बेकारी आणि बेरोजगारी हे दोन्ही शब्द सर्वसामान्यपणे एकाच अर्थाने वापरले जातात. मात्र शास्त्रीय अर्थाने यात फरक आहे. सामान्यपणे बेकार हा शब्द नोकरीचा अभाव या अर्थाने वापरला जातो. म्हणून बेकारीपेक्षा बेरोजगारी हा शब्द निश्चित अर्थाने वापरला जातो. बेकारी ही ऐच्छिक असू शकते. परंतु बेरोजगारी मुख्यत: गरीबी व काम उपलब्ध नसण्याशी निगडीत असते. ज्या व्यक्तीमध्ये काम करण्याची क्षमता व इच्छा आहे तरीही त्याचा प्रचलित वेतनावर किंवा आर्थिक मोबदला मिळवून देणारे काम मिळत नाही अशी व्यक्ती म्हणजे बेरोजगार व्यक्ती होय. बेरोजगारी ही समाजाने लादलेली असते. ती अनैच्छिक, अवांछनीय असते.

बेरोजगारी ही संकल्पना अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. सामान्यपणे ही संकल्पना कर्त्या लोकसंख्येशी संबंधित आहे. कर्त्या लोकसंख्येत १५ ते ६० वर्षे वयोगटातील लोकसंख्येचा समावेश होतो. लहान मुले व वृद्धांचा बेरोजगारीशी संबंध नाही. सर्वसाधारणपणे देशांत अस्तित्त्वात असलेल्या वेतनदारावर काम करण्याची ज्यांची इच्छा असते व जे काम करण्यास शारिरीक व बौद्धीकदृष्ट्या समर्थ असतात अशा लोकांना काम करण्याची व उत्पन्न मिळवण्याची संधी मिळत नाही. त्यांना बेरोजगार म्हटले जाते. प्रो. केन्स यांनी १९३६ मध्ये लिहिलेल्या (The General theory of Employment Interest and money) या ग्रंथात बेरोजगारीची व्याख्या दिली आहे. त्यांच्या मते, प्रचलित वेतन दरावर कामगार शारिरीक किंवा बौद्धीक रोजगार मिळविण्यात असमर्थ ठरतात. अशांना बेरोजगार संबोधले जाते. एखाद्या व्यक्तीने एखाद्या क्षेत्रात कार्य करण्यासाठी लागणारे प्रशिक्षण घेतले आहे, कौशल्य हस्तगत केले आहे किंवा कोणतेही शारीरिक, बौद्धीक श्रम करण्याची तयारी आहे, मिळेल

त्या वेतनदरावर काम करण्याची तयारी आहे. पण त्याला कामच मिळत नाही अशा व्यक्तीस बेरोजगार मानले जाते. बेरोजगारीच्या काही व्याख्या अभ्यासल्यानंतर बेरोजगारीचे नेमके स्वरूप आपल्या लक्षात येईल.

**बेरोजगारीच्या व्याख्या :**

**१) फेअर चाईल्ड :–** ''मजुरी करणाऱ्या सामान्य वर्गाच्या एका सदस्याला सामान्य वेळात, सामान्य वेतनावर आणि सामान्य काम करण्याच्या परिस्थितीत वेतन मिळणाऱ्या कामापासून अनिच्छेने किंवा जबरदस्तीने वेगळे ठेवले जाते तेव्हा त्याला बेरोजगारी असे म्हणतात. ''

**२) कार्ल प्रिब्राम :–** ''बेरोजगारी ही श्रमबाजाराची अशी स्थिती आहे कि, ज्यामध्ये उपलब्ध संधीच्या संख्यपेक्षा श्रमिकांचा पुरवठा अधिक असतो.''

**३) गुन्नार मिडील :–** ''काम करण्याची क्षमता व इच्छा असूनही ज्यांना रोजगार मिळत नाही अशा परिस्थितीला बेरोजगारी म्हणतात. काम मिळणे किंवा न मिळणे हे एकट्या व्यक्तीच्या हातात नसून एकूण लोकसंख्येत असलेल्या कामाच्या उपलब्धेच्या परिस्थितीवर बेरोजगारी अवलंबून असते.''

**४) प्रो. पिगू :–** ''रोजगार नसलेल्या परंतु रोजगार मिळावा अशी इच्छा असलेल्या व्यक्तीला बेरोजगार म्हणता येईल.''

**५) आंतरराष्ट्रीय श्रम संघटना :–** ''काम करण्याची इच्छा व सामर्थ्य असूनही प्रचलित वेतनदरावर कामाच्या शोधात असताना ज्यांना काम मिळत नाही अशा सर्वांचा समावेश बेरोजगार या संकल्पनेत केला जातो.''

वरील व्याख्यांचा अभ्यास केल्यास बेरोजगारीचे स्वरूप स्पष्ट होते कि, काम करण्याची व्यक्तीची शारिरीक, बौद्धीक व मानसिक क्षमता आहे. एखाद्या कामासाठी आवश्यक असणारे शिक्षण, प्रशिक्षण व कौशल्य तिने प्राप्त केले आहे, मिळणाऱ्या वेतनदरावर काम करण्याची त्याची तयारी आहे. परंतु इच्छा असूनही तिला रोजगार मिळत नाही अशा सर्वांना बेरोजगार संबोधले जाते.

भारताच्या सामाजिक व आर्थिक धोरणांचे रोजगार निर्मिती हे महत्त्वाचे उद्दीष्ट्य आहे. भारत हे विकसनशील राष्ट्र आहे. त्यामुळे भारतातील बेरोजगारीचे स्वरूप विकसीत राष्ट्रापेक्षा वेगळ्या स्वरूपाचे आहे. भारतात ग्रामीण व शहरी भागातील बेरोजगारीचे स्वरूप वेगवेगळे आहे. ग्रामीण समुदायात प्रामुख्याने अशिक्षितांची व अकुशल लोकांची बेरोजगारी आढळून येते. तर शहरी समुदायात शैक्षणिक व तांत्रिक बेरोजगारी आढळून येते. भारतात शेती, उद्योग व सेवा क्षेत्रात पुरेशा प्रमाणात रोजगार निर्मिती न झाल्याने बेरोजगारी वाढत जात आहे. ११ व्या पंचवार्षिक योजनाकाळात देशातील उपलब्ध श्रमशक्तीपैकी ८.२ कोटी लोक बेरोजगार होते. भारतात बेरोजगारीचे मापन करण्यासाठी चालू दैनिक स्थिती, साप्ताहिक स्थिती व सामान्य स्थिती या तीन पद्धतींचा अवलंब केला जातो. भारतातील विविध राज्यातील बेरोजगारीचा विचार केल्यास नैसर्गिक साधनांचे असमान वितरण, असमतोल विकास यामुळे विविध राज्यातील बेरोजगारीच्या दरात फरक आढळून येतो.

सामान्यपणे भारतात ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात बेरोजगारीचे प्रमाण जास्त आढळते. पुरूषापेक्षा स्त्रियामध्ये बेरोजगारी अधिक आढळते. कृषी क्षेत्रामध्ये औद्योगिक व सेवा क्षेत्रापेक्षा जास्त बेरोजगारी, छुपी बेरोजगारी, खुली बेरोजगारी, सुशिक्षितांची बेरोजगारी, हंगामी बेरोजगारी, शहरी बेरोजगारी, ग्रामीण बेरोजगारी, ऐच्छिक व अनैच्छिक बेरोजगारी, संघर्षजन्य बेरोजगारी व सरंचनात्मक बेरोजगारी असे विविध प्रकार आढळतात.

महाराष्ट्रातील बेरोजगारीचा विचार केल्यास असे दिसून येते कि, महाराष्ट्र राज्याच्या वाट्याला देशातील ९.४ टक्के भौगालिक क्षेत्र आले असून देशातील १०.२ टक्के श्रमशक्ती राज्यात आहे. राज्यातील ८० टक्के शेती कोरडवाहू स्वरूपाची असल्याने शेतीक्षेत्राचा फारसा विकास होऊ शकलेला नाही. औद्योगिक क्षेत्राचा राज्यात विकास झाला असला तरी वाढत्या श्रमशक्तीला या क्षेत्रात पुरेशा रोजगार संधी निर्माण होऊ शकलेल्या नाहीत. त्यामुळे शहरी तसेच ग्रामीण समुदायात बेरोजगारीची समस्या गंभीर बनली आहे.

### ३.५.२ बेरोजगारीची कारणे :

कोणत्याही देशातील उपलब्ध नैसर्गिक संसाधनाच्या तुलनेत लोकसंख्या अधिक प्रमाणात वाढल्यास किंवा संसाधनाच्या अपुऱ्या विकासामुळे बेरोजगारीची समस्या निर्माण होते. बेरोजगारीमुळे देशाच्या आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे इतर अनेक समस्यांना चालना मिळते. सामान्यपणे सामाजिक, आर्थिक व वैयक्तिक कारणामुळे बेरोजगारी निर्माण होत जाते. बेरोजगारीच्या कारणांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**१) लोकसंख्या वाढ :–** लोकसंख्येत होणारी वेगवान वाढ हे भारतातील बेरोजगारीचे मुलभूत कारण आहे. १९५१ मध्ये देशाची लोकसंख्या केवळ ३६ कोटी होती. ती वाढत जावून १९९१ मध्ये ८४.६ कोटी, २००५ मध्ये १०२.९ कोटी झाली तर २०११ मध्ये लोकसंख्या १२१.०२ कोटीपर्यंत वाढली. या लोकसंख्या वाढीमुळे श्रमाचा पुरवठा वाढत जातो. म्हणजेच प्रत्येक वर्षी नव्याने रोजगार मागणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढते. परंतु त्या प्रमाणात कोणत्याही क्षेत्रात रोजगार उपलब्ध होवू न शकल्याने देशातील बेरोजगारी वाढत जात आहे.

**२) मागासलेली शेती :–** भारतीय शेती निसर्गावर अवलंबून आहे. देशातील लागवडी योग्य शेतीपैकी ३.५ टक्के शेतीला जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध असून ६५ टक्के शेती कोरडवाहू आहे. सिंचनसुविधा उपलब्ध असणाऱ्या शेतीत रोजगार उपलब्ध होऊ शकतो. मात्र कोरडवाहू शेती केवळ हंगामात रोजगार उपलब्ध झाल्याने हंगामी बेरोजगारी वाढत जाते. याबरोबरच उद्योग व सेवा क्षेत्रांच्या विकासामुळे शेती क्षेत्रातील अतिरिक्त लोकसंख्या उद्योग व सेवा क्षेत्रात सामावली जाणे अपेक्षित असते. मात्र या क्षेत्राने फारच कमी लोकसंख्या सामावून घेतल्याने शेतीमध्ये छुपी बेरोजगारी, अर्थ बेरोजगारी, उघड बेरोजगारी वाढत जाते. आजदेखील सरकारकडून शेतीक्षेत्रात पुरेशा प्रमाणात गुंतवणूक केली जात नाही. त्याचा परिणाम होवून जलसिंचन, खते, रस्ते, वीज, कृषी अवजारे, शेतमाल विक्रीव्यवस्था, आर्थिक संस्था, शेतमालाला हमीभाव, प्रक्रिया उद्योग अशा मुलभूत सोई–सुविधांचा विकास होऊ शकलेला नाही. त्यामुळे शेतीक्षेत्रात रोजगार निर्मिती कमी झाल्याने बेरोजगारी वाढत जाते.

**३) ग्रामीण कुटिरोद्योगांना घरघर :–** ग्रामीण समुदायातील कुटीरउद्योग, लघुउद्योग, हस्तउद्योग हे भूमिहीन शेतमजूर व इतरांच्या चरितार्थाचे प्रमुख साधन आहे. मात्र औद्योगिकरणाच्या प्रक्रियेत अनेक उद्योगांनी उपभोग्य वस्तुंच्या उत्पादनात प्रवेश केला आहे. या उद्योगात तयार होणाऱ्या वस्तू या दर्जेदार, सुबक व स्वस्त असल्याने ग्रामीण लघु व कुटीर उद्योगांना त्यांच्याशी स्पर्धा करणे शक्य होत नाही. परिणामी ग्रामीण भागातील अनेक लघु व कुटीर उद्योग बंद पडत चालले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात बेरोजगारी वाढत आहे.

**४) यंत्र व तंत्रज्ञानात्मक प्रगती :–** तांत्रिक प्रगतीमुळे आर्थिक विकासाला चालना मिळते. परंतु उद्योगधंद्यामधून अधिक उत्पादन व अधिक नफा मिळवण्यासाठी मानवी शक्तीपेक्षा यांत्रिक शक्तीला प्राधान्य दिले जाते. उत्पादन खर्च कमी करण्यासाठी स्वयंचलित यंत्रे व संगणकाचा वापर वाढत आहे. तसेच उद्योग क्षेत्राबरोबरच बांधकाम, रस्ते व रेल्वे बांधणी, खाणकाम, शेतीची मशागत अशा अनेक कामासाठी आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर केला जात आहे. आधुनिक यंत्रसामुग्री उद्योगांत संगणकाचा वापर, स्वयंचलित साधने हे भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशासाठी अयोग्य असले तरी उत्पादन खर्चात बचत व नफ्याच्या प्राप्तीसाठी याचा सर्वत्र वापर केला जात आहे. त्यामुळे रोजगारनिर्मिती कमी होवून बेरोजगारी वाढत जाते.

**५) उद्योग व व्यवसायातील चढ–उतार :–** उद्योग व व्यापार व्यवसायात सातत्याने विविध कारणांमुळे चढ–उतार होत असतात. उद्योग तोट्यात जाणे, सरकारी धोरणातील बदल, कररचना, उद्योगातील श्रम व टाळेबंदी, व्यवस्थापन व कामगार संघर्ष, आंतरराष्ट्रीय बाजारातील चढ–उतार, नैसर्गिक आपत्ती, बाजारातील स्पर्धा अशा अनेक बाबीमुळे उद्योगधंदे व व्यापार व्यवसायात ताण–तणाव राहतात. त्यातून कामगार कपात होत असते. अशा उद्योग–व्यवसायात नवीन रोजगार निर्माण होत नाही. परिणामी बेरोजगारी वाढत जाते.

**६) शिक्षण व्यवस्थेतील दोष :–** सर्वसाधारपणे मनुष्यबळाचा विकास घडवून आणून त्यांची उत्पादकता व कार्यक्षमता वाढवणे, स्वयंरोजगारीचे मूल्य वाढविणे व तशी मानसिकता तयार करणे. हा शिक्षण व प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश असतो. परंतु ब्रिटिश काळापासून चालत आलेली भारतातील शिक्षण पद्धती ही कालबाह्य असून पारंपारिक शिक्षणामुळे रोजगार व स्वयंरोजगारात वाढ होत नाही. सदोष शिक्षणपद्धतीमुळे उद्योगासाठी आवश्यक असणारे कौशल्य, योग्यता व कुवत निर्माण होत नाही. याउलट रोजगारीसाठी शासनावर अवलंबून राहण्याची मानसिकता अशा दोषपूर्ण शिक्षणपद्धतीतून विकसीत होत गेली. त्यामुळे देशात सुशिक्षित बेरोजगारीत मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे.

**७) शासकीय योजनांचे अपयश :–** वाढत्या लोकसंख्येबरोबरच श्रमशक्तीचे योग्य नियोजन करणे सरकारला शक्य झालेले नाही. देशातील सर्व क्षेत्रांना लागणाऱ्या तांत्रिक व प्रशिक्षित मनुष्यबळाची मागणी लक्षात घेवून त्याचे योग्य नियोजन केल्यास बेरोजगारीची समस्या निर्माण होत नाही. परंतु भारतात पंचवार्षिक योजना व इतर धोरणांमध्ये रोजगारनिर्मितीच्या उद्देशाला दुहेरी स्थान देण्यात आले. त्यामुळेच संस्था अभियांत्रिकी, वैद्यकीय व पारंपारिक शिक्षण क्षेत्रात कुशल मनुष्यबळात वाढ होत असून त्या प्रमाणात रोजगार निर्माण झाल्याने बेरोजगारी वाढत आहे.

**८) राजकीय अस्थिरता व प्रशासन :–** देशाच्या विकासासाठी आर्थिक स्थैर्य व राजकीय स्थैर्याची गरज असते. भारतात केंद्र व राज्य पातळीवरील असंख्य राजकीय पक्षांच्या अस्तित्त्वामुळे केंद्र तसेच राज्य पातळीवर कोणत्याही एका राजकीय पक्षाला बहुमत मिळत नाही. त्यामुळे भिन्न दृष्टीकोन व विचारसरणी असणारे अनेक राजकीय पक्ष एकत्र येवून सरकार स्थापन करतात. मात्र स्वार्थी राजकीय प्रवृत्ती, हितसंबंध व विविध पक्षांसाठी घेतलेले अनुकूल निर्णय यामुळे राजकीय अस्थैर्य वाढते. शासकीय योजना व विविध कार्यक्रमांचे यश हे प्रशासकीय यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. राजकीय अस्थिरतेमुळे प्रशासकीय यंत्रणा कार्यक्षमतेने काम करीत नाही. परिणामी बेरोजगारीसारखे प्रश्न निर्माण होतात.

**९) व्यक्तिगत घटक :–** बेरोजगारी समस्या निर्माण होण्यास अनेक व्यक्तीगत घटक कारणीभूत ठरतात. त्यात प्रामुख्याने योग्य वयात रोजगार न मिळणे, अनेक तरूणांना त्यांची क्षमता व आवड याविषयी पुरेसे ज्ञान नसते. बहुतेक वेळा एखाद्या विशिष्ट व्यवसायात गरजेपेक्षा अधिक प्रशिक्षित व्यक्ती प्रयत्नशील असतात. त्यामुळे प्रत्येकाला रोजगार मिळत नाही. याबरोबर रोजगाराभिमुख शिक्षणाची माहिती नसणे, त्यामुळे घेतलेले शिक्षण रोजगार तसेच व्यवसायासाठी पुरेसे ठरत नाही. सुशिक्षित तरूणांना सामाजिकदृष्ट्या उच्च प्रतीचे रोजगार मिळवण्याची इच्छा असते त्यामुळे कमी प्रतीचे रोजगार करण्यास संकुचित वाटते. उदा – ऑटो रिक्षा किंवा टॅक्सी चालवणे, सेल्समन, शेतीतील काम, हॉटेलमधील काम इत्यादीला तरूणांची नापसंती असते. रोजगार व व्यवसाय हा आपल्या गावाजवळ तसेच चांगल्या शहरात पाहिजे. या मानसिकतेमुळे आपला प्रदेश सोडून दुसरीकडे स्थलांतर करण्याची तरूणांची मानसिकता नसते. असे अनेक व्यक्तीगत घटकांमुळे बेरोजगारीची समस्या तीव्र बनते.

वरीलप्रमाणे भारतीय समाजात बेरोजगारी निर्माण होण्याची कारणे आहेत. बेरोजगारीमुळे व्यक्तीचे उत्पन्न, उत्पादकता, आरोग्य, मानसिकतेवर प्रतिकूल परिणाम होतो. देशाच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होतो. भारतात दारिद्र्य हा बेरोजगारीचा सर्वात मोठा परिणाम आहे. बेरोजगारी दारिद्र्य वाढवते, दारिद्र्यामुळे लोकांना योग्य शिक्षण, आरोग्य व उपलब्ध संधीचा लाभ घेता येत नाही. प्रगतीसाठभ पोषक वातावरण मिळत नाही. याचा एकत्रित परिणाम सामाजिक आरोग्य धोक्यात येते. दारिद्र्य, कुपोषण, भूकबळी, निकृष्ट राहणीमान, गुन्हेगारी, झोपडपट्टी, लाचखोरी अशा अनेक समस्या बेरोजगारीमुळे निर्माण होतात.

**बेरोजगारीवरील उपाय योजना :**

स्वातंत्र्योत्तर काळात वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे बेरोजगारी, दारिद्र्य व आर्थिक विषमता या समस्यांची तीव्रता वाढत गेली. त्यामुळे आर्थिक विकासावर विपरीत परिणाम होवून विकासाच्या मार्गात अनेक अडथळे निर्माण झाले. प्रामुख्याने बेरोजगारीमुळे व्यक्ती, कुटुंब तसेच समाजव्यवस्थेवर वाईट परिणाम होतात. बेरोजगारीमुळे लोकांच्या ज्ञान व कौशल्यांना वाव न मिळाल्याने निराशा वाढत जावून व्यक्तींचे मानसिक खच्चीकरण होते. हा समाज आपणास जगण्याची साधने पुरवू शकत नाही. या मानसिकतेतून व्यक्तीगत व सामाजिक विघटनाला चालना मिळते. त्यातून गुन्हेगारी, व्यसनाधिनता, आत्महत्या, चोरी, कौटुंबिक संघर्ष अशा अनेक समस्यांना चालना मिळते. समाज स्वास्थ्य धोक्यात येते. म्हणून बेरोजगारी नष्ट करणे व समाजात संतुलन

राखणे ही शासनाची व सर्व समाजाची जबाबदारी बनते. त्यासाठी एकत्रित प्रयत्नांची आवश्यकता निर्माण होते.

बेरोजगारी ही एक गंभीर सामाजिक-आर्थिक समस्या आहे. ही समस्या सोडविण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्नांची गरज असते. शासकीय व सामाजिक पातळीवर निराकरणात्मक प्रयत्न होणे गरजेचे आहे. बेरोजगारी कमी करण्याच्या उपायांमध्ये दारिद्र्य निर्मुलनासाठीचे शासकीय कार्यक्रमांचा देखील समावेश होतो. यातील महत्त्वाच्या उपाय-योजना पुढीलप्रमाणे आहेत.

**१) लोकसंख्या नियंत्रण :-** भारतातील अनेक सामाजिक-आर्थिक समस्या लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होत आहेत. १९५१ मध्ये देशाची लोकसंख्या केवळ ३.६ कोटी होती. तर २०११ मध्ये ती १२१.०२ कोटीपर्यंत पोहचली आहे. आज भारतातील लोकसंख्या वाढीचा दर जगात सर्वाधिक आहे. या वाढत्या लोकसंख्येत कुशल व अकुशल मनुष्यबळ प्रचंड प्रमाणात निर्माण होत आहे. या वाढत्या मनुष्यबळासाठी आवश्यक रोजगार संधी उपलब्ध होत नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. प्रचंड लोकसंख्येमुळे मागणी आणि पुरवठा यांचे प्रमाण व्यस्त बनते आणि बेरोजगारी वाढते. यासाठी कुटुंब मर्यादीत ठेवणे, संतती नियमन करणे, कुटुंब नियोजन, कुटुंब कल्याण, लोकसंख्या शिक्षण, समाज प्रबोधन, जाणीव-जागृती अशा विविध मार्गाने लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**२) शाश्वत आर्थिक विकास :-** बेरोजगारीची समस्या सोडविण्यायसाठीचा प्रभावी मार्ग म्हणजे शाश्वत आर्थिक विकास होय. आर्थिक विकासासाठी उद्योगांचा विकास, शेती प्रक्रिया उद्योग, उद्योगांचे विकेंद्रीकरण, सेवा क्षेत्राचा विकास करणे आवश्यक आहे. देशातील रस्ते, रेल्वे, वीज, पाणीपुरवठा, देशांतर्गत विमान सेवा, आंतरराष्ट्रीय विमानतळे, सार्वजनिक वाहतूक सुविधा, शैक्षणिक केंद्रे, पर्यटन उद्योगांना चालना अशा पायाभूत सुविधांचा विकास करणे आवश्यक आहे. देशांतील कर रचना प्रक्रियेत सुटसुटीतपणा आणणे आवश्यक आहे. यामुळे देशांतील सर्वच क्षेत्रातील उद्योग व्यवसायांना चालना मिळून रोजगार वाढू शकेल.

**३) औद्योगिक विकास :-** रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी उद्योगधंद्याचा नियोजनपूर्वक विकास करणे आवश्यक आहे. यामध्ये भारतात उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक साधन सामग्रीचा विचार करून त्यासंबंधी उद्योगधंदे, लघुउद्योग, ग्रामोद्योग, कुटीरोद्योगांचा विकास केला पाहिजे. शेतीक्षेत्रात आज सर्वाधिक मनुष्यबळ आहे. त्यामुळे ग्रामीण भागात शेतीप्रक्रिया उद्योगांना चालना देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील उद्योग व शहरी भागातील उद्योग यांच्यात परस्पर समन्वय निर्माण केल्यास कच्चा माल, प्रशिक्षित मनुष्यबळ, बाजारपेठा यात समन्वय निर्माण होवून उद्योगांचा विकास होईल. याबरोबर शासनाने देखील उद्योगवाढीसाठी चालना देणारे धोरण राबवणे गरजेचे आहे. जे उद्योग सर्वाधिक कामगार भरती करतील त्यांना इतर सवलती देणे, स्थानिक कामगारांना प्राधान्य देणे असे धोरण राबवविल्यास रोजगार निर्मिती होऊ शकेल.

**४) शेती व शेतीपूरक व्यवसायांचा विकास :-** भारत हा शेतीप्रधान देश असल्याने शेती विकास व शेतीपूरक व्यवसायांच्या विकासावर अधिक लक्ष केंद्रीत करणे महत्त्वाचे आहे. शेतीविकासासाठी जलसिंचन सुविधा, आधुनिक पिक पद्धती, हवामानानुसार पिकांचे नियोजन, सामूहिक शेती, गट शेती, ग्रामीण कृषी व

मार्गदर्शन केंद्रे, रासायनिक खते व बी-बियाणांचा योग्य वापर, पडीक जमिनींचा विकास, फळबाग विकास योजना, ग्रामीण बाजारपेठांची निर्मिती यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. याबरोबरच दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मधुमक्षिका पालन, वराह-पालन, शेळी पालन, रेशीम उद्योग अशा शेतीपूरक व्यवसायांना चालना देवून सरकारने त्यासाठी कर्जपुरवठा, अनुदान देणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागात परंपरेने अनेक कुटीरोद्योग, ग्रामोद्योग व हस्तउद्योग केले जातात. उदा - टोपल्या विणणे, दोरखंड करणे, सुतारकाम, लोहारकाम, कुंभारकाम, लाकडी खेळणी बनवणे इ. अशा ग्रामीण उद्योगांना प्रोत्साहन देणे, हे उद्योग टिकवून ठेवून त्यांना शहरी बाजारपेठा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. याशिवाय शेतीत व्यापारी तत्त्वावर उत्पादन घेण्यासाठी लोकांना प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यात प्रामुख्याने नारळ, काजू, चहा, कॉफी, आले, तंबाखू, ऊस, कापूस, कडधान्ये, तेलबिया, फळभाज्या अशा अनेक उत्पादनांचा समावेश करणे गरजेचे आहे. याबरोबर कृषी प्रक्रियांना त्या-त्या प्रदेशातील पिकपद्धतीनुसार प्रोत्साहन देणे, कृषी पर्यटनाला चालना देणे, शहरातील बाजारपेठांत, शेतकरी बाजारपेठा निर्माण करणे. अशा विविध उपयांची अंमलबजावणी केल्यास ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होऊ शकेल.

**५) शैक्षणिक सुधारणा :-** भारत देशात ब्रिटिशकाळापासून चालत आलेल्या शैक्षणिक पद्धतीत अनेक दोष आहेत. आपल्याकडील शिक्षण हे रोजगाराभिमुख, स्वावलंबन व कौशल्य निर्माण करणारे नाही तर ते केवळ पदवी निर्माण करणारे आहे. भारतात आजपर्यंत भारतीय समाजाच्या गरजांचा विचार करून शैक्षणिक प्रक्रिया राबविली गेलेली नाही. या शिक्षण पद्धतीने आजपर्यंत केवळ शहरी भागातील गरजांचा अधिक वापर केला. त्या तुलनेत ग्रामीण भागाचा फारसा विचार केलेला आठवत नाही. त्यामुळे शिक्षणपद्धतीतील दोष दूर करून सुधारणा केल्या पाहिजेत. त्यासाठी संपूर्ण देशांत समाजशिक्षण प्रणाली राबविणे, प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणे, शिक्षणात स्थानिक गोष्टींना प्राधान्य देणे, विद्यार्थ्यातील कौशल्य शोधून त्याचा विकास करणे, कौशल्य विकासाला प्राधान्य देणे, उच्चशिक्षणात संशोधन व विकासाला चालना देणे. याबरोबरच पारंपारिक शिक्षणाबरोबरच व्यवसाय शिक्षणाला चालना देणे, स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण केंद्रे निर्माण करणे अशा विविध उपयांची अंमलबजावणी करून शैक्षणिक सुधारणा केल्यास कुशल मनुष्यबळाची निर्मिती होऊ शकेल. यामुळे रोजगार व स्वयंरोजगारास सहकार्य मिळेल.

**६) शासकीय योजना व कार्यक्रम :-** आजपर्यंत विविध पंचवार्षिक योजनांद्वारे औद्योगिक विकास व शेती विकास या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न करण्यात आले. यात प्रामुख्याने कृषी क्षेत्रात गुंतवणूक उपभोग्य वस्तू उत्पादन उद्योगांना प्रोत्साहन, उद्योगांचे ग्रामीण भागात विकेंद्रीकरण, ग्रामीण उद्योगांना चालना, सेवाक्षेत्राचा विकास अशा अनेक बाबीवर भर देण्यात आला आहे. याशिवाय दारिद्र्य निर्मुलन व रोजगार निर्मितीसाठी केंद्र व राज्यसरकारांनी वेतन आधारीत रोजगार योजना उदा - रोजगार हमी योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना इ. तसेच स्वयंरोजगार आधारीत रोजगार योजना उदा - स्वर्ण-जयंती ग्राम स्वरोजगार योजना, स्वर्ण-जयंती शहरी रोजगार योजना इ. अशा अनेक योजना राबविल्या आहेत. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**(अ) केंद्र शासनाचे कार्यक्रम :**

नियोजन काळात केंद्र सरकारने रोजगार निर्मितीसाठी विविध योजना व कार्यक्रम सुरू केले. या योजनासाठी सरकारकडून ५० टक्के ते ७५ टक्क्यांपर्यंत अनुदान उपलब्ध करून दिले जाते. केंद्र पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी राज्यसरकारांकडून केली जाते. या योजना पुढीलप्रमाणे आहेत.

१. सामाजिक विकास प्रकल्प आणि राष्ट्रीय विस्तार सेवा.

२. प्रकर्षित कृषी जिल्हा कार्यक्रम (१९६०-६१)

३. जिल्हा ग्रामीण विकास संस्था (१९६४)(१९९३)

४. अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम (१९२३)

५. सीमांत शेतकरी आणि शेतमजूर विकासा यंत्रणा (१९७३-७४)

६. डोंगरी क्षेत्र विकास कार्यक्रम (१९७१-७२)

७. वीस कलमी कार्यक्रम (१९७५)

८. राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था (१९७७)

९. ग्रामीण औद्योगिकरण व जिल्हा उद्योग केंद्र (१९७७)

१०. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (१९८०-८१)

११. ग्रामीण युवकांसाठी स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रम (१५ ऑगष्ट १९७९)

१२. ग्रामीण क्षेत्रातील महिला व बालविकास कार्यक्रम (१९८२)

१३. इंदिरा आवास योजना (१९८५)

१४. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (२५ डिसें २०००)

१५. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (२ फेब्रुवारी२००६)

या योजनांबरोबरच अनेक रोजगार व स्वयंरोजगाराच्या योजना केंद्रशासनाने राबविल्या आहेत.

**(ब) राज्य शासनाचे कार्यक्रम :**

महाराष्ट्र राज्यात रोजगार निर्मिती व ग्रामीण विकासासाठी केंद्र शासनाने पुरस्कृत केलेल्या विविध योजना राबविल्या जातात. या योजनांबरोबरच राज्य शासनाने राज्यातील गरजा विचारात घेवून पुढील काही योजना राबविल्या आहेत.

१. रोजगार हमी योजना (३ एप्रिल १९७५)

२. संजय गांधी स्वावलंबन योजना (२ ऑक्टोबर १९८०)

३. जवाहर विहिरी कार्यक्रम (१ ऑक्टोबर १९८०)

४. रोह्यो अंतर्गत फळबाग लागवड योजना (१ जून १९९०)

५. सुशिक्षित बेरोजगारांसाठी वीज भांडवल योजना

६. रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र

**७) इतर उपाय :**

बेरोजगारी निर्मुलनासाठी वरील विविध उपायांबरोबरच खालील काही मुद्यांचा विचार होणे महत्त्वाचे आहे.

१) कर्ज, वीज, पाणी, रस्ते अशा सोयी उपलब्ध करून पाच ते पन्नास हजार लोकसंख्येच्या छोट्या शहरात उद्योग वाढीसाठी प्रयत्न करणे.

२) जमीन, भांडवल अशा उपलब्ध उत्पादनाच्या साधनांच्या तुलनेत श्रमाची संख्या वाढत गेल्याने श्रमनियोजनास प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे.

३) उपभोग्य वस्तुंच्या उद्योगाचा विस्तार केल्यास भाववाढ कमी होवून रोजगार निर्मिती होवू शकेल.

४) ज्या उद्योगांत सर्वाधिक रोजगार निर्माण होईल अशा उद्योगांना कर, कर्ज इत्यादीबाबत सवलती देण्याचे धोरण स्वीकारले पाहिजे.

५) स्थानिक उद्योग व उद्योजकांना सवलती देणे.

६) शिक्षणपद्धती ही केवळ पुस्तकी ज्ञानापर्यंत मर्यादीत न ठेवता, व्यवसायाभिमुख शिक्षणपद्धतीला प्राधान्य द्यावे. यासाठी उद्योगांना आवश्यक असणारे प्रशिक्षित मनुष्यबळ पुरविण्यासाठी शिक्षण संस्था व उद्योगांना परस्पर सामंजस्य करार करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

७) ग्रामीण भागात रस्ते, रेल्वे, पूल, शाळा बांधकाम, शेततळी इ. कामांना प्राधान्य देवून रोजगार निर्मिती करावी.

वरीलप्रमाणे बेरोजगारी निर्मुलनासाठी विविध उपाय योजना सांगता येतील. याशिवाय याच प्रकरणातील दारिद्रय या समस्येवरील रोजगारविषयक योजनांचा विचार करणेत यावा. याशिवाय राज्यघटनेतील कलम ३९ नुसार 'कामाचा हक्क' (Right to work) मान्य करण्यात आला आहे. यानुसार असे मान्य करण्यात आले आहे कि, बेरोजगारी नाहीशी करण्यासाठी राज्याने त्याच्या आर्थिक क्षमतेच्या व विकासाच्या मर्यादेत राहून कामाचा हक्क, शिक्षण याद्वारे सार्वजनिक सहाय्यता प्रदान करावी.

## ३.६ पारिभाषिक शब्द :

**१) सर्वकष दारिद्र्य :–** शारीरिक कार्यक्षमता व मुलभूत आरोग्य विषयक गरजांची पूर्तता करण्यासाठी साधनसामग्रीचा अभाव असणे.

**२) दारिद्र्याची संस्कृती :–** व्यक्तीला आपली दारिद्र्याची जीवनपद्धती बदलायची नसते. आहे त्या संस्कृतीत जीवन जगण्याला प्राधान्य दिले जाते.

**३) सापेक्ष दारिद्र्य :–** एखाद्या वरिष्ठ आर्थिक समुहाचा कनिष्ठ आर्थिक समुहाशी तुलना करून श्रीमंती अथवा गरीबी निश्चित करणे.

**४) बेरोजगारी :–** व्यक्तीत काम करण्याची क्षमता व इच्छा असते. तरीही तिला प्रचलित वेतनावर काम मिळत नाही.

**५) हंगामी दारिद्र्य :–** शेती व इतर क्षेत्रात केवळ एका विशिष्ट काळात काम मिळणे व इतर वेळी न मिळणे.

## ३.७ सारांश :

या घटकांमध्ये भारतातील प्रमुख सामाजिक–आर्थिक समस्या म्हणून दारिद्र्य व बेरोजगारी या दोन प्रमुख समस्यांचा अभ्यास करण्यात आला आहे. दारिद्र्य या संकल्पनेचा अभ्यास करताना दारिद्र्याची संकल्पना, अर्थ, व्याख्या, दारिद्र्याचे प्रकार, दारिद्र्याची कारणे व उपाय–योजनांचा विचार करण्यात आला आहे. दारिद्र्यामुळे समाजात सामाजिक आरोग्य विस्कळीत होवून सामाजिक विघटनाला चालना मिळते. दारिद्र्यामुळे व्यक्ती व समाजाच्या विकासाला अडथळा निर्माण होतो. म्हणून हा प्रश्न सोडविण्यासाठी व्यक्तीगत सामाजिक व शासकीय पातळीवर सर्वांगिण प्रयत्न झाल्यास दारिद्र्य निर्मुलन होवून समाजाचा विकास शक्य होतो.

बेरोजगारी ही समस्या देखील आर्थिक व्यवस्थेशी संबंधित आहे. बेरोजगारी दारिद्र्य व आर्थिक विषमतेला चालना देते. समाजात गुन्हेगारी, व्यसनाधिनता, आत्महत्या, भ्रष्टाचार अशा अनेक समस्यांना बेरोजगारी चालना देते. या घटकात आपण बेरोजगारीचा अर्थ, व्याख्या, कारणे व बेरोजगारीवरील उपाययोजनांचा अभ्यास केला आहे. सामान्यपणे बेरोजगारी कर्त्या लोकसंख्येशी संबंधित असते. ही लोकसंख्या देशात विकासातील प्रमुख मनुष्यबळ म्हणून काम करते. अशा लोकसंख्येलाच ते शारिरीक व बौद्धीकदृष्ट्या सक्षम असताना प्रचलित वेतनदरात काम मिळत नाही. त्यावेळी बेरोजगारी निर्माण होते. ही बेरोजगारी मानसिक व सामाजिक आरोग्य विस्कळीत करू शकते. यासाठी शासनस्तरावर यावर उपाय–योजना करण्याचा सातत्याने प्रयत्न होत आहेत.

**स्वयं अध्ययनाचे प्रश्न – १**

१. दारिद्र्याची गोडार्ड यांची व्याख्या सांगा?

२. 'दारिद्र्य रेषा' अर्थ काय?

३. दारिद्र्याची व्यक्तीगत कारणे सांगा?

४. राम आहुजा यांनी सांगितलेली दारिद्र्याची कारणे सांगा?

५. दारिद्र्य निर्मुलनाचे शासकीय उपाय सांगा?

६. दारिद्र्य निर्मुलनाचे इतर उपाय सांगा?

७. बेरोजगारीची फेअर चाईल्ड यांची व्याख्या सांगा?

८. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेची व्याख्या सांगा?

**स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न – २**

**१)** बेरोजगारीची कारणे सांगा?

**स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न – ३**

१. बेरोजगारीचे उपाय सांगा?

२. बेरोजगारीचे शासकीय कार्यक्रम सांगा

**स्वयं अध्ययन प्रश्न :**

१. दारिद्र्य निर्मुलनाचे शासकीय उपाय सांगा?

२. दारिद्र्य निर्मुलनाचे इतर उपाय सांगा?

३. बेरोजगारीची फेअर चाईल्ड यांची व्याख्या सांगा?

४. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेची व्याख्या सांगा?

५. बेरोजगारीची कारणे सांगा?

६. बेरोजगारीचे उपाय सांगा?

७. बेरोजगारीचे शासकीय कार्यक्रम सांगा?

**उत्तर – १ –** गोडार्ड – ''एक व्यक्ती आणि तिच्यावर अवलंबून असणारे इतर लोक यांचे स्वास्थ्य, आरोग्य व त्यांची कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तुंचा अपुरा पुरवठा म्हणजे दारिद्र्य होय. ''

**उत्तर – २ –** दारिद्र्यरेषेमुळे आपणास दारिद्र्याचे मोजमाप करता येते व अशा दारिद्र्यरेषेच्या खालपासून दारिद्र्याची सुरवात होते व त्या रेषेच्यावरती दारिद्र्याचा शेवट होतो.

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे – २**

**उत्तर – १ –** व्यक्ती, दारिद्र्याची संस्कृती व समाजरचना ही दारिद्र्याची व्यक्तीगत कारणे आहेत.

**उत्तर – २ –** राम आहुजा यांनी दारिद्र्याची, आर्थिक कारणे, लोकसंख्यात्मक कारणे व सामाजिक कारणे सांगितली आहेत. आर्थिक कारणांत अपुरा विकास, वाढती महागाई व भांडवलाचा अभाव, कुशल मनुष्यबळाचा अभाव, वाढती बेकारी, पारंपारिक शेती व्यवसाय हे मुद्दे सांगितले आहेत.

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे – ३**

**उत्तर :– १ –** दारिद्र्य निर्मुलनाचे अनेक शासकीय उपाय आहेत. त्याचा सविस्तर आढावा प्रकरणातील या मुद्यांच्या आधारे घ्यावा.

**उत्तर :– २ –** इतर उपायात लोकसंख्या नियंत्रण, कृषिक्षेत्राचा विकास, रोजगार संधी, अभिवृत्तीत बदल इ. चा विचार करावा लागेल.

*** बेरोजगारीची समस्या :**

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे – १**

**उत्तर – १ –** फेअर चाईल्ड - मजुरी करणाऱ्या सामान्य वर्गाच्या एका सदस्याला सामान्य वेळात, सामान्य वेतनावर आणि सामान्य काम करण्याच्या परिस्थितीत वेतन मिळणाऱ्या कामापासून अनिच्छेने वेगळे ठेवले जाते तेव्हा त्याला बेरोजगारी असे म्हणतात.

**उत्तर – २ –** आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेनुसार ''काम करण्याची इच्छा व सामर्थ्य असूनही प्रचलित वेतनदरावर काम शोधत असताना ज्यांनाा काम मिळत नाही अशांना बेरोजगार म्हटले जाते.''

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे – २**

**उत्तर – १ –** लोकसंख्या वाढ, मागास शेती, ग्रामोद्योगांचा ऱ्हास, यंत्र व तंत्रज्ञानात्मक प्रगती, उद्योग व व्यवसायातील चढ–उतार, शिक्षण व्यवस्थेतील दोष, राजकीय संरचना, व्यक्तीगत घटक ही बेरोजगारीची कारणे आहेत.

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे – ३**

**उत्तर – १ –** लोकसंख्या नियंत्रण, शाश्वत आर्थिक विकास, औद्योगिक विकास, शेती व शेती–पूरक व्यवसायांचा विकास, शैक्षणिक सुधारणा हे बेरोजगारीचे उपाय आहेत.

**उत्तर – २ –** बेरोजगारीसाठी अनेक शासकीय कार्यक्रम व योजनांचा विचार केला जातो. त्यात केंद्र व राज्यशासनाच्या कार्यक्रमांचा समावेश आहे. सविस्तर उत्तरासाठी प्रकरणातील मुद्दे पहावेत.

✻ **सराव/गृहपाठ (Exercise/Home Assignment) :**

महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील दारिद्र्य व बेरोजगारी संबंधीच्या पुस्तकांचे वाचन करा. आपलाा तालुका, गांव येथील दारिद्र्य व बेरोजगारी निर्मुलन कार्यक्रमांचा आढावा घ्या.

✻ **चिंतन आणि कृती** (Reflection and Action) **:**

तुमचे गाव, तालुका व शहरातील दारिद्र्यासंबंधी केंद्राला भेट द्या. सरकारी कार्यालयात तालुक्यातील बेरोजगारीचा आढावा घ्या. तालुका/जिल्हा उद्योग केंद्रे व सरकारी बँकांना भेटी द्या.

✻ **अधिक वाचनासाठी पुस्तके** (Suggested Reading Books) **:**


१. Ahuja Ram : Social Problems in India, Rawat Publication Jaipur (2003)

२. Sharma. Ram Nath : Indian Social Problems, Media Promoters Bombay (1982)

३. Ghate P. : Direct Attack on Poverty, Concept Publishing New Delhi (1984)

४. Shankar Rao C.N. : Sociology Primary Principles, Chand & Co. Delhi (2004)

५. समकालीन भारतातील सामाजिक समस्या – प्रा. जयंत घाटगे

६. भारतातील सामाजिक समस्या – प्रा. मोहिते, प्रा. कोंडेकर, फडके प्रकाशन.

७. समकालीन भारतातील सामाजिक समस्या, साळुंखे जत्राटकर, मारूळकर – नरेंद्र प्रकाशन, पुणे.

८. शर्मा जी. एल. – सामाजिक मुद्दे, रावत पब्लिकेशन, जयपूर.

९. भगेलीवाल टी. एन. – श्रम अर्थशास्त्र एव औद्योगिक संबंध, साहित्य भवन, आग्रा.

१०. चव्हाण एन. एल.– भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास–१ प्रशांत पब्लिकेशन, जळगांव

११. रसाळ राजेंद्र – भारतीय अर्थव्यवस्था, सक्सेस पब्लिकेशन, पुणे.

१२. शिरगांवे, गोडसे, साळुंखे, साळोखे – भारतातील सामाजिक समस्या, निराली प्रकाशन, पुणे.

१३. आगलावे, प्रदीप – भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

१४. मारूळकर, पाडळकर – भारतातील सामाजिक समस्या, फडके प्रकाशन, कोल्हापूर.


✻✻✻

# घटक क्रमांक – ४
# सामाजिक – वैधानिक समस्या
# ( Socio- Legal Issues)

**अनुक्रमणिका**

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रस्तावना

४.३ विषय विवेचन

४.३.१ मानवी हक्क: मानवी हक्कांचा इतिहास, भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क

४.३.२ सायबर गुन्हा: अर्थ, सायबर गुन्ह्यांची कारणे आणि सायबर गुन्ह्यांवरील उपाय.

४.४ सारांश

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ४.१ उद्दिष्टे (Objectives)

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास...

१. मानवी हक्कांचा इतिहास स्पष्ट होईल.

२. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क माहिती होतील.

३. सायबर गुन्ह्यांचा अर्थ, सायबर गुन्ह्यांची कारणे आणि सायबर गुन्ह्यांवरील उपाय स्पष्ट होतील.

## ४.२ प्रस्तावना

भारतीय समाजातील सामाजिक-वैधानिक समस्यांचे आकलन होण्याच्या दृष्टीने तसेच या विविध समस्यांवर उपाययोजना सुचविण्याचा दृष्टीने भारतीय समाजाच्या जडणघडणी मधील मूलभूत घटकांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. उदा. भारतीय नागरिकांना मिळालेले मूलभूत हक्क. यामध्ये प्रामुख्याने जगण्याचा हक्क, अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्य इत्यादींचा समावेश होतो. मानवी हक्क सर्व मानवी समाजात प्राप्त झाले आहेत. भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांना काही मूलभूत हक्क मिळवून दिले आहेत.

माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर आणि संगणक, इंटरनेट यावरील मानवी समाजाचे अवलंबन यामध्ये वाढ झाली. माहिती-तंत्रज्ञानाचा मानवी विकासासाठी महत्वाचा वाटा असला तरी माहिती-तंत्रज्ञानाच्या मोठ्या प्रमाणातील वापरामुळे आणि यामधील त्रुटींमुळे काही सामाजिक समस्यांची निर्मिती होत आहे. उदाहरणार्थ सायबर गुन्हा इत्यादी.

**४.३ विषय विवेचन :**

प्राचीन काळापासून मानवी मानवी जीवनमान उंचावण्यासाठी आणि सर्वांचा सन्मान,रक्षणासाठी प्रयत्न होत आलेले आहे. यामध्ये विविध कालखंडामध्ये विविध राज्यांनी आपल्या राजवटीमध्ये जनतेच्या कल्याणासाठी प्रयत्न केलेले दिसून येतात. विविध विचारवंत आणि तत्त्ववेत्ते यांनी आपल्या लिखाणातून मानवी हक्काबाबत विचार मांडलेले दिसून येतात. भारतीय राज्यघटनेमध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता अशा प्रकारचे महत्त्वाचे मानवी हक्क नागरिकांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

या घटकांमध्ये आपण मानवी हक्कांचा ऐतिहासिक आढावा अभ्यासणार आहोत तसेच भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्कांचा अभ्यास करणार आहोत. यासोबतच सायबर गुन्ह्याचा अर्थ, सायबर गुन्ह्याची कारणे आणि सायबर गुन्ह्यावरील उपाय अभ्यासणार आहोत.

**४.३.१ मानवी हक्क : इतिहास, भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क**

जे हक्क व्यक्तीला जन्मापासूनच प्राप्त होतात. त्यांना मानवी हक्क असे म्हणतात. मानवी जीवनाचा अविभाज्य भाग म्हणजे मानवी हक्क होय. प्रत्येक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासामध्ये मानवी हक्क महत्वपूर्ण भूमिका बजावतात. संयुक्त राष्ट्र संघाने १९४८ मध्ये मानवी हक्कांचा जाहीरनामा प्रसिध्द केला. मानवी हक्कांचा इतिहास समजून घेण्यापूर्वी मानवी हक्काची संकल्पना थोडक्यात माहिती करून घेता येईल.

**मानवी हक्क : व्याख्या**

**१. जे. पी. एस. सिरोहीया -**

मानवी हक्क म्हणजे असे हक्क की, जे मानवी व्यक्तींच्या जीवनाशी आणि स्वातंत्र्याशी निगडित असून सर्व संस्थांद्वारे आणि संयुक्त राष्ट्रसंघासहित सर्व राष्ट्रांच्या कायद्यामार्फत त्यांना संरक्षण प्रदान करण्यात आले पाहिजे.

**२. संयुक्त राष्ट्र संघटनेचे मानवाधिकार केंद्र -**

मानवी हक्क म्हणजे व्यक्तीला निसर्गाकडून प्राप्त झालेले असे अधिकार, की ज्याशिवाय माणूस म्हणून जगणे अशक्य आहे.

**३. रँडम हाऊस विश्वकोश -**

मानवाधिकार म्हणजे व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले असे अधिकार, की जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी अत्यावश्यक आहेत.

**४. मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ च्या कलम २ (१) (ड) नुसार,**

**(Protection of Human Rights Act)**

भारतीय राज्यघटनेने हमी दिलेल्या जीवन, स्वातंत्र्य, समता, प्रतिष्ठा यासंबंधित हक्क तसेच आंतरराष्ट्रीय करारामध्ये समाविष्ट असलेले आणि भारतीय न्यायानुसार अंमलबजावणी योग्य अशा हक्कांचा समावेश मानवी हक्कांमध्ये होतो.

भारतीय राज्यघटनेमध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता अशा प्रकारचे महत्त्वाचे मानवी हक्क नागरिकांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

वरील व्याख्यांवरून मानवी हक्क म्हणजे काय याबाबत पुढील अर्थ स्पष्ट होतो.

- मानवी हक्क व्यक्तीला जन्मापासून प्राप्त झाले आहेत.
- व्यक्तीला सन्मानपूर्वक जगण्यासाठी आणि व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी मानवी हक्क अनिवार्य आहेत.
- मानवी हक्क हे व्यक्तीच्या संरक्षणाचे कवच आहे.
- मानवी हक्क हे नैसर्गिक आहेत.
- मानवी हक्क व्यक्तीच्या जीवनाशी आणि स्वातंत्र्याचे निगडित आहेत.

थोडक्यात, मानवी हक्क व्यक्तिविकास आणि समाजविकास या दोहोंसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत.

या घटकाचा अभ्यास करताना मानवी हक्क म्हणजे काय, हे थोडक्यात समजून घेतल्यानंतर मानवी हक्कांचा इतिहास पुढीलप्रमाणे समजावून घेऊयात.

**मानवी हक्कांचा इतिहास (History of Human Rights)**

भारतातील सामाजिक आणि वैधानिक मुद्द्यांचा अभ्यास करीत असताना मानवी हक्कांची संकल्पना अभ्यासणे महत्त्वपूर्ण ठरते. मानवी हक्क संकल्पनेचा उल्लेख प्राचीन काळापासून आढळतो. सद्य स्थितीमध्ये संपूर्ण समाजाच्या विकासामध्ये मानवी हक्क आणि त्यांचे संरक्षण याला अनन्यसाधारण असे महत्व आहे. त्यामुळे मानवी हक्कांचा इतिहास अभ्यासणे आवश्यक ठरते.

मानवी हक्कांचा इतिहास आपणास तीन कालखंडातून स्पष्ट करता येईल.

१. प्राचीन कालखंड

२. मध्ययुगीन कालखंड

३. आधुनिक कालखंड

हे तीनही कालखंड आपणास पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१. प्राचीन कालखंड –**

प्राचीन कालखंडातील मानवी हक्कांचा इतिहास हा ख्रिस्तपूर्व परंपरा, सम्राट अशोक यांचा कार्यकाळ,

आणि ग्रीक– रोमन परंपरा अशा विभागांमध्ये अभ्यासता येईल.

**ख्रिस्तपूर्व परंपरा**

ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकामध्ये सम्राट सायरसच्या राजवटीमध्ये मानवी हक्कांची तत्वे प्रस्थापित केली. सायरस वृत्तचिती मानवी हक्कांबाबत पहिला दस्तऐवज म्हणून ओळखला जातो. ख्रिस्तपूर्व ५३९ मध्ये बॅबिलोन वरील विजयानंतर राजाने वृत्तचिती काढली, असे १८७९ मध्ये स्पष्ट झाले. सायरस राजाने यहुदी धर्माच्या अनुयायांची गुलामगिरी मधून सोडवणूक केली.

**सम्राट अशोक यांचा कालखंड**

ख्रिस्तपूर्व २६५ मध्ये सम्राट अशोकने कलिंगवर विजय मिळविला. परंतु त्यानंतर त्याने अहिंसेचे धोरण स्वीकारले सम्राट अशोकच्या आज्ञापत्रामध्ये विविध सुधारणांचे वर्णन करण्यात आले आहे, त्या पुढीलप्रमाणे.

सर्वधर्मसहिष्णुता राखणे.

पालकांची आज्ञा पाळणे.

सर्वांशी माणुसकीने वागणे.

गुरुजनांचा आदर राखणे, इत्यादी.

**ग्रीक व रोमन परंपरा–**

स्ट्राइकस या ग्रीक रोमन तत्त्ववेत्त्याने नैसर्गिक कायद्याचा सिद्धांत मांडला. ज्यामध्ये मानवी हक्कांचे विचार दिसून येतात. सॉक्रेटिस आणि प्लेटो यांनी मांडलेल्या विचारांमध्येही मानवी हक्क बाबतचे विचारांचे प्रतिबिंब दिसून येते.

ग्रीक नगरराज्यामध्ये नागरिकांना भाषण स्वातंत्र्य, कायद्यासमोर समानता अशा प्रकारचे मूलभूत हक्क दिलेले दिसून येतात.

रोमन परंपरेमध्येही नैसर्गिक हक्काबाबतचे विचार दिसून येतात. सीसेरो यांच्या मते, मानवी जीवनाची सुरक्षा आणि शांतीसाठी नागरिकांनी चांगले वर्तन ठेवणे आवश्यक आहे.

**२. मध्ययुगीन कालखंड**

मध्ययुगीन कालखंडामध्ये अबेलॉर्ड, सेंट थॉमस क्वीनास यांनी नैसर्गिक कायद्याचा पुरस्कार केला. संघटित आणि नियंत्रित समाजासाठी खाजगी मालमत्तेची आवश्यकता असल्याचे सेंट थॉमस क्वीनास यांनी नमूद केले. तसेच त्यांनी शाश्वत कायदा, स्वाभाविक कायदा, दैवी कायदा आणि मानवी कायदा यानुसार संपूर्ण विश्वावर कायद्याची सत्ता चालते असेही मत स्पष्ट केले.

पाश्चिमात्य विचारवंतांमध्ये ह्युम रुसो, हॉब्ज, लॉक इत्यादी विचारवंतांनी विविध सिद्धांत द्वारे मानवी हक्कांच्या पायाभरणीस हातभार लावला.

### ३. आधुनिक कालखंड

नागरिकांचे त्यांच्या राज्यांकडून होणाऱ्या अन्याया पासूनचे संरक्षणासाठी आणि मानवी हक्कांच्या सुरक्षिततेसाठी आंतरराष्ट्रीय कायदा संस्थेच्या सभासदांनी काही उपाय सुचविले. यामध्ये युरोप, अमेरिका आणि आशिया खंडातील विविध राष्ट्रांचा समावेश होतो. यामध्ये प्रत्येक राष्ट्राकडून सहा कलमी कार्यक्रमाचा स्वीकार करण्यात आला.

१. राष्ट्रीयता, वंश, भाषा, लिंग, धर्म असा भेदभाव न करता व्यक्तींच्या समान हक्कांचे संरक्षण केले जाईल. प्रत्येक व्यक्तीचे जीवन, स्वातंत्र्य व मालमत्ता यांच्या समान हक्कांचा समावेश यात होतो.

२. प्रत्येक व्यक्तीच्या सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील श्रद्धा, धर्म व विश्वासानुसार असणाऱ्या आचरणास मान्यता देण्यात येईल.

३. प्रत्येक व्यक्तीला तिच्या आवडीची भाषा व त्या भाषेमध्ये शिक्षणाचा अधिकार मान्य करण्यात येईल.

४. कोणत्याही राष्ट्राच्या नागरिकांमध्ये वंश, धर्म, भाषा, लिंग यांच्या आधारे भेदभाव करता येणार नाही.

५. राष्ट्राच्या नागरिकांमध्ये समानतेचा विचार हा परिणामकारकपणे असणे आवश्यक आहे.

६. कोणत्याही राष्ट्राला स्वतःच्या सर्वसामान्य कायद्याच्या आधाराशिवाय नागरिकांना धर्म, वंश, लिंग याद्वारे प्राप्त झालेले राष्ट्रीयत्वाचे अधिकार काढून घेता येणार नाहीत.

वरील सहा कलमांमध्ये सर्वांना जीवन जगण्याचा, स्वातंत्र्याचा ,मालमत्ता संपादन करण्याचा समान हक्क प्रदान करणे आणि प्रत्येक राज्याने त्यांच्या नागरिकांमध्ये धर्म, भाषा, वंश, लिंग यांच्या आधारे भेदभाव करू नये असे स्पष्ट होते.

१० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाची सर्वसाधारण संसदेची आमसभा संपन्न झाली. यामध्ये मानवी हक्कांचा जाहीरनामा प्रसिद्ध करून स्वीकारण्यात आला. भारतातील मानवी हक्कांचे संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठी १२ ऑक्टोबर १९९३ रोजी भारतामध्ये राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची (National Human Rights Commission) स्थापना करण्यात आली.

थोडक्यात, आपणास मानवी हक्कांचा इतिहास स्पष्ट करत असताना प्रमुख तीन टप्प्यांमधून मानवी हक्कांचा विकास झाला असे म्हणता येईल. प्रामुख्याने या मानवी हक्काच्या इतिहासाचे वर्गीकरण प्राचीन कालखंड, मध्ययुगीन कालखंड आणि आधुनिक कालखंड अशा तीन कालखंडानुसार स्पष्ट करता येईल.

**भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क/अधिकार : (Fundamental Rights in Indian Constitution)**

भारताची राज्यघटना ( संविधान) ही भारताचा सर्वोच्च व पायाभूत कायदा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या मसुदा समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेद्वारे स्वीकारला गेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय

राज्यघटनेचे शिल्पकार असे मानले जाते. भारतामध्ये २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटनेचा स्वीकार केला गेला. त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस भारतीय 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो. २६ जानेवारी १९५० पासून भारताची राज्यघटना अंमलात आली. त्यामुळे २६ जानेवारी हा दिवस भारतीय 'प्रजासत्ताक दिन' म्हणून साजरा केला जातो. भारताची राज्यघटना उद्देशिका, मुख्य भाग व १२ परिशिष्ट अशा स्वरूपात विभागली आहे. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेनुसार, भारत हे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक, गणराज्य आहे.

भारतीय राज्यघटनेने नागरिकांना मूलभूत अधिकार प्रदान करून नागरिकांचा सर्व सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता अशा तत्त्वांची जोपासना केली आहे. भारतीय राज्यघटनेने मूलभूत हक्कांना संरक्षण दिले आहे. यासाठी घटनात्मक उपाययोजनेचा अधिकार नागरिकांना दिला आहे.

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या प्रकरणामध्ये कलम १४ ते कलम ३५ मध्ये मूलभूत हक्क स्पष्ट करण्यात आले आहेत.

१. समतेचा हक्क (Rights to Equality)(कलम १४ ते १८)

२. स्वातंत्र्याचा हक्क ( Rights to Freedom) (कलम १९ ते २२)

३. शोषणापासून संरक्षणाचा हक्क ( Rights against Exploitation)(कलम २३ ते २४)

४. धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क ( Rights to Freedom of Religion)(कलम २५ ते २८ )

५. सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क ( Cultural and Educational rights) (कलम २९ व ३०)

६. घटनात्मक उपायांचा हक्क ( Rights to Constitutional Remedies) (कलम ३२ ते ३५)

१९७८ च्या ४४ व्या घटनादुरुस्तीनुसार मालमत्तेचा अधिकार (मालमत्तेचा अधिकार कलम ३१) मूलभूत हक्कांच्या यादी मधून कमी करण्यात आलेला आहे.

**भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क/ अधिकार**

भारतीय राज्यघटनेने भारतीय नागरिकांना दिलेल्या मूलभूत हक्कांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे दिलेले आहे.

**१. समतेचा हक्क (Rights to Equality)** (कलम १४ ते १८)

कलम १४ – कायद्यापुढे समानता

कलम १५ – सार्वजनिक ठिकाणी प्रवेश करण्यास समान हक्क

कलम १६ – सार्वजनिक सेवा योजनांमध्ये नेमणुकीस समान संधी

कलम – १७ अस्पृश्यता नष्ट करणे

कलम १८ – पदव्यांचे संपुष्टिकरण

कलम १४ – कायद्यापुढे समानता–या हक्कानुसार, कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान आहेत. धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान इत्यादींपैकी कोणत्याही आधारावर कोणत्याही नागरिकाला भेदभाव करता येणार नाही.

कलम १५ – सार्वजनिक ठिकाणी प्रवेश करण्यास समान हक्क – या हक्कानुसार, सर्वांना सार्वजनिक ठिकाणी प्रवेशासंबंधित समान हक्क देण्यात आला आहे. धर्म, जात, वंश, लिंग यापैकी कोणत्याही कारणावरून शाळा, मंदिरे, पाणवठे, दुकाने, उपहारगृहे, रस्ते इत्यादी सार्वजनिक ठिकाणी प्रवेशासंबंधित भेदभाव केला जाणार नाही.

कलम १६ – सार्वजनिक सेवा–योजनांमध्ये नेमणुकीस समान संधी – या हक्कानुसार, राज्यातील सार्वजनिक सेवा–योजना मध्ये कोणत्याही जागेवर नेमणुकीस सर्व नागरिकांना समान संधी मिळते.

कलम – १७ अस्पृश्यता नष्ट करणे –कलम १७ मधील या तरतुदीनुसार, अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे. कोणत्याही स्वरूपाची अस्पृश्यता पाळणे हा शिक्षेला पात्र होणारा गुन्हा समजला जाईल. यानुसार संसदेने १९५५ मध्ये अस्पृश्यता निवारण कायदा केला. भारतामध्ये सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने घटनेतील हि तरतूद अत्यंत महत्त्वाची ठरते.

कलम १८ – पदव्यांचे संपुष्टिकरण–या तरतुदीनुसार राज्य लष्करी किंवा शिक्षणविषयक पदवी व्यतिरिक्त कोणतीही पदवी प्रदान करू शकणार नाही. यासोबतच भारतातील कोणत्याही नागरिकाला परराष्ट्रांकडून पदवी किंवा किताब स्विकारता येणार नाही. अशा प्रकारच्या पदव्या किंवा किताब स्वीकारल्यामुळे समाजात विषमता, भेदभाव निर्माण होऊन समतेच्या तत्वाला बाधा पोहोचते.

**२. स्वातंत्र्याचा हक्क (Rights to Freedom) (कलम १९ ते २२)** –

भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ ते २२ मध्ये स्वातंत्र्याचे अधिकार पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आले आहेत.

भाषणाचे व मतप्रदर्शनाचे स्वातंत्र्य.

शांततेने व शस्त्र न बाळगता एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य.

संस्था किंवा संघ स्थापन करण्याचे स्वातंत्र्य.

भारतामध्ये सर्वत्र संचार करण्याचे स्वातंत्र्य.

भारताच्या प्रदेशात कोठेही वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य.

व्यवसाय, रोजगार, व्यापार करण्याचे स्वातंत्र्य.

भाषणाचे व मतप्रदर्शनाचे स्वातंत्र्य–घटनेने भारतीय नागरिकांना भाषण करण्याचे, मतप्रदर्शन करण्याचे, विचार प्रकट करणे, लेखन, मुद्रण यांच्या स्वातंत्र्याचे हक्क दिले आहेत.

शांततेने व शस्त्र न बाळगता एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य–आपले विचार, मते प्रकट करण्यासाठी एकत्रित जमत असताना, तसेच सभा, बैठका, संमेलन भरवीत असताना कोणतेही शस्त्र न बाळगता एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य राज्यघटनेने सर्व नागरिकांना दिले आहेत.

संस्था किंवा संघ स्थापन करण्याचे स्वातंत्र्य–भारतीय राज्यघटनेने प्रत्येकाला संस्था व संघ स्थापन करण्याचा अधिकार दिला आहे. यामध्ये सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, औद्योगिक, राजकीय इत्यादी संस्था व संघटनांचा समावेश होतो.

भारतामध्ये सर्वत्र संचार करण्याचे स्वातंत्र्य–भारतीय नागरिकांना भारतामध्ये सर्वत्र संचार करण्याचे स्वातंत्र्य या हक्कानुसार देण्यात आले आहे.

भारताच्या प्रदेशात कोठेही वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य–भारतीय नागरिकांना भारतामध्ये कोणत्याही प्रदेशात आपल्या ईच्छेनुसार तात्पुरते किंवा कायमचे वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. उदा. भारतातील कोणतीही व्यक्ती व्यापार, नोकरी, व्यवसाय, शिक्षण, पर्यटन इत्यादींसाठी भारतात कोणत्याही प्रदेशात वास्तव्य करु शकते.

व्यवसाय, रोजगार, व्यापार करण्याचे स्वातंत्र्य–भारतामध्ये प्रत्येक नागरिकाला स्वतःच्या इच्छेनुसार व आवडीनुसार उद्योग–व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे.

भारतीय नागरिकास कलम १९ मध्ये स्वातंत्र्याचे जे सहा हक्क देण्यात आले आहेत, त्या हक्कांच्या संरक्षणाची तरतूद कलम २०, २१ व २२ मध्ये करण्यात आली आहे.

३. **शोषणाविरुद्धचा हक्क ( Rights against Exploitation )** (कलम २३ ते २४)

भारतीय राज्यघटनेमध्ये शोषणाविरुद्धचा हक्क कलम २३ व २४ नुसार देण्यात आला आहे.

कलम २३ नुसार,माणसांची विक्री, वेठबिगारी यासारख्या अपव्यापारास मनाई करण्यात आली आहे. घटनेतील वरील तरतुदींनुसार गुलामगिरी, वेठबिगारी इत्यादींमधून होणाऱ्या शोषणापासून संरक्षण मिळाले आहे. परंतु सार्वजनिक कार्यासाठी कोणताही भेदभाव न करता राज्य हे आपल्या नागरिकांकडून सक्तीने काम करून घेऊ शकते. उदा. महापूर, भूकंप अशा परिस्थितीमध्ये नागरिकांना संरक्षण देण्यासाठी इत्यादी.

कलम २४ यामधील तरतुदीनुसार, १४ वर्षाखालील कोणत्याही मुलांना कारखान्यात, खाणीमध्ये किंवा अन्य कोणत्याही धोक्याच्या ठिकाणी कामावर ठेवण्यास मनाई करण्यात आली आहे.

भारतीय राज्यघटने शोषणाविरुद्ध चे अधिकार (कलम २३ व २४ ) कल्याणकारी आणि समतेचे राज्य निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण आहेत.

४. **धार्मिकस्वातंत्र्याचा हक्क (Rights to Freedom of Religion)** (कलम २५ ते २८)

भारतीय राज्यघटनेमध्ये धार्मिक स्वातंत्र्य विषयक तरतुदी कलम २५ ते २८ मध्ये दिलेल्या आहेत.

कलम २५ नुसार, प्रत्येकास आपल्या धर्माचे आचरण, पालन आणि प्रचार करण्याचे स्वातंत्र्य आहे. तसेच धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार आहे. परंतु, सार्वजनिक व्यवस्थेसाठी सरकार धार्मिक स्वातंत्र्यावर मर्यादा घालू शकते.

कलम २६ नुसार,भारतीय नागरिकांना धार्मिक संस्था स्थापन करणे आणि चालविणे, कायद्यानुसार स्थावर व जंगम संपत्तीची मालकी आणि कारभार पाहण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

कलम २८ नुसार, सरकारी शिक्षणसंस्थांमध्ये कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही. भारतीय राज्यघटनेनुसार भारतीय नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य मिळाले असले तरीही, भारताने धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व स्वीकारलेले आहे. त्यानुसार कोणताही विशिष्ट धर्म हा राष्ट्राचा धर्म मानलेला नाही.

५. **सांस्कृतिक आणि शैक्षणिक अधिकार (Cultural and Educational rights)** (कलम २९ ते ३०)

भारतीय राज्यघटनेमध्ये सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्कांबाबतचे स्पष्टीकरण कलम २९ आणि ३० नुसार देण्यात आले आहे.

कलम २९ नुसार, भारतीय प्रदेशात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या कोणत्याही नागरिक समूहाला स्वतःची स्वतंत्र भाषा, लिपी, संस्कृती जतन करण्याचा हक्क असेल. तसेच धर्म, वंश, जात, लिंग या कारणांवरून कोणत्याही नागरिकास शिक्षणसंस्थांमधील प्रवेश नाकारता येणार नाही.

कलम ३० नुसार, सर्व प्रकारच्या अल्पसंख्यांक वर्गांना त्यांच्या पसंतीप्रमाणे शिक्षणसंस्था स्थापन करणे आणि चालविण्याचा हक्क प्राप्त झाला आहे.

**६. घटनात्मक उपायांचा हक्क ( सनदशीर उपायांचा हक्क) (Rights to Constitutional Remedies)** (कलम ३२ ते ३५) -

घटनात्मक उपायांमुळे भारतीय नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण केले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, 'घटनात्मक उपाययोजनेचा अधिकार हा राज्यघटनेचा आत्मा आणि हृदय आहे.'

भारतीय राज्यघटनेनुसार, नागरिकांना दिलेल्या अधिकारांची योग्य अंमलबजावणी आणि संरक्षणासाठी न्यायालयाकडे दाद मागता येते. अशावेळी न्यायालयाला पुढील पाच प्रकारानुसार आदेश काढता येतात.

* बंदी प्रत्यक्षीकरण
* परमादेश
* प्रतिषेध (बंदी हुकूम)
* अधिकार पृच्छा
* उत्प्रेषण

**बंदी प्रत्यक्षीकरण-**

यानुसार, कोणत्याही अटक झालेल्या व्यक्तीला २४ तासांच्या आत न्यायालयात हजर करून त्याचा अटकेचे कारण द्यावे लागते. कोणत्याही व्यक्तीस जर बेकायदेशीररीत्या अटक केली असल्यास, त्या व्यक्तीला न्यायालयाकडे घटनात्मक अर्ज करता येतो. यालाच बंदी प्रत्यक्षीकरणचा अधिकार असे म्हणतात.

**परमादेश -**

एखाद्या सरकारी अधिकाऱ्याने कर्तव्याचे पालन न केल्यामुळे एखाद्या व्यक्तीवर अन्याय होत असेल, तर

अशा वेळी मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी ती व्यक्ती न्यायालयाकडे अर्ज करू शकते. अशावेळी न्यायालयाकडून अन्याय करणाऱ्या अधिकाऱ्याला त्या व्यक्ती वरील अन्याय नाहीसा करण्याबाबतचे आदेश देण्यात येतात यालाच परमादेश असे म्हणतात.

**प्रतिषेध ( बंदी हुकूम) –**

एखादा खटला कनिष्ठ न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रामध्ये येत नसेल, तरीही तो खटला कनिष्ठ न्यायालयात चालू असेल, तर अशा खटल्याचे कामकाज थांबविण्यासाठी उच्च न्यायालयाकडे अर्ज करता येतो. असा अर्ज मंजूर झाला तर, कनिष्ठ न्यायालयातील खटल्याचे कामकाज उच्च न्यायालय थांबवू शकते.

**अधिकार पृच्छा –**

एखादी व्यक्ती अधिकार नसताना शासकीय पद भूषवित असेल त्यावेळी अशा व्यक्ती विरुद्ध न्यायालयात अर्ज करता येतो. मात्र अशावेळी अर्जदाराचा हितसंबंध त्या पदाशी असणे आवश्यक आहे.

**उत्प्रेषण–**

एखादा खटला कनिष्ठ न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात नसताना कनिष्ठ न्यायालयामध्येच सुरू असेल, तर उच्च न्यायालय कनिष्ठ न्यायालयास आदेश काढून त्या खटल्याचे सर्व पुरावे, कागदपत्रे उच्च न्यायालयाकडे पाठविण्याबाबत आज्ञा करते.

**स्वयं अध्ययन प्रश्न – १**

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. संयुक्त राष्ट्र संघाने मानवी हक्कांचा जाहीरनामा कोणत्या साली प्रकाशित केला?

२. मानवी हक्काबाबतचा पहिला दस्तऐवज कोणता आहे?

३. भारतीय राज्यघटनेमध्ये कलम १४ ते १८ मध्ये नागरिकांना कोणता अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे?

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेमधील कोणत्या अधिकारास राज्यघटनेचा आत्मा आणि हृदय आहे असे म्हटले?

५. भारतामध्ये भारतामध्ये राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना कोणत्या साली झाली?

**सारांश :**

थोडक्यात, व्यक्तिविकास आणि समाजविकास लक्षात घेऊन, व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर आणि अधिकारांवर मर्यादित स्वरूपाची बंधनेही घालण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांना मूलभूत अधिकार प्राप्त होण्यासाठीची हमी दिली आहे. इतर देशांच्या राज्यघटनेची तुलना करता भारतीय राज्यघटनेने आपल्या नागरिकांना मानवी हक्क बाबतचे संरक्षण अधिक प्रमाणात दिलेले दिसून येते.

## ४.३.२ सायबर गुन्हा: अर्थ, सायबर गुन्ह्यांची कारणे आणि सायबर गुन्ह्यांवरील उपाय.

## (Cyber Crime: Meaning, Causes and Remedies)

माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये संगणक, मोबाईल, इंटरनेट, विविध सॉफ्टवेअर्स आणि ॲप्लिकेशन्स, ऑनलाइन सेवा-सुविधा इत्यादींचा वापर वाढत गेला. या सर्वाचा सकारात्मक परिणामही दिसून आला. लोकांना एकाच ठिकाणावरून आपली जास्तीत-जास्त कामे संगणक आणि इंटरनेटचा वापराने करता येऊ लागली. उदाहरणार्थ.-ऑनलाइन शॉपिंग, ऑनलाइन गेम्स, ई लर्निंग, ऑनलाइन बँकिंग, ऑनलाइन स्टडी, ऑनलाईन एक्झाम, ऑनलाइन सर्फिंग, ऑनलाइन बिल पेमेंट इत्यादी. या सर्व सुविधांमुळे वेळ, पैसा आणि श्रमामध्ये बचतही झाली. परंतु काही नकारात्मक परिणामही दिसून आले. त्यामध्ये सायबर गुन्हा एक महत्त्वपूर्ण सामाजिक समस्या म्हणून पुढे येत आहे. प्रत्येक समाजात प्रचलित असणारा कायदा आणि मूल्य यांच्या विरुद्धचे वर्तन म्हणजे गुन्हा होय. ज्या प्रकारचे कृत्य मानवतेच्या आणि मानवी समाजाच्या विरुद्ध असते, त्याला आपण गुन्हा म्हणू शकतो. गुन्हा ही संकल्पना स्थळ कालसापेक्ष असते. प्रत्येक समाजात नैतिक आणि सामाजिक मूल्यांमध्ये काही प्रमाणात विविधता दिसून येते. गुन्हे शास्त्रामध्ये गुन्हा, गुन्हेगार आणि गुन्हेगारी इत्यादींचा सखोल अभ्यास केला जातो. गुन्हा करणाऱ्याकडून गुन्ह्याला बळी पडलेल्या व्यक्तीवर अन्याय झालेला असतो म्हणून गुन्हेगाराला शिक्षा होणे क्रमप्राप्त ठरते.

सायबर गुन्ह्यांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. यावेळी तंत्रज्ञान हे माध्यम म्हणून वापरले जाते. तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे, गुन्हा करणारी व्यक्ती, म्हणजेच गुन्हेगार तंत्रज्ञानाचा आधार घेऊन आपल्या प्रत्यक्ष उपस्थिती शिवाय गुन्हा अडवून आणत असते.

सद्यस्थितीमध्ये संपूर्ण समाज व्यवस्थेसाठी इंटरनेटचा वापर अनिवार्य झाला आहे. प्रत्येक व्यक्ती संगणक, लॅपटॉप, मोबाइल किंवा अन्य इलेक्ट्रॉनिक डिवाइस इत्यादींच्या माध्यमातून इंटरनेटचा वापर करून जगासोबत जोडलेला आहे. खाजगी, सहकारी, सरकारी क्षेत्र यामध्येही संगणक इंटरनेटचा वापर अनिवार्य होत चालला आहे. सायबर गुन्ह्याचे नवीन प्रकार समोर येत आहेत. अशा सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी प्रत्येकाने दक्षता घेणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीमध्ये जगासोबतच भारतामध्ये सायबर गुन्हेगारी ही एक महत्वाची सामाजिक समस्या बनली आहे. सायबर गुन्हेगारीचा नकारात्मक परिणाम समाजावर होत आहे. म्हणून सायबर गुन्ह्याचा अर्थ समजून घेणे, सायबर गुन्ह्यांची कारणे आणि त्यावरील उपाय इत्यादींचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते.

### सायबर गुन्हा – व्याख्या व अर्थ :

संगणक, इंटरनेट किंवा इलेक्ट्रॉनिक साधनाचा माध्यम म्हणून वापर करून केलेला गुन्हा म्हणजे सायबर गुन्हा होय. सायबर गुन्हे करणाऱ्या व्यक्तींना सायबर गुन्हेगार असे म्हणतात. सायबर गुन्ह्यांमध्ये संगणकाचा माध्यम म्हणून वापर केला जाऊ शकतो तसेच संगणकाला लक्ष्य (-TT-CK) म्हणूनही वापरले जाऊ शकते.

१. ज्या प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये प्रत्यक्ष उपस्थित न राहता गुन्हेगारांकडून संगणक, मोबाईल, इंटरनेट इत्यादींचा माध्यम म्हणून वापर केला जातो आणि गुन्हा केला जातो, त्याला सायबर गुन्हा असे म्हणतात.

२. सायबर गुन्हा म्हणजे असा गुन्हा की, ज्यामध्ये संगणक इंटरनेटचा वापर करून बेकायदेशीर कृत्य केले जाते उदा. हॅकिंग, ऑनलाइन चोरी, ऑनलाईन फसवणूक करणे, बदनामी करणे माहिती ची अदलाबदल करणे इत्यादी.

३. सायबर गुन्हा म्हणजे गुन्हेगार आपली ओळख लपवून किंवा बनावट ओळख तयार करून इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर करून गुन्हा करतो.

४. सायबर गुन्हा म्हणजे असे बेकायदेशीर कृत्य, की ज्यामध्ये संगणकाचा साधन म्हणून, लक्ष्य म्हणून किंवा साधन आणि लक्ष्य दोन्ही म्हणून वापर केला जातो.

वरील व्याख्यावरून सायबर गुन्ह्याचा अर्थ पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**सायबर गुन्ह्यांमध्ये...**

सायबर तंत्रज्ञान, संगणक, इंटरनेट इत्यादींचा माध्यम म्हणून वापर केला जातो, तसेच लक्ष्य म्हणूनही वापर केला जातो.

गुन्हेगार हा गुन्ह्याच्या ठिकाणी अप्रत्यक्षरीत्या उपस्थित असतो.

गुन्हेगार आपली ओळख लपवितो किंवा आपली बनावट ओळख निर्माण करतो.

सोशल मीडियाचा माध्यम म्हणून वापर केला जाऊ शकतो.

गोपनीय माहितीची चोरी, आदला-बदल, अश्लील मजकूर पसरविणे, बेकायदेशीर कृत्य करणे, पैसे चोरी, बदनामी इत्यादींसाठी संगणकाचा वापर केला जातो.

**सायबर गुन्ह्याचे प्रकार :**

माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर झाला. सुरुवातीला फक्त गोपनीय माहितीची चोरी करणे किंवा माहितीची अदलाबदल करणे इत्यादीपर्यंत मर्यादित असणारी सायबर गुन्ह्यांची व्याप्ती वाढत चालली आहे उदाहरणार्थ- हॅकिंग, सोशल मीडियाच्या माध्यमातून एखादी व्यक्ती, संस्था, समूहाची बदनामी करणे, ऑनलाईन चोरी करणे इत्यादींचा समावेश सायबर गुन्ह्यांमध्ये झालेला आहे. सायबर गुन्ह्यांचे प्रकार आपणास पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील. यामध्ये प्रामुख्याने आर्थिक, फसवणूक व्यवसायविषयक फसवणूक, सोशियल मीडियाशी संबंधित फसवणूक इत्यादींचा समावेश होतो.

**१. हॅकिंग (Hacking) :**

संगणक किंवा इतर इलेक्ट्रॉनिक सिस्टम मध्ये बेकायदेशीररित्या केलेला प्रवेश म्हणजे हॅकिंग होय.

ज्या व्यक्तीकडून संगणकाच्या सिस्टम मध्ये अनधिकृत प्रवेश केला जातो त्या व्यक्तीला हॅकर असे

म्हणतात. हॅकिंगचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात. नैतिक हॅकिंग आणि अनैतिक हॅकिंग.
नैतिक हॅकिंग हे सरकारी मदत किंवा विविध गुन्हे उघडकीस आणण्यासाठी केले जाते.

अनैतिक हॅकिंग हे एखाद्या संगणकामधील माहिती चोरणे, माहितीची अदलाबदल करणे, माहिती लपविणे, मिळालेल्या माहितीचा गैरवापर करणे या उद्देशाने केले जाते. उदाहरणार्थ-ऑनलाइन बँकिंग संबंधित लॉग इन आयडी आणि पासवर्ड चोरी करणे इत्यादी.

**२. बाललैंगिक अपमानास्पद सामग्री (Child Sexually Abusive Material) (CS-M²):**

बालअत्याचार किंवा बालअश्लीलतेशी संबंधित सामग्रीचा (छायाचित्रे, चित्रफित) प्रसार करणे हा एक प्रकारचा सायबर गुन्हा आहे. आय.टी. कायद्याच्या कलम ६७ (ब) नुसार, बालकांसंबंधित अश्लील सामग्री इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्रकाशित करणे, प्रसारित करणे शिक्षेस पात्र आहे.

**३. सायबर छळ/ सायबर बुलिंग – (Cyber Bullying)**

संगणक, लॅपटॉप, मोबाईल इत्यादींसारख्या इलेक्ट्रॉनिक किंवा संप्रेषण साधनांच्या माध्यमातून एखादी व्यक्ती किंवा समूहाला संस्थेला त्रास देणे, छळ करणे.

**४. सायबर स्टॉकिंग/ पाठलाग करणे – (Cyber Stalking)**

सायबर स्टॉकिंग म्हणजे समोरील व्यक्तीची इच्छा, होकार नसतानादेखील इलेक्ट्रॉनिक माध्यमातून त्या व्यक्तीशी संवाद साधण्याचा प्रयत्न करणे, त्या व्यक्तीचे अनुसरण करणे. उदा. इंटरनेट, ई-मेल,सोशल मीडियाच्या माध्यमातून अनधिकृत संदेश पाठविणे, त्रास देणे इत्यादी.

**५. ऑनलाइन रोजगार विषयक फसवणूक (Online Job Fraud)**

यामध्ये रोजगाराची आवश्यकता असणाऱ्या गरजू लोकांना जास्त पगार आणि चांगल्या रोजगाराची खोटी हमी किंवा आश्वासन देऊन फसविण्याचा प्रयत्न केला जातो. यामध्ये खोटी वेबसाईट तयार करून नोकरी, रोजगाराचे आमिष दाखवून ऑनलाईन फसवणूक केली जाते.

**६. फिशिंग – (Phishing)**

या प्रकारामध्ये एखाद्या व्यक्तीकडून फोन कॉलद्वारे ग्राहक आयडी, बँकेचा अकाउंट नंबर, एटीएम कार्ड वरील नंबर, एटीएम कार्डचा पिन, कार्ड समाप्तीची तारीख, सिव्हिव्हि नंबर, ओटीपी इत्यादी प्रकारची वैयक्तिक आणि गोपनीय माहिती विविध प्रकारचे आमिष दाखवून काढून घेतली जाते आणि त्या माहितीचा वापर बँक खात्यांमधील पैसे चोरीसाठी वापरला जातो.

उदा. आपणास ऑनलाईन लॉटरी लागली आहे. आपल्या अकाउंटवर पैसे ट्रान्सफर करण्यासाठी आपला अकाउंट नंबर,बँकेचा अकाउंट नंबर, एटीएम कार्ड वरील नंबर, एटीएम चा पिन, कार्ड समाप्तीची तारीख, सिव्हिव्हि नंबर, ओटीपी इत्यादी प्रकारची माहितीची मागणी केली जाते. थोड्या वेळानंतर, बँकेतील पैसे कट झाल्याचा संदेश आल्यानंतर सदरचा फोन कॉल हा फसवणुकी संदर्भातील होता तसे लक्षात येते.

काही वेळा फोन कॉलद्वारे बँकेतून बोलत आहे असे भासवून एखाद्या व्यक्तीकडून एटीएम कार्ड अपडेट करण्यासाठी माहितीची विचारणा केली जाते आणि गोपनीय माहिती घेऊन गैरवापर केला जातो. त्यामुळे अशा प्रकारची कोणतीही वैयक्तिक आणि गोपनीय माहिती कोणत्याही परिस्थितीत फोनवरून अनोळखी व्यक्तीला सांगू नये. यासोबतच जाणीव-जागृती म्हणून बँक सुद्धा आपल्या ग्राहकांना आपला इंटरनेट बँकिंगचा पासवर्ड किंवा ओटीपी कोणासोबतही शेअर करू नये असा सल्ला वारंवार देत असते.

**७. बनावट अकाऊंट तयार करणे – (Identity Theft)**

हा सुद्धा एक सायबर गुन्हा आहे. सायबर गुन्हेगारीच्या या प्रकारांमध्ये आपली स्वतःची ओळख लपविली जाते आणि बनावट ओळख तयार करून फसवणूक केली जाते. विशेषतः सोशल मीडियावर बनावट अकाऊंट तयार करून समोरील व्यक्तीची दिशाभूल करणे छळ करणे दबाव आणणे इत्यादी गोष्टी केल्या जातात. काहीवेळा एखाद्या व्यक्तीचे बनावट अकाऊंट तयार केले जाते आणि बेकायदेशीर रित्या चुकीच्या माहितीचा प्रसार केला जातो. त्यामुळे ती व्यक्ती, समूह, समाजामध्ये तेढ निर्माण होऊ शकते.

**८. रॅन्सवेअर– (Ransomware)**

रॅन्सवेअर हा संगणक मालवेअरचा एक प्रकार आहे की, जो संगणक, लॅपटॉप, इत्यादीमध्ये विनापरवाना प्रवेश करतो आणि साठविलेली अत्यंत महत्त्वपूर्ण अशी माहिती, फाइल्स, स्टोरेज, मीडिया, डेटा इत्यादी हॅक करतो, लपवितो. हा सर्व डेटा पुन्हा मिळविण्यासाठी गुन्हेगारांकडून वापरकर्त्यास मागणी केलेली खंडणी भरण्यास सांगितले जाते.

**९. माहितीची चोरी करणे – (Data Thief)**

एखादा संगणक किंवा अन्य इलेक्ट्रॉनिक साधनांमधील माहितीची वापरकर्त्याला न माहिती होता गोपनीयपद्धतीने चोरी करणे. पेन ड्राईव्ह किंवा अन्य साधनाचा वापर करून संगणकाच्या सिस्टम मधील माहिती चोरी करणे इत्यादींचा समावेश यामध्ये होतो.

**१०. व्हायरस अटॅक – (Virus Attack)**

संगणक, मोबाईल किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांच्या सिस्टम मध्ये इंटरनेट, ई-मेल किंवा अन्य माध्यमा मधून वायरस पाठविला जातो आणि त्या सिस्टमवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. काहीवेळा त्या सिस्टम मध्ये बिघाड निर्माण केला जातो. सिस्टम वरील माहिती (डेटा) ला नुकसान पोहोचविले जाते.

व्हायरस हा एक प्रोग्रॅम आहे, जो संगणकाच्या सिस्टमला नुकसान पोहोचविण्यासाठी तयार केलेला असतो. ट्रॉजन हासुद्धा एक विध्वंसक प्रोग्रॅम आहे. हा प्रोग्रॅम संगणकाच्या सिस्टम मध्ये प्रवेश करतो आणि संगणकावरील बॅकडोअर एन्ट्रीज उघडल्या जातात. ज्यामुळे संगणकाच्या सिस्टम मध्ये इतर वापरकर्ता, प्रोग्रॅमला प्रवेश मिळतो आणि वैयक्तिक, गोपनीय माहितीची चोरी होऊ शकते तसेच आपल्या संगणकाच्या सिस्टमवर सायबर गुन्हेगार नियंत्रण मिळवू शकतो.

**सायबर गुन्ह्याची कारणे (Causes of Cyber Crime)**

सद्यस्थितीमध्ये प्रत्येक क्षेत्रामध्ये डिजिटलायझेशनचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्याचप्रमाणे उपलब्ध असणाऱ्या तंत्रज्ञानाचा वापर करून व्यक्ती विकास व समाज विकास साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु सायबर गुन्हा ही समाजाच्या विकासात एक अडथळा बनत आहे. तंत्रज्ञानाचा गैरवापर करून सायबर गुन्हा केला जातो. सायबर गुन्हा ही एक महत्त्वपूर्ण सामाजिक समस्या बनत चालली आहे. सायबर गुन्हामुळे ऑनलाइन सुरक्षिततेला बाधा पोहोचते म्हणून सायबर गुन्हे घडण्यामागील कारणांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

सायबर गुन्ह्याची कारणे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१. गुन्हेगाराला ओळख लपविता येणे शक्य आहे–**

सायबर क्राईमसाठी, गुन्हा करणाऱ्याला जगाच्या कोणत्याही ठिकाणावरून इंटरनेट संगणकाच्या माध्यमातून सायबर गुन्हा करता येतो. तसेच यावेळी गुन्हेगाराला गुन्हा घडण्याच्या ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहावे लागत नाही. तसेच स्वतःची ओळख लपवून बनावट अकाऊंट किंवा प्रोफाईल वरून गुन्हा केला जाऊ शकतो. अशा वेळी गुन्हेगारांना पकडणे कठीण बनते. उदाहरणार्थ–सोशल मीडियावर बनावट अकाउंट तयार करणे आणि त्या बेकायदेशीर वापर करणे इत्यादी.

**२. असुरक्षित संगणक सिस्टम –**

संगणक मोबाईल किंवा अन्य इलेक्ट्रॉनिक साधनाचा वापर करणाऱ्या व्यक्तीकडून अशा साधनाची योग्य ती काळजी न घेतल्यास त्या संबंधित असणारी सुरक्षितता धोक्यात येते. त्याचप्रमाणे अशा असुरक्षित सिस्टम वरती सायबर गुन्हेगारांकडून नियंत्रण मिळविणे किंवा सिस्टम मध्ये प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. त्यामुळे वापरकर्त्याचा आपल्या इलेक्ट्रॉनिक साधनाबाबतचा निष्काळजीपणा सायबर गुन्हेगारांसाठी संधी निर्माण करतो. उदा. आपल्या संगणकाची सिस्टम अपडेट न ठेवणे धोक्याचे ठरू शकते. तसेच आपल्या सिस्टमचा पासवर्ड गोपनीय न ठेवणे, सोपे सांकेतिक पासवर्ड वापरणे असुरक्षित ठरू शकते.

**३. अपुरी माहिती, प्रशिक्षण नसणे –**

वापरकर्त्याला संगणक, मोबाईल, सिस्टम आणि विविध ॲप्लिकेशन इत्यादी वापरासंबंधी असणारी माहिती अपुरी असणे. तसेच अशा प्रकारच्या सिस्टम आणि विविध ॲप्लिकेशन कसे हाताळावेत. याबाबत प्रशिक्षण न घेता वापरकर्ता त्याचा वापर करतो. अशा वेळी काही चुका होऊ शकतात.

उदाहरणार्थ– ऑनलाइन व्यवहारासाठी एखाद्या बँकेचे ऑनलाइन एप्लीकेशन वापरकर्ता डाउनलोड करतो. परंतु युजर आयडी आणि पासवर्ड हा गोपनीय ठेवावा लागतो. याबाबतीत वापरकर्ता जागरूक नसेल, तर सायबर गुन्हेगार त्याचा गैरवापर करू शकतात. अनेक वेळा वापरकर्ता आपल्या सिस्टीमवर एखादे ॲप्लिकेशन डाउनलोड करतो. अशावेळी ॲप्लिकेशन चा निर्माता सदर ॲप्लिकेशन वापराची काही नियम आणि अटी, शर्ती (Terms and Conditions) सादर करतो. परंतु वापर करता या सर्वांचे वाचन न करता किंवा समजून न घेता त्यामधील आय ॲग्री (I - GREE) मी सहमत आहे. हा पर्याय निवडतो. यावेळी वापरकर्त्यांच्या संगणकावरील

मोबाईल वरील डेटा, कॉन्टॅक्ट, स्टोरेज, इमेज, फाईल अशा सर्व प्रकारची माहिती धोक्यामध्ये येऊ शकते.

**४. पुरावा नष्ट करणे सुलभ –**

सायबर गुन्हेगार एखादा गुन्हा केल्यानंतर त्या गुन्ह्याशी संबंधित सर्व माहिती इलेक्ट्रॉनिक सिस्टम, संगणकावरून नष्ट किंवा डिलीट करण्याचा प्रयत्न करतात. तसेच बनावट अकाउंट वापरून असा गुन्हा केला असेल, तर अशा गुन्हेगारांना पकडणे अवघड असते. सायबर गुन्हा वेळी सोशल मीडियामधील फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, इमेल वर बनावट अकाउंट तयार केली जाऊ शकतात आणि त्याचा वापर सायबर गुन्ह्यांसाठी केला जाऊ शकतो.

**५. द्वेषभावना –**

सायबर गुन्हा करण्या पाठीमागे द्वेषभावना हे सुद्धा कारण असू शकते. एखादी व्यक्ती, समूह किंवा संस्थेबाबत द्वेषभावना बाळगून चुकीची माहिती, अफवा पसरवून बदनामी करण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच यातून समाजात दुफळी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.

थोडक्यात वरीलप्रमाणे सायबर गुन्ह्यांची कारणे स्पष्ट करता येतील. या कारणांचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी प्रत्येकाने जागरूक असणे आवश्यक आहे. तसेच आपल्या इलेक्ट्रॉनिक साधनासंबंधीची पूर्ण माहिती घेऊन त्याचा वापर करणे आवश्यक आहे.

मानव आपल्या गरजांच्या पूर्तीसाठी तंत्रज्ञानावर जास्तीत – जास्त अवलंबून आहे. कारण सर्व ऑनलाईन सेवा सहज उपलब्ध होत आहेत. उदाहरणार्थ ऑनलाईन खरेदी, ऑनलाईन गेमिंग, ऑनलाईन लर्निंग, सोशल नेटवर्किंग, ऑनलाइन जॉब, ऑनलाइन बँकिंग, ऑनलाइन चॅटिंग, ऑनलाइन सर्फिंग या सर्व गोष्टी एकाच ठिकाणी बसून सर्वांना उपलब्ध होत आहेत. जगासोबत भारतामध्येही सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. या गुन्ह्यांमध्ये माहितीची बेकायदेशीररीत्या चोरी करणे, सिस्टीममध्ये व्हायरसचा शिरकाव करणे, बाललैंगिक सामग्रीचा प्रसार करणे, ऑनलाईन चोरी करणे इत्यादींचा समावेश होतो.

**सायबर गुन्ह्यांवरील उपाय ( Remedies On Cyber Crime )**

माहिती तंत्रज्ञानाचा वापर आपल्या दैनंदिन जीवनातील गरजांच्या पूर्तीसाठी आणि अत्यावश्यक सोयी-सुविधांसाठी करणे सद्यस्थितीत अनिवार्य ठरत आहे. सायबर गुन्ह्याची संकल्पना, प्रकार, कारणे अभ्यासल्यानंतर सायबर गुन्ह्यांवरील उपाय अभ्यासणे आवश्यक ठरते. भारत सरकारने याबाबत काही कायदेशीर उपायांचा अवलंब केला आहे. त्यासोबतच प्रत्येक व्यक्तीने स्वतः सायबर गुन्ह्यांला बळी पडू नये, यासंदर्भात दक्षता घेणे अत्यंत आवश्यक आहे. याबाबतचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे :

सायबर गुन्ह्यांबाबतच्या उपायांमध्ये कायदेशीर उपाय, प्रतिबंधात्मक उपाय आणि उपचारात्मक उपाय अशा प्रामुख्याने तीन प्रकारे करता येतील.

**अ) कायदेशीर उपाय**

माहिती तंत्रज्ञान कायदा २००० **(Information Twchnology Act - 2000)**

माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ (Information Technology Act- 2008)

राष्ट्रीय सायबर सुरक्षा नीति २०१३ (National Cyber Security Policy - 2013)

ब) प्रतिबंधात्मक उपाय

क) उपचारात्मक उपाय

कायदेशीर उपाय म्हणजे भारत सरकारने वेळोवेळी सायबर गुन्हेगारी नियंत्रणात आणण्यासाठी केलेले कायदे व त्यामधील तरतुदी इत्यादींचा समावेश होतो.

प्रतिबंधात्मक उपायमध्ये, सायबर गुन्हा घडण्यापूर्वी, सायबर गुन्हे घडू नये, सायबर गुन्ह्याला आपण बळी पडू नये, यासाठी घेण्यात आलेल्या काळजीचा, उपायांचा समावेश होतो.

उपचारात्मक उपायमध्ये, सायबर गुन्हा घडल्यानंतर त्या गुन्ह्यात बळी पडलेल्या व्यक्तीने आपल्यावर झालेला अन्याय दूर करण्यासाठी, आपले नुकसान भरून काढण्यासाठी त्वरित करावयाच्या उपायांचा समावेश होतो.

**अ) कायदेशीर उपाय**

कायदेशीर उपायांमध्ये भारत सरकारने वेळोवेळी सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी विविध कायदे केलेले आहे. तसेच त्यामध्ये वेळोवेळी दुरुस्त्याही सुचविण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार पुढील कायद्यांचा आपणास अभ्यास करता येईल.

**माहिती तंत्रज्ञान कायदा २००० (Information Technology Act 2000)**

माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे तसेच माहिती तंत्रज्ञानावरील अवलंबामुळे सायबर गुन्ह्यांमध्येही वाढ झाली. यामध्ये माहितीची चोरी, फसवणूक इत्यादी गुन्ह्यांचा समावेश होतो. माहिती तंत्रज्ञान संदर्भातील गुन्ह्यांसाठी स्वतंत्र कायदा निर्माण करण्याची आवश्यकता भासू लागली. म्हणून भारत सरकारने १७ ऑक्टोबर २००० पासून माहिती तंत्रज्ञान कायदा २००० लागू केला. या कायद्यामध्ये संगणक आणि इंटरनेटच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या सायबर गुन्ह्यांना शिक्षा देण्याची तरतूद करण्यात आली.

या कायद्यानुसार सायबर गुन्ह्यांच्या प्रकारानुसार शिक्षेची तरतूद पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

कलम **४३** नुसार, अन्य वापरकर्त्याच्या संगणकामध्ये अनधिकृतपणे प्रवेश करणे, यासाठी मनाई केली आहे.

कलम **६५** नुसार, संगणकातील डेटामध्ये अदला-बदल केल्यास, तीन वर्ष कारावास आणि दोन लाख रुपयांचा दंड अशा शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

कलम **६६** नुसार, संगणकावरील डेटा हॅक करण्याचा प्रयत्न केल्यास, तीन वर्षे कारावास आणि दोन लाख रुपये दंडाची तरतूद करण्यात आली आहे. तसेच संगणक किंवा इलेक्ट्रॉनिक डिवाइस मधून चोरी केलेल्या माहितीचा गैरवापर करणे. एखाद्याची संगणक वरील ओळख, पासवर्ड इत्यादींची चोरी करणे, त्याचप्रमाणे सायबर दहशतवाद्यांसाठी सुद्धा या कलमामध्ये शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे.

कलम ६७ नुसार, बालअश्लीलता ब्राउझ करणे, डाउनलोड करणे, तयार करणे, प्रकाशन करणे आणि वितरण करणे हा गुन्हा मानला आहे. यासाठी कारावास व पाच लाख रुपये दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.

कलम ७१ नुसार, संगणक, इंटरनेटचा वापर करून चुकीची माहिती प्रसारित केल्यास दोन वर्षे कारावास व एक लाख रुपये दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.

कलम ७२ नुसार, संगणकातील गोपनीय व वैयक्तिक माहितीला नुकसान केल्यास, दोन वर्षे कारावास व एक लाख रुपये दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.

कलम ७३ नुसार, एखाद्या अधिकाऱ्याची सहीची नक्कल केल्यास, दोन वर्षे कारावास आणि एक लाख रुपये दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.

**सुधारित माहिती तंत्रज्ञान कायदा–२००८ (Revised Information Technology Act-2008)**

माहिती तंत्रज्ञान कायदा २००० मधील असलेल्या काही त्रुटी आणि उणिवा दूर करून सुधारित माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ लागू करण्यात आला.

या कायद्यानुसार, महिलांच्या संदर्भातील अश्लील चित्रफिती दृष्ये प्रदर्शित करणे, त्यांचा प्रसार करणे, सोशल मीडियाच्या माध्यमातून त्रासदायक संदेश पाठविणे, महिलांचा अपमान करणे यासाठी तीन वर्षाच्या कारावासाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे.

**राष्ट्रीय सायबर सुरक्षा नीति – २०१३ (National Cyber Security Policy 2013)**

भारताने २ जुलै २०१३ मध्ये राष्ट्रीय सायबर सुरक्षा नीति लागू केली. या राष्ट्रीय सायबर सुरक्षा नीतीचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे सायबर हल्ल्यापासून बचाव करणे आणि सायबर सुरक्षा मजबूत करणे हा होय. या राष्ट्रीय सायबर सुरक्षा नीतीमुळे देशभरातील सायबर सुरक्षिततेचे संवर्धन केले जाईल.

थोडक्यात, सायबर गुन्हेगारी संदर्भातील भारतामधील कायदेशीर उपायचा अभ्यास आपणास वरीलप्रमाणे करता येईल. सायबर गुन्ह्यांच्या प्रकारानुसार या कायद्यांमध्ये वेळोवेळी बदल झालेले आपणास दिसून येतात.

**ब) प्रतिबंधात्मक उपाय –**

सायबर गुन्हा घडण्यापूर्वी, सायबर हल्ला होऊ नये किंवा सायबर हल्ल्याचा बळी होऊन यासाठी वापरकर्त्याने घ्यावयाच्या काळजीची यामध्ये समावेश होतो. यामधे वैयक्तिक तसेच सामाजिक जबाबदारीही जाणीव प्रत्येकाने ठेवली अत्यंत आवश्यक आहे.

**आपला संगणक, मोबाईल, इलेक्ट्रॉनिक डिवाइस वापर करत असताना घ्यावयाची दक्षता :**

१. आपण वापरत असलेला संगणक, मोबाईल इलेक्ट्रॉनिक साधन इत्यादींचा वापर कसा करावा याचे प्रशिक्षण किंवा पूर्ण माहिती आपल्याला असणे अत्यंत आवश्यक आहे.

२. आपला संगणक मोबाईल व इलेक्ट्रॉनिक डिवाइसला मजबूत (strong) पासवर्ड असावा.

३. नवीन सॉफ्टवेअर किंवा ॲप्लिकेशन डाऊनलोड, इन्स्टॉल करण्यापूर्वी त्या संबंधित सर्व नियम आणि अटी समजावून घेऊन सदर सॉफ्टवेअर किंवा ॲप्लिकेशन वापरावे. त्यामुळे आपल्याला सदर सॉफ्टवेअर वापराबाबतच्या मर्यादा कळतात.

४. आपल्या ऑपरेटिंग सिस्टम नेहमी अद्ययावत (अपडेटेड) ठेवावी.

५. व्हायरसपासून बचावासाठी अँटीव्हायरस सॉफ्टवेअर इन्स्टॉल करावे. तसेच वेळोवेळी अँटी-व्हायरस सॉफ्टवेअर अद्ययावत (अपडेट) करावे.

**सोशल मीडियाचा वापर करत असताना घ्यावयाची दक्षता :**

सोशल मीडियामध्ये फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर, व्हाट्सअप, टेलिग्राम, युट्युब इत्यादींचा समावेश होतो. या सर्वांचा वापर करत असताना पुढीलप्रमाणे दक्षता घेणे आवश्यक आहे.

१. आपल्या अकाउंट वरती कोणत्याही प्रकारची गोपनीय माहिती अपलोड करू नये.

२. आपल्या अकाउंटचा युजर आयडी आणि पासवर्ड गोपनीय ठेवावा.

३. कोणत्याही प्रकारचा आक्षेपार्ह संदेश किंवा पोस्ट सोशल मीडियावरती अपलोड, डाउनलोड किंवा फॉरवर्ड करू नये.

४. आपल्या सोशल मीडिया अकाउंटचा पासवर्ड ठराविक कालावधीनंतर बदलावा.

**ऑनलाइन बँकिंग करत असताना घ्यावयाची दक्षता :**

१. ऑनलाइन बँकिंग करण्या पूर्वी किंवा कोणताही ऑनलाईन व्यवहार करण्यापूर्वी संबंधित बँकेकडून ऑनलाइन व्यवहाराबाबत दिलेली तांत्रिक माहिती समजून घ्यावी. बँकेने पुरविले बुकलेट किंवा दिलेल्या सूचना तंतोतंत पाळाव्यात.

२. सार्वजनिक संगणकावर इंटरनेट बँकिंगचा वापर टाळावा. सायबर कॅफे इत्यादी. कोणत्याही ऑनलाइन आकर्षक आणि फसव्या जाहिरातींना बळी पडू नये.

३. इंटरनेट बँकिंग लॉगिन आयडी आणि पासवर्ड कोणासही शेअर करू नये. एखाद्या संगणकावरील आपला ऑनलाइन व्यवहार सुरू असताना पासवर्ड सेव्ह करू नये. रिमेंबर पासवर्ड हा पर्याय निष्क्रिय करावा. इंटरनेट बँकिंगचा व्यवहार पूर्ण झाल्यानंतर आपले अकाउंट लॉग आउट करावे. सर्वात शेवटी आपण वापरलेली ब्राउझिंग हिस्टरी आणि टेम्परारी फाइल्स डिलीट कराव्यात.

४. इंटरनेट बँकिंग करीत असताना आपल्याला आलेला ओटीपी कोणासोबतही शेअर करू नये.

५. आपल्याकडून अनधिकृत फोन कॉल द्वारे किंवा ईमेल द्वारे ओटीपी ची मागणी होत असेल तर ओटीपी न देता लगेच संबंधितांविरुद्ध पोलिसांमध्ये तक्रार करावी.

**एटीएम कार्ड क्रेडिट कार्ड डेबिट कार्ड वापराबाबतची दक्षता :**

१. कार्ड मिळाल्यानंतर बँकेने पुरविलेला पासवर्ड शक्य तितक्या लवकर बदलून घ्यावा आणि गोपनीय ठेवावा.

२. आपल्या कार्डचा अनुक्रमांक, कार्ड समाप्तीची तारीख, पिन नंबर, सीव्हीव्ही नंबर कोणासोबतही शेअर करू नका.

३. कार्डचा पिन नंबर म्हणून आपला मोबाईल क्रमांक, जन्मतारखेचे वर्ष, गाडीचा क्रमांक किंवा सहज ओळखता येईल असा सोपा क्रमांक ठेवू नये.

४. कोणतीही बँक आपल्या कोणत्याही ग्राहकाला कार्ड बाबतची माहिती किंवा कार्डचा पिन किंवा ओटीपी बाबतची माहितीची विचारत नाही. म्हणून अशा खोट्या फोन कॉल पासून सावध रहा.

५. कार्ड वापरण्यापूर्वी बँकेकडून कार्डवरील दैनंदिन व्यवहाराची मर्यादा निश्चित करून घ्या.

**पालकांनी घ्यावयाच्या दक्षता :**

१. ऑनलाइन जगता संदर्भात, सोशल मीडियाच्या जबाबदार वापरासंदर्भात आपल्या मुलांशी चर्चा करा, त्यांना शिक्षित करा, त्यांना मदत करा. इंटरनेट आणि ऑनलाइन गेम वापरत असताना गोपनीयता, मार्गदर्शक तत्वे सेट करा.

२. वापरत नसताना आपला वेब कॅमेरा झाकून (कव्हर) करून ठेवा.

३. आपल्या संगणकाची सिस्टम आणि अँटीव्हायरस अद्ययावत ठेवा.

**तरुणांनी घ्यावयाच्या दक्षता :**

१. आपल्या सोशल मीडिया अकाउंट वरील सेटिंग योग्य पद्धतीने निवडा, कारण आपण पोस्ट केलेले छायाचित्रे, संदेश आपल्या माहितीशिवाय वापरले जाऊ शकतात.

२. सोशल मीडिया वरती अनोळखी व्यक्तींची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नका.

३. सेटिंग मधून एखाद्या व्यक्तीला मित्रांच्या सूचीतून कसे काढावे (अनफ्रेंड), कसे ब्लॉक करावे, वापरानंतर सोशल मीडिया वेबसाइटवरून लॉग आउट कसे करावे या सर्व बाबींकडे लक्ष देणे आवश्य क आहे.

४. आपले बनावट खाते तयार झाल्याचे आपल्या लक्षात आल्यास, ताबडतोब सोशल मीडिया सेवा प्रदात्यास माहिती देऊ शकता जेणेकरून खाते अवरोधित केले जाऊ शकते.

५. बनावट सोशल मीडिया अकाउंट्सपासून सावध रहा. सर्व खाती खरी नाहीत आणि खात्यांवरील सर्व माहिती सत्य नाही

६. आपले मोबाइल डिव्हाइस, पीसी सर्व्हिसिंग / रिपेयरिंग / विक्रीसाठी देताना काळजी घ्या. वैयक्तिक प्रवासी आणि मोबाइल डिव्हाइसमध्ये खाजगी माहिती असते जी, ती दुरुस्ती, सर्व्हिसिंग किंवा विक्रीसाठी पाठविण्यापूर्वी खोडली जाणे आवश्यक असते.

**क) उपयोजनात्मक उपाययोजना –**

१. इंटरनेटवरती आपला अनधिकृत फोटो, आपल्याबाबतची अनधिकृत माहिती आढळून आल्यास याबाबत त्वरित कायदेशीर कार्यवाही करावी.

२. ऑनलाइन बँकिंग केल्यानंतर आपली फसवणूक झाली आहे, असे लक्षात आले तर त्वरित संबंधित बँकेशी संपर्क साधावा. तसेच कायदेशीर कार्यवाही करावी.

३. एटीएम, क्रेडिट, डेबिट कार्ड संदर्भात फसवणूक झाल्यास त्वरित बँकेशी संपर्क साधून आपले कार्ड ब्लॉक करावे.

४. बँकेचे संबंधित कोणतीही ऑनलाईन फसवणूक झाल्यास, एटीएम डेबिट, क्रेडिट कार्ड गेल्यास प्रत्येक बँकेने आपला हेल्पलाइन नंबर दिलेला आहे त्यावरती संपर्क साधावा.

५. सोशल मीडिया अकाउंट वरती आक्षेपार्ह पोस्ट किंवा अनधिकृत संदेश आढळल्यास अशी पोस्ट, माहिती किंवा संदेश डिलीट करण्यासाठीचे पर्याय प्रत्येक सोशल मीडिया त्या वेबसाईट वरती दिलेले असतात. या पर्यायांची माहिती करून घेणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ-फेसबुक, व्हाट्स-एप, इंस्टाग्राम अशा प्रकारच्या सोशल मीडिया वरती अपलोड केलेला मेसेज पोस्ट छायाचित्र डिलिट करण्याचा पर्याय उपलब्ध असतो. तसेच आपण पाठविलेला संदेश कोण पाहू शकते, याबाबतचेही विविध पर्याय सोशल मीडिया वेबसाईटवरती उपलब्ध असतात.

**राष्ट्रीय सायबर गुन्हा तक्रार पोर्टल (National Cyber Crime Reporting Portal)**

सायबर गुन्ह्यांच्या तक्रारी ऑनलाईन नोंदविण्यासाठी भारत सरकारने नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल (https://cybercrime.gov.in) तयार केलेले आहे. या पोर्टलवरती सायबर गुन्ह्याबाबत ऑनलाइन तक्रार नोंदविता येते. प्रामुख्याने महिलांच्या संदर्भातील सायबर गुन्हे, बाललैंगिक अत्याचार संदर्भातील साधनसामग्रीच्या ऑनलाइन प्रसारा संदर्भातील गुन्हे, सोशल मीडिया संदर्भातील गुन्हे, ऑनलाइन आर्थिक गुन्हे, ऑनलाइन सायबर तस्करी, ऑनलाइन आर्थिक फसवणूक, रॅन्समवेअर, हॅकिंग, क्रिप्टोकरन्सी गुन्हे इत्यादी.

तसेच या पोर्टल वरती प्रत्येक राज्याचे सायबर गुन्हे संदर्भातील राज्यानुसार नियुक्त असलेले नोडल सायबर सेल अधिकारी आणि तक्रार निवारण अधिकारी यांची माहिती दिलेली आहे. भारतात इंटरनेट बँकिंग संदर्भातील फसवणुकी संदर्भातील १७८५ तक्रारी /गुन्हे २०१७ मध्ये नोंदविले गेले.यामध्ये एकूण ७१.४८ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे आढळून येते.

**स्वयं अध्ययन प्रश्न – २**

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. सायबर गुन्हा म्हणजे काय?

२. सायबर गुन्ह्यांचे कोणतेही दोन प्रकार सांगा.

३. हॅकिंग म्हणजे काय?

४. व्हायरस म्हणजे काय?

५. भारतामध्ये सुधारित माहिती तंत्रज्ञान कायदा कोणत्या साली अस्तित्वात आला ?

## ४.४ सारांश

थोडक्यात, सायबर गुन्हेवरील विविध उपाय स्पष्ट केल्यानंतर आपणास असे दिसून येते, की सायबर गुन्ह्यांबाबत कायद्यामध्ये विविध तरतुदी असल्या, तरीही दिवसेंदिवस सायबर गुन्ह्यांचे नवनवीन प्रकार समोर येत आहेत. तसेच सायबर गुन्ह्यांच्या प्रमाणामध्येही सातत्याने वाढ होत आहे. या सायबर हल्लयाला बळी होऊ नये. यासाठी व्यक्तिगत आणि सामाजिक जबाबदारी ओळखून सायबर गुन्ह्यांबाबत जागरूक असणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या प्रत्येकाने जागरूकतेने तंत्रज्ञानाचा वापर केला , तर यापासून कोणताही धोका नाही.

इंटरनेटचा वापर सुरक्षितता आणि दक्षता बाळगून वापर करणे आवश्यक आहे. आज जगातील प्रत्येक क्षेत्र इंटरनेटने प्रभावित झालेली दिसून येते. सरकारी कार्यालय, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, बँकिंग क्षेत्र, व्यवसाय व रोजगार, व्यापार, दळणवळण, विविध खाजगी संस्था इत्यादींमध्ये इंटरनेटचा वापर अनिवार्य झाला आहे. तसेच मोबाईल, टॅबलेट इत्यादींच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीच्या हातामध्ये संपूर्ण जगाशी संपर्क साधता येईल असे साधन पोहोचले आहे. या वैयक्तिक वापराच्या मोबाईल, टॅबलेट, संगणक किंवा अन्य इलेक्ट्रॉनिक मध्यमा संदर्भातील सर्व सेटिंग आणि त्या इलेक्ट्रॉनिक साधनावर इंस्टॉल असणारी सर्व एप्लीकेशन याबाबत आपण जागरूक असणे आवश्यक आहे.

थोडक्यात, भारतीय समाजातील सामाजिक-वैधानिक समस्यांमध्ये सायबर गुन्हेगारी ही एक महत्त्वाची समस्या दिसून येते.

## ४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### स्वयं-अध्ययन प्रश्न - १

१. संयुक्त राष्ट्र संघाने मानवी हक्कांचा जाहीरनामा १९४८ साली प्रकाशित केला.

२. मानवी हक्काबाबतचा पहिला दस्तऐवज सायरस वृत्तचिती हा आहे.

३. भारतीय राज्यघटनेमध्ये कलम १४ ते १८ मध्ये नागरिकांना समतेचा अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेमधील घटनात्मक उपाययोजनेचा अधिकारास राज्यघटनेचा आत्मा आणि हृदय आहे असे म्हटले.

५. भारतामध्ये भारतामध्ये राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना १९९३ साली झाली.

**स्वयं-अध्ययन प्रश्न - २**

१. ज्या प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये प्रत्यक्ष उपस्थित न राहता गुन्हेगारांकडून संगणक, मोबाईल, इंटरनेट इत्यादींचा माध्यम म्हणून वापर केला जातो आणि गुन्हा केला जातो, त्याला सायबर गुन्हा असे म्हणतात.

२. हॅकिंग (Hacking), व्हायरस अटॅक **(Virus -ttack)** .

३. संगणक किंवा इतर इलेक्ट्रॉनिक सिस्टम मध्ये बेकायदेशीररित्या केलेला प्रवेश म्हणजे हॅकिंग होय.

४. व्हायरस हा एक प्रोग्रॅम आहे, जो संगणकाच्या सिस्टमला नुकसान पोहोचविण्यासाठी तयार केलेला असतो.

५. भारतामध्ये सुधारित माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ साली अस्तित्वात आला.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. मानवी हक्कांचा इतिहास विशद करा.

२. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क स्पष्ट करा.

३. सायबर गुन्हेगारीचा अर्थ आणि सायबर गुन्हेगारीची कारणे स्पष्ट करा.

४. सायबर गुन्हेगारी वरील उपाययोजना स्पष्ट करा.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ :


१. य. च. म. मु. वि. नाशिक, मानवी हक्कातील मूलभूत संकल्पना.

२. य. च. म. मु. वि. नाशिक, मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना.

३. य. च. म. मु. वि. नाशिक, मानवी हक्कांची ऐतिहासिक वाटचाल. २००९.

४. कुलकर्णी पी. के. (२०१३) 'मानवी हक्क आणि सामाजिक न्याय' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे


* * *

# घटक – १

# लिंगभाव आणि हिंसाचार

# ( Gender and Violence )

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

  १.२.१ लिंगभाव संकल्पनेचा अर्थ

  १.२.२ लिंगभाव हिंसाचार स्वरूप

  १.२.३ लिंगभाव विषयक प्रमुख समस्या

१.३ सारांश

१.४ स्वयंअध्यनासाठीचे प्रश्न

१.५ सरावासाठीचे प्रश्न

१.६ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्टे :

या अभ्यासानंतर आपणांस

१) लिंगभाव संकल्पना समजेल.

२) लिंगभावविषयक प्रमुख समस्या समजतील.

३) लिंगभावाचे स्वरूप समजेल.

## १.१ प्रस्तावना : (Introduction)

समाजशास्त्र हे एक सामाजिकशास्त्र असून याचा प्रमुख अभ्यासविषयक मानवाच्या सामाजिक संबंधाचा अभ्यास करणे आहे. मानवी सामाजिक संबंध हे वैविध्यपूर्ण असून लिंगभावविषयक संबंध हे या मानवी सामाजिक

संबंधाचा महत्त्वाचा गाभा आहे. परतु समाजशास्त्र विषयाच्या उद्यापासूनच लिंगभावविषयक संबंधाच्या अध्ययनाकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. तथापि अलिकडच्या काळात साधारणत: १९८० च्या दशकानंतर अनेक महिला अभ्यासकांनी बदलता काळाच्या गरजेनुसार विषयाचे गांभीर्य जाणुन रुचीपूर्ण अध्ययनाला सुरुवात केली. त्यामुळे लिंगभावविषयक अभ्यास हा सामाजिक शास्त्रे, मानव्यविद्या या ज्ञानशाखांतील महत्त्वाचा अभ्यासविषय बनत चालला आहे. तसेच या अध्यनामधून लिंगभाव भूमिका, लिंगभावविषयक संबंध तसेच भेदभाव, लिंगभावाशी संबंधीत समाजीकरण, सामाजिक स्तरीकरण याबरोबरच दैनंदिन जीवनात येत असलेल्या लिंगभावाशी संबंधीत समस्या सारखे अनेक कंगोरे या विषयाच्या अनुषंगाने निर्माण होत असेल.

मानवी समाज हा धर्म, जात वर्ण वंश, भाषा, पंथ, संप्रदाय यासारख्या बाबतीत वैविध्यपूर्ण असून समाजात याच्याआधारेच हिंसाचार घडून येत असतो. पण अलिकडच्या काळात असे हिंसाचार अनिष्ठ मानले जातात, अशा हिंसाचारांना दडपण्यासाठी काही कायदेदेखील पारित करण्यात आले आहेत. मानवी समाज जसा सार्वत्रिक आहे तसा हिंसाचार देखील कमी-अधिक प्रमाणात सर्वत्र पहायला मिळतो. मग तो जात, धर्म, वर्ण, वंश, भाषा, पंथ याबाबतीत घडुन येत असतो जसे की अमेरिका, आफ्रिका यासारख्या पाश्चात्य देशात काळा-गोरा असा वर्णभेद असून अशा वर्णभेदांमधून हिंसाचार घडून येत असतात. भारतात अस्पृश्य आणि संवर्ण यासारखे जातीयभेदावरुन, सांप्रदयिकतेवरुन हिंसाचार घडून येत असतात. या हिंसाचारासारखाच लिंगभावाच्या आधारे होणारा हिंसाचार हा विकसनशील देशातील समाजाबरोबरच विकसीत देशातील समाजात देखील होत असतो. असा हिंसाचार हा प्रामुख्याने पुरुषांकडून स्त्रियांच्याबाबतीत होताना दिसतो. स्त्रियांचे कार्यक्षेत्र आता पूर्वीसारखे कुटुंबापुरते मर्यादित राहिले नसून बहुआयामी बनत आहे. बदलत्या काळात हिंसाचाराचे स्वरुप देखील बदलत आहे. या अनुषंगाने स्त्रियांच्या बाबतीत होत असलेला हिंसाचार हा कुटुंबाबरोबरच कामाचे ठिकाण, सार्वजनिक ठिवकाणी होऊ लागला असून सध्या अशा हिंसाचाराच्या प्रमाणात वाढ होत आहे. दैनंदिन जीवनात स्त्रियांच्या बाबत विनयभंग, बलात्कार, लैंगिक शोषण यासारख्या समस्या वाढत आहेत. ही चिंतेची बाब आहे. येणाऱ्या भविष्यकाळात केवळ भारतीय अर्थव्यवस्थाच नव्हे तर संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेच्या प्रगतीसाठी स्त्रियांचे भरीव योगदान ठरणारे आहे. तसेच सकल मनुष्य जातीच्या अस्तित्वाच्या दृष्टिने महिलांचे महत्व अनन्यसाधारण आहे. परंतु लिंगभावाच्या आधारे होणाऱ्या हिंसाचारामुळे महिलांच्या समस्यांमध्ये वाढ होऊ लागली आहे. या दृष्टिने प्रस्तुत विषयाच्या वस्तुनिष्ठ अध्ययनातून या प्रकरणात आपण

१) लिंगभाविषयक संकल्पना अर्थ, व्याख्या,स्वरुप

२) लिंगभावविषयक हिंसाचाराचे प्रकार

३) लिंगभावविषयक प्रमुख मुद्दे इ. चा अभ्यास.

**१.२ विषय विवेचन :**

प्रस्तुत घटकात लिंगभाव संकल्पना अर्थ, व्याख्या आणि स्वरूप त्याचबरोबर, लिंगभावविषयक हिंसाचार

र्थि, स्वरूप आणि प्रमुख समस्या या विषयी तटस्थ आणि वैज्ञानिक दृष्टीकोनातून अध्ययन केले आहे. त्याचा सविस्तर आढावा इथे घेऊ.

### १.२.१ लिंगभाव संकल्पनेचा अर्थ :

**१) अँथोनी गिडिन्स –** लिंगभाव म्हणजे स्त्री–पुरुषामधील समाजाने, संस्कृतीने निर्माण केलेले भेद होय. यामध्ये स्त्रीत्वाशी तसेच पुरुषत्वाशी निगडीत असलेल्या पारंपारिक आणि मानसशास्त्रीय घटकांचाही समावेश होतो.

**२) जागतिक आरोग्य संघटना (WHO) :** लिंगभाव म्हणजे स्त्री–पुरुषांची समाजाने निर्माण केलेली वैशिष्ट्ये तसेच त्यांच्यासाठी योग्य मानलेल्या भूमिका, वर्तनप्रकार आणि नियमने यांचा संच होणे.

याबरोबरच लिंगभाव ही संज्ञा स्पष्ट करण्यासाठी पुढे दिलेल्या आणखीन काही मुद्यांचा समावेश समजून घेण्याच्या अनुषंगाने करता येईल.

**१) लिंगभाव म्हणजे स्त्री–पुरुषात समाजाने, संस्कृतीने निर्माण केलेले भेद :**

वस्तुत: स्त्री आणि पुरुष हे समाजाचे महत्त्वपूर्ण घटक आहेत. परंतु वर–वर पहाता या घटकांकडे समानतेच्या दृष्टिने पाहिले जाते. पण प्रत्यक्षात मात्र समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा पुरुषांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनापेक्षा भिन्न असतो. स्त्रियांची निसर्गत:च जैविक रचना, स्वभाव, त्यांनी करावयाची काम, वेशभुषा, केशरचना याबाबतची सामाजिक मते तसेच पुरुषांनी करावयाची कामं, वेशभुषा, केशरचना याबाबतची सामाजिक मते ही खुषच भिन्न असतात. स्त्री–पुरुषांतील हा सामाजिक आणि सांस्कृतिक भेद म्हणजेच लिंगभाव होय.

**२) लिंगभाव म्हणजे स्त्री–पुरुषांच्या वर्तनाबाबतच्या सामाजिक अपेक्षा :**

मानवी समाजात स्त्री–पुरुषांच्या वर्तनाबाबतच्या ठराविक सामाजिक अपेक्षा रुढ आहेत. जसे की,ख स्त्रियांनीच शृंगार करावा, लाजावे, स्वभावाने मृदू असावे, मृदू बोलावे, हसावे, अंगमेहनतीची कामे करु नयेत, तर याउलट पुरुषांनी लाजू नये, स्वभावाने कठोर असावे, धाडसी, शौर्य हे पुरुषांच्या अंगी असावे अशा स्त्री–पुरुषांकडून वर्तनाची अपेक्षा समाज करत असतो. सहाजिकच या अपेक्षांमुळे स्त्री आणि पुरुषांचे जन्माला आल्यानंतर स्त्री किंवा पुरुष म्हणून सामाजीकरण होत असते आणि त्या अनुषंगाने वैशिष्ट्ये निर्माण होत असतात व यामधूनच लिंगभाव ही संकल्पना निर्माण होत असते.

### लिंगभाव संकल्पनेचे स्वरुप :

आतापर्यंत अभ्यासलेल्या व्याख्यांच्या आधारे आपणांस लिंगभाव ही संज्ञा समजण्यास मदत झाली. परंतु या संकल्पनेचा उगम कधी झाला हे पहाणे देखील क्रमप्राप्त ठरते. या अनुषंगाने आपण इथे थोडक्यात आढावा घेणार आहोत.

**लिंगभाव संकल्पनेचा उगम :**

साधारणपणे १९५५ या साली लिंगशास्त्रज्ञ जॉन मनी यांनी सर्वप्रथम लिंगभावविषयक भूमिका (Gender Role) ही संज्ञा 'सायंटिफिक ट्रेड जर्नल' या जर्नलमधील शोधनिबंधात वापरली होती. या शास्त्रज्ञाच्या मतानुसार लिंगभावविषयक भूमिका म्हणजे एखादी व्यक्ती ज्या गोष्टीबद्दल प्रकट होत असताना ती स्वत:स पुरुष किंवा स्त्री या दर्जानुसार प्रकट करते. त्यास 'लिंगभावविषयक भूमिका' असे म्हटले जाते.

अलिकडच्या काळात जेंडर (gender) या नावाने (अर्थाने) प्रचलित असलेली संकल्पना प्राचीन काळापासून प्रचलित आहे. ॲरिस्टटल यांच्या मते भाषा व्याकरणात लिंगाधारित शब्द जसे की, स्त्रीलिंगी, पुल्लिंगी आणि नपसुकलिंगी असे शब्द सर्वप्रथम ग्रीक तत्वज्ञ पायथागोरस यानी इ. स. पूर्व ४८० ते ४१० या काळात वापरली. 'जेंडर' gender  हा इंग्रजी शब्द ॲंग्लोनार्मन आणि मध्ययुगीन फ्रेंच शब्द gndre पासून निर्माण झाला आहे. तर gndre हा शब्द genus या लॅटिन शब्दापासून बनला आहे. gndre आणि genus या शब्दांचा अर्थ प्रकार (kind, type) असा आहे. परंतु अलिकडे gender या शब्दाचा अर्थ प्रकार या अर्थाने वापरला जात नाही. या विवेचनावरुन थोडक्यात असे म्हणता येईल की, जेंडरचा gender व्युत्पत्तीशास्त्रीय अर्थ जो आजपर्यंत प्रकार या अर्थाने घेतला जात होता तो अलिकडे स्त्री-पुरुषातील भेद दर्शविण्यासाठी निर्माण केलेली सामाजिक वैशिष्ट्ये असा असून हे दोन्ही अर्थ परस्परांपेक्षा अगदी वेगळे आहेत. याबरोबरच लिंगभाव ही संकल्पना सार्वत्रिक स्वरुपाची असून ती स्थळ-काळानुसार बदलणारी आहे. व्यक्तीच्या जन्मानंतर सामाजिकरणाच्या प्रक्रियेमधून लिंगभावविषयक भूमिका व्यक्तीला शिकविल्या जातात. याबरोबरच लिंगभावाच्या समाजात रुढ असलेल्या पारंपारिक रुढीनुसार समाजात पुरुषाचे स्थान श्रेष्ठ तर स्त्रियांचे स्थान कनिष्ठ असा स्तरांमध्ये स्त्री-पुरुषांचे स्तरीकरण होत असते.

**१.२.२ लिंगभावविषयक हिंसाचार अर्थ, स्वरुप आणि प्रकार :**

**(Meaning and Nature-Types of Gender Violence)**

लिंगभावविषयक हिंसाचार याचा अर्थ समजण्यासाठी लिंगभाव ही संकल्पना समजणे गरजेचे होते या अनुषंगाने आपण लिंग, लिंगभाव समजून घेतला. यानंतर आपण लिंगभाव हिंसाचाराचा अर्थ, स्वरुप आणि प्रकार यांचा अभ्यास करणार आहोत.

हिंसाचार हा अवांछनिय मानला जात असला तरी त्याचे प्रमाण सर्व मानवी समाजात कमी-अधिक प्रमाणात घडून येत असतो. असा हिंसाचार व्यक्तीगत, सामूहिक, वांशिक, वर्णाधारित इ. प्रकारचा असतो. या प्रकारांसारखाच लिंगभाव विषयक हिंसाचार हा एक महत्त्वाचा तसेच सार्वत्रिक आढळणारा हिंसाचाराचा प्रकार आहे. यादृष्टिने याचा अर्थ पहाणे महत्त्वाचे ठरते.

हिंसाचार म्हणजे काय? हिंसा + आचार = हिंसाचार होय. हिंसा म्हणजे इजा, दुखापत किंवा जुलूम आणि आचार म्हणजे वर्तन किंवा वृत्ती होय.

थोडक्यात हिंसाचार म्हणजे एखाद्या व्यक्तीस इजा करणारे किंवा तिला दुखापत करणारे वर्तन किंवा कृती होय.

**हिंसाचाराच्या व्याख्या :** लेखक : हिंसाचार याचा अर्थ भौतिक बळाचा वापर करुन स्वत:च्या कृतीद्वारे किंवा वर्तनाद्वारे एखाद्या व्यक्तीला किंवा वस्तुला हानी, नुकसान पोहचविणे किंवा तिला नष्ट करणे होय.

**२) डॉमनॅक :** यांच्या मते दुसऱ्या व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर आक्रमण करणारे व्यक्तीचे कृत्य किंवा वर्तन म्हणजे हिंसाचार होय.

या व्याख्यांमधून असा अर्थ प्राप्त होतो की, हिंसाचार म्हणजे अशी कृती किंवा वर्तन ज्यात भौतिक बळाचा वापर करुन एखाद्या व्यक्तीस किंवा वस्तुस हानी पोहचविणे किंवा तिला नष्ट करणे, किंवा तिच्या स्वातंत्र्यावर आक्रमण करणे होय.

लिंगभाव विषयक हिंसाचार अर्थ : लिंगभाविषयक हिंसाचार म्हणजे स्त्री-पुरुषांतील सामाजिक भेदांच्याआधारे कोणत्याही लिंगाच्या एक किंवा अनेक व्यक्तींनी कोणत्याही लिंगाच्या (स्त्रीलिंगी, पुल्लिंगी, नपुसकलिंगी) एक किंवा अनेक व्यक्तींच्या विरोधात केलेला हिंसाचार हा लिंगभावविषयक हिंसाचार होय. थोडक्यात असा अर्थ घेता येतो की,लिंगभावविषयक हिंसाचार म्हणजे पुरुषाने स्त्रीच्या विरोधात केलेला हिंसाचार होय.

लिंगभावविषयक हिंसाचाराचे स्वरुप सार्वत्रिक आहे. यामध्ये एक पुरुष किंवा अनेक पुरुष एक किंवा अनेक स्त्रियांच्या विरुध्द हिंसाचार करतो/करत असतात असा हिंसाचार समाजात स्त्री कनिष्ठ आणि पुरुष श्रेष्ठ या भावनेतून घडून येत असतात. यामध्ये स्त्रियांची छेडछाड, विनयभंग, कौटुंबिक पातळीवर स्त्रियांच्या बाबत होणारी हिंसा तसेच हुंड्यासाठी केला जाणारा छळ इ. बाबींचा समावेश होतो.

**लिंगभाव हिंसाचाराचे स्वरुप :**

लिंगभाव हिंसाचार हा प्रत्येक समाजात आढळून येतो. त्यामुळे याचे स्वरुप सार्वत्रिक आहे. असे जरी असले तरी लिंगभावविषयक हिंसाचाराचे स्वरुप खालील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

१) लिंगभावविषयक हिंसाचाराचे विविध प्रकार

२) हिंसाचार करणाऱ्या पुरुषांची मनोवृत्ती

३) हिंसाचाराला बळी पडणाऱ्या स्त्रियांची वैशिष्ट्ये

४) हिंसाचाराची कारणे

१) लिंगभावविषयक हिंसाचाराचे प्रकार :

असा हिंसाचार पुढील प्रकारांमध्ये घडून येत असतो.

क) लैंगिक हिंसाचार (Sexual Violence)

ख) कुटुंबार्तगत होणारा हिंसाचार (Sexual Violence)

ग) समाजामधून स्त्रियांच्या विरोधात केला जाणारा हिंसाचार

**क) लैंगिक हिंसाचार :** असे हिंसाचार लैंगिक सुखप्राप्तीसाठी एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीवर किंवा स्त्रीवर केलेला जुलुम किंवा दडपशाही म्हणजे लैंगिक हिंसाचार होय. या प्रकारचा हिंसाचार समलिंगी आणि भिन्नलिंगी व्यक्तींच्या बाबतीत घडुन येते. लैंगिक हिंसाचार हे स्त्रियांबरोबर लहान मुलांच्या बाबतीतही घडून येतो.

लैंगिक हिंसाचारात स्त्रीचा विनयभंग करणे, छेडछाड करणे, बलात्कार करणे, नंतर तिची हत्या करणे, स्त्रीला फसवून वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडणे इ. बाबींचा समावेश होतो. अलिकडच्या काळात सर्व समाजात स्त्रियांच्या विरोधात असे लैंगिक हिंसाचार घडून येत आहेत.

**ख) कुंटुंबार्तंगत होणारा हिंसाचार :** या हिंसाचाराच्या प्रकारात कुटुंबातील एका सदस्याने दुसऱ्या सदस्यास शारीरीक दुखापत, इजा होणाऱ्या उद्देशाने केलेले कृत्य होय. कुटुंबांतर्गत होणारा हिंसाचार हा कुटुंबातील पुरुष सदस्यांकडून स्त्री सदस्यांच्या विरोधात घडून येतो. कुटुंबातील स्त्री सदस्यांमध्ये पत्नी, सुन, नववधु, तर कधी कधी विधवा, वृध्द स्त्रियांचा समावेश होतो. पत्नीस, कुंटुंबांतर्गत केली जाणारी मारहाण, लैंगिक दुर्व्यवहार, हुंड्यासाठी सुनेचा शारीरीक, मानसिक छळ करणे या बाबींचा समावेश होतो.

**ग) समाजामधून स्त्रियांच्या विरोधात केला जाणारा हिंसाचार :** या हिंसाचाराला सामाजिक हिंसाचार म्हणून देखील ओळखले जाते. सामाजिक कायदे आणि सामाजिक नीतीमत्तेचा भंग करुन स्त्रियांच्या विरोध केला जाणारा हिंसाचार म्हणजे सामाजिक हिंसाचार होय. यामध्ये सार्वजनिक ठिकाणी स्त्रियांची छेडछाड, स्त्रीभ्रूण हत्या, नवजात स्त्री मुलाची हत्या, एकतर्फी प्रेमातून तरुणीवर केला जाणारा ॲसीड हल्ला, नवविवाहिता, विधवा स्त्रियांना सार्वजनिक जीवनात सहभागी होण्यास मज्जाव करणे या गोष्टींचा समावेश होतो.

**२) हिंसाचार करणाऱ्या पुरुषांची मनोवृत्ती :**

हिंसाचार हा पुरुष सदस्याकडून स्त्री सदस्यांविरोधात होत असतो असे पुरुष विशिष्ट अशा मनोवृत्तीने ग्रासलेले व्यासबाधीत असतात.

१) जे पुरुष प्राप्त परिस्थितीशी समायोजन साधु शकत नाहीत. जे तणावग्रस्त असतात ते स्त्रियांच्या विरोधात हिंसा करतात.

२) ज्या पुरुषांना व्यावसायिक यश मिळविता येत नाही. बुध्दीकौशल्याचा अभाव असतो असे पुरुष व्यसनांच्या आहारी जातात आणि घडणाऱ्या घटनांचा सद्सद्विवेक बुध्दीने विचार करण्यांऐवजी ते भावनिक ताणतणावांतून करतात आणि याचा परिणाम म्हणून त्यांचे भावविस्थापन स्त्रियांविरोधात हिंसाचार करुन होतो.

३) प्राचीन काळापासूनच पुरुषांचे सामाजिक स्थान हे स्त्रियांपेक्षा उच्च समजले जात असल्यामुळे पुरुषी मनात अहंभाव रुढ असतो. या अहंभाव, वर्चस्ववादी वृत्तीमुळे पुरुष आपल्यापेक्षा दुबळ्या समजल्या जाणाऱ्या स्त्रियांच्या विरोधात हिंसा करतात.

४) बालपणापासून हिंसाचारात बळी पडलेले पुरुष सुडभावनेतून स्त्रियांच्या विरोधात हिंसाचार करतात.

लिंगभावविषयक हिंसाचार हा पुरुषी मानसिकतेतुन तसेच व्यसनाधिनतेच्या पुरुष आहारी गेल्युळे होत असल्याचे पहायला मिळते.

### ३) हिंसाचाराला बळी पडणाऱ्या स्त्रियांची वैशिष्ट्ये :

समाजात दुबळा समजला घटक असा पुरुषी समज समाजात रुढ आहे. लिंगभावविषयक हिंसाचाराला बळी पडणाऱ्या स्त्रियांची नेमकी वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे मांडता येतील.

१) हिंसाचाराला बळी पडणाऱ्या स्त्रियांची मनस्थिती अधिक कारणीभूत असते अशा स्त्रिया परिस्थितीसमोर हतबल झालेल्या, वैफल्यग्रस्त भावनिकदृष्ट्या विस्कटलेल्या असतात.

२) ज्या महिला सुशिक्षीत सुज्ञ कुंटुंबात राहतात. त्यांच्या सर्व गरजा पुर्ण होत असतात. कुंटुंबातील भावनिक आधारामुळे ज्या मानसिकदृष्टया सक्षम बनत असतात. परंतु सर्वच स्त्रियांना अशी कुटुंब मिळत नाहीत. काही कुंटुंबात पती-पत्नी सामंजस्य, सहकार्य असत नाही. शिवाय भावनिक आधार ही त्यांना मिळत नाही अशा स्त्रिया हिंसाचाराला बळी पडतात.

३) काही स्त्रियांच्या बाबतीत त्यांचे विवाह सामाजिक परिपक्वता येण्याआधीच केले जातात. त्यामुळे त्यांच्याकडे विवाहानंतर येणाऱ्या जबाबदाऱ्या हाताळण्याचे कौशल्य नसते. त्यामुळे सुध्दा मानसिकदृष्ट्या अपरिपक्व महिला हिंसाचाराला बळी पडत असतात.

४) याबरोबरच कुंटुंबातील पुरुषी वर्चस्व, पुरुषी मनोविकृत्ती यासारख्या पुरुषी स्वभावामुळे सुध्दा हिंसाचाराला बळी पडतात.

### ४) हिंसाचाराची कारणे :

लिंगभावविषयक हिंसाचार हा सार्वजनिक स्वरुपाचा आहे. प्रत्येक समाजात तो कमी-अधिक प्रमाणात पहायला मिळतच असतो. अशा या हिंसाचाराला कारणीभूत असणारे घटक याचा आढावा इथे घेणार आपण घेणारआहोत.

**अ) पितृप्रधान समाजव्यवस्था :** भारतीय समाजव्यवस्था ही पितृप्रधान समाजव्यवस्था आहे. त्यामुळे भारतीय समाजात स्त्रियांना कनिष्ठ तर पुरुषांना श्रेष्ठ मानले जाते. पुरुषाला विशेष सामाजिक अधिकार समाजातून तसेच कुटुंबातूनही दिले जातात. त्यामुळे समाजात पुरुषी वर्चस्व निर्माण होऊन स्त्रिया दुय्यम बनतात. तिचे गौणत्व विविध मार्गाने पुरुष सिध्द करु लागतात. तसेच ती केवळ भोगवस्तु आहे या भावनेतुन पाहिले जाते. अशा भावनेतून स्त्रियांचा छळ करण्याची प्रथा समाजात रुढ झाली. स्त्रियांना गुलामासारखे वागवणे, मारणे, छळ करणे हा पुरुषी अधिकार जन्मापासून मिळत असल्याची समज समाजात रुढ झाल्याच्या भावनेतुन स्त्रियांच्या विरोधात हिंसाचार वाढला.

**ब) पुरुषी स्वभाव :** काही पुरुषांचा स्वभाव संशयी असतो. हिंस्त्र, व्यभिचारी असतो. अशा स्वभावाने प्रवृत्त असलेले पुरुष हे हिंसाचार करतात. काही पुरुषांच्या स्वभावाची जडण-घडण बाल्यावस्थेतूनच वरीलप्रकारे होत असते. लहानपणी हिंसाचाराला बळी पडणारे पुरुष पुढे जाऊन सुडभावनेने पत्नी मुलांच्या विरोधात हिंसाचार करतात.

**क) व्यसनाधिन पुरुष :** स्त्रियांच्या विरोधात हिंसाचार करणारे पुरुष हे शक्यतो नशा करणारे असल्याचे आढळते. असे पुरुष नशा करुन आत्मनियंत्रण हरवतात. दारु, अफू कोकेन यासारख्या मादक द्रव्यांच्या अंमलाखाली येऊन हिंसाचार करत असतात. तर कधी-कधी काही पुरुष हिंसा करण्यासाठी धाडस यावे म्हणून अशा पदार्थांचे सेवन करतात.

**ड) हिंसेला बळी पडणाऱ्या स्त्रियांना हिंसेवेळी मिळणारे प्रोत्साहन :** स्त्रियांच्या विरोधात होत असलेल्या हिंसाचारात स्त्रियांकडून कळत-नकळपणे हिंसेवेळी प्रोत्साहन दिले जाते. हिंसाचारात पती मारत असताना मारण्यास प्रोत्साहन स्वत: स्त्रियांकडून दिले जाते. कधी कधी लैंगिक सुधाच्या भावनेतून स्त्री एखाद्या पुरुषाकडे आकर्षित होते. परंतु वास्तविकता जेव्हा या गुपित गोष्टी उघडकीस येतात. तेव्हा स्त्री बदनामी टाळण्यासाठी स्त्री पुरुषावर आरोप करते. अशाप्रकारे स्त्रियांकडून हिंसेवेळी प्रोत्साहन दिले गेल्याने देखील स्त्रियांच्या विरोधात हिंसाचार घडत असतो.

कधी-कधी हिंसाचार हा अचानकपणे निर्माण झालेल्या परिस्थितीमधून सुध्दा घडून येते असतो. एखादी स्त्री एकांतात हेरुन तिच्यावर बलात्कार केला जातो. या घटनेनंतर या कृत्याची कोणालाही बातमी कळू नये या भावनेतून पुरुष स्त्रीची हत्या करतात.

स्त्रियांच्या हिंसाचाराला अनेक कारणे जबाबदार असतात. परंतु वर आढावा घेतलेली कारणे ही अधिकच जबाबदार असल्याचे पाहण्यात आले आहे.

### १.२.३ लिंगभावविषयक प्रमुख समस्या :

लिंगभावविषयक हिंसाचाराला लिंगभावविषयक मुद्दे किंवा समस्या कारणीभूत असल्यामुळे आपण या ठिकाणी ते समजून घेणार आहोत. साधारणपणे मुद्दा (Issue) हा शब्द समस्या (Problem) या अर्थाने वापरला जातो. परंतु समाजशास्त्रीय अर्थाने पाहिले असता यांचा अर्थ थोडा वेगळा आहे.

मुद्दा (Issue) याचा अर्थ वादग्रस्त चर्चेसाठीचा मुद्दा होय आणि समस्या (Problem) याचा अर्थ एखादा प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्यक्षात येणे होय. समाजशास्त्रात सामाजिक मुद्यांचा आणि समस्यांचा अभ्यास करण्यावर भर दिला जातो. या अनुषंगाने या दोन संकल्पनांचा अर्थ समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

**सामाजिक समस्या (Social Issue) :**

सामाजिक मुद्दा म्हणजे असा प्रश्न किंवा समस्या की जी समाजातील अधिकाधिक लोकांशी जोडलेली असते किंवा समाजातील अधिक लोक त्या प्रश्नापासून प्रभावित झालेले असतात असे प्रश्न किंवा मुद्दे हे सामानय

व्यक्तीच्या व्यक्तीगत नियंत्रणापलिकडचा असतो. याबरोबरच तो व्यक्तीच्या व्यक्तीगत आणि सामाजिक जीवनास नैतिकतेच्या दृष्टिने बरोबर किंवा चुकिचा ठरविणाऱ्या मताला निर्माण करत असतो.

याउलट सामाजिक समस्या (Social Problem) याचा अर्थ समाजातील अशी परिस्थिती किंवा कृत्य की जे अनेक लोकांच्या मुल्यांशी विसंगत असते आणि त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी सामुहिकपणे उपाययोजना करण्याची गरज असते. या सर्व विवेचनाचे तात्पर्य असे थोडक्यात मांडता येईल की,

**लिंगभावविषयक मुद्दे / समस्या :**

मानवी समाजात अनेक सामाजिक प्रश्न असे असतात की, ज्यांवर विवादात्मक चर्चा होत असते. लिंगभावविषयक मुद्दा हा अशा मुद्यांपैकीच एक महत्त्वाचा मुद्दा होय. लिंगभावविषयक मुद्दा याचा अर्थ स्त्री-पुरुषातील सामाजिक भेदावर (समाजाने निर्माण केलेल्या भेदावर) आधारित वादाचे/चर्चेचे मुद्दे होय.

मानवी समाजात लिंगभावविषयक मुद्दा हा सार्वत्रिक आहे. याचा अर्थ जगातील कोणताही देश, संस्कृती मध्ये तो पहायला मिळतो. याबाबत लिंगभावावरुन भेदभाव केले जाणारे असे कोणते मुद्दे आहेत याची आपण या ठिकाणी चर्चापुर्ण विवेचन करणार आहोत.

**१) वैवाहिक मुद्दे :** समाजात प्राचीन काळापासून रुढ असणाऱ्या लिंगभावविषयक मुद्यांचे समर्थन करणारा सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा विवाहविषयक मुद्दा आहे. कारण या मुद्यांवरुन स्त्री-पुरुषातील समाजनिर्मित भेदाला खऱ्या अर्थाने सुरुवात होते. पूर्वीच्या काळात विवाहाचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य जसे पुरुषांना असे तसे स्त्रियांना दिले जात नसे. मुलींचे विवाह कमी वयातच करावेत अशी प्रथा रुढ होती. परंतु पुरुषांना विवाहाबाबत कोणतीही बंधने नव्हती तर ते आजन्म अविवाहीत (केवळ समाजाला दाखवण्यापुरतेच) देखील राहू शकतात. वर निवडीचे स्वातंत्र्य अलिकडे स्त्रियांना जरी दिले जात असले तरी त्यांना ते खऱ्या अर्थाने उपभोगता येत नाही.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात बालविवाहाची प्रथा रुढ होतो. बालवयात गर्भवती स्त्रिया प्रसुतीच्या यातना सहन न झाल्याने मरणत पावत असत. तर विजोड विवाहात मुलीच्या वयाच्या तिप्पट वयाच्या पुरुषाशी विवाह केला जात अशा विवाहत काही कालावधीतच पती मरण पावल्यास अशा विधवेला पुनर्विवाहाचा अधिकार मिळत नसे. त्यांनी पुनर्विवाह न करता अत्यंत कष्टदायक जीवनच जगायचे. याउलट विधुराचा विवाह होण्यास काही अडचणी अलिकडे सुध्दा येत नाहीत. हुंडाबंदीचा कायदा असूनही विवाहासाठी वधुकडून हुंडा वेगवेगळ्या स्वरुपात घेतलाच जातो. जरी मुलगी उच्चशिक्षण घेतलेली, कमविणारी असली तरी देखील विवाहाच्यावेळी हुंडा वधुपक्षाला द्यावाच लागतो. विवाह जुळविताना वधु ही वरापेक्षा कोणत्याही बाबतीत जसे की शिक्षण, उंची, उत्पन्न, वय या बाबींमध्ये ती वरापेक्षा वरचढ नसावी अशी अपेक्षा केली जाते. विवाहानंतर सुध्दा मुलीनेच परिस्थितीशी मिळते-जुळते घ्यावे. तोडजोडीचा संसार रेटावा, घटस्फोट घेऊ नये अशी अपेक्षा केली जाते. परंतु अशी अपेक्षा पुरुषांकडून केली जात नाही. यापुढेही, घटस्फोटित महिलेला कुंटुंबाची आर्थिक जबाबदारी

पेलवताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. शिवाय इतके करुनही समाज घटस्फोटित स्त्रियांकडे संशयी वृत्तीने पहात असतो. यामुळे महिला विवाहात कितीतरी त्रास, अन्याय सहन करावा लागला तरीसुध्दा त्या सहसा घटस्फोट घेण्यास तयार नसतात. अशा प्रकारे विवाहबंधनाने स्त्रिया या अपत्यजन्म, अपत्यसंशोधन, वृध्दांची सेवा तसेच घरकाम या सारख्या अर्थोत्पान होत नसलेल्या कामात जन्मभर गुंतून पडतात आणि गुण, कौशल्य, हुशारी असूनही त्या खऱ्या अर्थाने दुर्लक्षित राहतात.

**२) कुंटुंबव्यवस्था :**

जगात सर्वच समाजात पितृप्रधान कुटुंबव्यवस्था आहे. केवळ बोटांवर मोजण्याइतपत आदिम जमातीमध्ये मातृप्रधान कुटुंबव्यवस्था अगदी अपवादात्मक संख्येत पहायला मिळते. एकत्र कुटुंब किंवा विभक्त कुंटुंबामध्ये पुरुषप्रधानता दिसून येते. पितृप्रधान कुटुंबाचा कर्ता पुरुष असून सर्व औपचारिक सत्ता, तसेच कुंटुंबाची संपत्ती बाबतचे अधिकार हे पुरुषांच्या हाती असतात. संपत्तीचा वारसाहक्क पित्याकडून मुलाकडे वंशपरंपरेने संक्रमीत होते. विवाहानंतर मुलीला पित्याचे घर सोडून पतीच्या घरी जावे लागते. विवाहाआधी मुलगी दुसऱ्याच्या घरी जाणार या भावनेने पित्याच्या संपत्तीवर तर विवाहानंतर पत्नी बाहेरच्या घरातून आली आहे या भावनेने पतीच्या संपत्तीवर आपला हक्क सांगू शकत नाही. परंतु अलिकडे कुटुंबाच्या मालमत्तेत स्त्रियांना मुलांइतकाच हक्क मिळत असल्याचे कायदे आहेत. परंतु व्यवहारात असे हक्क मुलींना किंवा बहिणीला देण्यास पुरुष नाखुष असतात.

मुलाच्या जन्मासाठी नवस-गवस केले जातात. आनंदोत्सव साजरा केला जातो. पण मुलीचा जन्म लोकांना नकोसा असतो. विवाहानंतर तसेच विवाहपूर्व मुलीचे परावलंबित्व यामुळे हुंड्यासारख्या समस्या निर्माण होतात. अशा गोष्टी टाळण्यासाठी मुलींना गर्भातच मारुन टाकले जाते. अलिकडे आधुनिक काळात वैद्यकीय क्षेत्रातील तंत्राच्या साह्याने स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे स्त्रियांचे दरहजारी पुरुषांमागील प्रमाण घटत आहे.

**३) आर्थिक समस्या :**

लिंगभावविषयक भेदभाव हे आर्थिक क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात पहावयास मिळतात. आर्थिक क्षेत्रात श्रमविभाजन, रोजगार या बाबतीत तो अधिक प्रमाणात पहायला मिळतो. कुटुंबात अर्थार्जन करणे हे काम पुरुषांचे तर स्त्रियांनी मुलांना जन्म देणे, त्यांचे संगोपन करणे घरकाम करणे इ. कार्ये करावी अशी प्रथा रुढ झाली. समाजातील श्रमविभाजन हे स्त्री-पुरुष अशा लिंगभेदावर आधारीत होते.

अलिकडच्या काळात स्त्रियासुध्दा पुरुषांप्रमाणे नोकरी, व्यवसाय करुन अर्थार्जन करु लागल्या आहेत. परंतु तरीसुध्दा त्यांचे हे कार्यदेखील दुय्यमच मानले जात आहे. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असूनसुध्दा त्या आपल्या इच्छेप्रमाणे पैसे खर्च करु शकत नाहीत. भारतात रोजगाराच्या क्षेत्रात स्त्रियांचे प्रमाण पुरुषांच्या प्रमाणाच्या केवळ २७% होते अशी माहिती मनुष्यबळ मंत्रालयाच्या २०१५-१६च्या आकडेवारीवरुन स्पष्ट झाली आहे. याबरोबरच ासकिय, निमशासकीय तसेच खाजगी नोकरीच्या ठिकाणी पुरुषांकडेच त्या कार्यालयातील प्रमुख पद असते.

असंघटीत क्षेत्रात स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी वेतन दिले जाते. पगारवाढ, बढतीमध्ये महिलांचा विचार करण्याकडे कमी कल असतो. परंतु नोकर कपातीमध्ये त्यांचा पहिला विचार होतो. नोकरकपातीमध्ये महिलांना पुरुषांआधी कमी केले जाते. त्यामुळे महिलांची काम ही असंघटीत अस्थिर तसेच हंगामी स्वरुपाची पहायला मिळतात.

कमविणाऱ्या महिलांना नोकरी आणि गृहिणीची भूमिका असा ताण सहन करावा लागतो. याठिकाणी देखील स्त्रीने नोकरीपेक्षा गृहिणीच्या भूमिकेलाच प्राधान्य द्यावे अशी सामाजिक अपेक्षा ठेवली जाते. तर याउलट पुरुषांनी प्रथम नोकरीला महत्त्व दिले पाहिजे नंतर गृहकार्याला असा क्रम पुरुषांच्या बाबतीत समाज अपेक्षित असतो.

**४) राजकीय क्षेत्रातील समस्या :**

राजकीय क्षेत्रातील लिंगभावविषयक मुद्दे प्राचीन काळापासून असलेले दिसून येतात. इतिहास काळात समाजात राजेशाही रुढ होती. त्यामुळे राजकीय सत्ता पुरुषांच्या हाती असे. प्रशासन तसेच राजकारणात स्त्रियांचा सहभाग वर्ग मानला जात असे. अपवादात्मक परिस्थितीत जर एखाद्या स्त्रीला राणी म्हणून जरी राज्यकारभार चालवावा लागला असला तरी दरबारातील सेनापती, राजगुरु यासारख्या पदावरील व्यक्तीचे सहकार्य घ्यावे लागत असे.

ऐतिहासिक काळानंतर देखील अनेक देशांनी लोकशाही राजकीय व्यवस्थेचा स्विकार केला आहे. त्यामुळे लोकशाही प्रशासनातील मतदान करणे, निवडणूक लढविणे, लोकप्रतिनिधी म्हणून महत्त्वाच्या पदांवर काम करणे यासारख्या प्रक्रियांमध्ये स्त्रियांना देखील पुरुषांच्या बरोबरीने अधिकार दिले गेले आहेत. असे असले तरी अनेक आधुनिक समजल्या जाणाऱ्या देशांमध्ये सुध्दा राष्ट्राध्यक्ष किंवा पंतप्रधान असे शासनप्रमुख म्हणून स्त्रियांना संधी दिली गेलेली नाही.

संपूर्ण जगात भारतातील लोकशाही बृहद स्वरुपाची आहे. परंतु भारतात देखील स्त्रियांना राजकीय पत्र हे निवडणुकीस उमेदवारी सहसा देत नाहीत असे निरीक्षण आहे. परंतु एकीकडे भारतात पंचायत राज्यव्यवस्थेत नगरपालिकांमध्ये स्त्रियांना ३३% आरक्षण दिल्याने त्यांचा स्थानिक राजकारणात त्यांचा सहभाग वाढला आहे. यामुळे ग्रामपंचायतीमध्ये सरपंच, मंत्रालयात सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष, नगराध्यक्ष, महापौर अशी पदे स्थानिक राजकारणात स्त्रियांना मिळू लागली आहेत. परंतु यामध्ये सुध्दा एक बाजू अशी दिसून येते की, स्थानिक राज्यकारभारात महिला पदाधिकारी ज्या आहेत त्यांना केवळ नावापुरतेच अर्थात सहीपुरतेच ठेवले जाते आणि त्यांच्या घरातील पुरुषच कारभार करत असतात.

अशा प्रकारचा लिंगभेदभाव राजकीय क्षेत्रात पहायला मिळतो.

**५) शैक्षणिक क्षेत्रातील समस्या :**

प्रत्येक सामाजिक क्षेत्रात लिंगभावविषयक मुद्यांवरुन भेदभाव पहायला मिळतोच त्यामध्ये शिक्षण क्षेत्र कसा अपवाद राहिल ?

शैक्षणिक क्षेत्रात विकसीत देशांपेक्षा विकसनशील देश तसेच अविकसीत देशात शिक्षणाच्या क्षेत्रात

लिंगभावविषयक भेदभाव मोठ्या प्रमाणावर होत असतो. याचे उदाहरण म्हणून पाहत असताना भारतातील उच्चशिक्षणातील महिलांचे प्रमाण पाहणे योग्य ठरते. कारण भारतासारख्या विकसनशील देशातील मुलींचे उच्च शिक्षणातील हे पुरुषांपेक्षा (मुलांपेक्षा) खूपच कमी आहे. भारतात स्वातंत्र्यपूर्व कालखंडात स्त्री शिक्षणावर बंदी होती. परंतु ब्रिटीश कालखंडात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळाला आणि स्वातंत्र्योत्तर भारतात स्त्री शिक्षणाला खऱ्या अर्थाने चालना मिळाली असे जरी असले तरी पुरुषांच्या तुलनेत आजही स्त्रियांमध्ये साक्षरता प्रमाण कमीच आहे. आजही बहुसंख्य पालक हे मुलीच्या शिक्षणापेक्षा मुलाच्या शिक्षणाला अधिक महत्त्व देताना दिसतात. तसेच व्यावसायिक शिक्षण केवळ मुलांनीच घ्यावे आणि कलाशिक्षण मुलींनी घ्यावे यावर भर देत असतात. घर, विवाह, कुटुंब यासारख्या अनेक न दिसणाऱ्या जबाबदाऱ्यांमुळे मुलींचे उच्चशिक्षणातील प्रमाण खूपच कमी होत असल्याचे निरिक्षण आहे.

**६) आरोग्य क्षेत्रातील समस्या :**

आरोग्यविषयक बाबींमध्ये सुध्दा लिंगभावविषयक भेदभाव असलेला पहायला मिळतो. कुटुंबात लहानपणापासूनच मुलगा-मुलगी भेदभाव केला जातो. मुलाच्या आहाराकडे, औषधपाण्याकडे आणि इतर अनुषंगिक बाबींकडे मुलींच्या तुलनेत अधिक लक्ष दिले जाते. तर विवाहानंतर प्रसूती, स्तनपान इ. वेळी महिलांच्या शरीराची अपरिमित हानी होत असते. पण त्याची भरपाई स्त्रियांच्या आहाराद्वारे केली जात नाही. याबरोबरच प्रसूतीनंतर कुटुंब नियोजनाची जबाबदारी स्त्रियांकडे सोपविलेली असते. मग याठी स्त्रिया गर्भनिरोधक गोळ्या घेणे, तांबी बसविणे, कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया करणे इ. स्त्रियांच्या बाबतीत केल्या जातात. या उपाययोजनांचे दुष्परिणाम स्त्रियांच्या शरीरावर होतात. त्यामुळे त्यांच्यात रक्ताची कमतरता, शारीरिक थकवा, स्थूलत्व, शारीरीक दुखणी इ. आरोग्यविषयक समस्या (तक्रारी) जाणवतात. याबरोबरच महिला या स्वआरोग्याबाबत उदासीन असतात. त्यामुळे त्या स्वत: त्या गंभीर आजारदेखील अंगावर काढतात. यामुळे त्यांचे आरोग्य ढासळते, अकाली वृध्दत्व येते.

**६) धार्मिक क्षेत्रातील समस्या :**

भारतीय समाजात जाती धर्माबाबत विविधता आढळते. अनेक जाती धर्माचे लोक भारतात सामुहिकपणे राहतात. धर्म हा व्यक्तीच्या जीवनाचा अविभाज्य भाग समजला जातो. परंतु धार्मिक क्षेत्रातेखील स्त्री-पुरुष भेदभाव पहायला मिळतो. अनेक धार्मिक कार्यात मंदिरात, स्त्रियांचा सहभाग, प्रवेश निषिध्द मानला जातो.

स्त्रियांच्या 'ऋतुचक्र' या नैसर्गिक देणगीमुळे सृष्टीचे कार्य (मानवी जन्म-मृत्यू) अवितरपणे सुरु आहे. ऋतुचक्रास मासिक धर्म म्हणूनही संबोधिले जाते. या वेळेत स्त्रियांना अपवित्र मानून त्यांचा धार्मिक कार्यात मंदिरात प्रवेश दिला जात नाही. तर धर्मगुरु, पुरोहित, पुजारी यासारख्या पदांवर पुरुषच असतात महिलांना असे अधिकार दिले जात नाहीत. पूर्वीपासूनचे धर्माने पुरुषांना विवेश अधिकार दिले आहेत आणि स्त्रियांवर जाचक निर्बंध लादलेले आहेत.

**७) सांस्कृतिक क्षेत्रातील समस्या :**

मानवी समाज सार्वत्रिक आहे. मानवाने निर्माण केलेल्या संस्कृतीमुळे मानवी गरजा पूर्ण होतात. तसेच मानवी अस्तित्व टिकुन आहे. सर्वच समाजात सांस्कृतिक क्षेत्रातही लिंगभावविषयक भेदभाव दिसून येतो. अनेक समाजाच्या संस्कृती या पुरुषप्रधान आहेत. त्यामुळे सांस्कृतिक घटकांच्या निर्मितीमध्ये तसेच सादरीकरणात पुरुषी वर्चस्व पहायला मिळते. नाटक-सिनेमांमधून पुरुष कलाकाराची भूमिका प्रधान (मुख्य) अशी दाखविण्यात येते तर स्त्रियांची भूमिका दुय्यम असते. याबरोबरच साहित्यक्षेत्रात कथा, कादंबरी, यामधील पात्रे देखील पुरुषप्रधानच दाखविली किंवा लिहिली जातात. पुरुषांच्या मनोरंजनासाठी स्त्रियांचा वापर केला जातो. मनोरंजनाचे काही विशेष प्रकार केवळ पुरुषांसाठी योग्य असून असे प्रकार स्त्रियांसाठी अयोग्य मानले जातात. जगात सर्व समाजात साहित्यीक, शास्त्रज्ञ, कलाकार, संगीतकार, गीतकार, नाटककार हे पुरुषच असल्याचे पहायला मिळते. यापैकी महिला दिसत नाहीत. सांस्कृतिक क्षेत्रातील पुरस्कारांचे मानकरी पुरुष होताना दिसतात. यामध्ये स्त्रियांचे प्रमाण अगदी अल्प असल्याचे दिसते.

अशाप्रकारे मानवी समजात सर्वच क्षेत्रामध्ये लिंगभावविषयक भेदभाव पहायला मिळतो.मग तो समाज प्रगत असो किंवा अप्रगत अशा लिंगभावविषयक भेदभावामुळे समाजात स्त्री-पुरुषात प्रचंड प्रमाणात स्त्री-पुरुषांत असमानता निर्माण होत आहे. सांस्कृतिक क्षेत्रात देखील पुरुषप्रधानता आणि स्त्री गौणत्व दिसून येते.

## १.३ सारांश :

भारतीय समाज हा पुरुषप्रधान आहे. केवळ भारतच पुरुषप्रधान नसून संपूर्ण विश्व हे सुर्धदा पुरुषप्रधान संस्कृतीचे द्योतक आहे. स्त्रियांवरील होणारा हिंसाचार हा नविन नाही, त्याला फार प्राचीन अशी परंपरा आहे. स्त्री हि पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये पुरुषाची दास्य असल्याची वागणूक स्त्रीला वेळोवेळी होताना दिसते. जसजशी समाजामध्ये आनुधिकता येत आहे त्याच प्रमाणात हिंसाचाराचे स्वरूप बदलत चालले आहे. स्त्रीवर होणारा हिंसाचार प्रामुख्याने पुरुषी वर्चस्वातूनच होतो आहे. प्रस्तुत प्रकरणात आपण विस्तृतरित्या लिगभाव संकल्पना, हिंसाचार स्वरूप आणि समस्यांवर विवेचन केलेले आहे.

## १.४ स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न (एका वाक्यात उत्तरे लिहा) :

१) लिंगभाव विषयक संकल्पना कोणत्या शास्त्रज्ञाने वापरली ?

२) हिंसाचार म्हणजे काय ?

३) हिंसाचाराची कोणतीही दोन कारणे कोणती ?

४) आदिम समाजामध्ये अगदी अपवादात्मक कोणती व्यवस्था पहायला मिळते?

५) लैंगिक हिंसाचारात कोणत्या बाबींचा समावेश होतो?

## १.५ स्वयंअध्यय प्रश्नांची उत्तरे.

१) जॉन मनी

२) हिंसाचार म्हणजे एखाद्या व्यक्तीस इजा करणारे किंवा तिला दुखापत करणारे वर्तन अथवा कृती होय.

३) पितृप्रधान समाजव्यवस्था, पुरुषी स्वभाव, व्यसनाधिन पुरुष, हिंसेला बळी पडणाऱ्या स्त्रियांना हिंसेवेळी मिळणारे प्रोत्साहन.

४) मातृप्रधान

५) स्त्रीचा विनयभंग करणे, छेडछाड करणे, बलात्कार करणे, हत्या करणे, स्त्रीला फसवणे, वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडणे.

**१.६ सरावासाठीचे प्रश्न (सविस्तर उत्तरे लिहा) :**

१) लिंगभाव संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करा.

२) लिंगभाव हिंसाचार स्वरूप यावर चर्चा करा.

३) लिंगभाव विषयक प्रमुख समस्या विशद करा.

**१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :**

1) Kimmel, Michael S. The Gendered Society, New York, Oxford University Press, 2011, Chapter 13, Gender of Violoence, pp 381-407.

2) Karlekar, Malvika - Domestic Violence, Economic and Political Weekly, Vol. 33, No. 27, Jul 4-10, 1998. pp - 1741 - 1751.

* * *

# घटक – २

# कौटुंबिक हिंसाचार

# (Domestic Violence)

२.० प्रास्ताविक

२.१ उद्दिष्टे

२.२ विषय विवेचन

२.२.१ कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ

२.२.२ हुंडाबळी : कारणे आणि उपाययोजना

२.२.३ घटस्फोट : कारणे आणि उपाययोजना

२.३ सारांश

२.४ स्वयंअध्ययन प्रश्न

२.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठीचे प्रश्न

२.७ चिंतन व कार्य

२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० प्रास्ताविक (Introduction) :

मनुष्य हा जन्मतः केवळ एक प्राणी असतो. त्याचे सामाजिक प्राण्यात रूपांतर करणाऱ्या प्रक्रियेत कुटुंबाचे स्थान महत्त्वाचे आहे. मानवी जीवनातील प्राथमिक व मुलभूत सामाजिक संस्था म्हणून कुटुंबसंस्था ओळखली जाते. मानवाच्या सर्व गरजांचे निराकरण व संरक्षण कुटुंबातून होत असते. परंतू लहान मुले, वृद्ध व विशेषत: स्त्रियांसाठी कुटुंब असुरक्षित बनते. स्त्रियांवरील कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांकडे दुर्लक्ष केले जाते. कारण भारतात सर्वत्रच घरगुती हिंसाचार ही सर्वसाधारण बाब समजली जाते. परंतु अधुनिक काळात

हिंसाचार अमानवीय, अनिष्ट मानला जातो. लोकशाहीत हिंसाचारास स्थान नाही. त्यामुळे हिंसाचारास प्रतिबंध करण्याचे काम सर्वच समाजातून होताना दिसते. आज कौटुंबिक हिंसाचार ही एक महत्त्वाची सामाजिक समस्या बनली आहे. म्हणून या प्रकरणामध्ये कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ, व्याप्ती, कौटुंबिक हिंसाचाराची कृत्ये, त्यास जबाबदार कारणे व कौटुंबिक हिंसाचारावरील कायदेशीर व प्रतिबंधात्मक उपाययोजना अभ्यासणार आहोत. दुसऱ्या घटकामध्ये कौटुंबिक हिंसाचारास जबाबदार असणारी दिर्घकाळापासून दूर झालेली हुंडाप्रथा तिचे स्वरूप जाणून घेणार आहोत. त्यानंतर हुंडाप्रथा रूढ होण्याची कारणे व त्यावरील कायदेशीर व प्रतिबंधात्मक उपाय अभ्यासणार आहोत.

स्त्री-पुरूषातील वैवाहिक नाते कायमस्वरूपी टिकून रहावे अशी अपेक्षा सर्वत्रच केली जाते. भारतात विवाह हा पवित्र संस्कार मानला जातो. परंतू काही वेळा विवाहबंधन अत्यंत क्लेशकारक बनते. अशावेळी घटस्फोटाची मुभा दिली जाते. काही वेळा घटस्फोट देण्या-घेण्याच्या कारणातून कौटुंबिक हिंसाचार घडून येतो. म्हणूनच घटस्फोटाचा अर्थ, घटस्फोटास जबाबदार कारणे व त्यावरील उपाययोजनांचा अभ्यास इथे करणार आहोत.

व्यक्तीच्या जीवनात कुटुंबाचे स्थान अनन्यसाधारण आहे. कारण व्यक्तीचे पालन-पोषण, संरक्षण, मानवीकरण, समाजिकरण कुटुंबातच होत असते. कुटुंबातूनच मानवाच्या भावनिक, मानसिक गरजांची पूर्तता, व्यक्तिमत्त्व विकसीत होते. व्यक्तिसाठी सर्वात सुरक्षित ठिकाण म्हणून कुटुंबाकडे पाहिले जाते. परंतू सर्वांसाठीच कुटुंब सुरक्षित असते म्हणता येत नाही. काहीवेळा कुटुंबातील प्रौढ व्यक्ती आपल्या नात्यांचा, वयाचा, सत्तेचा दुरूपयोग करून घरातील इतरांना आपल्या ताब्याता ठेवण्याचा प्रयत्ना करते. अशा दबावाचा, हिंसाचाराचा लहान मुले, स्त्रिया व वृद्ध बळी पडतात. परंतू भारतामध्ये कौटुंबिक हिंसाचारास प्रामुख्याने स्त्रियाच बळी पडतात. पती व सासरच्या व्यक्तीकडून विवाहीत स्त्रीचा होणारा छळ सार्वत्रिक स्वरूपाची घटना 'नवरा' आहे म्हंटल्यावर मारणारच इतक्या सहजपणे ही बाब घेतली जाते. तर आई-वडिलांच्या घरी मुलींना मिळणारी भेदभावपूर्ण वागणूक वा छळ हा त्यांचा अधिकारच मानला जातो. कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना जोवर गंभीर रूप धारण करीत नाहीत तोवर दुर्लक्षिल्या जातात. परंतू अधुनिक युगात मानवी हक्क व मूल्यांना महत्त्व प्राप्त झालेल्या समाजात कौटुंबिक हिंसाचाराविरूद्ध आवाज उठवला जाऊ लागला आहे. त्यातूनच कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण करणारा कायदा करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रथम घटकामध्ये आपण कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ त्याचे स्वरूप, कारणे व उपाय यांचा अभ्यास करणार आहोत.

**२.२ उद्दिष्टे (Objective) :**

१) कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या व अर्थ समजून येईल.

२) कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप समजावून घेता येईल.

३) कौटुंबिक हिंसाचाराची कारणे स्पष्ट करता येतील.

४) कौटुंबिक हिंसाचारावरील उपाय विशद करता येतील.

५) हुंडाप्रथेचा अर्थ, व्याख्या व स्वरूप समजून येईल.

६) हुंडाप्रथेची कारणे स्पष्ट करता येतील.

७) हुंडाप्रथा व हुंडाबळी रोखण्यासाठी उपाय स्पष्ट करता येतील.

## २.२ विषय विवेचन (Presentation of Subject Matter) :

कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ समजावून घेण्यासाठी प्रथम आपण काही व्याख्या अभ्यासणार आहोत. त्यानंतर कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप जाणून घेणार आहोत. शेवटी कौटुंबिक हिंसाचाराची कारणे व त्यावरील उपाययोजना अभ्यासणार आहोत.

### २.२.१ कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या व अर्थ

**(Definition and Meaning of Domestic Violence) :**

कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ समजून घेण्यासाठी आपण काही व्याख्या अभ्यास त्याशिवाय कौटुंबिक हिंसाचाराबाबत केलेल्या कायद्यामध्ये समाविष्ट व्याख्येनेही कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ अधिक स्पष्ट होईल.

**१) मेरिअम–वेबस्टर शब्दकोश :** कुटुंबातील एका सदस्याने दुसऱ्या सदस्यास दुखापत करणे म्हणजे कौटुंबिक हिंसाचार होय. असा वर्तनप्रकार वारंवार व सराईतपणे करणे होय. (Domestic Violence is the inflicting of physical injury by one family household member on another)

**२) ॲन्थोनी गिडीन्स :** कुटुंबातील एका सदस्याने दुसऱ्या एक किंवा अनेक सदस्यांच्या विरोधात केलेला शारिरीक दुरूपयोग म्हणजे कौटुंबिक हिंसाचार. (We may define domestic violence as physical abuse directed by one member of the family against another or others.)

**३) कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण :** अधिनियम २००५ च्या कायद्यानुसार व्यथित स्त्रीच्या शारिरीक किंवा मानसिक आरोग्यास, सुरक्षिततेस, एकूण जीवितास, कल्याणास धोकादायक परिस्थितीत नेणारे वातावरण, तसेच व्यथित स्त्रीच्या जीवनात किंवा कोणत्याही अवयवास घातक आणि उपद्रवी ठरेल अशी वागणूक, व्यथित स्त्रीचा लैंगिक छळ, लैंगिक दुरूपयोग, शाब्दिक किंवा भावनिक छळ, आर्थिक छळ व आर्थिक कायद्यांपासून वंचित ठेवणे तसेच आर्थिक कारणांसाठी दुरूपयोग होत असेल तर तो अत्याचार, हिंसाचार, कौटुंबिक हिंसाचार समजला जाईल.

या कायद्यानेच पत्नीच नाहीतर घरातील सर्व स्त्रिया बहिण, विधवा या सर्वांच्या संरक्षणाची तरतूद आहे.

कुटुंबातील प्रौढ व्यक्ती आपल्या स्थानाचा,नात्यांचा, वयाचा वापर कुटुंबातील इतर व्यक्तीच्या विरोधात

हिंसक वर्तन करते. शारिरीक, शाब्दिक बळाचा वापर करून आपल्या असलेल्या दुसऱ्या व्यक्तीस शारिरीक दुखापत, मानसिक खच्चीरकण केले जाते. त्याच्या स्वतंत्र जगण्यावर, अधिकारावर अंकुश ठेवून गुलामासारखी वागणूक दिली जाते. त्याला कौटुंबिक हिंसाचार म्हंटले जाते.

या हिंसेची प्रामुख्याने स्त्री लक्ष्य असते. परंतु लहान मुले, वृद्ध, काहीवेळा पुरूषही अशा हिंसाचाराचे बळी असतात. हिंसेचे मानसिक खच्चीकरणाचे लहान मुलांच्या मनावर खोलवर परिणाम होतात. ते सामान्य व निकोप आयुष्य जगू शकत नाहीत. आत्मविश्वास गमावलेली मुले मोठेपणी वाईट मार्गाला लागतात. अलिकडे वृद्धांची अवस्थाही दयनिय झाली आहे. मुले, सुना त्यांच्याशी दुर्वव्यवहार करतात.

भारतात सर्वात जास्त हिंसाचार, स्त्रियांच्या संदर्भात घडून येतो. जन्मापासूनच स्त्रीला कसलेच अधिकार नसल्याने माता-पित्याच्या घरीही भेदभावपूर्ण वागणूकीतून छळ केला जातो. परंतू माहेरघरी होणारी हिंसा समाजाला मान्यच नसल्याने ती सर्वसाधारण वर्तणूक मानली जाते. त्यामुळेच भारतात स्त्रियांवरील हिंसा मग ती क्रूर, पाशवी असो वा सौम्य ती स्त्री जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे. सुरक्षितता देणारे घरच स्त्रीसाठी असुरक्षित, छळ-छावणी बनले आहे. जगातील अनेक संस्कृतीमध्ये पुरूषांचे स्त्रियांवर वर्चस्व रहावे म्हणून स्त्रियांवर होणाऱ्या हिंसेला मान्यता आहे. ही वर्तणूक सर्वसामान्य मानली जाते. भारतात नवऱ्याने हिंसा करणे, मारहाण करणे त्याचा विशेष हक्क मानला जातो. त्याचे समर्थन केले जाते. अगदी स्वत: स्त्रियाही याचे समर्थन करतात. सासरच्या माणसांनी सुनेचा छळ अधिकृत मानला जातो. कितीही छळ झाला तरी सासर हेच तिचे ‘घर’ असल्याने ती सहन करत राहते. काहीवेळा स्त्रीवर होणारे शारिरीक, मानसिक अत्याचार इतके तीव्र असतात की माहेरच्या आधारा अभावी ती आत्महत्येस प्रवृत्त होते.

**कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप :**

कौटुंबिक हिंसाचाराची व्यापकता समजून घेण्यासाठी भारतात कौटुंबिक हिंसाचाराच्या घडणाऱ्या घटनांची माहिती घेणे आवश्यक ठरेल.

१) नॅशनल क्राईम रेकॉर्डस ब्युरोच्या (NCRB) च्या अहवालानुसार १९८८ ते २००१ या कालावधीपर्यंत ४९१७० एवढ्या कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांची नोंद झाली.

२)२००५ च्या नोंदीनुसार कौटुंबिक छळामुळे दररोज ६६ स्त्रीया आत्महत्या करतात. दररोज ५ महिलांचा पाण्यात बुडून मृत्यू होतो. कौटुंबिक हिंसाचारामुळे दररोज ५७ स्त्रीया विषारी औषध पिऊन आत्महत्या करतात. तर दररोज ३५ महिलांचा भाजून मृत्यू होतो. यामध्ये काहीवेळा विषारी औषध पाजून वा स्त्रीला जाळून मारले जाते व त्या घटनांची आत्महत्या म्हणून नोंद होते.

३) २००५ च्या दरम्यान स्त्रियांवरील हिंसेमध्ये एवढी वाढ झाली की ‘नॅशलन कमिशन फॉर वुमन’ ने त्यांचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक देऊन सामाजिक व राष्ट्रीय वृत्तपत्रामध्ये हिंसेला बळी पडणाऱ्यांसाठी हेल्पलाईन सेवा उपलब्ध असल्याची जाहिरात केली.

४) २००१ च्या राष्ट्रीय कुटुंब स्वास्थ्य सर्वेक्षणानुसार ५६% स्त्रियांना कौटुंबिक हिंसा सर्वसामान्य बाब वाटते.

कुटुंबामध्ये जवळच्या व्यक्ती वा नातलगांकडून स्त्रियांवर विविध प्रकारचे अत्याचार होत असतात. आणि तो त्यांचा अधिकारच आहे असे समजले जाते. स्त्रियांनाही हिंसा स्वाभाविक वर्तणूक वाटते. परंतू कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांचा आढावा घेतल्यास त्यामधील गांभीर्य लक्षात येते. स्त्रियांवरील हिंसेमध्ये कोणकोणत्या कृत्यांचा समावेश होतो हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

**१) शारीरिक हिंसा –** या प्रकारामध्ये स्त्रीचा शारीरिक छळ केला जातो. बळाचा वापर करून स्त्रीच्या अवयवांना इजा पोहचेल असे कृत्य केले जाते. मारहाण, चावणे, चटके देणे, शॉक देणे, ढकलून देणे, थोबाडीत मारणे, लाथ मारणे, केसांना धरून ओढणे, हाताला येईल त्या वस्तुने जीव घेणे, वार करणे, दात पाडणे, कज्ञान कापणे, भिंतीवर डोके आपटणे, याशिवाय नैसर्गिक गरजा पूर्ण करण्यात अडथळे आणणे, उपाशी ठेवणे, झोपू न देणे, टोमणे मारणे, अपमान करणे, आजारपणाकडे दुर्लक्ष करणे इ.

**२) मानसिक हिंसा –** स्त्रियांवर होणारी मानसिक हिंसा प्रत्यक्षात दिसून येत नाही. पण त्याचे अत्यंत प्रतिकूल परिणाम स्त्रियांच्या मानसिकतेवर होतात. अपमानास्पद वागणूक, टोमणे मारणे, धमकी देणे, सतत दडपणाखाली ठेवणे, दिसण्यावरून उपहासाने बोलणे, चारित्र्याचा संशय घेणे, कोंडून ठेवणे, कोणास भेटू न देणे, कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य व अधिकारापासून वंचित ठेवणे इ.

**३) लैंगिक हिंसा –** लैंगिक अत्याचारामुळे स्त्रीच्या आत्मसन्मानास धक्का पोहचतो. पती, दिर, सासरे इतर पुरूष नातेवाईक व्यक्ती स्त्रीचा विनयभंग करतात. तिच्याबरोबर जबरदस्तीने संबंध ठेवतात. अश्लिल चाळे केले जातात. तिचा बिभत्स, अनैतिक कृत्य करावयास भाग पाडले जाते. काहीवेळा परपुरूषाशी शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडले जाते, अनैसर्गिक शारीरीक संबंध ठेवणे. काहीवेळा वेश्याव्यवसायासाठी जबरदस्ती केली जाते. या कृत्यांचा समावेश लैंगिक छळामध्ये होतो.

**४) आर्थिक हिंसा –** स्त्रीला आर्थिकदृष्ट्या परावलंबी करणे. जरी स्त्री संपत्ती, धन असले तरी त्यावर स्त्रीचा अधिकार नसतो. तिच्याकडून स्त्रीधन काढून घेतले जाते. स्त्री कमावती असली तर तिचा पगार काढून घेतला जातो. एवढेच नाही तर तिला तिच्या अन्न, वस्त्र, औषधउपचार अशा गरजेसाठीही पैसे दिले जात नाहीत. स्त्रीचा हुंडा व इतर वस्तुंच्या मागणीसाठी दबाव टाकणे याप्रकारची कृत्य म्हणजे आर्थिक हिंसा होय.

### अ) कौटुंबिक हिंसाचाराची कारणे :

कौटुंबिक हिंसाचाराची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) पितृसत्ताक कुटुंब पद्धती –** पितृसत्ताक कुटुंब पद्धतीत पुरूषाच्या हाती सत्ता एकवटलेली असते. कुटुंबातील नियंत्रण व निर्णयाचे अधिकार पुरूषाकडे केंद्रीत असतात. अमर्याद व्यक्तीच्या हुकूमशाही प्रवृत्तीस पोषक ठरते. म्हणूनच बहुसंख्यवेळा पुरूष आपल्या कुटुंबातील सदस्यांवर विशेषत: स्त्रिया व लहान मुलांवर

अत्याचार करतो. पुरूष हा मालक व स्त्री ही दासी मानणाऱ्या पितृसत्ताक व्यवस्थेने स्त्रीला पुरूषाची मालमत्ता मानले. त्यामुळे तिच्याशी अवमानकारक वागणे, छळ करणे, मारहाण करणे, हे स्त्रीला नियंत्रणात ठेवण्यासाठी आवश्यका असल्याचे पितृसत्ताक व्यवस्था मान्य करते. आणि स्त्रीविरोधी होणारे हिंसक वर्तन सर्वसामान्य समजले जाते.

**२) स्त्रीची मानसिक दुर्बलता व परावलंबन –** मध्ययुगीन काळापासून स्त्रीचे कार्यक्षेत्र चूल व मूल हेच मानले गेले. तिला शिक्षण व अर्थाजनाच्या संधी नाकारल्या गेल्या. परावलंबन स्त्रीला अधिक दुबळं बनवते. व पुरूषांमधील वर्चस्ववाद, एकाधिकारशाही प्रबळ करते. स्त्री–पुरूष भेदभावासाठी श्रम विभाजन कारणीभूत ठरलं. स्त्रीला पुरूषाची दासी मानले जाऊ लागले. हे दास्यत्त्व स्वाभाविक असल्याचे शतकानुशतके स्त्रियांच्या मनावर बिंबवले गेल्याने त्यांच्यात कायमची मानसिक, शारीरिक दुर्बलता निर्माण झाली. त्यामुळे ती सहनशील बनली. एकूणच स्त्रीची दुर्बलता व पुरूषाची प्रबळ स्वामीत्त्व भावना स्त्रियांवरील अत्याचारास पोषक ठरली.

**३) मानसिक विकृती व व्यसनाधिनता –** काही पुरूषांमध्ये आक्रमक हिंसक, वर्चस्ववादी, दुसऱ्यावर हुकूमत गाजवणारी प्रवृत्ती असते. असे पुरूष कुटुंबातील सदस्यांशी नेहमी हिंसक वर्तन करतात. अशा विकृत मानसिकतेचे पुरूष घराबाहेरील अपयश, अपमान, ताणतणावाचा राग घरातील बायका, मुलांवर मारहाण करून काढतात. तसेच मद्यभान, मादकद्रव्याचे सेवन करणाऱ्या पुरूषांमध्येही बायको मुलांना मारहाण करण्याचे प्रमाण अधिक आहे. असे पुरूष स्वत: कुटुंबाचा आर्थिक भार उचलत नाहीत आणि बायकोने कमवलेले पैसे काढून घेण्यासाठी तिच्याशी हिंसक वर्तन करतात. अशा घटना जास्त प्रमाणात आर्थिकदृष्ट्या निम्न वर्गात, ग्रामीण भागातील कुटुंबात दिसून येतात. परंतू सुशिक्षित मध्यमवर्गातही बहुसंख्यवेळा व्यसनाधिन पुरूषांच्या अत्याचारास स्त्रिया बळी पडताना दिसून येतात.

**४) संशयीवृत्ती –** स्त्री चंचल, ओदाळ, नाठाळ, चारित्र्यहिन असते असे प्रवाद समाजात पूर्वीपासूनच रूजले असलेल्या समाजात स्त्रीच्या चारित्र्याकडे अत्यंत काटेकोरपणे पाहिले जाते. बऱ्याचवेळा पुरूष स्त्रीचा चारित्र्यावरून संशय घेऊन तिच्या प्रत्येक हालचालींवर नजर ठेवली जाते. ही एक प्रकारची हिंसाच आहे. त्यामुळे स्त्रियांच्या साध्या सरळ जीवन जगण्यावर एकप्रकारे सातत्याने दडपण आणले जात असते. संशयी पुरूष स्त्रीला मारहाण ही करतो. संशयामुळे पत्नीला जीवे मारण्याच्या कित्येक घटना घडताना दिसून येतात. काही पुरूष स्त्रीला संशयावरून कोंडून घालतात. चारित्र्याच्या संशयातून होणारी हिंसा कुटुंबातील सर्वच स्त्रियांच्याबाबत घडून येताना दिसते. संशयाचा रोग अशिक्षित तसे सुशिक्षितातही आहे. पुरूषाचा संशय व त्याबद्दल स्त्रीला होणारी मारहाण हे समाजाला योग्यच वाटत असते.

**५) स्त्री अपत्यप्राप्ती व पुत्रप्राप्तीचे साधन –** पितृसत्ताक व्यवस्थेत स्त्रीला व्यक्तीगत संपत्ती व वंशवृद्धीचे साधन मानले जाते. स्त्रीची गरज तिच्या गर्भाशयासाठी या मानसिकतेतून स्त्रीला जर मूलं होत नसतील तर सारा दोष स्त्रीलाच देऊन तीचा अमानुष छळ केला जातो. त्याशिवाय एखाद्या स्त्रीस फक्त मुलीच होत असतील तर त्याचा दोषही स्त्रीच्य माथी मारून तिचा शारीरिक, मानसिक छळ केला जातो. असा छळ पती

व इतर नातेवाईकांकडून होत असतो.

**६) हुंडाप्रथा –** विवाह हा स्त्रीसाठी अत्यंत महत्त्वाचा व आवश्यक संस्कार मानला जातो. त्यातूनच हुंडाप्रथा निर्माण झाली. विवाहप्रसंगी वधुपक्षाने हुंडा व मानपान देणे आवश्यक मानले जाऊ लागले. विवाहानंतर लोभी पती व त्याच्या नातेवाईकांची हुंडा व सतत भेटवस्तूची मागणी वाढतच जाते. अशी मागणी न पुरवल्यास स्त्रीचा छळ होतो. हुंड्यासाठी मारहाण केल्याच्या, ठार मारल्याच्या, जाळून मारण्याच्या व स्त्रीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या कित्येक घटना घडताना दिसून येतात. हुंडाविरोधी कायदा करण्यात आला असूनही आजही कित्येक नवविवाहीत हुंडाप्रथेमुळे कौटुंबिक हिंसाचारास बळी पडतात.

**७) स्त्रीच्या जोडीदार निवडीवर निर्बंध :–** आजही पूर्वापार चालत आलेल्या प्रथा–परंपरांचे पालन करणे स्त्रीसाठी आवश्यक मानले जाते. त्यामुळे मुलीने स्व:मर्जीने विवाह ठरविणे, प्रेमविवाहाचा आग्रह धरणे, जातीबाह्य विवाह करणे हे कुटुंबाच्या प्रतिष्ठेस बाधा पोहचवणारी बाब मानली जाते. असा आग्रह धरणाऱ्या मुलीस कुटुंब व नातेवाईकांच्या रोषास बळी पडावे लागते. त्यातून मुलीचा छळ करतात. काहीवेळा कनिष्ठ जातीतील तरूणाशी प्रेमसंबंध असल्यास वा त्यांनी विवाह केल्यास दोघांचीही हत्या केल्याच्या कित्येक घटना घडल्याचे दिसून येते. अशा प्रतिष्ठेसाठी बळी (Honourkiling) च्या वाढत जाणाऱ्या घटना गंभीर समस्या बनली आहे.

**ब) कौटुंबिक हिंसाचारावरील उपाय :–**

भारतात घडून येणाऱ्या कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना पाहता त्यावर उपाययोजना आवश्यक असते. त्यातूनच कौटुंबिक हिंसाचार रोखण्यासाठी कायदेशीर उपाययोजना करण्यात आल्या.

**१) भारतीय दंड संहिता :–** भारतीय राज्यघटनेच्या कलम ४९८ (अ) नुसार हुंडा वा अन्य कारणासाठी स्त्रियांचा छळ करणे हा दखलपात्र व अजामिनपात्र गुन्हा मानला आहे. अशा गुन्ह्यात दोषी व्यक्तिस पती किंवा त्याच्या नातेवाईकांना दोन वर्ष कारावास व दंडाची शिक्षा होऊ शकते.

**२) हुंडा प्रतिबंधक कायदा :–** या १९६१ च्या कायद्याने हुंडाप्रथा कौटुंबिक हिंसाचाराचे प्रमुख कारण मानले व हुंड्यासाठी होणाऱ्या छळास प्रतिबंध करण्यात आला. तसेच या अधिनियमानुसार हुंडा देणाऱ्या व घेणाऱ्या व्यक्तींना दोषी मानून ५ वर्षे कैद १५,००० रू. इतका दंड होऊ शकतो.

**३) कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा २००५ :–** कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करणारा कायदा २००५ मध्ये करण्यात आला. या कायद्याने गुन्हेगारास शिक्षेची तरतूद करण्यात आली. तसेच या अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यासाठी नियम तयार करण्यात आले. या कायद्याच्या उद्देशात हिंसाचारात मोडणारी कृत्ये स्पष्ट केली आहेत. तसेच तक्रार कोण करू शकते हे ही स्पष्ट केले आहे. या कायद्याने स्त्रियांना कुटुंबात सुरक्षितता मिळवून देणे, त्यांना बेघर होऊ न देता त्यांचा कुटुंबात राहण्याचा अधिकार मान्य करण्यात आला आहे.

केंद्रसरकारने कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण नियमावली २६ ऑक्टो २००८ पासून अंमलात आणली.

अर्थातच कायदे केल्याने घरगुती हिंसाचाराच्या घटना कमी झालेल्या नाहीत. अजुनही सर्वसामान्य महिलांपर्यंत कायदा पोहचलेला नाही आणि स्वसंरक्षणासाठी या कायद्याचा आधार घेण्यास स्त्रिया सक्षम नाहीत. म्हणूनच कायदेशीर उपाययोजने बरोबरच काही प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक आहेत. त्या उपाययोजना पुढीलप्रमाणे.

१) स्त्री-पुरूष समानतेचं तत्त्व रूजवण्यासाठी, स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी त्यांना शिक्षण व अर्थार्जनाच्या संधी उपलब्ध करून देणे.

२) अत्याचारा विरोधात आवाज उठवण्याचे, प्रतिकार करण्याचे, मानसिक बळ स्त्रियांमध्ये निर्माण करणे व तक्रार दाखल करण्याचे धाडस त्यांच्या मध्ये निर्माण करणे आवश्यक आहे.

३) घरगुती हिंसाचाराकडे घरगुती मामला, पतीचा अधिकार म्हणून पाहण्याची समाजाची प्रवृत्ती बदलून पिडीत महिलेस मदत, हिंसाचार करणाऱ्या कुटुंबाचा निषेध, बहिष्कार केल्यास घरा-घरातील हिंसेला चाप बसेल.

४) कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायद्याची माहिती सर्वांपर्यंत पोहचण्यासाठी शाळा, महाविद्यालये, महिला मेळावा, परिषदा कार्यशाळांच्या माध्यमातून प्रयत्न करणे.

५) शासन, पोलिस, न्यायालये या यंत्रणांनी गुन्हेगारांना पाठीशी न घालता कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

अशा प्रकारे कायद्याबरोबरच इतर प्रतिबंधात्मक उपाय योजल्यास कौटुंबिक हिंसाचार रोखता येऊ शकेल.

### २.२.३ हुंडाप्रथा : कारणे व उपाय (Dowry : Causes and Remedies)

भारतातील हुंडाप्रथा स्त्रियांवरील हिंसेचेच एक रूप आहे. प्राचीनकाळी वधुपित्याकडून दागदागिने देऊन मुलीचे सालंकृत कन्यादान केले जात असे. त्याला धार्मिक संदर्भ होता. वरदक्षिणेची ही प्रथा पुढे राजकिय, आर्थिकदृष्ट्या उच्च वर्गातील लोकांमध्ये आपल्या वैभवाच्या व प्रतिष्ठेच्या प्रदर्शनाचे साधन बनली. आज या प्रथेने स्त्रियांचे अवमुल्यन करून स्त्रियांना देव-घेवीच्या वस्तुचे मूल्य प्राप्त झाले आहे. हुंडाप्रथेचे बाजारी स्वरूप विवाहात सौदेबाजीच्या रूपाने प्रकट होऊ लागले. समाजाच्या सर्व स्तरांमध्ये आता हुंडाप्रथेचं पालन केलं जातं. वधुपित्याने हुंडा व मानपान देणे आवश्यक बनलं आहे. त्यामुळे ज्या वधुपित्यांना हुंडा देणे शक्य होत नाही. सासरच्या होणाऱ्या मागण्या पुरवणं शक्य होत नाही. तेव्हा मुलीचा हुंड्यासाठी छळ केला जातो. हुंडाप्रथा हे कौटुंबिक हिंसाचाराचे प्रमुख कारण बनले आहे. त्यामुळे कित्येक वधु या छळाला कंटाळून मृत्युमुखी पडल्या आहेत तर कित्येक मुलींना जाळून मारले आहे. भारतातील एक सामाजिक समस्या म्हणून या घटकामध्ये आपण हुंडाप्रथेची व्याख्या व स्वरूप समजावून घेणार आहोत. तसेच हुंडाप्रथेची कारणे व त्यावरील उपाययोजना अभ्यासणार आहोत.

**हुंडाप्रथा अर्थ व व्याख्या (Dowry : Meaning & Definition) :**

हुंडाप्रथेचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी काही व्याख्यांचा अभ्यास करू.

**१) हेल्दी फेअरचाईल्ड :–** वधुच्या पालकांकडून किंवा जवळच्या आप्तांकडून वरास दिली जाणारी संपत्ती म्हणजे हुंडा होय. (Dowry is the property that is given by brides parents or close relatives to bridgroom)

**२) मॅक्स इंडियन :–** एखाद्या पुरूषास त्याच्या पत्नीकडून किंवा तिच्या कुटुंबाकडून तिच्या विवाहप्रसंगी मिळणारी संपत्ती म्हणजे हुंडा होय. (Dowry is the property wich a man receives from his wife or her family at the time of her marrige)

**३) हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ :–** ला अनुसरून विवाहाच्यावेळी किंवा विवाहानंतर विवाहातील दोन पक्षांपैकी एका पक्षाने दुसऱ्या पक्षाचा, कोणत्याही पक्षाच्या माता-पित्यांनी किंवा इतर व्यक्तींनी दुसऱ्या पक्षाला किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे दिलेली किंवा देण्याचे मान्य केलेली संपत्ती वा मौल्यवान वस्तू वा रोख रक्कम म्हणजे हुंडा होय.

**हुंडाप्रथा स्वरूप :**

प्राचीन काळी वधुपिता कन्येचे सालंकृत कन्यादान करत असे. भेटवस्तू, दागदागिने, वरदक्षिणा म्हणून दिल्या जात असत. पुढे ही हुंडाप्रथा राजे, सरदार, आर्थिक, राजकिय उच्च व प्रतिष्ठित वर्गामध्ये आपल्या सामाजिक दर्जाचे प्रदर्शन केले जात असे. नंतर इतर आर्थिक स्तरामध्ये हुंडाप्रथा इतकी प्रचलित झाली की तिला सामाजिक प्रथेचं स्वरूप प्राप्त झालं. हुंडाप्रथा सक्तीची बनली तेव्हा वधुपिता व वधुच्या छळाचे, शोषणाचे कारण बनली. विवाहातच नाहीतर विवाहानंतर मानपान, भेटवस्तू, रोख रकमेची मागणी होऊ लागली. मुलीचा छळ थांबेल म्हणून पूर्ण केल्या जाणाऱ्या मागण्या स्त्रियांच्या छळात अधिकच भर घालू लागल्या. पूर्वी रोख रक्कम लग्नाचा खर्च या स्वरूपात दिला जाणारा हुंडा आता फ्लॅट, इलेक्ट्रॉनिक वस्तू, कार, व्यवसायासाठी, नोकरीसाठी आर्थिक मदत, हनिमूनचा खर्च, डामडौलात लग्न, विशिष्ट स्थळी लग्न अशा मागण्यांच्या स्वरूपात बदल झाला आहे. या मागण्या पुऱ्या करताना वधुपिता कर्जबाजारी होतो. सासरकडून हुंड्यासाठी होणारा छळ व माहेरच्या लोकांची आर्थिक ओढाताण याचा मुलीच्या मानसिकतेत इतका परिणाम होतो की ती आत्महत्या करते. तर काहीवेळा सासरची मंडळी सुनेला मारून टाकतात. सासरच्या लोकांनी सुनेला विहिरीत ढकलून दिले, शॉक देऊन मारले अथवा जाळून मारल्याच्या कित्येक घटना घडल्याचे दिसून येतात.

आज समाजजीवनाच्या सर्वच क्षेत्रात स्त्री पुरूषापेक्षा कमी दर्जाची मानली जाते. आपले गौण स्थान हे स्त्रीजन्माचं पाप आहे असं समजून चालणाऱ्या बहुसंख्य स्त्रिया आहेत. मध्ययुगात स्त्रीला मालमत्तेचं स्वरूप प्राप्त झालं. स्त्रीचं अस्तित्त्व उंबऱ्याच्या आतच उरतं तेव्हा तिच्यासाठी लग्न हा केवळ एकच संस्कार उरला व नवरा हा तिचा स्वामी-मालक बनला. प्राचीनकाळी कन्यादान हे महादान मानल्याने त्याबरोबर काहीतरी दिले पाहिजे. त्यातून हुंडाप्रथा रूढ झाली. पारंपारिक हुंडापद्धत ही लग्नाच्या वेळीस मुलीस तिचा वारसाहक्क किंवा स्त्रीधन

म्हणून हस्तांतरीत केलेली रक्कम मानली जात असे. त्यामुळे मुलीच्या पित्यास सामाजिक दर्जा प्रतिष्ठा प्राप्त होत असे. त्यामुळे पुण्यही लाभते या कारणांमुळे ही प्रथा पुढे चालू राहण्यास मदतच झाली.

आज हुंडाप्रथेच्या स्वरूपाने मुलगी कुटुंबावरचे ओझे मानले जाऊ लागली आहे. काहीवेळा निम्नस्तरातील मुलींच्या विवाहत हुंड्याअभावी अडथळे येवू लागले आहेत. अशावेळी मुलीच्या पालकांची समाजात नाचक्की होते. त्यामुळे काहीही तडजोड करून मुलीचा विवाह केला जातो. काहीवेळा असे वैफल्यग्रस्त पालक आत्महत्या करतात तर काहीवेळा लग्न ठरत नाही म्हणून मुलीही मृत्युस कवटाळतात.

अलिकडे हुंडाप्रथेने नवे रूप धारण केले आहे. असे समर्थन केले जाते की हुंडा नव्या संसाराच्या उभारणीस मदत ठरतो, वराच्या शिक्षणाचा खर्च म्हणून घेतला जातो, हुंडा हा तिच्या सुखासाठीच आहे, बहिणीच्या लग्नात देण्यासाठी घेतला जातो, हुंड्याची प्रथा ग्रामीण, शहरी, आदिवासी व निम्न समुदायातही रूढ झाली आहे. पूर्वी हिंदू धर्मात असलेली ही प्रथा आज अल्पसंख्यांक समुदायातही मान्यता पावली आहे. संपूर्ण भारतामध्ये हुंडाप्रथा व हुंडाबळी समस्या निर्माण झाली आहे. हुंड्याची देवाण-घेवाण इतकी राजरोसपणे होत असते की त्याला आता सौदेबाजीचं स्वरूप प्राप्त झालं आहे. विवाह दोन व्यक्ती वा दोन कुटुंबाच्या मिलनाचा न राहता तो दोन कुटुंबाच्या आर्थिक सौद्याचा बनला आहे. विवाहानंतर सर्व सुरळीत होईल या आशेने छळ सोसला जातो. बऱ्याचवेळा आई-वडील मुलींच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करतात. पण जेव्हा मुलगी भाजून-जळून मरते तेव्हा आई-वडील सासरच्या मंडळींवर पोलीस केस करण्यासाठी धडपडतात.

हुंडाप्रथेने स्त्रियांच्या इतर समस्यात भर टाकली आहे. प्रौढ झाल्यावर जास्त हुंडा द्यावा लागेल या भितीने मुलींचे बालविवाह केले जातात. जास्त शिक्षण दिले तर त्याचा काही उपयोग नाही म्हणून त्यांना घरकामास लावले जाते. मुलीचा विवाह तिच्यापेक्षा वयाने मोठ्या पुरूषाबरोबर लावून दिला जातो. तर काहीवेळा हुंडा द्यावा लागू नये म्हणून वैराग्य असलेल्या, विधूर, वयस्कर व्यक्तींशी गरीब पालक विवाह करतात. अत्यंत गरीब कुटुंबात तर मुलींना विकून टाकले जाते, त्यांना अनैतिक मार्गाला लावले जाते. एकूणच हुंडाप्रथा स्त्रियांच्या समस्येत भर घालते.

मिनीस्ट्री ऑफ क्षेत्र अफेअर्स व राष्ट्रीय गुन्हे अहवालाचा आकडेवारीनुसार २००१ मध्ये हुंडाबळीच्या संख्या ६५८१ होती. २००२ मध्ये ६८२४ होती. २००३ मध्ये ६२४५ झालेली दिसेल. राष्ट्रीय महिला आयोगाच्या मते प्रत्यक्षात हुंडाबळी, हिंसाचाराच्या घटना अधिक आहेत. पण नोंद झालेली हुंडाबळीची संख्या कमी दिसते. हुंडाबळीच्या नोंदीनुसार भारतात दरवर्षी ६००० स्त्रीया हुंड्यासाठी बळी जातात. एकूणच हुंडाविरोधी कायदा अस्तित्त्वात असूनही स्त्रिया तक्रारीस पुढे येत नाहीत. तक्रार झाल तरी गुन्हेगारांना शिक्षेचे प्रमाण कमी असल्याचे दिसते. त्यामुळे स्त्रिया छळ सोसत राहणे योग्य मानतात. जेव्हा एखाद्या स्त्रीचा बळी जातो. तेव्हाच घटना उघडकीस येते. हुंड्यांचे मूल्यांकन केल्यास असे दिसते, हुंडा हा कुटुंबाच्या उत्पन्नाच्या पाचपट असतो. त्यामुळे भारतातील गरीब कुटुंबे जीवनभर कर्जाच्या ओझ्याखाली राहतात.

**हुंडाप्रथेची कारणे (Causes of Dowry) :**

हुंडाप्रथा रूढ होण्याची कारणे खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) पितृसत्ताक समाजव्यवस्था :-** भारतीय स्त्रियांच्या सर्व समस्यांचे मूळ पितृप्रधान संस्कृतीत आहे. समाजामध्ये स्त्रियांच स्थान दुय्यम आहे. लिंगभेदावर आधारीत श्रमविभागणी नैसर्गिक मानली जाते. स्त्रियांच्या हातात संपत्तीचा अधिकार नसतो. बाप, भाऊ किंवा नवरा यांच्या माध्यमातून तिचा सांपत्तीक दर्जा ठरतो. या सगळ्यामुळे स्त्रीची अवस्था स्त्रीची दुर्बल, असुरक्षित बनते.

**२) धार्मिक रूढी, परंपरांचा प्रभाव :-** हुंडाप्रथा प्रचलित झाल्यापासून तिला धार्मिक रूढी, प्रथापरंपरांचे अधिष्ठान दिले आहे. पशुधन, दागदागिने देऊन कन्यादान केल्यास मोक्षप्राप्ती होते. सालंकृत कन्यादान करणाऱ्या पित्यास समाजात मान-सन्मान, प्रतिष्ठा प्राप्त होते. मुलीला वारसाहक्काचा हिस्सा स्त्रीधन म्हणून दिल्याने कुटुंबाला सामाजिक दर्जा प्राप्त होतो. पुण्य मिळते. अशा रूढी हुंडाप्रथेमागे असल्याने त्या परंपरा काटेकोरपणे पोळल्या जाऊ लागल्या. आता लग्नात मिळविले स्त्रीधन, दागदागिने सासरची संपत्ती मानले जाऊ लागले आहे. त्यामुळे स्त्री रोख रक्कम मिळवण्याची साधन बनली आहे.

**३) जातीअंतर्गत विवाहाचे बंधन :-** भारतीय समाजात विवाहासाठी जोडीदार आपल्या जातीतून निवडण्याचे बंधन कटाक्षाने पाळले जाते. अशावेळी सुयोग्य वर निवडीस मर्यादा येतात. आपल्या मुलीचा उच्च कुळातील, प्रतिष्ठित घराण्यातील वर मिळावा या आकांक्षेने मुलीचे पालक जास्त हुंडा देण्यास तयार होतात. याचा फायदा घेऊन वरपितेही जास्तीत जास्त हुंड्याची मागणी करून सौदेबाजी करू लागले आहेत.

**४) उच्चवर्गियांचे अनुकरण :-** पूर्वी फक्त राजे, सरदार, धनिक, सत्ताधारी घराणी आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन करण्यासाठी मुलीचा विवाह थाटात करू लागले. अधिक हुंडा देऊन प्रतिष्ठा मिळवू लागले. या प्रथेचे अनुकरण भारतीय समाजात सर्वत्रच रूढ झाले. अगदी समाजाच्या खालच्या स्तरातील ग्रामीण भागातले लोक मुलीला कर्ज काढून हुंडा देऊ लागले. डामडौलात लग्न करून देऊ लागले. त्यामुळे आज भारतात सर्वत्रच हुंडाप्रथेन समस्येचं रूप धारण केलं आहे.

**५) शिक्षित, संपन्न वरास प्राधान्य :-** भारतात आजही मुलींना नाममात्र शिकण्याची संधी, आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास नकार देणारे पालक मुलीसाठी मात्र उच्च शिक्षित, श्रीमंत वर मिळावा ही अपेक्षा करतात. त्यासाठी कितीही हुंडा देण्याची त्यांची तयारी असते. त्यामुळे अशा श्रीमंत, शिकलेल्या वराकडून अधिक हुंड्याची मागणी होऊ लागते.

**६) हुंडा सामाजिक प्रतिष्ठा मिळवण्याचे साधन :-** अलिकडच्या काळात हुंडा किती दिला, किती घेतला याच्या उघड चर्चा होऊ लागल्या आहेत. जास्त हुंडा, जास्त प्रतिष्ठा मिळवण्याचे साधन बनू लागला आहे. त्यामुळेच सामाजिक प्रतिष्ठा उंचावल्याचे साधन म्हणून हुंडाप्रथा जास्त प्रमाणात रूढ होऊ लागली.

**७) वरपक्षाकडून हुंड्याचे समर्थन :–** वर जेवढा उच्चशिक्षीत तेवढी हुंड्याची रक्कम जास्त असते. मुलाच्या शिक्षणासाठी झालेल्या खर्चाची परतफेड वधुपक्षाने करावी अशी अपेक्षा ठेवली जाते. काहीवेळा मुलाच्या व्यवसायास मदत म्हणून, तर काहीवेळा वराच्या बहिणीच्या लग्नासाठी हुंड्याची तरतूद म्हणून हुंडा मागीतला जातो व त्याचे समर्थन वरपक्षाकडून केले जाते.

**८) मुलीच्या संसारास मदत हे वधुपक्षाचे कर्तव्य :–** जो काही हुंडा, भेटवस्तू, फ्लॅट, गाडी, दागिने दिले जाते ते तुमच्या मुलीसाठीच आहे. मुलीच्या संसारास मदत करणे वधुपक्षाचे कर्तव्यच असते. अशाप्रकारचे समर्थन हुंड्याची मागणी करताना वरपक्ष करत असतो. स्त्रीची प्रतिष्ठा वैवाहिक दर्जाशी जोडली गेली असल्याने मुलीला एकदा सर्व काही दिलं की ती सुखी होईल. आपण जबाबदारीतून मुक्त होऊ या भावनेने आई–वडील पाहिजे त्या गोष्टींचा पुरवठा करतात.

**९) लग्नाच्या बाजारात स्त्रीच्या बाह्यरूपास महत्त्व :–** भारतीय समाजव्यवस्थेत लग्नाच्या बाजारात स्त्रीचं दिसणं महत्त्वाचं मानलं जातं. त्यामुळे सावळ्या, दिसायला सर्वसामान्य असणाऱ्या किंवा एखादं वैगुण्य असणाऱ्या मुलींना जास्त हुंडा देऊन विवाह केला जातो. वरपक्षाकडूनही तशी मागणी केली जाते. कारण मुलीच लग्न होणं तिचं आयुष्य सासरघरी व्यतीत होणं भारतीय समाजाच्या केंद्रीयस्थानी रूजलेली संकल्पना आहे. त्यामुळे हुंडाप्रथा बळकट होते.

**१०) वरपक्षाची लालसी, उपभोगवादी प्रवृत्ती :–** आज समाजजीवनात उपभोगवादी जीवनशैली रूजली आहे. तर काहींना विनासायास मिळणाऱ्या संपत्तीची लालसा असते. अशा प्रवृत्तीचे वरपक्ष असतील तर विनाकष्ट, विनासायास, सहज मिळणाऱ्या संपत्तीमुळे त्यांची हाव वाढते. चंगळवादीवृत्तीचे लोक मग अशा प्रकारची मागणी सातत्याने करत राहतात.

**हुंडाप्रथा उपाययोजना :**

हुंडाप्रथेमुळे समाजावर अनेक दुष्परिणाम होत आहेत. हुंड्यासाठी छळातून अनेक वधुंवर आत्महत्येची वेळ आली आहे. तर काहीवेळा सासरच्या मंडळीकडून तिचा जाणीवपूर्वक बळी घेतला आहे. जोडीदार निवडीच्या अंतर्गत निवडीमुळे काहीवेळा अनुरूप जोडीदार निवडीस मर्यादा येतात. विवाह ठरविताना तडजोड केली जाते. विजोड विवाह केला जातो. कित्येकवेळा हुंडा देऊ शकत नसल्याने विवाह होत नाहीत. योग्य वयात विवाहास अडथळे निर्माण झाल्याने अनैतिक संबंधात वाढ होते. त्यातून मोठ्या प्रमाणात फसवणुकीचे प्रकार घडून येतात. कर्ज काढून हुंडा दिला असल्यास त्या कर्जात ते कुटुंब बुडून जाते. हुंडाप्रथेमुळे भ्रष्टाचार, गुन्हेगारी वाढण्यास मदत होते. एकूणच हुंडाप्रथा अनेक सामाजिक समस्यात भर घालते. म्हणून आपण आता हुंडा प्रतिबंधक कायदा व हुंड्यावरील उपयांची माहिती घेऊ.

**१) १९६१ चा हुंडा प्रतिबंधक कायदा :** हा कायदा हुंडाप्रथेस प्रतिबंध व्हावा व हुंडाबळीसारख्या घटना रोखल्या जाव्यात यासाठी करण्यात आला. या कायद्याने हुंडा देणे–घेणे गुन्हा मानण्यात आले. १९८४ व १९८६ मध्ये या कायद्यात दुरूस्त्या करण्यात आल्या. त्यानुसार या कायद्यातील तरतूदी खालीलप्रमाणे आहेत.

* जम्मू-काश्मिर वगळता सर्व राज्यांना लागू करण्यात आला.

* हुंडा घेणे हा अजामिनपात्र गुन्हा ठरतो.

* विवाहप्रसंगी वधुला मिळणाऱ्या भेटवस्तुवर तीचा मालकीहक्क आहे.

* हुंडा देण्यास-घेण्यास प्रात्साहन देणाऱ्या दोषी व्यक्तीस ५ वर्षे कैद व १५,००० रू. इतक्या दंडाची शिक्षा होऊ शकते.

* हुंड्याचे प्रकरण तडजोडीने परस्परात मिटवता येत नाही.

**२) भारतीय दंडसंहिता :-**

* दंडसंहिता कलम ३०४ ब नुसार विवाहानंतर सातवर्षाच्या आत एखाद्या स्त्रीचा अनैसर्गिक मृत्यू झाला व ती घटना निदर्शनास आणून दिल्यास असा मृत्यू हुंडाबळी मानला जातो,

* हुंडाबळी प्रकरणात दोषी व्यक्तीस किमान ७ वर्षे व जास्तीत जास्त आजन्म कारावासाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

* कलम ३०६ नुसार पत्नीला आत्महत्येस प्रवृत्त करणे हा गुन्हा ठरतो.

* कलम ४९८ नुसार पती वा त्याच्या नातेवाईकांनी केलेला विवाहितेचा शारिरीक, मानसिक छळ केल्यास दोषी व्यक्तीस २ वर्षे कैद व दंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

**हुंडाप्रथा प्रतिबंधात्मक उपाय :-**

**१) स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित करणे :-** पितृसत्ताक समाज रचनेमध्ये स्त्रियांचे असणारे दुय्यम स्थान, कुटुंबात असणारा सत्ता असमतोल, स्त्री बाबत केला जाणारा भेदभाव हुंडाप्रथेस पोषक ठरतो. त्यासाठी स्त्री-पुरूषामधील असमानता नष्ट करणे, विवाहानंतर मुलींना समाज मालकी हक्क देणे, आई-वडीलांच्या संपत्तीत वाटा, गृहिणीच्या घरगुती कामास मूल्य प्राप्त होणे. अशाप्रकारे बदल केल्यास स्त्रियांचे दुय्यमत्त्व कमी होण्यास मदत होईल.

**२) हुंडाप्रथे विषयी प्रबोधन करणे :-** हुंडारूपाने रोख रक्कम घेणे, भेटवस्तूची अपेक्षा करणे हे मानवी नैतिक मूल्य विरोधी वर्तन असल्याचे जनमाणसात रूजवणे, यातून स्त्रीचे अवमुल्यन होते याचे ज्ञान देणे. हुंडा देणे-घेणे ही प्रतिष्ठेची बाब नसून तो सामाजिक व कायदेशीर गुन्हा आहे. याबाबत जाणीव-जागृती करणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षणसंस्था, शासन, स्त्रीसंघटना, पोलीसयंत्रणा, प्रसारमाध्यमे यांच्या सहभागातून हुंडाविरोधी जाणीवजागृती व प्रबोधन केले पाहिजे.

**३) सामाजिक दबाव :-** हुंडाप्रथेचे पालन करणारे हुंड्यासाठी सुनेचा छळ यांच्यावर समाजाचे दडपण असणे महत्त्वाचे आहे. आपण करत असलेल्या कृत्यावर समाजाची नजर आहे. ते यामध्ये हस्तक्षेप करू शकतात याची जाणीव जरी झाली तरी अशा कृत्य करणाऱ्या व्यक्तींवर वचक बसेल. हुंडा घेऊन लग्न कारणाऱ्यांच्या

विवाहसमारंभावर बहिष्कार टाकणे, ज्या कुटुंबात स्त्रियांचा छळ होतो. त्यांना वाळीत टाकणे, अशाप्रकारे हुंडाप्रथा पालन करणाऱ्यांची समाजात अप्रतिष्ठा झाल्यास एकप्रकारे सामाजिक दबाव निर्माण होऊ शकेल. त्याचबरोबर हुंडा न घेणाऱ्या वराचा व त्याच्या कुटुंबियांचा जाहिर सत्कार केल्याने हुंडाविरोधी अनुकूल वातावरण निर्माण होईल.

**४) जातीअंतर्गत विवाहाची बंधने सैल करणे :–** पालकांनी ठरवून केलेल्या विवाहामध्ये सर्वसाधारणपणे सर्व प्रथांचे काटेकोर पालन होताना दिसते. जेव्हा वधु-वर स्वपसंती विवाह ठरवितात तेव्हा जात-पात, पैसा-संपत्ती, प्रतिष्ठा यांचा विचार केला जात नाही. ज्यामुळे समाजामध्ये अशा स्वपसंतीने होणाऱ्या विवाहांना प्रोत्साहन मिळालं पाहिजे. त्यासाठी पालकांबरोबरच, समाज, शासन, पोलीसयंत्रणा यांचा पाठींबा व मदत मिळाली पाहिजे.

**५) स्त्रियांचे सर्वार्थाने सक्षमीकरण झाले पाहिजे :–** अल्पशिक्षित, परावलंबी व प्रथा-परंपरामध्ये गुंतलेली स्त्री अधिक दुर्बल असते. म्हणून स्त्रियांना शिक्षणाची संधी दिली पाहिजे. शिक्षणाने आत्मविश्वास निर्माण होतो. व कोणत्याही परिस्थितीत सामोरे जाण्याची ताकद मिळते. शिक्षणातूनच नोकरीच्या, व्यवसायाच्या, अर्थाजनाच्या संधी मिळतात. अशा सर्वार्थाने सक्षम झालेल्या स्त्रिया स्वत:ला एकाकी समजणार नाहीत. नवरा टाकून देईल अशा दडपणाखाली जगणार नाहीत. स्वावलंबी स्त्रिया हुंडा देऊन लग्न करणे मान्य करणार नाहीत.

**६) समर्पण वृत्ती सोडून परिस्थितीशी धैर्याने सामोरे जाणे :–** स्त्री मनावर खोलवर रूजलेला स्वत:ला कमी लेखणारी समर्पण वृत्ती तीला सहनशील बनवते. अशावेळी सामाजिक दबाव झुगारून लढून योग्य तो मार्ग काढण्याचे धाडस स्त्रीने दाखवले पाहिजे. आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराला वाचा फोडली पाहिजे. हुंड्याची मागणी व त्यासाठी होणाऱ्या छळास धैर्याने विरोध केला पाहिजे. योग्य वेळी पती व कुटुंबीयांना मला कायद्याचा आधार घ्यावा लागेल अशी समज दिली पाहिजे. वेळ पडल्यास पोलीसात तक्रार नोंदविण्याचे धाडस दाखवले पाहिजे. अशाप्रकारे अन्यायग्रस्त स्त्रिया आपल्यावर होणाऱ्या अत्याचाराची वाच्यता करतील तेव्हा अशाप्रकारचे वर्तन करण्याऱ्यांसाठी वचक बसेल.

**७) कायद्याची काटेकोर अंमलबजावणी :–** हुंडाविरोधी कायदा होऊन पाच दशकं होऊनही हुंड्यासाठी छळाच्या व हुंडाबळीच्या घटनाचं प्रमाण कमी झालेलं दिसून येत नाही. कायद्यामध्ये असलेल्या उणीवांचा फायदा घेऊन हुंडा देणारे, हुंडा घेणारे, हुंड्यासाठी होणारा छळ वा बळी समाजामध्ये उजळ माथ्याने फिरताना दिसतात. त्या करीता या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. हुंडाबळीच्या केसमध्ये प्रतिष्ठीत घराणे, श्रीमंती, लागेबांधे, वरून येणारा दबाव या गोष्टी झुगारून पोलीसयंत्रणेणे काम केल्यास दोषींना शिक्षा होण्यास मदत होईल. हुंडाबळी वा छळाच्या प्रकरणातील दोषी व्यक्ती निर्दोष सुटू नये यासाठी न्यायालय व पोलीस यंत्रणेने सर्तकता बाळगली पाहिजे. हुंड्याच्या प्रकरणामध्ये दोषी व्यक्तीस शिक्षा होते हा संदेश पिडीत स्त्री व कुटुंबीयांसाठी दिलासादायक असतेच पण असा छळ सोसणाऱ्या स्त्रियांपर्यंतही हा सकारात्मक संदेश पोहचतो. त्यातूनच स्त्रिया आपल्या वर होणाऱ्या अन्याया विरोधात भक्कमपणे उभ्या राहतील.

### २.२.४ घटस्फोट : कारणे आणि उपाय (Divorce : Causes & Remedies)

विवाहाने स्त्री-पुरूष पती-पत्नी या नात्याने एकत्रित येतात व कुटुंब निर्माण होते. परंतु काहीवेळा कुटुंबातर्गत व्यवहार किंवा कुटुंबबाह्य परिस्थितीमुळे पती-पत्नीच्या नात्यामध्ये अंतर पडते. परस्पर संबंधात विसंवाद निर्माण होतो. पती-पत्नी नात्यामध्ये राहणे अशक्य होऊन जाते. तेव्हा विवाहविच्छेदाने वा घटस्फोटाने पती-पत्नीचे नाते संपुष्टात येते. कुटुंब विघटन घडून येते. स्त्रीच्या आयुष्यात घर हे केंद्रियस्थानी असल्याने घराचा त्याग, नवऱ्याने टाकून देणे (परित्यक्ता), घटस्फोट घेणे, बहुतांश स्त्रियांना स्विकारणीय नाही. जेव्हा पतीला घटस्फोट हवा असतो त्यावेळी भारतीय स्त्रीच्या मनोरचनेचा विचार करता ती कोणत्याही परिस्थितीत घटस्फोटास तयार होत नाही. अशावेळी पतीकडून पत्नीला मारहाण, छळ सुरू होतो. घटस्फोटाच्या कारणास्तव समाजात कौटुंबिक हिंसाचाराच्या, पतीच्या क्रूर वागणुकीच्या घटना घडतात. समाजसंरचनेतील मुलभूत अर्थाने महत्त्वाच्या कुटुंबसंस्थेमध्ये घटस्फोटाची व्याख्या व अर्थ, घटस्फोटाचे कायदे, घटस्फोटाची कारणे व घटस्फोटावरील उपाय आपण इथे पाहणार आहोत.

या घटकाची विभागणी तीन भागात केली आहे. पहिल्या भागात घटस्फोटाची व्याख्या व अर्थ स्पष्ट करण्यात आला आहे. दुसऱ्या भागात घटस्फोटाची कारणे स्पष्ट केली आहेत. तर तिसऱ्या भागात घटस्फोटाचा कायदा व घटस्फोटावरील उपाययोजना विशद केल्या आहेत.

**घटस्फोट अर्थ व व्याख्या (Divorce : Meaning and Definition) :**

घटस्फोटाचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी इथे काही व्याख्यांचा अभ्यास करू.

**१) डंकन मिचेल :-** विवाह विच्छेद ही अशी एक प्रक्रिया आहे की, जिच्याद्वारे वैध मानलेला विवाह पतीपत्नीच्या आयुष्यातून रद्द केला जाऊ शकतो व त्यानंतर ते अविवाहीत दर्जा या पूर्वपरिस्थितीवर येतात आणि पुर्नविवाह करण्यासाठी मुक्त होतात. (Divorce is the process by which a marriage, recognized as valid, can be revoked in the life time of the partners who than revert to single status and are free to remarry.)

**२) रॅंडन हॉऊस डिक्शनरी :-** विवाहाचे पूर्णत: किंवा अंशत: विसर्जन करणारी विशेषत: पती-पत्नी सर्व वैवाहिक बंधनापासून मुक्त करणारी न्यायालयीन घोषणा म्हणजे विवाह विच्छेद होय. (Divorce is a judicial declaration dissolving a marriage in whole or part especiallg. One that releass the husband and wife form all matrimonial obligations.)

**३) डब्ल्यू पी स्कॉट :-** समाजशास्त्र शब्दकोश - ''संस्थीकृत व्यवस्थेद्वारा वैवहिक संबंध संपुष्टात आणण्याची आणि प्रत्येक भागीदाराला पुर्नविवाहाचा अधिकार देण्याची प्रक्रिया म्हणजे घटस्फोट.'' (Divorce is an institutionalized arrangment for terminating the marriage relationship and allowing each parther the right to remarry.)

**घटस्फोटाचे स्वरूप :** हिंदू संस्कृतीत विवाह हा धार्मिक संस्कार मानला जातो. मृत्यूनंतरही हे बंधन तुटत

नाही अशी श्रद्धा आहे. समाजरचनेत कुटुंबसंस्था ही मुलभूत संस्था आहे. पती-पत्नीच्या वैवाहिक नात्याने कुटुंबसंस्था स्थापन होते. विवाह संस्कार अतूट बंध मानल्याने त्यामुळे शेवटपर्यंत हे नातं, सहजिवन कोणत्याही परिस्थितीत टिकून रहावं अशी समाजाची अपेक्षा असते. परंतू काहीवेळा पती-पत्नीमधील नातं विकोपाला जातं, एकत्र नात्यामध्ये राहणं अशक्य होतं तेव्हा घटस्फोटाचा विचार केला जातो. विवाहाने स्त्री-पुरूषाने एकत्र येऊन कामपूर्ती, प्रजनन, मुलांचे पालन-पोषण करावे, परिपूर्ण जीवन जगावे असे अपेक्षित असते. विवाहाद्वारे स्त्री-पुरूषांच्या जैविक, सामाजिक, मानसिक व आर्थिक गरजांची पूर्तता होत असते. अर्थातच या गरजा भागविल्या गेल्या नाहीतर पती-पत्नीमध्ये सुसंवाद रहात नाही. विवाहाचे बंधन त्यांच्यासाठी दुःखदायक बनते, परस्परातील बेबनाव, अविश्वास, भांडणे, यामुळे एकमेकांपासून वेगळे होण्याची, विवाहाचे बंधन तोडून घटस्फोट घेण्यास अनुमती दिली जाते.

प्राचीन काळी काही अटींवर घटस्फोट घेण्यास संमती दिल्याचे दिसून येते. वैदिक काळात घटस्फोटाचे संकेत मिळत नाहीत. पण स्मृती पाहिल्यास घटस्फोटाचा स्विकार झालेला दिसून येतो. त्यामध्ये पती बहिष्कृत झाला असेल, वेडाचाराने ग्रस्त असल्यास पत्नीस घटस्फोट मान्य केला आहे. मनुस्मृतीस नपुंसकता, वेडेपणा, सांसर्गिक रोगाने पिडीत पतीपासून घटस्फोट घेण्यास अधिकार दिल्याचे दिसून येते. कौटिल्याने अर्थशास्त्रात घटस्फोटाचा पुरस्कार केला आहे. परंतु मध्ययुगीन काळात घटस्फोट घेणे अयोग्य मानले. विवाह हा पवित्र संस्कार असून पती-पत्नीचे संबंध सात जन्मापर्यंत अतूट रहाते. अशी विचारसरणी त्या काळात दृढ झालेली दिसून येते.

१९ शतकाच्या अत्तरार्धात समजासुधारणा चळवळीस वेग आला. शिक्षणाचा प्रसार, क्षमता, न्याय, स्वातंत्र्य, बंधुत्त्व ही तत्त्वे उदयास आली. व्यक्तिस्वातंत्र्यास महत्त्व प्राप्त झाले. स्त्री-पुरूष समानतेच्या मागणीने जोर धरला. १९२० मध्ये कोल्हापूर संस्थानामध्ये घटस्फोटाचा कायदा संमत झाला. १९४२ मध्ये बडोदा राज्यात घटस्फोटाचा कायदा पास झाला. व १९४६ साली मुंबई राज्याने घटस्फोला मान्यता दिली. स्वातंत्र्यानंतर संपूर्ण भारतात विशेष विवाह कायदा १९५४ ला करण्यात आला व १९५५ ला हिंदू विवाह विषयक कायदा लागू करण्यात आला. १९५५ च्या कायद्याने घटस्फोटाची तरतूद हिंदू, जैन, बौद्ध व शिख या समुदायांना लागू करण्यात आली.

पूर्वी विवाह मातापित्याद्वारे निर्धारित होत असत. पती-पत्नींची सांस्कृतिक, पार्श्वभूमी, जीवननिष्ठा, ध्येयधोरणे सारखे असतं. पतीला देव मानून जीवन जगण्याची वडिलधाऱ्यांकडून सल्ला दिला जात असे. अशी समर्पित विवाहबंधनात मतभेदाची संधी नव्हती. पतीने पत्नीशी क्रुरतापूर्वक वर्तन केले तरी ते स्वाभविक मानले जात असे, त्यामुळे घटस्फोटाचे प्रमाण नगण्य होते. परंतु अधुनिक युगात औद्योगिकरण, शहरीकरण, स्त्रीशिक्षण, स्त्रीची आर्थिक सक्षमता, व्यक्तीवादी विचारसरणी, नविन कायदे, यामुळे घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहे. त्यासाठी वैवाहिक संबंध कसे टिकवून ठेवता येईल याविषयी समुपदेशन केले जाते.

पती-पत्नी परस्पर संमतीने घटस्फोट घेतात तेव्हा त्यांच्यामध्ये हिंसाचाराची शक्यता कमी असते. परंतु दोघांपैकी एकास घटस्फोट हवा असेल तर किंबहुना पत्नीस घटस्फोट नको असतो. त्यावेळा पती व काहीवेळा त्याचे कुटुंबिय तिने घटस्फोट द्यावा म्हणून छळ, हिंसाचार करतात. अशावेळी घटस्फोट घेणे योग्य ठरते.

कायदेशिररित्या विवाहबंधन संपुष्टात आले हे 'घटस्फोट' या शब्दाने सूचित करण्यात येते. विवाहविच्छेद, घटस्फोट या शब्दाला मराठीत काही समानार्थी शब्द वापरले जातात. काडीमोड, सोडचिठ्ठी, फारकत हे मराठीत वापरले जाणारे शब्द आहेत. तर, इंग्रजीमध्ये घटस्फोटासाठी (Divorce) हा शब्द प्रयोगात येतो.

**घटस्फोटाची कारणे (Causes of Divorce) :**

एकमेकांप्रती समर्पित भावनेने, कायमस्वरूपी विवाह संबंध टिकावेत या भावनेने एकत्रित आलेले पती-पत्नी नंतर घटस्फोटासाठी का तयार होतात. त्यांच्या संबंधामध्ये तणाव निर्माण होण्याची कोणती कारणे आहेत हे पाहणे गरजेचे आहे. घटस्फोटाच्या अनेक घटना घडतात. त्या प्रकरणांचा अभ्यास काही कारणांचे स्पष्टीकरण देतात. एकूण या कारणांचा आढावा घेतल्यास घटस्फोटास पुढील कारणे जबाबदार असल्याचे दिसून येते.

**१) लैंगिक व भावनिक प्रतिसादाचा अभाव :** पती-पत्नी संबंधामध्ये भावनात्मक संतुष्टी आवश्यक आहे. भावनिक प्रतिसाद, प्रेम, परस्पर सामंजस्य नसेल तर त्यांच्यामध्ये कोणत्याच प्रकारचे संबंध प्रस्थापित होण्यास अडथळा निर्माण होतो. याशिवाय वैवाहिक संबंधामध्ये लैंगिक गरजेची तृप्ती आधारभूत तत्त्व मानले जाते. पण जोडीदाराकडून शारीरिक गरजांचे समाधान होत नसेल तर त्यांच्या संबंधामध्ये तणाव निर्माण होतो. म्हणूनच विवाह संबंधात लैंगिक अतृप्ती व भावनिक पाठींब्याचा अभाव विवाह विघटन घडवून आणतो.

**२) विवाहबाह्य संबंध वा जोडीदाराची फसवणूक :** वैवाहिक जीवनामध्ये एकमेकांशी एकनिष्ठ राहून परस्परांच्या गरजांचे समाधान अपेक्षित असते. जोडीदारांपैकी कुणीही फसवणूक करून इतर स्त्री अथवा पुरूषाशी शारीरिक संबंध ठेवत असल्यास ते व्यभिचारी वर्तन मानले जाते. व्यभिचार समाज मान्य नसल्याने तो गुन्हा मानला जातो. विवाहबाह्य संबंध वैवाहिक संबंधामध्ये तणाव निर्माण करतात, असे जोडपे घटस्फोट घेण्यास प्रवृत्त होते.

**३) परस्पर विरोधी स्वभाव व जीवनाविषयक दृष्टीकोनातील भिन्नता :** वैवाहिक जिवनातील सौख्य पती-पत्नीच्या परस्परपूरक स्वभावावर अवलंबून असते. परंतू जोडीदारापैकी कुणीही भांडखोर, रागीट, एककल्ली, टिकाखोर व चंचल स्वभावाचे असेल तर त्यांच्यामध्ये विसंवाद निर्माण होतो. पती-पत्नीच्या आवडी-निवडी, जीवनविषयक दृष्टीकोन, अभिवृत्ती, श्रद्धा, विचारसरणी, इच्छा-आकांक्षा यामध्ये टोकाचे भिन्नत्त्व असेल तर पती-पत्नींना एकमेकांशी जुळवून घेणे कठिण जाते. त्यामुळे जीवन विषयक दृष्टीकोन व स्वभावातील भिन्नत्त्व घटस्फोटाचे कारण बनते.

**४) जोडीदाराची विकृत, क्रूर, वर्तणूक :** जोडीदारापैकी कुणाचेही वर्तन क्रूर वा विकृत स्वरूपाचे असेल तर ते घटस्फोटाचे कारण ठरते. संशयीवृत्ती, शारीरिक, मानसिक, लैंगिक छळ करणाऱ्या व्यक्तीच्या

वर्तनामुळे दुसऱ्या सदस्याला मानहानिकारक, अपमानास्पद जीवन जगावे लागते, क्रूर छळास सामोरे जावे लागते, जोडीदाराचे राक्षसी, क्रूर, स्वैर वर्तणूक जेव्हा असह्य होते तेव्हा ती व्यक्ती घटस्फोट घेण्यास प्राधान्य देते.

**५) जोडीदारांच्या वयातील अंतर :** भारतात बहुतांश वेळा मुलींचे विवाह लवकरच्या वयात केले जातात, आणि वर मात्र जास्त वयाचा असतो. पती-पत्नींना वयातील अंतरामुळे एकमेकांशी जुळवून घेणे अवघड जाते. वयातील अंतर पती-पत्नीच्या वर्तनावर, अभिवृत्तीवर परिणाम करते. बिजोड विवाहात प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचा पती व अल्लड वयाची पत्नी यांच्यात सुसंवादाचा अभाव निर्माण होतो. पती-पत्नींची कुचंबणा होते. त्यामुळेही अशी जोडपी घटस्फोटाच्या निर्णयाप्रत येतात.

**६) जोडीदार निवडीत पालकांच्या पसंतीस प्राधान्य :** पारंपारिक विवाह पद्धतीत जोडीदार निवडताना पालक व नातेवाईकांची पसंती महत्त्वाची मानली जाते. काहीवेळा त्यांनी निवडलेला जोडीदार पसंत नसतो. आई-वडिलांच्या आग्रहास्तव होकार दिलेला असतो. काहीवेळा पालकांकडून सक्ती केली जाते. अशा पसंत नसलेल्या जोडीदाराशी जुळवून घेणे कठीण जाते. असे नाते फार काळ टिकत नाही. कालांतराने अशा जोडप्यांचा घटस्फोट होतो.

**७) बाह्य आकर्षण व स्वप्नरंजनावर आधारित प्रेमविवाह :** अलिकडच्या काळातील सहशिक्षणाचा प्रसार, समाजाच्या विविध क्षेत्रात स्त्रियांचा वाढता वावर, आर्थिक स्वावलंबन, व्यक्तीवादी विचारसरणी या सर्वांमुळे स्त्री-पुरूषांना परस्परांच्या सान्निध्यात येण्याची संधी मिळते. अशावेळी स्वभाव, वास्तवता नजरेआड करून बाह्य आकर्षणाला भुलून विवाह केले जातात. चित्रपटातल्या प्रमाणे जीवन जगण्याचे स्वप्न पाहिले जाते. अशा विवाहात सुरूवातीचे दिवस अत्यंत समाधानात जातात. पण जेव्हा आकर्षण संपते, वास्तव प्रगट होते तेव्हा त्यांना एकमेकांतील उणिवा दिसू लागतात. पती-पत्नीमध्ये मतभेद होऊ लागतात. अशावेळी त्यांच्यामध्ये तडजोड न झाल्यास घटस्फोटाचा निर्णय घेतला जातो.

**८) वैवाहिक जीवनात नातेवाईकांचा हस्तक्षेप :** अलिकडच्या काळामध्ये मुलीच्या संसारामध्ये तिचे आई-वडील व नातेवाईकांचा हस्तक्षेप वाढला आहे. तिच्या संसारातील अत्यंत छोट्या, शुल्लक गोष्टी मध्ये लक्ष घातले जाते. सासरच्या लोकाविषयी बरेवाईट समज निर्माण केले जातात. त्यामुळे मुलीची मानसिकता द्विधा होते. काही वेळा दोन्ही पक्षाचे, आई-वडील, नातेवाईक, संसारात अजाववी हस्तक्षेप करत असतात. एकमेकांची उणी-दुणी काढली जातात. मानापमानाच्या बाबींचं भांडवल केल जाते व विनाकारण एकमेकांमध्ये द्वेषाची भावना पेरली जाते. त्यामुळे पती-पत्नी नात्यामध्ये तणाव निर्माण होतो हे प्रकरण घटस्फोटापर्यंत जाते त्यास नातेवाईकांचा हस्तक्षेप कारणीभूत ठरतो.

**९) आर्थिक व वित्तीय स्वातंत्र्याबाबत मतभिन्नता :** अधुनिक जीवनशैली व पारंपरिक विचारसरणी यातील गोंधळ पती-पत्नी नात्यामध्ये दुरावा निर्माण करते. पुरूषांच्या मते पत्नीने नोकरी करावी किंवा करू नये यासंबंधीच्या अपेक्षा भिन्न असतात. काहीवेळा पतीला पत्नीने नोकरी करू नये असे वाटते तेव्हा स्त्रीला आपले आर्थिक स्वातंत्र्य नष्ट होईल असे वाटते. तर काहीवेळा पतीला पत्नीने नोकरी करून संसारास हातभार लावावा

अशी इच्छा असते पण पत्नीला ते मान्य नसते. परिणामी पती-पत्नीचे संबंध बिघडतात. आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र स्त्री घरामध्ये आपल्याला समानतेची वागणूक मिळावी, आर्थिक व इतर निर्णय येण्याचे स्वातंत्र्य असावे अशी अपेक्षा करते. परंतू पारंपारिक विचारसरणीच्याा पतीला हे मान्य होत नाही. त्यातून एकमेकांविषयी संशय, अविश्वासाची भावना निर्माण होते. जी घटस्फोटास कारणीभूत ठरते.

**१०) अपत्यप्राप्ती न होणे :** कामवासनातृप्ती व वंशवृद्धी हे विवाहसंस्थेचे उद्दिष्ट मानले जाते. शास्त्रीय संस्कृती अपत्यप्राप्तीस अधिक प्राधान्य देते. याशिवाय पुत्रप्राप्ती झालीच पाहिजे ही अपेक्षा असते. मोक्षप्राप्ती, वंशसातत्य, मालमत्तेचा वारस पुत्रच असावा हे भारतीय संस्कृतीत महत्त्वाचे मानले जाते. अशावेळी एखाद्या स्त्रीस अपत्यप्राप्ती होत नसेल किंवा एखाद्या स्त्रीस फक्त मुलीच होत असतील मुलगा होत नसेल अशा दोन्ही कारणास्तव पत्नीला घटस्फोट देऊन दुसरा विवाह केला जातो.

**भारतातील घटस्फोट कायदा व घटस्फोटास आवश्यक अटी :**

**विशेष विवाह अधिनियम – १९५४** (Speial Marriage Act - 1945) **:**

या कायद्याच्या १३ व्या कलमानुसार पती किंवा पत्नीला खालील अटींच्या आधारावर घटस्फोट घेण्याची तरतूद करण्यात आली आहे.

**(अ)**

१. दुसरा पक्ष परपुरूष किंवा परस्त्रीशी संबध ठेवत असल्यास.

२. दुसऱ्या पक्षाने धर्मांतर केले असल्यास.

३. दुसरा पक्ष मनोविकृत, कुष्ठरोग वा गुप्तरोगाने पिडीत असल्यास.

४. दुसऱ्या पक्षाने अर्जदारास क्रुरपणाची वागणूक दिली असल्यास.

५. दुसरा पक्षाने संन्यास घेतला असल्यास.

६. दुसरा पक्ष सात वर्षापासून बेपत्ता आहे व तो जीवंत नाही अशी माहिती असल्यास.

७. दोन्ही पक्ष कायेदशीर विलगीकरणाच्या आदेशानंतर दोन वर्षे किंवा अधिक काळापर्यंत एकत्र आले नसतील तर.

**(ब) याशिवाय पत्नीस पुढील कारणांसाठी घटस्फोटाचा अधिकार देण्यात आला आहे.**

१. पतीने प्रथम पत्नी जिवंत असता विनासंमत्ती दुसरा विवाह केल्यास.

२. विवाहानंतर पतीने बलात्कार, अनैसर्गिक कृत्य संभोग, समलैंगिक संभोग वा क्रूरवर्तन केले असल्यास.

३. विभक्त होण्याच्या कायदेशीर आदेशानंतर पती-पत्नी किमान एक वर्ष दोघे एकत्र रहात नसतील तर.

**(क) परस्परसंमत्तीने घटस्फोटाच्या अटी.**

१. विवाहीत असूनही पती-पत्नी एक वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त काळ सोबत रहात नाहीत आणि पुढेही त्यांची एकत्र राहण्याची इच्छा नसल्यास ते परस्पर संमत्तीने न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज करू शकतात.

२ अशा प्रकारचा अर्ज विवाहानंतर एक वर्षाच्या आत करता येत नाही.

३. परस्पर संमत्तीच्या घटस्फोटाचा अर्ज आल्यानंतर न्यायालय समेट घडवून आणण्याकरीता सहा महिन्यांची मुदत देते त्यानंतर घटस्फोटाचा आदेश देते.

४. अपवादात्मक परिस्थितीत जोडीदाराचे वागणे अत्यंत असामान्य असेल, त्रासदायक असेल तर एकवर्षाच्या आतील घटस्फोटाचे अर्ज न्यायालय दाखल करून घेते.

**पुनर्विवाहाची तरतूद :-** घटस्फोटाच्या न्यायालयीन आदेशानंतर त्याविरोधात प्रतिपक्षाने वरच्या न्यायालयात अर्ज दाखल केला नसेल तर पुर्नर्विवाह करता येतो.

**न्यायप्रविष्ठ प्रकरणात आर्थिक मदतीचे आदेश :-** या कायद्याने पती-पत्नी पैकी एकाचे निर्वाह व कोर्टकचेरीचा खर्च करण्यास पुरेसे उत्पन्न नसल्यास तसा त्या पक्षाने अर्ज केल्यास न्यायालय निकाल लागेपर्यंत प्रतिपक्षास काही रक्कम दरमहा द्यावी असा आदेश देते.

**पोटगी व निर्वाह खर्च :-** अर्जदाराने न्यायालयात पोटगी व निर्वाह खर्च मिळावा अशी विनंती केली असल्यास या कायद्यानुसार प्रतिपक्षाची मालमत्ता, उत्पन्न, राहणीमान लक्षात घेऊन अर्जदारास रोख रक्कम, मासिक निर्वाह खर्च ह्यातभर द्यावी असे आदेश देऊ शकते. अर्थातच अर्जदार नोकरी अथवा व्यवसाय करत असल्यास पोटगी मिळण्याची शक्यता कमी असते.

**अपत्याचा ताबा :-** घटस्फोटाच्या या कायद्यानुसार वैवाहिक संबंधातून जन्मलेली अपत्ये वारसा हक्क व इतर अधिकारासाठी वैध ठरतात. अपत्याचा ताबा कोणाकडे असावा असा स्पष्ट निर्देश कायद्यात नाही. पण १९५६ च्या हिंदू अज्ञानत्त्व व पालकत्त्व कायद्याप्रमाणे अपत्याचा ताबा प्रथमत: पित्यास मिळतो. पण अपत्य पाच वर्षाचे होईपर्यंत ते मातेकडे राहते.

**घटस्फोटावरील उपाय (Remedies of Divorce) :**

घटस्फोटामुळे पती-पत्नींचे नाते संपुष्टात येते तेव्हा त्यांच्या जीवनात एकप्रकारची पोकळी निर्माण होते. कारण सहानुभूती, प्रेम, भावनिक पाठींबा देणारे कोणी नसते. पत्नीला घटस्फोट नको असताना मिळाल्यास ती निराधार बनते. स्त्रियांचे अपुरे शिक्षण, आर्थिक परावलंबन, यामुळे स्त्रियांच्या आर्थिक-सामाजिक संरक्षणाचा प्रश्न निर्माण होतो. विभक्त कुटुंबपद्धतीत तिचे माहेर जबाबदारी घेण्यास सक्षम नसते. त्यातून अनेक समस्या निर्माण होतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे घटस्फोटाचे गंभीर परिणाम माता-पित्यापेक्षा बालकांवर जास्त होतात. घटस्फोटीत व्यक्ती पश्चाताप, चिंता, आत्मविश्वासाच्या अभावातून वैफल्यग्रस्त होते. घटस्फोटाचे दुष्परिणाम

लक्षात घेता, पती-पत्नीचे वैवाहिक जीवन घटस्फोटाने उध्वस्त होऊ नये म्हणून काही उपाययोजना करता येतील. घटस्फोट रोखण्यासाठीचे उपाय खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१) पती-पत्नी नात्यात सुसंवाद व संतुलन असावे :-** मानवी जीवन व्यक्ती तितक्या प्रवृत्तीने भरलेले आहे. व्यक्तीची मूल्य, विचारसरणी, स्वभाव, वागणं, व्यक्त होणं, प्रतिक्रिया देणं, आनंदाची व दुःखाची कारणं, यामध्ये भिन्नता आढळून येते. पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीत हे सारं सामावून घेतलं जात होतं. आजही व्यक्तीवादी दृष्टीकोन बाजूला ठेवून एकमेकांच्या स्वभावातील भिन्नता जाणून घेऊन नात्यामध्ये सुसंवाद व संतुलन कायम ठेवल्यास, स्वभावातील दोष पाहण्यापेक्षा जोडीदाराचे चांगले स्वभाव गुणांचा प्राधान्याने विचार केल्यास वैवाहिक संबंधातील मतभेद कमी होण्यास मदत होईल.

**२) घटस्फोट घेण्यापूर्वी पुर्नविचार महत्त्वाचा :-** बऱ्याच जोडप्यांच्या नात्यामध्ये वितुष्ट शुल्लक कारणांमुळे येत असते व ते वेगळं होण्याचा निर्णय घेतात. अशावेळी घटस्फोटातून निर्माण होणारे भावनिक, आर्थिक, सामाजिक प्रश्न दोघांतील मतभेदांपेक्षा फार गंभीर परिणाम करणारे असतात. नात्यातील विसंवादापेक्षा विवाहसंबंध तोडण्याचे तोटे अधिक असतील तर घटस्फोटाच्या निर्णयाचा पुर्नविचार होणे आवश्यक ठरते. अशावेळी जोडप्याने विसंवादाची कारणे कशी दूर करता येतील. दोघातील तणाव दूर करण्यासाठी समुपदेशन करून घेतल्यास घटस्फोट टाळता येऊ शकतो.

**३) नात्यामध्ये समानता व सन्मानाची वर्तणूक :-** आजच्या युगात जुन्या प्रथापरंपरांना कवटाळून न बसता कुटुंबात पतीने पत्नीस समानतेची वागणूक दिली पाहिजे. कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत पत्नीस सहभागी करून घेतले पाहिजे. एकमेकांच्याकडे असणाऱ्या गुणांची कदर केली पाहिजे. एकमेकांच्या कामाचा आदर केला पाहिजे. त्यामुळे आपोआप त्यांच्यातील नाते अधिक घट्ट होण्यास मदत होईल.

**४) जोडीदाराच्या स्वतंत्र अस्तित्त्वाची जाणीव ठेवणे :-** काही पती-पत्नीच्या नात्यामध्ये दुसऱ्याला स्वतंत्र अस्तित्त्व हवं असतं. याची जाणीव ठेवली जात नाही. त्यातून एकमेकांच्या प्रत्येक बाबीत अवाजवी लक्ष घातलं जातं, टिका टिप्पणी केली जाते, हस्तक्षेप केला जातो, अनावश्यक सल्ला दिला जातो. अशा बंधनाचा काही वेळा जाच होतो. पती-पत्नी मधील सुसंवाद संपून जातो म्हणून एकमेकांसोबत राहताना काहीकाळ व्यक्तीला स्वतःच्या मनाप्रमाणे जगण्याचे स्वातंत्र्य दिल्यास वैवाहिक नात्यामध्ये संतुलन साधले जाते. पती-पत्नीचे नाते अधिक घट्ट होते.

**५) एकमेकांसाठी वेळ देणे :-** विवाहानंतर काही काळ सोडल्यास कौटुंबिक जबाबदाऱ्यांमध्ये पती-पत्नी इतके व्यस्त होतात, की एकमेकांची सोबत गृहीत धरली जाते व नात्यामध्ये तोचतोचपणा आल्याने दुरावा निर्माण होतो. अशावेळी केवळ एकमेकांसाठी, एकमेकांसोबत वेळ घालवणं, एकमेकांच्या आवडीकडे लक्ष पुरवणं, बाहेर पर्यटनाला, नाटक, सिनेमाला जाणं अशा गोष्टी केल्याने पती-पत्नीचं नातं अधिक घट्ट होतं.

**६) व्यक्तिगत पेक्षा दोघांच्या महत्त्वकांक्षांना प्राधान्य देणे :-** व्यक्तिगत महत्त्वकांक्षा पूर्ण करताना

आपण फक्त स्वत:चाच विचार करत आहोत का हे लक्षात घेतले पाहिजे. कारण प्रत्येकाच्या महत्त्वाकांक्षा मध्ये भिन्नता असते. आपल्या इच्छा, आकांक्षा, स्वप्न पुरी करताना आपल्या जोडीदाराचाही विचार केला पाहिजे. अशावेळी दोघांमध्ये संतुलन साधल्यास वा इतरांना आधी प्राधान्य दिल्यास एकमेकांमध्ये त्यागाची भावना निर्माण होते व कौटुंबिक ऐक्य वाढीस लागते.

**७) आर्थिक निर्णय प्रक्रियेत समन्वय साधणे :–** आर्थिक मिळकतीतून मुलांचा खर्च, शिक्षण, जीवनावश्यक गरजा, मनोरंजन, हौसमौज, चैनीच्या वस्तू, या खर्चामध्ये कशाला प्राधान्य द्यायला हवे. अशावेळी गरजांचा प्राधान्यक्रम ठरवणे, खर्चाच्या संदर्भातील एकमेकांची मते विचारात घेणे अत्यंत आवश्यक असते. दोघांच्या विचारातून, समन्वयातून आर्थिक निर्णय घेतल्यास दोघांमधील विसंवाद कमी होतील.

**८) तडजोडीचा प्रयत्न करणे आवश्यक :–** कुटुंब आहे तिथे मतभेद असतातच. वाद, भांडणे, गैरसमज सातत्याने होत असतात. पण हे वादाचे, गैरसमजाचे प्रसंग ज्या–त्या वेळी एकमेकांशी संवाद साधून मिटवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पती–पत्नीने एकमेकांच्या चुका पाठीशी टाकायला, माफ करायला शिकलं तर नातं टिकून राहतं. या जगात परिपूर्ण कुणी नसते. कुठे ना कुठे न्यून असते हे समजून घेतले तर एकमेकांना माफ करून तडजोडीने संसार केल्यास वैवाहिक जीवन सुखकर जाण्यास मदत होते.

**९) समुपदेशकाची मदत घेणे :–** पती–पत्नी मध्ये टोकाचे मतभेद होतात. एकमेकांसोबत राहणे शक्य नाही अशा विचाराने विभक्त होण्याचा निर्णय घेतला जातो. परंतु या शेवटच्या निर्णयाप्रत होण्यापूर्वी दोघांमधील वितुष्ट संपवता येते का हे पाहण्यासाठी मित्र, नातेवाईक, कुटुंबिय यांच्याशी मोकळेपणाने बोलले पाहिजे. काहीवेळा कौटुंबिक समुपदेशन केंद्रामध्ये जाऊन जोडप्याने मार्गदर्शन घेतले पाहिजे. त्यामुळे वैवाहिक बंध तुटण्याआधी सांधता येण्याची शक्यता असते.

**२.५ सारांश (Let Us Sum Up) :**

आपण कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ व व्याख्या समजून घेतल्या. कौटुंबिक हिंसाचार समाजात गंभीर रूप धारण केलेली सामाजिक समस्या आहे. म्हणून त्याची व्याप्ती समजून घेताना कौटुंबिक हिंसाचारामध्ये केल्या जात असलेल्या शारिरीक, मानसिक, लैंगिक, आर्थिक कृत्यांची माहिती घेतली.

कौटुंबिक हिंसाचारास कारणीभूत ठरणारे घटक पाहिले. त्यामध्ये स्त्रियांची दुर्बलता व परावलंबन, पतीचा विकृत स्वभाव व व्यसनाधिनता, संयशीवृत्ती, अपत्य प्राप्ती व पुत्रप्राप्ती न होणे, हुंडाप्रथा व जोडीदार निवडीवरील निर्बंध याची माहिती घेतली. त्यानंतर तिसऱ्या भागात कौटुंबिक हिंसाचारावरील कायदेशीर उपाययोजना भारतीय दंडसंहिता कलम ४९९ (अ) व कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा २००९ ची माहिती घेतली. तसेच कौटुंबिक हिंसाचाराचा प्रश्न केवळ कायद्याने संपुष्टात येणारा नसल्याने इतर प्रतिबंधात्मक उपयायोजनांचा अभ्यास केला.

हुंडाप्रथेच्या व्याख्या पाहिल्या व अधिक स्पष्टीकरणासाठी हुंडाप्रतिबंधक कायदा १९६१ ची व्याख्या अभ्यासली त्यानंतर हुंडा प्रथेचे स्वरूप अभ्यासले. प्राचीन काळापासून वारसाहक्क व स्त्रीधन प्रदान करणारी ही रूढी नंतर समाजाच्या सर्वस्तरामध्ये अनुकरणीय बनली. हुंडा देणे–घेणे आवश्यक मानले जाऊ लागले. स्त्रियांचे

अवमुल्यन झाले. हुंडाप्रथा स्त्रियांच्या छळास, बळीस कारणीभूत ठरली याचे विवेचन केले आहे.

हुंडाप्रथा रूढ होण्याची कारणे अभ्यासली त्यामध्ये पितृसत्ताक समाजव्यवस्था, धार्मिक रूढी व परंपरांचा पगडा, जाती अंतर्गत विवाहाचे बंधन, उच्चवर्गियांचे अनुकरण, शिक्षीत संपन्न वरास प्राधान्य, हुंडा सामाजिक प्रतिष्ठा मिळण्याचे साधन, वरपक्षाकडून होणारे हुंड्याचे समर्थन, मुलीच्या संसारासाठी मदत म्हणून हुंडा, स्त्रियांच्या बाह्यरूपास महत्त्व, वरपक्षाची लालसा, भोगवादी प्रवृत्ती इत्यादी कारणांचे विवेचन केले आहे. शेवटच्या भागात हुंडाप्रतिबंधक कायदा १९६१ व त्यामध्ये करण्यात आलेल्या १९८४ व १९८६ चे दुरूस्त केलेल्या तरतुदींची माहिती घेतली. त्यानंतर हुंडाप्रथेविरोधातील प्रतिबंधात्मक उपाययोजना स्पष्ट केल्या. त्य पुढीलप्रमाणे – स्त्री-पुरूष समानता निर्माण करणे, हुंडाप्रथेविषयी जाणीवजागृती प्रबोधन करणे, सामाजिक दबाव निर्माण करणे, जातीयअंतर्गत विवाह बंधने सैल करणे, स्त्रियांचे सक्षमीकरण करणे, समर्पण वृत्ती सोडून स्त्रियांनी धाडसाने अन्यायाविरूद्ध लढणे, कायद्याची कोटेकोर अंमलबजावणी करणे इत्यादींची आपण माहिती करून घेतली.

या घटकाच्या पहिल्या भागामध्ये आपण घटस्फोटाची व्याख्या व अर्थ पाहिला त्यानंतर प्राचीन काळापासून १९५४ कायदा लागू होईपर्यंत कोणत्या अटीवर घटस्फोटास मान्यता देण्यात येत असे. याची माहिती घेतली त्यानंतर घटस्फोटांच्या अनेक घटनातून काढलेल्या अनुमानद्वारे घटस्फोटाची सर्वसाधारण कारणे कोणती याचे विवेचन केले आहे. त्यामध्ये लैंगिक व भावनिक प्रतिसादाचा अभाव, विवाहबाह्य संबंध व जोडीदाराची फसवणूक परस्परविरोधी स्वभाव व जीवनविषयक दृष्टीकोनातील भिन्नत्त्व, जोडीदाराची विकृत व क्रूर वागणूक, जोडीदाराच्या वयातील अंतर, जोडीदार निवडीत पालकांच्या पसंतीस प्राधान्य, बाह्य आकर्षण व स्वप्नरंजनावर आधारित प्रेमविवाह, नातेवाईकांचा संसारातील हस्तक्षेप, आर्थिक व निर्णय स्वातंत्र्याबाबत मतभिन्नता, अपत्यप्राप्ती न होणे इत्यादी घटस्फोटाच्या कारणाचे विवेचन करण्यात आले आहे.

त्यानंतर विशेष विवाह अधिनियम १९५४ मधील पती-पत्नीस घटस्फोटास मान्यता देणाऱ्या अटी व तरतुदींचे विवेचन करण्यात आले. घटस्फोटाचे होणारे दुष्परिणाम अभ्यासून घटस्फोट होऊ नये म्हणून करण्यात येऊ शकणाऱ्या उपाययोजना स्पष्ट केल्या आहेत.

**२.६ स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न (Check Your Progress) :**

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या सांगा?

२) कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा कधी लागू करण्यात आला?

३) कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्यात कोणाच्या संरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे?

४) नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो नुसार १९९८ चे २००१ या कालावधीत किती कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांची नोंद झाली?

५) कौटुंबिक हिंसेला बळी पडणाऱ्यांसाठी हेल्पलाईन सेवा कुणी सुरू केली?

६) राष्ट्रीय कुटुंब स्वास्थ्य सर्वेक्षणाने कोणती बाब उजेडात आणली?

७) मानसिक हिंसेच्या कृत्यात कशाचा समावेश होतो?

८) स्त्रियांवर आर्थिक हिंसाचार कशाप्रकारे केले जातात?

९) स्त्रियांवरील कौटुंबिक हिंसाचाराची महत्त्वाची कारणे सांगा?

१०) कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक उपाय योजना सांगा?

१) हुंडाप्रथेचा अर्थ स्पष्ट करणारी व्याख्या लिहा?

२) हुंडा प्रतिबंधक कायदा कधी करण्यात आला?

३) प्राचीन काळी कन्यादान कसे केले जात असे?

४) हुंडाप्रथा सुरूवातीस कोणत्या वर्गामध्ये प्रचलित होता?

५) हुंडाप्रथेने स्त्रियांच्या कोणत्या समस्येत भर घातली?

६) भारतात दरवर्षी किती स्त्रिया हुंडाबळी जातात?

७) कोणत्या धार्मिक रूढी-परंपरामुळे हुंडाप्रथा रूढ झाली?

८) हुंडाप्रथेचे वरपक्षाकडून कशाप्रकारे समर्थन केले जाते?

९) हुंडाप्रतिबंधक कायदा दुरूस्तीनुसार महत्त्वाच्या दोन तरतूदी कोणत्या?

१०) भारतीय दंडसंहिता कलम ३०४ ब काय स्पष्ट करते?

१) घटस्फोटाची कोणतीही एक व्याख्या लिहा?

२) मनुस्मृतीमध्ये पत्नीस कोणत्या अटीवर घटस्फोटाचे अधिकार दिले होते?

३) कोणत्या कायद्याने संपूर्ण भारतात घटस्फोटास मान्यता देण्यात आली?

४) घटस्फोटाचा कायदा कोणत्या समुदायांना लागू होतो?

५) कोणत्या गरजांच्या पूर्ततेअभावी पती-पत्नी मध्ये तणाव निर्माण होतो?

६) जोडीदाराचे कोणत्या स्वरूपाचे वर्तन विकृत व क्रूर स्वरूपाचे मानले जाते?

७) विशेष विवाह अधिनियमातील घटस्फोटास मान्यता देण्याऱ्या कोणत्याही चार अटी लिहा?

८) विशेष विवाह अधिनियम कोणत्या अटीवर पत्नीस घटस्फोटास मान्यता देते?

९) घटस्फोटानंतर कायद्याने पुर्नविवाह कधी करता येतो?

१०) घटस्फोटास प्रतिबंध करणारे दोन उपाय लिहा?

**२.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to Check Your Progress) :**

१) कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या अन्थोनी गिडन्स :- ''कुटुंबातील एका सदस्याने दुसऱ्या किंवा अनेक सदस्यांच्या विरोधात केलेला शारिरीक दुरूपयोग म्हणजे कौटुंबिक हिंसाचार होय.''

२) कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ साली लागू करण्यात आला.

३) कौटुंबिक हिंसाचार कायद्यात पत्नी, बहिण, मुलगी, विधवा, लहान मुले व वृद्ध यांच्या संरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.

४) नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या नोंदीनुसार १९९८ चे २००१ या कालावधीत ४९१७० कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना घडल्या.

५) कौटुंबिक हिंसेला बळी पडणाऱ्यांसाठी तक्रार करण्याकरता 'नॅशनल कमिशन फॉर वुमेन' ने हेल्पलाईन सेवा सुरू केली.

६) स्त्रियांना कौटुंबिक हिंसा सर्वसामान्य बाब वाटते हे राष्ट्रीय कुटुंब स्वास्थ्य सर्वेक्षणातून उजेडात आली.

७) मानसिक हिंसेच्या कृत्यात अपमानस्पद वागणूक, टोमणे मारणे, धमकी देणे, दडपणाखाली ठेवणे, चारित्र्याचा संशय घेणे, कोणास भेटू न देणे या बाबींचा समावेश होतो.

८) स्त्रीला संपत्ती व धनावरील अधिकार नाकरणे, कमावत्या स्त्रीचा पगार काढून घेणे, तिच्या अन्न-वस्त्र, औषधउपचारास पैसे न देणे ही कृत्ये आर्थिक हिंसाचारात येतात.

९) स्त्रियांवरील कौटुंबिक हिंसाचाराची महत्त्वाची दोन कारणे पुढीलप्रमाणे - स्त्रियांची मानसिक दुर्बलता व परावलंबन, पुरूषाची विकृती व व्यसनाधिनता.

१०) कौटुंबिक हिंसाचारास प्रतिबंधक करण्यासाठी स्त्रियांना शिक्षण व अर्थार्जनाच्या संधी उपलब्ध करून देणे, हिंसाचारविरूद्ध प्रतिकार करण्याचे मानसिक बळ धाडस निर्माण करणे.

१) हुंडाप्रथेची व्याख्या हेन्री फेअरचाईल्ड :- वधुच्या पालकांकडून किंवा जवळच्या आप्तांकडून वरास दिली जाणारी संपत्ती म्हणजे हुंडा होय.

२) हुंडाप्रतिबंधक कायदा १९६१ ला लागू करण्यात आला.

३) प्राचीनकाळी पशुधन, भेटवस्तू, दागदागिने देऊन सालंकृत कन्यादान केले जात असे.

४) हुंडाप्रथा सुरूवातीस राजे, सरदार, आर्थिक राजकीय उच्च, प्रतिष्ठीत वर्गामध्ये प्रचलित होती.

५) हुंडाप्रथेमुळे स्त्रियांना शिक्षणासाठी नाकारण्यात येऊ लागले. बालविवाह, बिजोडविवाह करण्यात येऊ लागले. तसेच विधुर व वैगुण्य असलेल्या वराशी विवाह करण्यात येवू लागले. अशाप्रकारे स्त्रियांच्या समस्यात भर पडली.

६) भारतात दरवर्षी ६००० स्त्रिया हुंडाबळी जातात.

७) सालंकृत कन्यादान केल्याने मोक्षप्राप्ती होते, स्त्रीधन दिल्याने कुटुंबास सामाजिक दर्जा प्राप्त होतो, समाजात मान सन्मान मिळतो या धार्मिक रूढी परंपरामुळे हुंडा प्रथा सुरू झाली.

८) मुलाच्या शिक्षणासाठीच्या खर्चाची परतफेड, मुलाच्या व्यवसायास मदत, मुलाच्या बहिणीच्या लग्नासाठी हुंड्याची तरतूद अशाप्रकारे वरपक्षाकडून हुंड्याचे समर्थन केले जाते.

९) हुंडाप्रतिबंध कायद्यातील दुरूस्तीनुसार हुंडा घेणे हा अजामिनपात्र गुन्हा ठरतो व हुंड्याचे प्रकरण परस्परात तडजोडीने मिटवता येत नाही.

१०) भारतीय दंडसंहिता कलम ३०४ ब नुसार विवाहानंतर सातवर्षाच्या आत एखाद्या स्त्रीचा अनैसर्गिक मृत्यू झाल्यास व ती घटना निदर्शनासा आणून दिल्यास असा मृत्यू हुंडाबळी मानला जातो.

१) डकन मिचेल यांची घटस्फोटाची व्याख्या - ''विवाह विच्छेद ही अशी एक प्रक्रिया आहे की जिच्याद्वारे वैध मानलेला विवाह पती-पत्नीच्या आयुष्यातून रद्द केला जाऊ शकतो व त्यानंतर ते अविवाहीत दर्जा या पूर्वस्थितीवर येतात आणि पुर्नविवाह करण्यासाठी मुक्त होतात.''

२) मनुस्मृतीमध्ये पती नपुंसक, वेडेपणा व सांसर्गिक रोगाने ग्रस्त असल्यास पत्नीस घटस्फोटास अधिकार दिले होते.

३) विशेष विवाह अधिनियम १९५४ या कायद्याने संपूर्ण भारतात घटस्फोट मान्यता देण्यात आली.

४) घटस्फोटाचा कायदा हिंदू, जैन, बौद्ध व शिख समुदायांना लागू होतो.

५) लैंगिक व भावनिक गरजांच्या पूर्ततेअभावी पती-पत्नी मध्ये तणाव निर्माण होतो.

६) संशयीवृत्ती, शारीरिक, मानसिक व लैंगिक छळ करणारे जोडीदाराचे वर्तन विकृत व क्रूर स्वरूपाचे मानले जाते.

७) विशेष विवाह अधिनियमातील घटस्फोटाच्या अटी पुढीलप्रमाणे - (१) दुसरा पक्ष परस्त्री किंवा परपुरूषाशी शारीरिक संबंध ठेवत असल्यास. (२) दुसरा पक्ष अर्जदारास क्रूर वागणूक देत असल्यास. (३) दुसरा पक्ष मनोविकृत कुष्ठरोग वा गुप्तरोगाने पिडीत असल्यास. (४) दुसरा पक्ष सात वर्षापासून बेपत्ता असल्यास.

८) विशेष विवाह अधिनियम पत्नीस पुढील अटीवर घटस्फोट मान्यता देते - (१) पतीने पत्नी जिवंत

असताना विनासंमत्ती दुसरा विवाह केल्यास. (२) विवाहानंतर पतीने बलात्कार, अनैसर्गिक संभोग, समलैंगिक संभोग वा क्रूर वर्तन केल्यास.

९) कायद्याने घटस्फोटानंतर - घटस्फोटाच्या न्यायालयीन आदेशानंतर त्याविरोधात प्रतिपक्षाने वरच्या न्यायालयात अर्ज दाखल केला नसेल तर पुर्नविवाह करता येतो.

१०) घटस्फोटास प्रतिबंध करणारे उपाय - (१) नात्यामध्ये समानता व सन्मानाची वर्तणूक. (२) तडजोडीचा प्रयत्न करणे.

**२.७ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ (Exercise/Home Assignment) :**

१) कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ स्पष्ट करा.

२) कौटुंबिक हिंसाचाराची कारणे विशद करा.

३) कौटुंबिक हिंसाचारावरील उपाय स्पष्ट करा.

४) हुंडाप्रथेची व्याख्या व अर्थ स्पष्ट करा.

५) हुंडाप्रथेची कारणे लिहा.

६) हुंडाप्रतिबंधात्मक उपाय योजना विशद करा.

७) घटस्फोटाचा अर्थ व व्याख्या स्पष्ट करा.

८) घटस्फोटाची कारणे विशद करा.

९) विशेष विवाह अधिनियम - १९५४ मधील अटी व तरतूदी स्पष्ट करा.

१०) घटस्फोटावरील उपाय लिहा.

**२.८ चिंतन व कार्य (Reflection and Action) :**

तुमच्या निदर्शनास येणाऱ्या कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमागील कारणांची काळजीपूर्वक नोंद घ्या.

या पाठात दिलेल्या घटस्फोटाच्या कारणा व्यतिरिक्त पती-पत्नी नात्यामध्ये अनेक कारणांनी तणाव निर्माण झाल्याचे निदर्शनास येते. सामाजिक परिवर्तनाच्या पार्श्वभूमीवर पती-पत्नीमधील तणावाच्या कारणांचे टिपण तयार करा.

दैनंदिन वर्तमानपत्रामध्ये येणाऱ्या हुंड्यासाठी केलेल्या छळाच्या अथवा हुंडाबळीच्या बातम्या प्रसिद्ध होतात. अशा घटनांच्या नोंदीच्या व अशा घटनांमधील वेगळेपणाचे विश्लेषण करा.

## २.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings) :


१) रेहाना धीडयाली (संपा) - ''समकालीन भारतातील नागरी स्त्रिया'', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २००८.

२) गीता साठे -''भारतीय स्त्री जीवन'', मौज प्रकाशन, पुणे २०१०.

३) आशा खांडेकर-गवई - ''महिलांच्या मानव अधिकारांचे उल्लंघन'', सुगावा प्रकाशन, पुणे.''

४) विद्युत भागवत - ''समकालीन भारतीय समाज'', डायमंड पब्लिकशेन्स, पुणे.

५) विजय माऊलकर, दयावती पाडळकर - ''लिंगभाव आणि हिंसाचार'', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

७) चंद्रकांत खंडागळे -''लिंगभाव हिंसाचार.''

१) रेहाना घडियाली (संपा) - ''समकालीन भारतातील नागरी स्त्रिया'' डायमंड पब्लिकेशन, पुणे - २००८.

२) गीता साने - ''भारतीय स्त्री जीवन '' मौज प्रकाशन, पुणे - २०१०.

३) आशा खांडेकर-गवई - ''महिलांच्या मानव अधिकारांचे उल्लंघन'' सुगावा प्रकाशन, पुणे.

४) Ram Ahuja " Social Problems in India, Rawat Publications, Jaipur."

१) भा. कि. खडसे - ''भारतातील सामाजिक समस्या'' मंगेश प्रकाशन, नागपूर.

२) गीता साने - ''भारतीय स्त्री जीवन'' मौज प्रकाशन पुणे-२०१०

३) आशा खांडेकर-गवई - ''महिलांच्या मानव अधिकारांचे उल्लंघन'' सुगावा प्रकाशन पुणे.

४) विजय मारूलकर, दयावती पाडळकर - ''लिंगभाव आणि हिंसाचार'' फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५) चंद्रकांत खंडागळे - ''लिंगभाव आणि हिंसाचार''

६) विद्युत भागवत - ''समकालीन भारतीय समाज'' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.


* * *

# घटक - ३

# स्त्रियांच्या विरोधातील हिंसाचार

# ( Violence Against Women )

३.० प्रस्तावना

३.१ उद्दिष्टे

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ आदिवासी महिला हिंसाचार : स्वरूप आणि उपाययोजना

   Tribal women Nature and Remedies.

  ३.२.२ ग्रामीण महिला हिंसाचार: स्वरूप आणि उपाय योजना.

   Rural Women: Nature and Remedies.

  ३.२.३ नागरी महिला हिंसाचार:स्वरूप आणि उपाययोजना.

   Urban women: Nature and Remedies.

३.४ सारांश

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

३.६ सरावासाठीचे प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके.

## ३.१ उद्दिष्टे

सदर घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास.

१. आदिवासी महिला हिंसाचार : स्वरूप आणि उपाययोजना समजून घेता येतील.

२. ग्रामीण महिला हिंसाचार स्वरूप आणि उपाय योजना समजून घेता येतील.

३. नागरी महिला हिंसाचार स्वरूप आणि उपाय योजना समजून घेता येईल.

## ३.२ विषय विवेचन :

महिला विरुद्ध अत्याचार या घटकात आपण आदिवासी स्त्रीच्या हिंसाचाराचे स्वरूप आणि उपायोजना त्याचबरोबर आदिम स्त्रीचे सामाजिक विश्व या विषयी सविस्तर विवेचन करणार आहोत. त्याचबरोबर इतर महत्त्वाच्या घटकांचा अभ्यास करणार आहोत आदिम स्त्रीची असहाय्यता आणि अगतिकता या विषयीचे सूक्ष्म अध्ययन सदर पाठांमध्ये आपण समजून घेणार आहोत. आदिम स्त्री ही या व्यवस्थेत वंचित असताना दिसून येते. ती समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अलिप्त आहे. तसेच ती विकासापासून कोसोदूर आहे. तिच्या मानवी मूल्याचे अवमूल्यन होताना दिसून येत आहे. एक तर ती स्त्री म्हणून आणि दुसऱ्या बाजूने आदिवासी म्हणून ग्रस्त असताना दिसून येते आहे. प्रस्तुत घटकात आदिवासी मानवाच्या या बाबतीत व्यापक दृष्टिकोनातून आणि सर्वांगाने महत्त्वपूर्ण असे विवेचन करून काही मुद्दे हाताळले आहेत. त्याचबरोबर ग्रामीण स्त्रीचे स्वरुप आणि त्यावरील उपाययोजना याचे विवेचन हे सदर घटकात सर्वव्यापक दृष्ट्या केले आहे. ग्रामीण स्त्रीचा अभ्यास करत असताना तिची भूमिका, कार्यक्षेत्र जबाबदाऱ्या आणि वास्तव स्थिती याचा आढावा घेतला आहे. ग्रामीण स्त्री बरोबर शहरी स्त्री तिच्या समस्या स्वरूप आणि त्यावरील उपाययोजना या विषयीही सविस्तर माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच शहरी स्त्रीची वास्तव स्थिती आणि तिच्या समोरील आव्हाने याचाही आढावा सदर घटकांमध्ये घेतला आहे.

### ३.२.१ आदिवासी महिला : स्वरूप आणि उपाययोजना

### Tribal Women : Nature and Remedies.

आदिम स्त्री जीवनाविषयी जेव्हा जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो तेव्हा वरवर पाहता आदिवासी स्त्री नटून –थटून आलेली एखादी स्त्री पाहता क्षणी स्वच्छंदी आणि आनंदी असेल असे पाहणार्याला वाटेल. पण वास्तविक पाहता त्यांच्या जीवनात त्यांना किती स्वातंत्र्य आहे. त्याच बरोबर त्यांना कोणती बंधने नाहीत किंवा समस्या नाहीत असे दिसून येते. परंतु हे विचार आदिवासी भागांमध्ये प्रत्यक्ष जाऊन आल्यावर त्यांच्या चालीरिती, धार्मिक, सामाजिक, राजकीय व्यवस्थेचा अभ्यास केल्यावर विरून जातात. त्यांच्या या स्वच्छंदी जीवनाला एक दुसरी बाजू आहे जी अदृश्य आहे ती भयानक आहे. त्या महीला अनेक समस्याचा सामना करतात त्यांना असणारे अनेक समस्या असल्या तरी त्यातून त्या मार्ग काढतात. सदर घटकाच्या अभ्यासामध्ये आपणास आदिवासी स्त्रीचे समाजात असलेले स्थान त्यांच्या समस्या यांचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करण्याचा प्रयत्न करणार आहोत. आदिम समाजात स्त्रीचे स्थान संस्कृती ठरवत असते. या संस्कृतीच्या चौकटी मुळे त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. जर शिक्षणाचा प्रसार आदिवासी भागात झाला तसेच त्यांच्यातील अंधश्रद्धेचे निर्मूलन केले गेले तर त्या स्त्रियांच्या समस्या सोडवण्याचे हेतूने मदत होईल. आदिम हे दुर्गम भागात राहतात चोहोबाजूंनी जंगल स्वतःची स्वतंत्र अशी वेगळी भाषा त्याचबरोबर कृषी–आधारित आणि जंगलावर त्यांचे व्यवसाय आणि उदरनिर्वाह अवलंबून असतात. आज येथे अप्रगत व्यवस्थेत जीवन जगतात. मासेमारी, लाकूडतोड, मध गोळा करणे इत्यादी प्रकारचे व्यवसाय हे लोकं करतात. त्यांचे जीवन जंगल संपत्ती वर अवलंबून असते या

आदिवासी स्त्रियांना त्यांच्या समाजात काय स्थान आहे. याचा विचार करण्यापूर्वी आदिवासी संस्कृतीचे स्वरूप समजावून घेणे आवश्यक आहे. पण प्रगत अवस्थेतील शेती आणि शिकार ही समाजाची उपजीविका चालवणारी साधने आहेत. दुर्गम भागात राहत असल्यामुळे शहरी जीवनाशी संबंध तुटलेला आहे. त्यामुळे स्वतःची आचार-विचार पद्धती तयार झालेली आहे. या आचार पद्धतीच्या आधारे ते आपापसातील तंटे सोडवतात. त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्याचाही प्रयत्न करतात. या त्यांच्या प्रयत्नातून जादूटोणा या प्रथेचा उगम झालेला आहे. आजही या आदिवासी समाजातील महाराष्ट्रातील स्त्रियात जात मौखिक परंपरा दिसून येते. अशा तऱ्हेने राजकीय, धार्मिक, आर्थिक, सामाजिक अशा विविध अंगांनी आदिवासी संस्कृती तयार झालेली आहे.

आदिवासी आर्थिक व्यवहार साधे-सोपे आहे उद्याची काळजी करण्याची आवश्यकता नसल्यामुळे त्यांची वृत्ती बँका, पतपेढ्या इत्यादी संस्था यांच्यामध्ये ठेवी ठेवण्याचा पूर्णपणे अभाव दिसतो. आदिवासी संस्कृतीचे आर्थिक, सामाजिक,राजकीय आणि धार्मिक व्यवहार लिंगभेदावर आधारित असतात. या संदर्भात स्पष्टीकरण पूर्वापार असेच चालत आलेले आहे. म्हणून आदिवासी समाजामध्ये स्त्रीचे स्थान संस्कृती ठरवते. आदिम समाजामध्ये जन्माला येणाऱ्या मुलाचे सारख्याच पद्धतीने स्वागत केले जाते. आदिवासी मधील मुलगा किंवा मुलगी असा भेदभाव नसला तरीही लहानपणापासून त्यांच्यावर वेगवेगळे संस्कार केले जातात. मुलीला पुढे लग्न झाल्यावर घर काम करावे लागणार चुलमुल सांभाळावे लागणार या विचाराने तिला तसे शिक्षण दिले जाते. बालपणीचे खेळ ही तशाच प्रकारचे असतात. मोठी झाल्यावर घरकाम करण्यासाठी आईला मदत करते पाणी आणणे, जंगलातून इंधन आणणे, लहान मुलांची काळजी घेणे आदी बारीक सारीक कामे ती करत असते. आदिवासी संस्कृतीमध्ये विश्रामग्रहांना महत्त्वाचे स्थान असते. वयात आलेल्या मुले- मुली एकत्र येतात त्यांना तिथे भावी जीवनाबद्दल कसे वागायचे याचे शिक्षण मिळते. तरुण मुलांना आणि मुलींना शिक्षण देण्यासाठी असतात. आदिवासी स्त्रीला मासिकपाळी वेळी धार्मिक कार्यक्रमापासून बंदी घालण्यात येते. कोणत्याही धार्मिक प्रसंगी ती मंदिरात जाऊ शकत नाही तिला अपवित्र मानले जाते.

**वैवाहिक जीवन :**

लग्नापूर्वी आदिवासी स्त्रीला बरेच स्वतंत्र असते. परंतु लग्नानंतर मात्र तिच्यावर अनेक बंधने पडतात. असे असले तरी तिच्या बाहेर रूपाचा किंवा सौंदर्याचा वधूमूल्य याच्याशी संबंध येत नाही. बहुतेक सर्व आदिवासी जमातींमध्ये हे मुल्य ठरलेले असते. ते अंदाजे ४०० रू पासून १००० रुपये पर्यंत किंवा धान्याच्या पोत्यांच्या स्वरूपातही असते. कधीकधी वधूमूल्य म्हणून वधूला दागिने घातले जातात. आदिवासींमध्ये प्रचलित असलेल्या वधूमूल्य या प्रथेला सामाजिक आणि नैतिक महत्त्व अर्थ आहे. लग्नप्रसंगी वधूच्या आई-वडिलांना बऱ्यापैकी आर्थिक झळ लागते. काही वेळेस कर्जबाजारी व्हावे लागते. अशा वेळी वर पक्षाकडील लोक मदत म्हणून फूल ना फुलाची पाकळी ही वधू मूल्याच्या रूपाने वधू पक्षाला देतात. वधूमूल्याचे स्वरूप विनिमय मूल्य असे नसते. वधूमूल्य देण्यामागे वधूला विकत घेतली हि भावना त्याच्या स्वरूपात आपल्या होणाऱ्या सग्या सोयऱ्याना केलेली मदत असते. म्हणुनच वधूमूल्य या प्रचलित परिवाराला नैतिक, सामाजिक आशय आणि महत्त्व आहे. आदिम स्त्रीला भावी वर निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. लग्नाच्या बाबतीत घरातील कर्ती व्यक्ती पुढाकार घेत असते

तरी लग्न हे वधू आणि वर यांच्या विचारविनिमयानेच ठरते. वेगवेगळ्या आदिम समुदायांमध्ये कोळी नृत्य प्रसंगी विवाहाचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य मुलाला असते परंतु सदर विवाहाच्या प्रक्रियेमध्ये दोघांची संमती असणे गरजेचे असते. या प्रसंगी जर वधूची संमती नसेल तर विवाह होऊ शकत नाही. विवाहानंतर आदिवासी स्त्रीला प्रमुख दोन भूमिका पार पाडाव्या लागतात पहिली पत्नीची आणि दुसरी मातेची. आदिवासी समाजामध्ये स्त्री–पुरुषांनी कोणती कामे करावीत हे स्पष्ट असते. हलकी फुलकी सहज करता येण्याजोगी कामे स्त्रिया करतात. तर अवजड कामे पुरुष करतात असे असले तरी अनेकदा पुरुषांना करावे लागणार कामे ही स्त्रिया करताना दिसतात. मातृत्वा मुळे आदिवासी स्त्रीला समाजात विशेष स्थान प्राप्त होते. वांझोट्या स्त्री बद्दल समाजात आपुलकी नसते. ती डाकीण समजली जाते आणि अशा प्रसंगी पुरुष पहिल्या पत्नीशी घटस्फोट न घेता दुसरे लग्न करू शकतो. आदिवासी स्त्रीला घटस्फोट घेण्याच्या बाबतीत पूर्ण स्वातंत्र्य असते. नवऱ्याचा जाच त्याचे नपुसकत्व हे घटस्फोट घेण्याची काही कारणे होतात. अर्थात घटस्पोट घेण्यापूर्वी तिला तिच्या लग्नात मिळालेले वधु मुल्य परत करावे लागते. त्याशिवाय तिला घटस्फोट मिळू शकत नाही. आदिवासी समाजात स्त्रीला घटस्फोट सहज घेता येण्याजोगी कारण असेही असू शकेल की, या समाजात विवाह सामाजिक करार समजला जातो. तेथे आत्मसमर्पण किंवा स्वार्थत्याग अशी भावना नसते. पती–पत्नीचे एकमेकाशी पटले नाही तर ते दोघे विभक्त राहू शकतात.

**वैधव्य :** हिंदू समाजात स्त्रीचे वैधव्य सामाजिक दृष्ट्या आणि धार्मिक दृष्ट्या त्याज्य मानले जाते. तिला वैधव्य आले तर तिला त्याची फार मोठी किंमत द्यावी लागते. लग्न प्रसंगी तसेच अनेक मंगल प्रसंगी तिची उपस्थिती नाकारली जाते. विधवा स्त्रिया एकाकी पडलेल्या दिसतात. तरुण विधवा स्त्रियांची अवस्था तर फारच दयनीय असते. त्यामुळे असे म्हणावेसे वाटते की, विधवा स्त्रीने आपला केवळ नवराच गमावलेलाच नसतो तर समाजातील स्थान ही गमावलेले असते. आज स्त्रीचा पुनर्विवाह विवाह मान्य केला जात नाही. म्हातारपणी आदिवासी स्त्रीकडे तिची मुले लक्ष देताना दिसतात. तरुणपणी केलेले कष्ट आणि अल्पाहार यामुळे आदिवासी स्त्री लवकर वयस्कर दिसायला लागते. तिचे सौंदर्य नाहीसे होते वं ती कुरूप दिसते. म्हातारपण सुद्धा तिला करता येण्याजोगी कामे करीत असते. शहरातील वृद्धा प्रमाणे तिला वृद्धाश्रमांमध्ये राहावे लागत नाही. आजच्या बदलत्या जीवनात आदिवासी स्त्रिया मागे नाही स्वतःचे निर्णय स्वतः घेतात. दारूबंदी मध्ये त्यांचा सहभाग महत्त्वाचा आहे तसेच चिपको आंदोलनांमध्ये त्यांनी महत्वाची कामगिरी बजावली आहे. अनेक राजकीय आणि सामाजिक प्रश्न सोडवण्याचा त्या प्रयत्न करीत आहेत, स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रश्नांचे आकलन करण्याची शक्ती सुशिक्षित हिंदू स्त्री इतकी प्रगल्भ नसलेली ही किंवा प्रश्न सोडवण्याचे मार्ग रांगडी असतील पण त्यांचे प्रयत्न नक्कीच स्तुत्य आहेत. तेव्हा आपण आदिवासी स्त्रीच्या जीवनामध्ये येणाऱ्या विविध अवस्थांचा तसेच राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रातील त्यांच्या सहभागाचा अभ्यास करतो. तेव्हा असे लक्षात येते की, तुलनात्मकदृष्ट्या आदिवासी स्त्री ही हिंदू स्त्रिया पेक्षा पुढील बाबतीत जास्त स्वातंत्र्य उपभोगते आहे.

१. आदिवासी समाजात मुलगी आणि मुलगा यांच्यात भेदभाव केला जात नाही. त्या दोघांना एक प्रकारची वागणूक दिली जाते. त्यामुळे जन्माला येणाऱ्या मुलीचे स्वागत हे जन्माला येणाऱ्या मुलाप्रमाणेच केलें जाते.

हिंदू समाजात मात्र उलट परिस्थिती दिसते मुलगा हा कुळाचा वंशज मांनल्यामुळे व म्हातारपणी आई वडिलांचा आधार असल्यामुळे मुलीपेक्षा मुलांचे कौतुक जास्त होते. घरामध्ये तसेच समाजात दोघानाही वेगवेगळ्या प्रकारची वागणूक मिळते. गर्भलिंग  निदानाने यावर प्रकाश टाकला आहे.

२. आदिवासी समाजाने आदिवासी स्त्रीला आणि मुलीला बरीच मोकळी दिलेली दिसते. आदिवासी मुलीला आपला भावी वर  शोधण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. तसेच आदिवासी स्त्रीचे तिच्या पतीशी पटले नाही तर ती त्याच्याशी घटस्फोट घेऊन पुनर्विवाह ही करू शकते. तसेच विधवेचा पुनर्विवाह ही या समाजात मान्य आहे.

हिंदू समाजात अशी परिस्थिती दिसून येत नाही. हिंदू मुलगी कितीही शिकलेली सुशिक्षित असली तरी तिला तिचा पती निवडण्याचे स्वातंत्र्य नसते. आज हि तिला पारंपारिक पद्धतीने या प्रसंगाला सामोरे जावे लागते. तसेच खानदान, प्रतिष्ठा, इज्जत इत्यादीच्या नावाखाली ती इतकी दबलेली गेली आहे की, तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करते  पण घटस्फोट घेण्याचे धाडस करीत नाही. तीच गोष्ट विधवेच्या पुनर्विवाहाच्या या बाबतीत होताना दिसते.

३. आदिवासी समाजात आणि संस्कृतीमध्ये स्त्री ही जमेची बाजू आहे. पण ही जमेची बाजू तिला समाजात महत्त्वाचे स्थान मिळवून देण्यात यशस्वी झाले आहे. राजकीय, सामाजिक, धार्मिक बाबतीत तिची भूमिका नगण्यच मानली जाते. थोडक्यात: पारंपारिक हिंदू समाजात स्त्रियाना नेहमीच दुय्यम स्थान मिळाले आहे. तिने नेहमी सहाय्यकाची भूमिका करावी अशी समाजाची अपेक्षा असते. घरात तिने चूल आणि मूल सांभाळणे हेच तिचे काम घराचा उंबरठा हा समाजाने तिच्यासाठी आणि तिच्या कर्तुत्व साठी घातलेली जणू वचनचं. हे वचन तोडले तर तिने अघोरी कृत्य केले असा समज दिसतो. तिच्यात अनेक गुण असूनही ती पुरुषांशी बरोबरी करू शकत नाही. एवढेच नव्हे तर पारंपारिक पुरुषी वर्चस्व मुळे आणि त्यांच्या आवाजवी अहंकारामुळे तिची आज पर्यंत गळचेपी होत राहिली. तिचे गुण घरातील चार भिंतीतच कुजत राहिले तिला स्वतःचे विचार भावना अस्तित्व असू शकेल असा विचार करणे हे सुद्धा पुरुषी अहम मान्यतेला दुखावणारे,खुपणारे वाटते. या पुरुष प्रधान संस्कृती मध्ये ती कायम कोणावर ना कोणावर तरी अवलंबून आहे असे वाटते. याला अपवाद म्हणून आज कालच्या हिंदू सुशिक्षित स्त्रिया सामाजिक,राजकीय,आर्थिक क्षेत्रात महत्वाची कामगिरी बजावत आहेत असे दिसते. अर्थात हे स्थान तिने सामाजिक रूढी परंपरा विरुद्ध बंड करून मिळवलेले आहे. याच्या अगदी उलट परिस्थिती आदिवासी समाजात दिसते. घरामध्ये तिला पुरुषांच्या बरोबरीने स्थान असते. ती घरातील आर्थिक बाजू संभाळते. आज-काल राजकीय,सामाजिक कार्यातही भाग घेताना दिसून येते. घरातील पुरुषांच्या जाचाला तोंड देण्याचे सामर्थ्य जसे तिच्यात आहे. तसे बाहेर स्वतःच्या अब्रुचा रक्षणासाठी जंगल अधिकार्याच्या थोबाडीत ठेवून देण्याचे धाडस देखील तिच्यात आहे. अशा तऱ्हेने हिंदू स्त्री अपेक्षा आदिवासी स्त्री बऱ्याच प्रमाणात स्वतंत्र आहे याचा अर्थ असा नव्हे की आदिवासी स्त्रीला कोणत्या समस्या नाहीत. तिला ही समस्या आहे आणि या समस्या प्रामुख्याने आदिवासी संस्कृतीमुळे निर्माण झाल्या आहेत.

**१. आरोग्य विषयक समस्या :** आदिवासी स्त्रिया पुढील एक ज्वलंत समस्या आहे. आदिवासी स्त्री संस्कृतीमध्ये जमेची बाजू असल्यामुळे तिला अनेक प्रकारची कष्टाची कामे करावी लागतात. गरोदरपणी तसेच बाळंपणानंतर ही ती अनेक अवघड व अवघड कामे करते. त्यातच तिला अपुरे अन्न मिळते. परिणामी अशक्तपणा आणि इतर शारीरिक दुर्बलता याचे ती भक्ष बनते. तसेच त्या उपयोगात आणणाऱ्या अनेक जडीबुटीचा तिच्या आरोग्यावर परिणाम होतो.

**२. निरक्षरतेचे अधिक प्रमाण :** आदिवासी भागात जास्त प्रमाणात दिसून येते. पुरुष आणि स्त्री आदिवासींमध्ये स्त्रियांच्या निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. साक्षरतेचे प्रमाण आदिवासी स्त्रिया मध्ये कसे वाढवावे हा एक त्यांच्यापुढे महत्त्वाचा प्रश्न आहे. निरक्षरतेचे प्रमाण बायकांमध्ये आढळून काही कारणे आहेत. आदिवासी जमाती आर्थिक दृष्ट्या दारिद्र्यरेषेच्या खाली असलेली जमात. त्यामुळे आदिवासी मधील प्रत्येक व्यक्ती आपापल्या परीने संसाराला मदत करत असते. आई-वडिलांना आर्थिक मदत करण्यासाठी या मुली गुरांची राखण करणे दुसऱ्याच्या शेतात काम करणे वगैरे कामे करतात. याशिवाय यांच्यामध्ये असा एक समज आहे की, स्वयंपाक करणे आणि मुले सांभाळणे या व्यतिरिक्त स्त्रीला दुसरी कामेच नसतात. मुलगी कितीही शिकली तरी चूल आणि मूल हे तिला सांभाळावे लागते. असे असले तर मग तिला शिकून काय उपयोग ह्या कारणामुळे आश्रमशाळेच्या रूपाने ज्ञानगंगा दाराशी येऊन तिचा उपयोग तिला करून घेता येत नाही.

**३. आदिवासी मधील अंधश्रद्धा :** याला अनेक महिला बळी पडल्या आहेत. आदिवासीची अशी सुद्धा श्रद्धा आहे कि, स्त्री बाहेरची व्हायला लागली की, ती अशुद्ध आपवित्र बनते. तिच्या मते , जादुटोना करण्याची शक्ती घेऊन कोणत्याही चांगल्या गोष्टीला तिची नजर लागते. या समजुतीमुळे समाजात काही विपरीत घडले तर स्त्रीलाच जबाबदार धरून तिला अतिशय अमानुष वागणूक दिली जाते.

**४. वधूमूल्य आणि विधवेच्या पुनर्विवाहाची स्वातंत्र्य :** या दोन्ही पद्धती वरवर बघता स्त्रियांना मिळणाऱ्या स्वातंत्र्याच्या द्योतक असल्या तरी त्या फसव्या आहेत. वधुमूल्य याचा उपयोग तीलान होता तिच्या आई-वडिलांना होतो. वधूमूल्य तिला काहीच कळत नाही. त्यामुळे वधूमूल्य देण्याची किंवा घेण्यामागचा हेतू कितीही उदात्त असला तरी त्याचा काहीही उपयोग न होता घटस्फोट घेते त्यावेळी त्याची अडचण मात्र होते. कारण वधूमूल्य परत केल्याशिवाय मुलीला घटस्फोट मिळू शकत नाही. स्त्री ही मिळवती असली तरी त्या मिळकतीचा धनी तिचा नवरा असतो. त्यामुळे वधूमूल्य परत करण्याइतके पैसे तिच्या जवळ नसते. अशा परिस्थितीत ती घटस्पोट देऊ शकत नाही तीच परिस्थिती विधवा विवाहाच्या बाबतीत विधवेला विधुर मनुष्य अशीच लग्न करता येते. अशा तऱ्हेने वधूमूल्य आणि विधवेचा पुनर्विवाह या दोन्ही पद्धती फसवव्या आहे.

**५. आदिवासी स्त्रियांवर होणारे अत्याचार :** जुलूम कसे थांबवावेत हा एक ज्वलंत प्रश्न आदिवासी समाजापुढें आहे. जंगल अधिकारी,समाजसेवक वगैरे मंडळी आदिवासी स्त्रियांवर बलात्कार करतात. आदिवासी स्त्रियांवर होणारे अत्याचार थांबवायचे असतील तर त्यांच्या समस्या सोडवायचे असतील तर त्यांना शिक्षण देऊन सुशिक्षित केले पाहिजे. म्हणजे त्यांच्यातील अंधश्रद्धेचे निर्मूलन होईल आणि त्यांच्या समस्या सोडवण्यास मदत होईल.

स्त्रीयांच्या विरोधात होणाऱ्या हिंसाचाराच्या बाबतीत अशाच भिन्नता आढळतात आदिवासी स्त्री या हिंसेचा बळी पडताना आढळते. हिंसेचे स्वरूप ग्रामीण स्त्री, शहरी स्त्री आणि आदिम स्त्री किंव्हा विश्वातील कोणतीही स्त्री या व्यवस्थेचा बळी पडताना दिसून येते. जगातील पुरुष प्रधान व्यवस्था या स्थितीला जबाबदार आहे. लिंगभाव भेदाभेद यातून स्त्री जात बळी पडताना दिसून येते.

**आदिवासी महिला विरोधातील हिंसाचार स्वरूप :**

**(Nature of Violence against the Tribal Women) :**

भारतीय समाज विविधतेने समृद्ध असा समाज आहे. भारतामध्ये विविध धर्माचे, जातीचे, वंशाचे,भाषेचे,वर्गाचे लोक राहतात. भारतामध्ये या विविध धर्माच्या लोकांच्या विविध प्रथा परंपरा यांचे वास्तव्य आढळून येते. विविध भाषा, जाती, प्रथा, परंपरा असणारा हा भारत देश सांस्कृतिक कलागुणांनी समृद्ध असा देश आहे. अशाच भारत देशात अनेक जाती समुहा बरोबर अनुसूचित जमातीचे आदिवासी लोक ही राहतात. या आदीम समुदायाच्या भारतामध्ये अंदाजे ४०० पेक्षा अधिक जमाती असुन त्या विविध भारतीय प्रदेशांमध्ये विभागल्या गेल्या आहेत.२०११ च्या जनगणनेनुसार आदिवासी लोकसंख्या ही १०,४२,८१,०३४ इतकी होती. आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ८.६ टक्के इतके आहे. अशा या आदिवासी समाजात स्त्रीला अनेक हिंसाचारास सामोरे जावे लागते.

**१. लैंगिक हिंसाचार :**

लैंगिक सुख प्राप्तीच्या दृष्टीने स्त्रिच्या इच्छेच्या विरोधात केलेले लैंगिकता सूचक वर्तन किंवा कृत्य म्हणजे लैंगिक हिसाचार होय. सदर बाबीमध्ये स्त्रीकडे पाहणे, चाळे करणे, लैंगिक चित्रफिती दाखवणे यासाठी सामाजिक माध्यमे अथवा ईमेलचा, फेसबुक, व्हॉट्स ॲप या सारख्या माध्यमाचा वापर करणे, छेडछाड करणे, हावभाव करणे, स्त्री देहास स्पष्ट करणे, लैंगिक शब्दाचा उपयोग करणे, वेगवेगळे सांकेतिक शब्द वापरने इत्यादीचा समावेश होतो. आदिवासी स्त्री बाबतीत होणारा हिंसाचार हा आदिवासी स्त्री या बाबत अधिक प्रमाणात होतो. हा हिंसाचार आदीम पुरुषा ऐवजी बिगर आदिवासी पुरुषाकडून मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. भारत, अमेरिका, आफ्रिका, अलासका आशा विविध देशात त्याचं बरोबर भारतातील विविध राज्यात होणाऱ्या हिंसाचाराच्या घटना आपण रोजच प्रसारमाध्यमांच्या द्वारे ऐकतो. परवाच घडलेली मध्यप्रदेशातील घटना असो आलासका मधील घटना असू दे किंवा देशाच्या आणि जगाच्या इतर कानाकोपऱ्यात होणाऱ्या घटना असू द्या ही सातत्याची बाब ठरली आहे. आदिम समाज हा प्रथा-परंपरा आणि त्यांच्या सांस्कृतिक नियमांनी बांधलेला समूह आहे. या समूहामध्ये नियम तोडल्यास कडक शिक्षा करण्याची तरतूद आहे. त्याचबरोबर पारंपारिक आणि सांस्कृतिक नियमांचे उल्लंघन आदिवासी पुरुषाकडून घडून येत नाही. कारण त्याला जाणीव असते की, असे कृत्य घडून आल्यास कडक शिक्षा होऊ शकते. त्यामुळे या जमाती कडून लैंगिक हिंसाचाराची कृत्य सहसा घडून येत नाही. अपवादात्मक परिस्थितीमध्ये अशा प्रकारची घटना घडू शकते. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत वेगळ्या प्रकारे बिगर आदिवासी लोकांचा आदिवासी जमातीशी कोणत्या ना कोणत्या कारणाने संपर्क येऊ लागला त्यामुळे महिला हिंसाचाराचे प्रसंग सातत्याने घडत गेले. यामध्ये विविध विभागातील शासकीय कर्मचारी, व्यापारी,खाणमालक, ठेकेदार, सावकार विक्रेते इत्यादी बिगर आदिवासी लोक आदिवासी क्षेत्रात अतिक्रमण करू लागेल. आणि

यातूनच समाजाच्या मुख्य प्रवाहापासून कोसो दूर असलेल्या गरीब, निरक्षर, प्रामाणिक, साध्याभोळ्या आदिवासींचे विविध प्रकारे मानसिक, शारीरिक आणि आर्थिक दृष्ट्या शोषण सुरू झाले. या सूचना पैकी आदिवासी स्त्रीचे शोषण हा अतिशय भयावह आणि अमानवीय शोषणाचा गंभीर प्रकार समोर आला.

**२. शासकीय कर्मचाऱ्यांकडून होणारे लैंगिक शोषण :**

बहुतांशी आदिम समुदाय हा डोंगरकपारीत आणि जंगलाजवळ राहतो. या जंगलाजवळ अन्न वस्त्र निवारा या साधनांची तो गरज भागवतो निसर्गात मिळणारे गवत, डिंक, लाख, कंदमुळे, फळे, भाजीपाला, लाकूड यावर त्याचा दैनिक दिनक्रम पूर्ण करत असतो. शिकार आणि पशुपालन करत असतो आपला उदर निर्वाह करण्यासाठी तो स्थानांतरीत शेती करीत असतो. निसर्ग, झाडे, पशुपक्षी यांना तो आपल्या पूर्वजांचा अंश समजतो. आणि त्याची श्रद्धा, प्रार्थनास्थळ, देव-देवता यांचा अधिवास जंगलात असल्याची त्याची धारणा असते. म्हणून या जंगल कपारी मध्ये तो स्वतःचे आणि आपल्या समाजाचे अस्तित्व असल्याची धारणा आदिम समुदायाची असते. ब्रिटिश शासनाने जंगल विषयक कायदे केले. या कायद्यान्वये आदिवासी समुदायाला जंगलामध्ये प्रवेश करणे निषिद्ध करण्यात आले. परंतु आदिवासी है समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आणि त्याच्या उदरनिर्वाहाच्या साधनांसाठी त्यांनी जंगलात प्रवेश करून मधगोळा करणे, जंगलातील खाद्यपदार्थ गवत लाकूडफाटा गोळा करण्यासाठी गेलेल्या आदिवासी स्त्रियांना जंगलातील सरकारी कर्मचारी कित्येकदा चोर म्हणून पकडतात. त्यांना अमानुष मारहाण तर करतातच शिवाय त्यांना तुरुंगात टाकले जाते. कायद्याचा धाक दाखवून स्त्रीवर वरती अत्याचार केले जातात. त्यांना धमक्या दिल्या जातात. अनेक वेळा बलात्काराचा गुन्हा उघड होऊ नये म्हणून त्यांचा खूनही केला जातो अपहरण केले जाते. आदिवासी स्त्रीला पैशाचे आमिष दाखवून लैंगिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी प्रवृत्त केले जाते. स्त्रियांना वेठबिगार म्हणून कर्मचारी ठेवल्याचे अनेक उदाहरणे देता येतील. त्यांना अनेक प्रकारची सेवा प्रदान करण्यासाठी सक्तीने भाग पाडले जाते. त्या सेवेचा नकार दिलेल्या स्त्रियांना चोरीचा बनावट खटला दाखल करण्याची भीती घातली जाते. अशा प्रसंगी इच्छा नसूनही आपल्या समस्या आणि अस्मानी संकट पुढे आदिवासी स्त्री या जुलमाला सामोरी जाते. हिंसाचार प्रकरणी आदिवासी स्त्रीचे म्हणणे पोलिस अधिकाऱ्याकडून ऐकले जात नाही त्यांची तक्रार पोलिस ठाण्यामध्ये दाखल केली जात नाही. त्याचे कारण म्हणजे पोलीस कर्मचारी आणि जंगल कर्मचारी शासकीय कर्मचारी असल्याने परस्परांची बाजू घेऊन अशा गुन्ह्याला अभय देताना दिसून येतात. थोडक्यात शासकीय यंत्रणेकडून या हिंसाचारास काळजीपूर्वक पाहिले जात नाही व आदिम स्त्रीला न्याय मिळत नाही हे दुर्दैव म्हणावे लागेल.

**ब) औद्योगिक क्षेत्रात होणारा लैंगिक अत्याचार**

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये म्हणजेच ब्रिटिश कालखंडामध्ये आदिवासी भागांमध्ये विविध प्रकारच्या खाणी उद्योगधंदे सुरू झाले. याकामी उद्योग-धंद्यात अनेक आदिवासी महिला प्रामाणिक पणे कष्ट करू लागल्या. चहाची कॉफीची लागवड मोठ्या प्रमाणात सुरू झाली. या चहाच्या मळ्यात उद्योगधंद्यामध्ये कामगार वर्गाची आवश्यकता असल्याने दलालामार्फत अथवा ठेकेदारामार्फत आदिवासी लोकांना तसेच महिलांना काम मिळत. त्याना कामाची मजुरी मिळते. पण आदिवासी स्त्रीला कामाची मजुरी देताना मोठ्या प्रमाणामध्ये लैंगिक शोषणाचा बळी द्यावा

लागला. खाण मालक, कारखानदार, चहा, कॉफी मळ्याचे मालक त्यांचे नोकर हे देखील आदिवासी स्त्रियांच्या मानसिकतेचा गैरफायदा घेऊन या स्त्रियांना लैंगिक संबंध ठेवण्यासाठी भाग पाडत. अशा या होणाऱ्या शारीरिक अत्याचार रास विरोध करणाऱ्या स्त्रियांना त्यांच्या पतीला व स्वतः पीडिताला मारहाण केली जात. कामावरून काढले जात त्यांच्यावर आर्थिक नुकसानीचे गुन्हे टाकले जात. त्यामुळे चोहोबाजूने आदिवासी स्त्रीला आर्थिक आणि मानसिक संकटाचा सामना एकाच वेळी करावे लागे. अशा प्रसंगी आदिवासी स्त्री लैंगिक प्रसंगात बळी पडल्याचे दिसून येते. आदिवासी स्त्री-पुरुषांना काही प्रमाणामध्ये मद्यपानाचे व्यसन असल्याने कामाच्या ठिकाणी बिगर आदिवासी लोकांनी औद्योगिक क्षेत्रात मध्य विक्रीची दुकाने सुरू केली. प्रसंगी त्यांना उदार घेण्याची सवय लावून त्यांच्याकडून मंजुरीनंतर पैसे वसूल केले जातात. पैसे वसूल न झाल्यास त्यांच्या बदली आदिवासी स्त्रियांना त्यांच्याबरोबर लैंगिक संबंध ठेवण्यास भाग पाडले जाते. कित्येकदा व्यसनाधिन पती स्वतःच्या दारुच्या गरजेपोटी बिगर आदिवासी पुरुषाशी स्त्रीला लैंगिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी प्रवृत्त करताना दिसते. अशा प्रकारे आदिवासी स्त्रीला औद्योगिक क्षेत्रात लैंगिक अत्याचाराला सामोरे जावे लागते.

आदिवासी भागात राहणारे जमीनदार, सावकार व्यापारी हे सुद्धा मोठ्या प्रमाणामध्ये आदिवासी स्त्री यांच्या विरोधात मोठ्या प्रमाणामध्ये हिंसाचार करताना दिसून येतात. स्वतः जवळ असलेली अमाप संपत्ती आणि वासनेच्या असणारी भूक हाताशी असणारे भ्रष्ट शासकीय कर्मचारी, राजकीय नेते यांच्या आधारावर हे श्रीमंत लोक भाबड्या, गरीब आदिम समुदायाचा व त्यांच्या असहाय्यतेचा फायदा घेतात. स्वतःच्या घरात त्यांना गुलामासारखी वागणूक देतात. त्यांना वेठबिगार म्हणून राबवतात. आदिवासी अगदी तुटपुंजावेतनावर आपली गुजराण करतात. त्यामुळे आदिवासी हे जमीनदाराच्या उपकाराच्या ओझ्याखाली वर्षानुवर्षे दबलेले असतात पिचलेले असतात. आशा दबलेल्या पिचलेल्या समूहातील स्त्रीवर श्रीमंत, सावकार जबरदस्ती लैंगिक संबंध प्रस्थापित करत असतात. आपल्या दैनंदिन गरजा सण-समारंभ, उत्सव, धार्मिक विधी, लग्न अशा विविध कार्याचा प्रसंगी सावकार मंडळी आदिमाना कर्ज देतात, दारू पिण्यासाठी पैसे देतात, त्याचबरोबर व्याजदराने पैसे देतात आणि पैसे न दिल्यास वर्षानुवर्षे त्यांना गुलाम म्हणून वागणूक देतात. कित्येक वर्षे त्यांना राबवतात ते या सावकारांची कर्ज फेडू शकत नाहीत. प्रसंगी त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचार ते बळी पडतात. आदिवासी क्षेत्रात व्यापार करणारे दुकानदार आदिवासींना आवश्यक असणाऱ्या वस्तू उधार चढ्या भावाने विकतात. त्याचबरोबर उधारी न फेडणाऱ्या आदिवासी कुटुंबातील स्त्रियांचा लैंगिक छळ करतात. अशाप्रकारे जमीनदार, सावकार आदिवासी स्त्रीच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन वर्षानुवर्षे लैंगिक अत्याचार करतात.

### ड) लैंगिक हिंसाचाराचे आदिवासी समुदायावर होणारे परिणाम :

लैंगिक हिंसाचाराने मानवी वर्तनात अमुलाग्र परिवर्तन होते. यामुळे व्यक्तीचे वैयक्तिक विघटन घडून येते हिंसाचाराला बळी पडलेल्या स्त्रीला जगणे असह्य वाटू लागते. वारंवार आत्महत्येचे विचार तिच्या मनात येतात. तिची कार्यक्षमता कमी होते. या अपघातातून अशी स्त्री स्वतःला सावरू शकत नाही. अशा हिंसाचाराला बळी पडलेल्या स्त्रीलाच नव्हे तर संपूर्ण कुटुंबाला समस्यांचा सामना करावा लागतो. या समस्येतून उद्भवणाऱ्या शारीरिक समस्या निर्माण होतात. विविध प्रकारचे आजाराची लागण या स्त्रीला भोगावे लागतात. असे आजार

स्त्रीकडून पुरुषाकडे ही संक्रमित होताना दिसून येतात. त्यामुळे संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त होताना दिसून येते. आरोग्यासाठी होणारा महागडा खर्च त्यांना परवडत नाही. त्याचबरोबर आरोग्य बसणारे त्यांचे अज्ञान यामुळे कित्येकदा जीव जाण्याची त्यांची शक्यता असते. अशा आजाराचे परिणाम होऊन दुर्बलता, अकाली वृद्धत्व अशा विविध समस्यांचा सामना आदिवासींना करावा लागतो.

**२) आदिवासी स्त्रीबाबत होणारा कौटुंबिक हिंसाचार :**

हिंसाचाराच्या बाबतीत आदिम स्त्री चोहोबाजूंनी पीडित असल्याचे दिसून येते. इतर स्त्रियांच्या बाबतीत म्हणजे शिक्षित, उच्चशिक्षित, ग्रामीण, शहरी आदिम स्त्रीची परिस्थिती इतरांहून भिन्न आहे. त्याचबरोबर तिला असणाऱ्या समस्या आणि त्याची तीव्रता हि वेगळ्या स्वरूपाची आहे. ती शोषित आहे तिचे शोषण सातत्याने सुरू आहे.

**अ) आदिम स्त्रीला होणारी मारहाण :**

संपूर्ण विश्व हे पुरुष प्रधान आहे. पुरुष प्रधान संस्कृतीला संपूर्ण विश्वभर मान्यता असल्याचे दिसून येते. आदिवासींची कुटुंब व्यवस्था याला अपवाद नाही. श्रेष्ठ-कनिष्ठ, भेदभाव हा आदिम समुदायामध्ये सुद्धा पाहायला मिळतो. या भेदभावातूनच आदिम त्याच्या पत्नीला मारहाण करताना दिसतो. आणि त्यातून हिंसाचार घडतो. बिगर आदिवासी समाजाप्रमाणेच आदिवासी समाजात हि वेगवेगळ्या कारणाने स्त्रीला मारहाण केली जाते. त्यामध्ये व्यसनाधीनता, व्याभिचार, विरोध करणे, चारित्र्याचा संशय, पत्नीने पतीशी व त्याच्या इतर नातलगांशी सातत्याने भांडणे अशा अनेक कारणास्तव आदिवासी पुरुष हे पत्नीस मारहाण करताना दिसून येतात. अशा प्रसंगी आदिवासी स्त्रीची तक्रार पोलीस दप्तरी नोंद केली जात नाही. त्याचबरोबर त्यांच्या मध्ये कोणत्याही प्रकारची याविषयी जागृती नाही. इतर समाजाप्रमाणेच नवरा-बायकोच्या भांडणांमध्ये कोणी मध्यस्ती करायची नाही अथवा नवऱ्याने बायकोला मारहाण केल्यास त्यात वेगळे गैर नाही अशा प्रकारची समजून आदिवासी समाजात हि दिसते हे दुर्दैव आहे.

**ब) आदिम स्त्रीचा होणारा मानसिक छळ :**

आदिम स्त्रीला स्वतःच्या कुटुंबात पुरुषाकडून छळ होतो. अनेकदा तिचा छळ नातेवाईक व आप्तसंबंध आप्त संबंधात असणारे तिचे सगेसोयरे यांच्याकडूनही होताना दिसतो. यामध्ये स्त्रीला टोमणे मारणे, शिव्या देणे, आपमान करणे, लाथ मारणे, शिव्या देणे, निंदा करणे या बाबींचा समावेश तिला सतत धाक दाखवला जातो धमक्या दिल्या जातात.

**क) बाल विवाहामुळे होणारा अत्याचार :**

आदिमाच्या प्रथा परंपरेनुसार त्यांच्यामध्ये बालविवाह प्रथा नव्हती, परंतु उच्च जातीच्या अनुकरणाने त्यांच्यामध्ये बालविवाहाची प्रथा आली बाल विवाह करणाऱ्या जमातीमध्ये संथाळ, मुंडा, उराव, भिल्ल इत्यादी आदिम समाज जमातीचा समावेश होतो. ही प्रथा आदिम मुलीच्या दृष्टिकोनातून अनिष्ठ ठरली आहे. त्याचं कारण म्हणजे शारीरिक परिपक्वता न येताच मुलींच्या बरोबर शारीरिक संबंध प्रस्थापित केले जातात आणि त्यातून अपत्य

प्राप्ती होते. अवेळी आलेल्या गर्भधारण आणि जबाबदाऱ्या यामुळे लहानपणातच कौटुंबिक जबाबदारी स्वीकारावी लागते. यातून शारीरिक समस्या निर्माण होतात. स्त्रिया दगावतात बालकेही दगावतात कुपोषणाचे प्रमाण वाढते.

**ड) विवाह जोडीदार निवडण्याच्या प्रक्रियेतून वाढणारा हिंसाचार :**

अनेक आदिवासी जमाती बिरहोर, हो, संथाल, कमार, ऊरावं, मुंडा, वारली, कोलाम, कोरकु इ. आदिवासी समुदायामध्ये अनादर विवाह, घरगुशी विवाह प्रकाराच्या विवाहामध्ये स्त्री ही आपल्याला आवडत असलेल्या पुरुषाच्या घरी स्वतः राहायला जाते. या विवाह प्रकारात मध्ये तिला नांदवण्याची इच्छा जर पुरुषाची नसेल तर तो त्या स्त्रीला शारीरिक व मानसिक त्रास देतो मारहाण करतो उपाशी ठेवतो कष्टाची कामे देतो. विविध प्रकारे तिचा या विवाह प्रकरामध्ये छळ केला जातो. थोडक्यात ही त्या स्त्रीचे एक प्रकारची परीक्षा असते. यामध्ये त्या स्त्रीचा जीव सुद्धा जाऊ शकतो. या प्रकारात सासरच्या मंडळीकडून तरुणीचा मोठ्याप्रमाणात छळ होतो. परंतु विवाहानंतर याची तीव्रता कमी येते. पण पुढे तिला त्या कुटुंबात योग्य तो सन्मान मिळतो. म्हणजे त्या स्त्रीला असंख्य वेदना अवहेलना सहन केल्यानंतर त्या कुटुंब तिला पत्नी म्हणून स्थान मिळते. हा एक प्रकारचा जोडीदार निवडण्यासाठीच्या तिचा मानसिक छळ म्हणावा लागेल.

**३) सामाजिक हिंसाचार :**

आदिवासी स्त्रियांच्या विरोधात काही हिंसाचाराच्या घटना घडतात त्यापैकी काही प्रमुख घटना याचा आढावा पुढील प्रमाणे.

**अ) विवाहाचा जोडीदार निवडण्याच्या मार्गामुळे होणारा हिंसाचार :**

आदिवासी समाजामध्ये स्त्रियांचे अपहरण करून तिच्याशी विवाह करण्याच्या प्रथा आढळतात. या विवाहाच्या प्रकारांमध्ये पुरुषाला आवडणारी स्त्री तिच्या घरात तो स्वतः जाऊन अथवा त्याच्या मित्रपरिवार किंवा नातेवाईक याद्वारे स्त्रीच्या कुटुंबावरती हल्ला करतो. तिच्या कुटुंबांना जखमी करतो. स्त्रीला मारहाण करतो व पळून जातो अशा प्रसंगी अनेक वेळा स्त्रीच्या कुटुंबातील लोक जखमी होतात. त्याचबरोबर मृत्युमुखी पडतात. उत्तर ब्राझील या देशात ही परंपरा दिसून येते. त्याचबरोबर भारतातील नागा जमातीत सुद्धा हा प्रकार दिसून येतो. काही प्रमुख जमाती मध्ये वधूमूल्य ची रक्कम देण्यासाठी तरुणाकडे वधूमूल्य नसल्यामुळे तो अशा प्रकारच्या विवाहाचा मार्ग निवडतो व आदिम स्त्रीशी जबरदस्तीने विवाह करतो. महाराष्ट्रातील कोलाम जमातीमध्ये हा विवाह प्रकार आढळतो. काही जमातीत दुसऱ्या जमातीवर हल्ला करून तेथील संपत्ती बरोबरच स्त्रियांनाही लुटले जाते व त्यांच्याशी विवाह केला जाई. अशा विवाहाच्या प्रकारांमध्ये स्त्री यांच्याविरोधात शारीरिक व मानसिक हिंसाचार मोठ्या प्रमाणात घडून येतो. आज अशा कारण आज कायद्याने प्रतिबंध घातला आहे. तरीसुद्धा असे असले तरी अपहरण पूर्णता थांबलेले दिसून येत नाही. आज भारतातील मारिया गोंड, खारिया, संथाळ, बिरहोर,वारली इत्यादी जमातींमध्ये ही प्रथा अस्तित्वात आहे. अपहरणाचे केवळ नाटक केले जाते. खरे अपहरण अपवादात्मक परिस्थितीमध्ये आढळते.

### ब) टोळीयुद्धातून होणारा हिंसात्मक :

या हिंसाचाराच्या प्रकारांमध्ये दोन समूह परस्पर शत्रुत्व भावनेतून असतात यातून परस्पर समूहांच्या हत्या सारखी प्रकरणे समोर येत असतात. शत्रू सुडाच्या भावनेतून आपल्यातील समूहाला समजेल या भीतीतून आपल्या समूहातील निर्दोष स्त्रीचा बळी घेतला जातो. आणि असे भासवले जाते की शत्रु पक्षाने आमच्या समूहातील स्त्रीचा अनैतिक संबंधातून खून केला, कारण शत्रुपक्षाचे आमच्यात समूहातील स्त्रीशी अनैतिक संबंध होते व तो तिला पळवून नेत होता म्हणून अशा प्रकारे हत्या घडली. परिणामी हा हल्ला रोखण्यासाठी स्व: समूहातील निर्दोष स्त्रीचा अशा प्रकारे बळी दिला जातो. म्हणजे या प्रकारांमध्ये स्त्रीला तिचा जीवही गमवावा लागतो.

**थोडक्यात :** माणसाच्या नैसर्गिक हक्काचे संरक्षण करणे हे शासन व्यवस्थेचे महत्त्वाचे कार्य आहे. कल्याणकारी राज्यांमध्ये जनतेचे हित जपणे हे प्राथमिक कर्तव्य आहे. वरील विश्लेषण पाहता असेल तर आदिवासी स्त्री वर शासकीय यंत्रणेतील कर्मचा-याकडून होणारा हिंसाचार ही बाब क्लेशदायक आहे. गरीब, दुबळ्या, भाबड्या आदिवासी स्त्रियांचा होणारा हिंसाचार हा संपूर्ण मानवतेला काळीमा फासणारा आहे. एक कलंक आहे. अशाप्रकारे शासकीय लोक सेवकाकडून होणारा जुलूम व अत्याचार ही बाब अमानवीय आहे. त्यांना कायद्याचा धाक दाखवून खोट्या केसेस दाखल करणे, त्यांचे शोषण करणे, खोटे आरोप ठेवणे, त्यांना अटक करणे आणि सुटकेच्या मोबदल्यात आदिवासी पुरुषाच्या कुटुंबातील स्त्रियांचा लैंगिक उपभोग घेणे हे भयाण वास्तव आहे. कित्येकदा या स्त्रियांना पोलीस कोठडीत डांबून त्यांच्यावर सामूहिक अत्याचार केल्याची उदाहरणे देता येतील. याप्रकारे आदिवासी स्त्रियांच्या विरोधात शारीरिक, मानसिक आणि लैंगिक हिंसाचार होताना दिसून येतो.

### आदिवासी स्त्रियांच्या विरोधात होणाऱ्या हिंसाचारा बाबतीत उपाय योजना

आदिवासी स्त्रीच्या बाबतीत होणारा हिंसाचार हा विविध प्रकारे आहे याचे आपण विश्लेषण केले आहे. आदिम स्त्रीचा बिगर आदिवासी पुरुषाकडून होणारा संघर्ष अधिक व्यापक व गंभीर स्वरूपाचा आहे. त्यासाठी काही उपाययोजनांची आवश्यकता आहे त्यात पुढील प्रमाणे.

### १. घटनात्मक तरतुदी :

भारतीय राज्यघटनेने पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना त्यांचे नागरी हक्क व मूलभूत अधिकार दिलेले आहेत. त्या हक्काचा आणि अधिकाराचा उपयोग करून आदीम स्त्री समाजामध्ये स्वतःची प्रगती करू शकते. त्याच बरोबर मार्गदर्शक तत्त्वांचा ही उपयोग तिच्या प्रगतीसाठी करू शकते. भारतीय राज्यघटनेने कलम ३२ नुसार घटनात्मक अधिकार दिले आहेत. कलम १४ नुसार पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही कायद्यापुढे समानता आहे. कलम १५ नुसार धर्म वंश जात जन्मस्थळ इत्यादी प्रमाणेच लिंगाच्या आधारे राज्य नागरिकांमध्ये भेदभाव करणार नाही. म्हणजेच राज्य स्त्री-पुरुष असा भेदभाव करणार नाही. त्याचबरोबर महिलांसाठी व बालकांसाठी विशेष तरतुदी करून ठेवल्या आहेत. भारतीय राज्यघटनेने कलम १७ नुसार अस्पृश्यता नष्ट केली आहे. कलम १९ नुसार पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही अभिव्यक्ति स्वातंत्र्य, मतप्रदर्शन करणे, शांततेच्या मार्गाने मोर्चे काढणे, निशस्त्र एकत्र येणे, सभा घेणे,

संघटना निर्माण करणे भारतात कोठेही संचार करणे वास्तव करणे कोणतेही व्यवसाय करणे ही सहा स्वातंत्र्ये बहाल केली आहेत. कलम २३ नुसार मानवाचा दूर व्यापार करणे व वेठबिगार प्रथाना बंदी घातली आहे. कलम ३९ नुसार पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही निर्वाहाची पुरेशी साधने मिळवणे त्यांना समान काम समान वेतन मिळणे त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जाणे इत्यादीचा अधिकार बहाल केला आहे. याप्रकारे घटनात्मक तरतुदीच्या सर्व भारतीय स्त्रियावरील अन्याय अत्याचार विरोधात होणारे हिसाचार दुरकरण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे. या घटनात्मक मार्गाचा उपयोग करून आदिवासी स्त्री आपली उन्नती करू शकते तर कधी साधू शकते.

## २. कठोर कायद्याची अंमलबजावणी :

स्त्रियाबाबत होणारे हिंसाचार थांबवण्यासाठी बरेच कायदे केले आहेत. उदा. स्त्रिया आणि मुली यांच्या अनेक व्यापारास प्रतिबंध करणारा कायदा १९५६ Suppression of Immoral Ttraffic of Women and Girls Act १९५६. भारतीय दंड विधान कायदा १८६०, हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१, ,सती प्रथा विरोधक कायदा १८ ६१, स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन विरोधी कायदा,१९८६,घटस्फोट कायदा, १८६९. बालविवाह बंदी अधिनियम १८५५ मध्ये १९७८ साली दुरुस्ती करून मुलींचे विवाह करण्याचे वय १८ कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा २००५, वेठबिगार प्रथा प्रतिबंध कायदा १९७६, अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९, कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ अधिनियम २०१३ याप्रकारे अनेक कायदे केले तथापि या कायद्याची अंमलबजावणी पुणे ग्रामीण नागरी समाजाच्या तुलनेत आदिवासी समाजात होत नाही. साधी सरळ, भोळीभाबडी, प्रामाणिक आदीम स्त्री ही संपर्कात आलेल्या सरकारी कर्मचारी, सावकार, जमीनदार, ठेकेदार यांच्या अत्याचाराची बळी पडते. वेगवेगळे कायदे केले असले तरी आदिवसी स्त्रीला याबाबत खूपच मर्यादा येतात. त्यांची दखल घेतली जात नाही. त्यांना कायद्याचे अपुरे ज्ञानअसल्यामुळे त्याचं बरोबर आर्थिक, मानसीक कुचंबणा यामुळे त्या तक्रार देण्यासाठी पुढे येत नाही. त्याचबरोबर त्यांची तक्रार ही स्वीकारले जाते अशा अस्मानी संकटाचा सामना आदिम स्त्री करत असते.

## ३) आयोगांचे सक्षमीकरण :

अनुसूचित जाती जमातीतील सदस्यांचे स्त्री अथवा पुरुष सक्षमीकरण करण्यासाठी घटनात्मक कायदेशीर हक्काचे संरक्षण करण्यासाठी व त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराचे निवारण करण्यासाठी भारतीय संविधानाच्या कलम ३३८ अ अन्वये अनुसूचित जमातीसाठी राष्ट्रीय आयोग स्थापन करण्यात आलेला आहे. परंतु याबाबत कोणत्याच प्रकारची कल्पना ही आदिम स्त्रीला नसते याचे कारण म्हणजे त्यांच्या मध्ये असणारी निरक्षरता आणि दारिद्र्य या कारणामुळे या आयोगाकडे तक्रार करण्यासाठी आदिवासी महिला कमी पडताना दिसून येतात. त्याच बरोबर आयोगावर नेमणूक केलेले व्यक्ती हे राजकीय व्यक्ती किवा सत्ताधाऱ्यांच्या जवळच्या असल्यामुळे त्यांना राजकीय संबंधातून पासून तटस्थ राहून काम करणे अनेकदा शक्य होत नाही. अशा कारणामुळे आदिवासींच्या हितसंबंधांचे व हक्काचे संरक्षण करण्यात हा आयोग अपुरा पडतो. म्हणून या आयोगास सक्षम करणे गरजेचे असल्यामुळे त्याचबरोबर त्याची कार्यक्षमता व अधिकार वाढवले पाहिजेत. शिवाय अनुसूचित जाती आणि जमातीच्या सदस्यांचे हित संरक्षण करण्यासाठी तळमळ असणारे अस्मिता असणारे सक्षम अधिकारी तेथे नियुक्त

करणे गरजेचे आहे. त्याच बरोबर आयोगाच्या शिफारशी आणि आयोगाने घेतलेला निर्णय या बाबत सरकारने काळजीपूर्वक विचार करणे गरजेचे आहे. देशातील सर्व स्त्रियांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी, त्यांच्याविरोधात होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोग व प्रत्येक राज्यात एक राज्य महिला आयोग नेमला जातो. अशा आयोगावर सदस्यांची नियुक्ती ही राजकीय व्यक्ती मधूनच होते. शिवाय या सदस्यांच्या सुशिक्षित उच्चभ्रू वर्गातील असतात. हे अधिकारी आदिवासी अनुसूचित जातीतील स्त्रियांच्या समस्यांचे व अडचणीचे स्वरूप समजून घेऊ शकत नाहीत. त्यामुळे आदिवासी स्त्रियांना न्याय देण्यात हे आयोग कमी पडतात असे दिसून येते. म्हणून त्यांचे सक्षमीकरण झाले पाहिजे. आदिवासी स्त्रियांच्या प्रश्नांची जाण असणाऱ्या सदस्याच्या नियुक्त केल्या पाहिजे.

**४) आदिवासी समाजामध्ये जाणीव जागृती करणे :**

डोंगर कपाऱ्यात राहणारी, विकासाच्या कोसो दूर असणारी, निरक्षरता, अज्ञान, दारिद्र्य, दैववादी दृष्टी, अंधश्रद्धा याला बळी पडलेली आदिम स्त्री समाजाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित आहे. तिला मिळणाऱ्या मानवी हक्कापासून ती अलिप्त आहे. या विषयी तिला कोणत्याही प्रकारची जाणीव नाही आदिवाशी स्त्रीला असणारे घटनात्मक हक्क, कायदेशीर तरतुदी, भारतीय दंड संहिता, न्यायदान प्रक्रिया यावर्षी कोणतीही माहिती नसल्याने आदिम स्त्री मध्ये याविषयी जाणीव जागृती करणे गरजेचे आहे. आदिवासी स्त्रीला तिचे हक्क कळले तरच आपल्यावर होणाऱ्या अत्याचाराचा ती विरोध करण्यासाठी प्रयत्न करेल अन्यायाचा सामना करेल. यासाठी आदिवासी स्त्रीला शिक्षणाचे महत्त्व समजून सांगणे गरजेचे आहे. त्यासाठी शासकीय पातळीवर महत्त्वपूर्ण असे उपक्रम राबवणे गरजेचे आहे. तरच आदिवासी स्त्री मुख्य प्रवाहात येऊन सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यास हातभार लावेल.

**३.२.२: ग्रामीण महिला: स्वरूप आणि उपाय योजना– Rural Women : Nature and Remedies.**

जगातील सर्वच समाजात स्त्रीचे अस्तित्व महत्वाचे आहे. तिच्याशिवाय पर्याय नाही तरीही जगभरात आपल्याला स्त्री-पुरुष समानता आढळत नाहीत. अगदी वेषभुषा, केशभुषा यामध्येच फरक आढळतो असं नव्हे तर त्यांच्या इच्छा-आकांक्षा, हक्क-कर्तव्य, त्यांचा दर्जा - भूमिका यामध्येसुद्धा फरक करण्यात आला आहे. आपल्या भारतीय व्यवस्थेला सुमारे ५००० वर्षांचा इतिहास आहे. आणि तेव्हा पासूनच आपल्या व्यवस्थेने पुरुषांना स्त्रियांपेक्षा श्रेष्ठ ठरवूंन त्यांना अनेक हक्क बहाल केले आहेत. व त्याचवेळेस स्त्रियांना मात्र कनिष्ठ दर्जा दिला व या हक्कापासून वंचित ठेवले व त्याचा परिणाम म्हणजे स्त्रियांवरील होणारे अत्याचार या मध्ये वाढ झाली हे दिसून येते. भारतीय समाज पुरुषप्रधान आहे. पितृसत्ताक व्यवस्थेमुळे कुटुंबामध्ये मुलाचा जन्म झाल्यास जितका आनंद होतो तितका आनंद मुलगी झाल्यास होतोच असा नव्हे. काही कुटुंबाबामध्ये तर चिंतेचं वातावरण असते. याला कुटुंबातील स्त्रियासुद्धा अपवाद नसतात. यामुळेच स्त्रीभ्रूण हत्येचे प्रमाण चिंता वाटावी इतके अधिक आहे. काही आकडेवारी नुसार १९०१साली दर हजार पुरुषामागे ९७२ स्त्रिया होत्या ते प्रमाण १९११ साली ९२७ पर्यंत घसरले होते. २०११ साली स्त्रियांचे प्रमाण प्रत्येक हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण ९४० इतके पोहोचले होते. आज स्त्रियांचे घटते प्रमाण ही देशापुढची एक महत्वाची समस्या बनली आहे. विवाह- भारतीय समाजात मुलींचा विवाह

लवकर केला जाई. आज सुद्धा बऱ्याच भारतीय कुटुंबामधून मुलीचा विवाह लवकर करण्याचा कल आहे. पूर्वीच्या काळी भारतात बालविवाह केले जात असत. त्याचा परिणाम या लहान मुलींचा बाळंतपणात मृत्यू होत असे. बऱ्याचवेळेस दुर्दैवाने नवऱ्याचा मृत्यू झाल्यास बालविधवा म्हणून त्या कुटुंबात आयुष्य काढावे लागे. त्यावेळेस या दुर्दैवी मुलींना कुटुंबामध्ये अनेक प्रकारे त्रास भोगावे लागत असत. भारतामध्ये पूर्वी सती प्रथा होती. त्यामुळे या स्त्रीस एक तर सती जावे लागत असे किंवा कुटुंबातीलच पुरुषांच्या भोगाची वस्तू म्हणून कुटुंबात राहावे लागत असे. आधुनिक भारतामध्ये खेड्यातून आजही काही प्रमाणात मुलीचा विवाह लवकर केला जातो. आधुनिक भारतात राजस्थानमध्ये एका विधवेस सती जाण्यासाठी सक्ती केल्याचे उदाहरण आहे. आजही भारतामध्ये स्त्रियांचे शिक्षण ही समस्या आहे. २०११ सालच्या जनगणनेनुसार पुरुषांचे शिक्षणाचे प्रमाण ८२% असून स्त्रीचे प्रमाण ६५% इतके आहे. ग्रामीण भारतात मुलांच्या शिक्षणाकडे ज्या प्रमाणात पालक लक्ष देतात त्या प्रमाणात मुलीकडे दिले जात नाही. मुलींच्या आरोग्याकडे सुद्धा नीट लक्ष दिले जात नाही. अगदी कुटुंबातील स्त्री आणि पुरुष यांच्या आहाराकडे सुद्धा भेदभाव केला जातो. कुटुंब नियोजनाच्या वेळी बऱ्याचवेळेस हे नियोजन स्त्रीलाच करावे लागते. उदा. तांबी बसविणे, निर्बिजीकरणाची शस्त्रक्रिया. बऱ्याच वेळेस गर्भपात अथवा गर्भनिरोधक गोळ्या घेतल्याने स्त्रीला तिच्या आरोग्यावर दुष्परिणाम भोगावे लागतात. हल्ली सर्व समाजातील स्त्रिया घरातून बाहेर पडून अर्थार्जन करीत असून आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावीत आहेत. याला कोणतेही कुटुंब अपवाद नसेल. महत्वाचा फरक म्हणजे स्त्री अर्थार्जन करीत असताना, कौटुंबिक जबाबदारी देखील पार पाडत असते. त्यापासून तिची सुटका नसते. यामुळे कुटुंबातील पुरुषापेक्षा तिला मानसिक आणि शारीरिक त्रास अधिक असतात. शारिरीक आणि मानसिक थकवा जाणवणे, शरीरातील रक्त कमी होणे, किंवा रक्तस्त्राव वाढणे, पाठ व कंबर दुखणे असे आजार होतात. ग्रामीण आणि आदिवासी भागात शिक्षणाचा अभाव, रूढीपरंपरांचा मोठा पगडा, अज्ञान, लिंगभेद, पुरुषप्रधान संस्कृती अशा परिस्थितीत समाजात स्त्रियांच्या प्रश्नांचं स्वरूप आणि कोविडमुळे विधवा झालेल्या स्त्रियांचे प्रश्न चिंताजनक आहेत. त्यात प्रामुख्याने जाणवलेल्या समस्या म्हणजे महामारीत एखाद्या विधवा स्त्रीला आजही समाजातील पुरुषी व्यवस्थेशी द्यावा लागणारा लढा हा भयावह आहे. त्यांच्या शारीरिक-मानसिक आरोग्याची होणारी हेळसांड, त्यांच्या मुलांचे प्रश्न, त्यांची आर्थिक, सामाजिक, भावनिक, लैंगिक शोषण यामुळे होणारी कुचंबणा आणि या साऱ्याला तोंड देत त्यांच मन मारून जगणं हे वास्तव समजून घ्यावे लागेल. स्त्रियांना सासरी आणि माहेरी मिळणारी वागणूक, घरी-दारी मारले जाणारे टोमणे, घर आणि जमिनीचा नाकारला जाणारा हक्क, कुटुंब व्यवस्थेपर्यंत सगळीकडेच नाकारलं जाणारं स्थान, मुले असूनही निराधार जीवन जगणाऱ्या, वृद्धपकाळातील असह्य वेदना सहन करत जगणाऱ्या स्त्रियाचं जगणं कोविडमुळे अजूनच वेदनादायी आणि अंधकारमय होतांना दिसत आहे. स्त्रियांच्या प्रश्नांचं वास्तव भेदक होतं. स्त्रिया आपल्या घरांमध्येही सुरक्षित नाहीत. २२ जून रोजी एकल महिला धोरणाचा प्राथमिक मसुदा राज्य सरकारकडे सादर करून दोन वर्ष पूर्ण होत आहे. या निमित्ताने राज्य सरकारने ह्या मसुद्यावर आवश्यक कार्यवाही करून राज्यातील एकल महिलांच्या सक्षमीकारणासाठी पाऊले उचलणे गरजेचे आहे. ग्रामीण स्त्रीच्या समस्या आदिवासी आणि शहरी स्त्री पासून वेगळ्या असल्याचे दिसून येतात अंधश्रद्धा आणि पारंपारिक, प्रथा विचारसरणीच्या चौकटी यामध्ये ती गुरफटलेले दिसून येते. ग्रामीण समाजामध्ये सर्व अधिकार पुरुषाकडे एकवटलेले असतात. ग्रामीण समाजात स्त्रीला

लिंगभेदभावास  बळी पडावे लागते. ग्रामीण समाज जीवनामध्ये स्त्रीला स्वातंत्र्याच्या बाबतीत मर्यादा पडतात. स्वातंत्र्यानंतर स्त्रीच्या दर्जात बदल होत असला तरी पुरुषाकडून होणारा हिंसाचार कमी झालेला दिसून येत नाही त्याच बरोबर श्रेष्ठ आणि कनिष्ठ तत्वाची भावना कमी झाल्याचे दिसून येत आहे. स्त्रीला अध्याप ग्रामीण समाजामध्ये दुय्यम स्थान असल्याचे दिसून येते. स्त्रीला पुरुषाने मारहाण केली तर त्याकडे गंभीर बाब म्हणुन पाहिले जात नाही हि एक शोकांतिकाच म्हणावी लागेल.

**अ) कुटुंबातील इतर स्त्रियांच्या विरोधातील हिंसाचार :**

ग्रामीण समुदाय मध्ये हिंसाचारामध्ये कुटुंबातील सर्व स्त्रियांचा समावेश होतो. तिच्या वाट्याला आलेले जबाबदारीचे काम तिने केले न केल्यास तिला मारहाण केली जाते कारण ग्रामीण समाजातील उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत शेती आधारित असल्याने मनुष्यबळाची आवश्यकता असते. अशा प्रसंगी तिचे कामाकडे दुर्लक्ष झाल्यास तिला हिंसाचाराला सामोरे जावे लागते. तिला दुय्यम वागणूक मिळते, तिला मनपसंद जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य असत नाही. जर तीने  असे केले  तर तिला कुटुंबात तसेच समाजात मान्यता मिळत नाही. परिणामी कित्तेकदा दोघांचीही हत्या झाल्याचे कित्येक उदाहरणे देता येतील. अशा प्रसंगांमध्ये पीडित मुलीला तिच्या वडिलोपार्जित संपत्तीचा  हक्क मिळत नाही. पीडित मुलीचे नातेवाईक भाऊ मालमत्तेत वाटा देण्यासाठी विरोध दर्शवतात आणि तिला मानसिक त्रास दिला जातो.  तिच्यावर वेगळ्या प्रकारे दबाव टाकला जातो. ग्रामीण स्त्रीला कायद्याने पुनर्विवाह करण्याची मान्यता दिली असली तरी ती आपला विवाह करू शकत नाही. आपले आयुष्य तिला अपमानास्पद आणि दयनीय अवस्थेत जगावे लागते हे दुर्दैव. अशा स्त्रीला समाजामध्ये सन्मानाने वागणूक मिळेलच असे नाही. कित्येकदा खोटे बोलून ती जर निरक्षर असेल तर तिचे नातेवाईक तिच्याकडून हक्क सोड पत्र करून घेऊन तिला संपत्तीतून बेदखल केले  करतात. अशा असहाय्य स्त्री अनेक वेळा लैंगिक शोषणाचा बळी पडते. अशा स्त्रियांना बदनाम केले जाते चारित्र्यावर ती शिंतोडे उडवले जातात. अशाप्रकारे एकंदरीत विधवांना कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागते. अर्थात सर्वच बाबतीत विधवांना सामोरी जावे लागते असे नाही परंतु हिंसाचाराचे स्वरूप हे वेगवेगळे असू शकते.

**ब)   हुंड्यासाठी हिंसाचार :**

कौटुंबिक हिंसाचार म्हणजे शारीरिक, शाब्दिक, लैंगिक, मानसिक किंवा आर्थिक छळ, हुंडा किंवा मालमत्ता देण्यासाठी महिलेला अपमानित करणे, तिला शिवीगाळ करणे, विशेषत: अपत्य नसल्यामुळे तिला हिणवणे किंवा धमकावणे, त्रास देणे, दुखापत करणे, जखमी करणे किंवा पीडित महिलेचा जीव धोक्यात आणण्यास भाग पाडणे. किंवा तिच्या कोणत्याही नातेवाईकाकडे हुंडयाची मागणी करणे व या सर्व गोष्टींचा दुष्परिणाम पीडित व्यक्ती अथवा तिच्या नातेवाईकांवर होणे तसेच आर्थिक छळ करणे म्हणजे महिलेचे स्वत:चे उत्पन्न, स्त्रीधन, मालमत्ता किंवा इतर आर्थिक व्यवहार किंवा तिच्या हक्काच्या कोणत्याही मालमत्तेपासून तिला वंचित करणे, घराबाहेर काढणे या बाबींना कौटुंबिक हिंसाचार म्हटले जाते. याचा समावेश येथे होतो. एखादी मागणी केली की त्यानंतर  दुसरी मागणी करणे अशाप्रकारे हे सत्र सुरूच असते शेवटी महिलेचे पालक या मागण्या पूर्ण करण्यासाठी सक्षम ठरतात. तेव्हा ते या महिलेला तिच्या नशिबावर अवलंबी राहण्यास सांगितले जाते.

परिणामी अशा घटनेतून कित्येकदा महिला आत्महत्येचा मार्ग निवडते असे कित्येक प्रसंग आपण दैनिक प्रमाणपत्र आतून ऐकत असतो. गरीब श्रीमंत आणि उच्चभ्रू सर्वच समाजामध्ये हा हिंसाचार आढळून येतो.

**क) कुटुंबात होणारा लैंगिक अत्याचार :**

हिंसाचाराचे स्वरूप हे सार्वत्रिक आहे सर्वच समाजात महिला बाबत होणारा हिंसाचार ही बाब नित्याची बनलली आहे. बहुतांश लैंगिक हिंसाचार हे नातेसंबंधात अधिक प्रमाणात होताना दिसले आहेत. वडील व मुलगी, माता व पुत्र, बहीण व भाऊ, याबाबतचे नातेसंबंधांमध्ये लैंगिक संबंध निषिद्ध मानले आहेत. परंतु असे असले तरी अशी कित्येक प्रसंगी नात्यांमध्ये हिंसाचार झाल्याची घटना समोर येताना दिसून येते. या घटना आपण वर्तमानपत्र आणि बातम्यांच्या माध्यमातून पाहत असतो. अशाप्रकारे घडणार्या घटना या अमानवीय मानवतेला काळीमा फासणानाऱ्या, आणि पाशवी आहेत.

**ड) स्त्रीभ्रूण हत्या :**

वंशाला दिवा असावा या भावनेतून त्याच बरोबर म्हातारपणी आधार असावा या दृष्टीकोनातून स्त्रीभ्रूण हत्येला  प्रोत्साहन दिले जाते. स्त्री अर्भकाची गर्भातच हत्या केली जाते. ही प्रवृत्ती स्त्रीचा जन्मा नाकारणारी असून अशा प्रकारची वृत्तीही ही हिंसाचारच आहे.

**३) सामाजिक हिंसाचार :**

ग्रामीण समाजामध्ये प्रथा आणि परंपरा यांचे काटेकोरपणे पालन केले जाते. प्रथा परंपरांचे पालन हे स्त्री हिंसाचारला चालना देतात यातूनच स्त्रियांवरील हिंसाचार वाढत जातो.

**बालविवाह प्रथेमुळे निर्माण होणारा हिंसाचार :**

भारतीय समाजामध्ये मुलगी जन्माला येणे कमीपणाचे मानले जाते याचे  कारण म्हणजे भारतीय समाजात असणाऱ्या प्रथा-परंपरा होय. या प्रथांचे पालन भारतीय समाजामध्ये आज रोजी कमी-अधिक प्रमाणात पाहायला मिळते. अशा कारणांमुळे भारतीय समाजामध्ये यांच्याविरोधात हिंसाचार होताना दिसतो. मुलगीला परक्याचे धन मानण्याची प्रथा भारतीय समाजामध्ये आहे. त्यामुळे लवकरात लवकर लग्न करणे ही प्रथा रूढ झाली आहे. लवकरात लवकर लग्न केल्यामुळे स्त्रीला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. आरोग्याचे नियम समस्या निर्माण होतात, कुपोषण, वेगवेगळे आजार अर्भक मृत्यू, मातामृत्यू प्रमाण वाढणे या समस्या निर्माण होतात. हा होणारा प्रकार हा स्त्रियांच्या विरोधातील होणारा एक हिंसाचाराचा भाग आहे.

**ब) द्विभार्या प्रथेमुळे बळावणारा हिंसाचार :**

प्राचीन तसेच आधुनिक समाजामध्ये दोन विवाह करण्याची अथवा दोन पेक्षा अधिक विवाह केला जातो. अर्थात १९५५ च्या कायद्यामध्ये पहिली पत्नी अस्तित्वात असताना दुसरा विवाह करता येणार नाही हा कायदा आहे. परंतु श्रीमंत, सावकार असे पुरुष विविध कारणासाठी द्विभार्या विवाह करतात. यामध्ये स्त्रीला मुलगा न होणे, सातत्याने मुली होणे, पहिली पत्नी वांझोटी असणे,लैंगिक विकृतीची मानसिकता  अशा प्रकारे

कारणे असतात. अशावेळी कुटुंबामध्ये दोन स्त्रियांमध्ये मत्सर वाढून भांडणे उद्भवतात. अशा भांडणातून कौटुंबिक स्वास्थ बिघडून पतीची चिडचिड होते. परिणामी तो दोन्ही पत्नींना मारहाण करतो यातून कौटुंबिक समस्या निर्माण होऊन बालकांचे प्रश्न निर्माण होतात. त्याच बरोबर स्त्रियांचे मानसिक व शारीरिक खच्चीकरण होते.

**क) विधवा विवाह बंदी मुळे होणारा हिंसाचार :**

आधुनिक काळामध्ये स्त्रीला पुनर्विवाह करण्याची परवानगी आहे. कायद्यांनी विदेशी तिला मान्यता दिलेली आहे. परंतु आज हे जुन्या प्रथा परंपरांचे पालन स्त्रीला करावे लागते हे नियम फक्त स्त्रीलाच लागू असल्याचे दिसून येतात. सार्वजनिक जीवनात तिचे अस्तित्व पतीच्या निधनानंतर नाकारले जाते तिला अपशकुनी समजले जाते. चांगली वस्त्रे, अलंकार, दागदागिने वापरण्यावर मनाई केली जाते. किंबहुना विरोध दर्शवला जातो. तिला अपवित्र समजले जातील अपमानास्पद बोललं ते ही मिळणारी वागणूक म्हणजे तिच्यावर होणार हिंसाचारच होय.

**ई) वयाने जास्त असणाऱ्या पुरुषाशी विवाह केल्यानंतर होणारा हिंसाचार :**

भारतीय समाजामध्ये स्त्रीपेक्षा पुरुषाचे वय जास्त असावे असा समज रुजला आहे. स्त्री पेक्षा वयाने मोठ्या असणार्या पुरुषाबरोबर आहे तिचा विवाह केला जातो. पुरुषाची निवड करण्यासाठी तिला स्वातंत्र्य दिले जात नाही. विवाह जुळवताना स्त्रीचे मत विचारात घेतले जात नाही. कित्येकदा वयाने जास्त असणाऱ्या पुरुषाबरोबर तिचा विवाह ठरवला जातो. यामध्ये पुरुषाचे कर्तृत्व पहिले जाते नोकरी पहिली जाते संपत्ती पाहिली जाते. त्याचे दिसणे वागणे याकडे दुर्लक्ष केले जाते. यामुळे स्त्रीला शारीरिक मानसिक आर्थिक आणि लैंगिक छळास बळी जावे लागते. स्वतःच्या पती चे लवकर निधन झाल्यानंतर तिला आयुष्यभर असेच आयुष्य काढावे लागते. अशा प्रकारे होणारी त्याची कुचंबणा म्हणजेच प्रथे नुसार तिचा होणारा हिंसाचार होय.

**फ) देवदासी प्रथेतून वाढीस लागणारा हिंसाचार :**

भारतीय समाजामध्ये अंधश्रद्धेचे अनेक खेडे गावांमध्ये धार्मिक अंधश्रद्धेतून देवासाठी मुलींना सोडण्याची प्रथा आहे. त्या प्रथेला देवदासी प्रथा असे म्हटले जाते. या देवदासी मुलीला अथवा महिला आयुष्यभर भिक्षा मागावी लागत तिला व्यक्तिगत स्वातंत्र्य असत नाही. देवाच्या नावावर ती अनेक वेळा अत्याचारास बळी पडते. परंतु समाजमान्य मार्गाने तिची अशी मानसिकता केलेली असते की, ही सर्व देवाची इच्छा आणि सेवा आहे. कायद्याद्वारे आज या प्रथेवर बंदी घातली असली तरी ही प्रथा अजूनही समाजामध्ये अस्तित्वात आहे. देवदासी नाचने,जोगवा मागणे हे काम करते. समाजमान्य पद्धतीने तिला विवाह करण्यास मुभा नसते. गावातील धनवान पुरुष, पुरोहित या देवदासीचा लैंगिक उपभोग घेत असतात. वास्तविकपणे देवदासी ही वेश्या सारखे जीवन जगत असते. तारुण्यामध्ये देवदासी सर्वसामान्य जीवन जगत असली तरी वृद्धापकाळात फार भयावह अवस्था तिच्या जीवनाची असते. अशाप्रकारे सामाजिक व धार्मिक हिंसाचार ही देवदासी सहन करत असते.

## ग) घराणेशाहीच्या कल्पनेतून होणारा हिंसाचार :

ग्रामीण भागामध्ये आज ही मोठ्या प्रमाणात स्वतःचे कुटुंब श्रीमंत, खानदानी आणि घराणेशाही असल्याचा दावा केला जातो. असे कुटुंब आपली प्रतिष्ठा इतर समाज सदस्य होऊन अधिक आहे. स्वतःच्या कुटुंबातील रितीरिवाज श्रेष्ठ व आदर्श चांगले आहेत. अशा प्रकारची जी कल्पना असते तिला खानदान सर्वश्रेष्ठ कल्पना होय. अशा प्रकारच्या खोट्या आणि भ्रामक कल्पनेतून अनेक कुटुंबात स्त्रियांना अधिकार व स्वातंत्र्य नाकारले जातात. अशा परिस्थितीमध्ये स्त्रियांना निर्णय स्वातंत्र्य नसते. या स्त्रिया घराबाहेर पडत नाही त्यांना तशी परवानगी नसते. अशा स्त्रिया कुटुंबाच्या आर्थिक क्रियेत समाविष्टीत नसतात. अशा स्त्रियांना अवश्य आशा सर्वभौतिक गरजा पूर्ण होतात. दागदागिने, हौस-मौज,भव्य घर ,उंची फर्निचर ,दुचाकी,चार चाकी परंतु वैयक्तिक आयुष्य हे बंदिस्त तुरुंगा प्रमाणे असते. अशा स्त्रियांचे आयुष्य गुलामाप्रमाणे असते. त्यांना अभिव्यक्तिस्वातंत्र्य त्यांच्या या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची उल्लंघन म्हणजे खोट्या प्रथेमुळे घराणेशाहीच्या कल्पनेतून होणारा हिंसाचार होय.

## घ) जातिव्यवस्थेच्या या प्रथेमुळे होणारा हिंसाचार :

भारतीय समाजामध्ये जातिव्यवस्थेचे अस्तित्व हजारो वर्षापासून चालत आलेले आहे. जातीव्यवस्था जातिभेद अस्पृश्यता इत्यादीचा प्रभाव आजही ग्रामीण समाजामध्ये दिसून येतो. या प्रगतीमुळे कनिष्ठ वर्गातील स्त्रियांच्या विरोधात मोठ्या प्रमाणात हिंसाचार घडून येतो. शेती हा ग्रामीण समाजाचा मुख्य घटक असल्याने उच्च वर्गाच्या हातात मोठ्या प्रमाणात जमिनीची मालकी असल्यामुळे अनुसूचित जाती जमातीतील स्त्रिया रोजगाराच्या दृष्टीने अथवा निर्वाह चालवण्यासाठी जमीन धारक असलेल्या उच्च जातीवर अवलंबून असतात. त्यांच्या या असहाय्यतेचा गैरफायदा घेऊन उच्च जातीतील जमीन भारत वर्ग अनुसूचित जातीतील स्त्रियांना आपल्या शेतात व घरात ही अनेकदा विनामोबदला तर काही वेळा अल्प मोबदल्यात सक्तीने वेठबिगारासारखे राबवतात. कमी वेतनावर त्यांना राबवून घेतले जाते आणि त्यांचे शोषण केले जाते. शेतामध्ये राहण्यासाठी नकार देणाऱ्या स्त्रिया वर हल्ले केले जातात, त्यांचा विनयभंग केला जातो. अनेक प्रसंगी त्यांच्यावर बलात्कार ही केला जातो. तक्रार देऊ नये म्हणून जीवे मारण्याची धमकी दिली जाते. कित्येकदा अशा स्त्रियांना संपवले जाते. अशी कित्येक उदाहरणे देता येतील. उच्च जातीचे लोक त्यांची घरे पेटवतात, कनिष्ठ जातीतील स्त्रियांची नग्न धिंड काढली जाते. सार्वजनिक ठिकाणी सामूहिक बलात्कार केले जातात. कनिष्ठ वर्गातील तरुणांचे उच्च जातीतील तरुणीशी प्रेमसंबंध आल्याचे उघडकीस आल्यानंतर त्याचा सूड म्हणून कनिष्ठ जातीतील स्त्रियावर लैंगिक अत्याचार केले जातात. अशा घटना देशातील सर्वच राज्यात कमी जास्त प्रमाणात घडत असतात. यामध्ये उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, हरियाणा ही राज्य आघाडीवर आहेत. त्यामुळे कनिष्ठ जातीतील स्त्रियांचा उपभोग घेणे हा आपला अधिकार वरिष्ठ वर्गातील लोक मानतात व त्यांच्या विरोधात शारीरिक मानसिक लैंगिक हिंसाचार करतात. याप्रकारे विधवा विवाह बंदी, हुंडा, बालविवाह, देवदासी जातिभेद इत्यादी समाजिक प्रथांच्या माध्यमातून स्त्रियांच्या विरोधात मोठ्या प्रमाणात हिंसाचार होताना दिसून येतो.

**च) प्रसार माध्यमाच्या वापरातून निर्माण होणारा हिंसाचार :**

आधुनिक काळामध्ये प्रसार माध्यमाचे महत्व वाढताना दिसून येते. या प्रसारमाध्यमांच्या वापरामुळे आभासी अपेक्षा पुरुषांमध्ये वाढल्याच्या दिसून येतात. प्रसारमाध्यमाच्या सादरीकरणात सारख्याच स्त्रीच्याकडून अपेक्षा केल्या जातात, पुरुषांच्या संशय वृत्तीला प्रोत्साहन मिळते यातूनच स्त्रीवर होणारा हिंसाचार वाढीला लागतो. त्याचबरोबर इच्छा नसतानाही ऑनलाइन एखादी साईट पाहत असताना अश्लील चित्रफिती, कॉम्पुटर व्हिडिओ, गेम, ई-मेल टेक्स्ट मेसेज माध्यमे यांच्या माध्यमातून अश्लील मेसेज पाठवले जातात यातूनच स्त्री विरोधातील हिंसाचार वाढीस लागतो.

**छ) आर्थिक कुचंबनेतून बचत गट आणि सूक्ष्म वित्त पुरवठा संस्था मार्फत होणारा हिंसाचार :**

स्वतःच्या कुटुंबाच्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी किंवा सण समारंभ, दवाखाना, मुलांच्या शिक्षणासाठी, अडचणीसाठी, घर बांधण्यासाठी, पशुपालनासाठी, अलीकडच्या काळात ग्रामीण भागात सूक्ष्म वित्त पुरवठा संस्थेकडून त्याचबरोबर बचत गटाच्या माध्यमातून कर्जपुरवठा केला जातो. परंतु कोविडच्या पार्श्वभूमीवर अनेक लोकांचा रोजगार बुडाला, कित्येक लोकं बेरोजगार झाले, अनेकांनी आत्महत्या केल्या, अनेक कुटुंबाचा मिळवता पुरुष दगावाला गेला यामुळे. सूक्ष्म वित्त पुरवठा, बचत गट यांचे हप्ते फेडणे कठीण बनले. कोवीडच्या या काळातील हप्त्यांचे व्याज दुप्पट झाले. खाजगी कंपनीच्या कर्मचाऱ्यांची जीवघेणी वसुली सुरू झाली. अनेक स्त्रियांनी या कर्मचार्याच्या भीतीने आत्महत्येचा मार्ग स्वीकारला, काहींनी स्वतःची घरे विकून कर्जे भागवली, ज्यांना कर्ज फेडणे अशक्य झाले अशा स्त्रिया लैंगिक शोषणाचा ही बळी पडल्या, कौटुंबिक जबाबदाऱ्या आर्थिक समस्येमुळे पीडित अनेक महिला बलात्कार आणि शोषणाच्या कचाट्यातून सुटल्या नाहीत. अशा प्रकारे सूक्ष्म फायनान्स च्या माध्यमातून तसेच बचत गटाच्या माध्यमातून हिंसाचार वाढीस लागला या मध्ये अनेक महिलांचे बळी गेले ह्या घटनेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

ग्रामीण स्त्रियांच्या विरोधात होणाऱ्या हिंसाचारावरील उपाययोजना:

ग्रामीण स्त्री अथवा आदिवासी स्त्री या स्त्रियांच्या बाबतीत करावयाच्या झालेले उपायोजना एकसारख्याच आहेत. ग्रामीण स्त्रीच्या बाबतीत काही स्थूलमानाने बदल येतो त्याची चर्चा आपण पुढील प्रमाणे करू.

**२) घटनात्मक तरतुदीची अंमलबजावणी :**

भारतीय संविधानाने दिलेले मुलभूत हक्क आणि अधिकार हा स्त्रियांच्या विकासाचा पाया आहे. त्याचप्रमाणे महिला आणि समाजातील दुर्बल घटकांसाठी विशेष कायदे करण्याची तरतूद घटनेमध्ये केलेली आहे. तथापि महिलांकडे बघण्याचा समाजाचा आणि शासनाचा दृष्टिकोन प्रामुख्याने कल्याणकारी उपक्रमाचा लाभार्थी असला पाहिजे. महिला विकास प्रक्रियेचा अविभाज्य घटक होऊ शकल्या नाहीत. या तत्त्वांकडे दुर्लक्ष झाले. राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीत, तसेच दुर्बल घटकाच्या हक्काच्या चळवळीत जातीप्रथा, विषमता निर्मूलन, कामगार,शेतकऱ्यांच्या चळवळी, सामाजिक सुधारणा, उत्पादन प्रक्रिया यात स्त्रियांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. स्वातंत्र्य उत्तर काळात शिक्षणाचे प्रमाण वाढले असले तरी एकूण सामाजिक आर्थिक राजकीय जीवनात महिलांचा अपेक्षित सहभाग

वाढलेला दिसत नाही. कौटुंबिक आणि सामाजिक असुरक्षितता, बेरोजगारी स्थलांतर आरोग्यसेवा अन्य दैनंदिन सुविधांचा अभाव यांचा परिणाम महिला व मुलावर प्रकर्षाने दिसून आला. पिण्याचा पाण्याचा अभाव, दारिद्र्य, कुपोषण, बालमृत्यू दर त्यातही गर्भलिंग निदान चाचणी व त्यामुळे कमी होणारी मुलींची संख्या, महिला आणि मुलींची विक्री यातून महिलांच्या मानवी हक्कांची पायमल्ली होताना दिसून येते. गेल्या वीस वर्षात आपल्या देशाने उदारीकरणाचे धोरण स्वीकारले, आर्थिक-सामाजिक घडी मध्ये मोठे बदल झाले. हे बदल अनेक क्षेत्रात लाभदायक ठरले असले तरी तळागाळातील लोक विशेष करून महिलांपर्यंत विकासाची फळे अधिक प्रमाणात पोचणे आवश्यक होते. ते पाहिजे त्या प्रमाणात महिला पर्यंत पोहोचू न शकल्यामुळे असमतोल निर्माण झाला. त्यातून मानवी हक्काच्या उल्लंघनाचे नवे प्रकार वेगाने वाढू लागले.१९४८ साली संयुक्त राष्ट्रसंघाने मानवी हक्काचे सनद तयार केली, त्यातही महिलांची काही वेगळे प्रश्न आहेत आणि त्यांचा मानवी हक्काच्या दृष्टीने ऊहापोह झाला पाहिजे असा विचार नव्हता. स्त्रिया मागे राहिल्या तर समाजाच मागे पडत जातो याची जाणीव होऊन संयुक्त राष्ट्र संघाने १९७५ हे वर्ष प्रथम आंतरराष्ट्रीय महिला वर्ष जाहीर केले. आणि त्याचेच पुढे महिला दशकात रूपांतर केले. त्याचे औचित्य साधून भारत सरकारने एक समिती नेमून समतेकडे वाटचाल हा महिलांच्या परिस्थिती विषयक अहवाल तयार केला. या अहवालातून भारतीय महिलांच्या परिस्थितीचे सम्यक दर्शन घडते. महिलांचे शिक्षण, आरोग्य, रोजगार, विघातक सामाजिक चालीरीती, प्रथा-परंपरा त्यांच्यावर होणारा परिणाम व उपाययोजना अधिक संदर्भात ठोस उपाय योजना करण्यात आल्या. केवळ कागदोपत्री सुधारणा करून भागणार नाही तर महिलांना प्रत्यक्षात सन्मानाने जगता आले पाहिजे. सर्व क्षेत्रात महिलांना समान संधी मिळाली पाहिजे आणि सन्मानाचे स्थानही मिळाले पाहिजे. महिलासाठी केलेल्या सर्व कायदेशीर तरतुदींची आणि कार्यक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. ही जबाबदारी प्रथम राज्य व केंद्र शासनाचे आहे. यापूर्वी आपण आदिवासी स्त्री बाबत घटनात्मक तरतुदी, या कडक कायद्याची अंमलबजावणी, न्यायालयाचा दृष्टिकोन, सक्षम आयोगाची आवश्यकता हे मुद्दे अभ्यासले आहेतच हे मुद्दे ग्रामीण स्त्रीला ही लागू पडतात. बदलत्या काळानुसार सामाजिक परिस्थितीनुसार महिला समोरील आव्हाने दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येते. अलीकडच्या काळातील महिलांवर झालेल्या हिंसाचाराच्या घटना विचारात घेऊन महिलांच्या संरक्षणासाठी विशेष उपाययोजना करणे क्रमप्राप्त ठरते. केवळ कठोर कायदे करून या समस्या दूर होतील असे नाही. त्यासाठी समाजामध्ये महिला बद्दल स्वाभिमान सन्मान आणि आदराची भावना निर्माण करणे आणि त्या दृष्टीने समाजाच्या मानसिकतेत बदल घडवून आणणे ही काळाची गरज झाली आहे.

**उपाय योजना :**

१) महिलांच्या सर्वांगीण विकास व सक्षमीकरण यासाठी प्रागतिक दृष्टिकोन रुजवणे, पुरुषप्रधान मानसिकता बदलणे व स्त्री-पुरुषांचे परस्पर संबंध सौदाहपूर्ण व निकोप व्हावेत यासाठी प्रयत्न करणे.

२) महिलांना त्यांच्या अगर क्रमानुसार आयुष्य जगता यावे यासाठी सर्व क्षेत्रात समान संधी व त्यांना आपले उद्दिष्ट साध्य करता येण्यासाठी आवश्यक ते वातावरण साध्य करणे.

३) धर्म, वंश, जात सत्ता प्रदेश या कारणांमुळे वाढत्या हिंसेचा प्रभावी मुकाबला करण्यासाठी स्त्रियांना पाठबळ देणे, किंबहुना या प्रकारचा हिंसा होणारच नाहीत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवणे.

४) स्त्री-पुरुष जन्मदर सामान ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे.

५) महिलांच्या पारंपारिक प्रतिमेला छेद देऊन आधुनिक व स्वबळावर उभी असणारी नवी प्रतिमा तयार करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे व गृहिणीच्या ग्रह कामाला प्रतिष्ठा मिळवून देणे.

६) शासनाच्या सर्व स्तरावरील निर्णय प्रक्रियेत समाजाच्या सर्व महिलांच्या हिताचे व हक्काचे संरक्षण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे.

७) समाजाच्या मुख्य प्रवाहातून बाहेर फेकल्या गेलेल्या समाज घटका मध्ये एकल स्त्रिया, देवदासी, देहविक्री करणाऱ्या महिला, लोक कलावंत महिला आणि तृतीयपंथी यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न करणे, तसेच महिलांवर अन्याय करणाऱ्या अनिष्ट प्रथांपासून त्यांची मुक्त होण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे.

८) समाजाच्या विषमता मूलक रचनेमुळे, विशेषता: अनुसूचित जाती) अनुसूचित जमाती/विमुक्त जाती व भटक्या जमातीतील व अल्पसंख्याक समुदायातील महिलांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे.

९) असंघटित क्षेत्रातील महिलांच्या हक्कासाठी प्रयत्न करणे.

१०) स्त्रियांना त्यांच्या क्षमतांचा पुरेपूर उपयोग करता यावा यासाठी घरात तसेच कामाच्या ठिकाणी हिंसाचार विरहित व सुरक्षित वातावरण निर्माण करणे.

११) अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी आरक्षित जागा असाव्यात. प्रत्येक विभाग त्यांच्या अखत्यारीतील महिलासाठी योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी वेळोवेळी नियमितपणे त्याचा आढावा घेऊन पाठपुरावा शासनाने करावा. तसेच त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात भरीव अशी तरतूद करावी.

१२. शासनाच्या विविध विभागाकडून महिलांचे हक्क/योजना, महिलांसाठी असलेल्या सुविधा, हेल्पलाईन इत्यादी बाबींना प्रसार माध्यमातून सातत्याने प्रसिद्ध करण्यात यावे.

१३. पीडित मुली/महिला यांच्या प्रसारमाध्यमांकडून होणाऱ्या चित्रीकरण प्रचलित कायद्यातील तरतुदीनुसार निर्बंध लादण्यात यावेत.

१४. स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणूक देणाऱ्या वर्तनाचे उदात्तीकरण करणाऱ्या चित्रपट/मालिका यांच्या विरोधात तक्रार प्राप्त झाल्यावर किंवा स्वतःहून स्वाधिकारात आवश्यक दंडात्मक कारवाई/करण्याचे अधिकार महिला आयोगाच्या देण्यास कायदेशीर तरतूद केली जावी.

१५. सेन्सॉर बोर्डावर सदस्य म्हणून मानसोपचार /मानसशास्त्रज्ञ तसेच अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती व भटक्या जमाती गटातील महिलांचा समावेश करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनास शिफारस करावी.

१६. वर्तमानपत्रात तसेच दूरचित्रवाणीवरील कार्यक्रमात सकारात्मक वृत्ते व माहिती, महिलांचे जीवनपट, विशेषता अनुसूचित जाती/जमातीतील महिलांचे जीवन/त्यांची संस्कृती/गौरवास्पद इतिहास/समाज व्यवहारात त्या देत असलेले विविध पातळीवर योगदान याचे चित्रण असणाऱ्या लेखकांना/मालिकांना/चित्रपटांना/ कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्यात यावे. शासनाने येथे आर्थिक तरतूद करेल व पुढाकार घेईल अशी जबाबदारी घ्यावी.

१६) प्रसारमाध्यमांमध्ये महिला पत्रकारांना विशेषता: अनुसूचित जाती जमाती विमुक्त भटक्या जमाती अल्पसंख्यांक प्रवर्गातील महिलांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सामावून घेतले जावे. तसेच सक्षम महिला पत्रकारांना समानतेची वागणूक मिळवून माध्यमांच्या निर्णय प्रक्रियेत त्यांना सन्मानाचे स्थान मिळावे यासाठी शासनाकडून विशेष प्रयत्न केले जावेत.

१७. माध्यमांशी सतत संवाद साधून भारतीय संविधानाच्या चौकटीत व कायद्याच्या कक्षेच्या आधारे महिलांना एक उपभोग्य वस्तू म्हणून दाखवणारे, पुरूषांपेक्षा महिला दुय्यम असल्याचे चित्र रेखाटणारे, करिअर करणाऱ्या महिला बद्दल समाज मनात दुराव्याची भावना निर्माण करणारे, लेखन/कार्यक्रम/कलाकृती यांना प्रसिद्धी दिली जाणार नाही याची काळजी घेतली गेली पाहिजे. मुलगी हे परक्याचे धन आहे ही मनोवृत्ती प्रदर्शित करणारे चित्रीकरण प्रदर्शित करण्यापासून परावृत्त केले पाहिजे. अशाप्रकारे ग्रामीण महिलांसाठी उपायोजना करून त्यांचे सबलीकरण करणे गरजेचे आहे.

### ३.२.३ नागरी महिला हिंसाचाराचे : स्वरूप आणि उपाययोजना

**Urban Women Violence : Nature and Remedies.**

शहरी स्त्री ग्रामीण समाजाच्या तुलनेत शिक्षित आहे. नागरी स्त्री पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात काम करतात. यातून त्यांना उत्पन्न मिळते त्यामुळे आर्थिक दृष्ट्या नागरी स्त्री स्वावलंबी आहे. शिवाय या कमवत्या स्त्रियांना जीवनात काही प्रमाणात स्वातंत्र्य असते. त्यांना त्यांच्या हक्काविषयी जाणीव जागृती असते. म्हणून आदिवासी व ग्रामीण स्त्रियांपेक्षा नागरी स्त्रियांची स्थिती व दर्जा बराच उन्नत असतो. त्यामुळे नागरी स्त्रीयांच्या विरोधात हिंसाचार होत नाही असे नाही. शहरातील स्त्रियांनाही हिंसाचाराच्या या प्रमुख समस्यांना सामोरे जावे लागते.

नागरी महिला हिंसाचाराचे स्वरुप : **Nature of Urban Women Violence**.

**१) लैंगिक हिंसाचार :**

शहरात मोठ्या व दाट लोकसंख्येची वस्ती असते. तेथील लोकांचे परस्परसंबंध दोन प्रकारचे असतात. लोक परस्परांना अपरिचित असतात. शिवाय कुटुंब, सवंगडी, शेजारी, रुढी-परंपरा यांचे नियंत्रण शहरी वस्तीवर

फारसे नसते. त्यामुळे लोकांना काही स्वैर वर्तन करण्याची बरीच संधी असते. अशा परिस्थितीमध्ये शहरात महिला यांच्याविरोधात पुरुष मंडळींकडून विविध प्रकारचा हिंसाचार घडतो.

**अ) छेडछाड :**

स्त्रियांची होणारी छेडछाड ही नित्याची बाब ठरली आहे. याचे प्रमाण शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येते. शहरातील स्त्रियांना शिक्षण नोकरी व्यवसाय बाजार हा विविध कारणांच्या निमित्ताने गर्दीत जावे लागते. साधारणत: बाजारपेठ, सण-समारंभ, प्रवास, बस स्टॉप, रेल्वे स्टेशन इत्यादी गर्दीच्या ठिकाणी धक्का मारणे, स्पर्श करणे, अश्लील इशारे करणे, हावभाव करणे, गाणे म्हणे, शीट्टी मारणे, रस्ता अडवणे, पाठलाग करणे, पदर कापणे, अंगावर दगड मारणे इत्यादी विविध मार्गाने विशेषत: स्त्रियांच्या बाबतीत छेड काढली जाते. शहरातील गुंड, मवाली, रिकामटेकडे पुरुष, विशेषता:तरुणही शाळा महाविद्यालयाचा परिसर बागा चौक अशा ठिकाणी टोळक्यांनी एकत्र जमून स्त्रियांची छेडछाड काढतात. झोपडपट्ट्या व कामगार वस्तीतील असे टोळकी स्त्रियांना रस्त्यात, गल्लीबोळात गाठून तर गर्भश्रीमंतांची मुलीही दुचाकी-चारचाकी तून भटकत रस्त्यावरील स्त्रियांची छेड काढतात. अशा प्रकारची छेड काढणे म्हणजे स्त्रियांचा विनयभंग होय. अशा कनिष्ठ पुरुषांच्या क्रियेला प्रतिकार न करतात ना तक्रार करतात. यातून काही तरुणाचे धाडस वाढून ते बलात्काराचा प्रयत्न करतात. शहरातील अनेक स्त्रियांनाही छेडछाड अंगवळणी पडल्याने याच प्रकारच्या अडचण होणार हे गृहीत धरून स्त्रिया घराबाहेर पडतात. ही होणारी छेडछाड म्हणजेच स्त्रियांचा होणारा भयावह अशा प्रकारचा हिंसाचार होय.

**ब) प्रेमसंबंधातून होणारा हिंसाचार :**

शहरी पर्यावरण हे बरेचसे उदात्त असते. तरुण-तरुणींना प्रेम करण्यास त्यातून प्रेम विवाह करण्यास अनुकूल असे वातावरण असते. त्यामुळे शहरी तरुण तरुणी प्रेमात पडतात. मात्र काही थोड्या प्रेमीयुगुलांचा अपवाद वगळता, अनेकांच्या प्रेमात शारीरिक लैंगिक आकर्षणाचा भाग अधिक असतो. अनेक तरुण आपल्या प्रेमीकाशी विवाहपूर्व लैंगिक संबंध प्रस्थापित करू इच्छितात. काही तरुणी त्यांच्या भूलथापांना विवाह करण्याच्या अविश्वासाला बळी पडत व विवाहपूर्व संबंध तयार होतात. मात्र पुढे यातून विवाह करण्यास टाळाटाळ तरुण करतात त्यामुळे अनेक समस्या गंभीर रूप धारण करतात. अनेकदा प्रेमीयुगुलाचा विवाहास घरच्यांचा विरोध असतो. त्यामुळे विवाह करण्यासाठी तरुण तरुण मुलीला फूस लावून पळवून नेतो. मात्र तिचा लैंगिक उपभोग घेतल्यानंतर विवाह न करता वाऱ्यावर सोडून जातो. अशी फसगत झालेल्या तरुणी पुढे अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागते. यातूनच अनेक युवती आत्महत्येचा मार्ग निवडतात. अनेक तरुण एखादा तरुणीवर एकतर्फी प्रेम करतात. तिला आपल्याशी प्रेम संबंध ठेवण्याची विनंती करतात. काही जण तिला धमकावतात मात्र ती तरुणी त्याला झिडकारते, त्याचा अपमान करते, अशावेळी काही माती ग्रुप तरुण अशा तरुणीला विविध प्रकारे सतावतात. फोन करणे, पत्र लिहिणे, मेल करणे, अश्लील संदेश पाठवणे. तिचा सतत पाठलाग करणे एकटे गाठून विनयभंग करणे, एकतर्फी प्रेम करणारा तरुण विकृत बनतो. अशावेळी तरुणीने त्याच्याविरुद्ध गरीबा पोलिसात तक्रार केल्यास मात्र असा एकतर्फी प्रेम करणारा तरुण विकृत बनतो परिणामी त्या मुलीला मृत्युमुखी पाडतो. यातूनच चेहऱ्यावर सिड हल्ला, जखमी करणे, तिच्यावर बलात्कार करणे आणि त्यानंतर स्वतः

आत्महत्या करणे असे अनेक प्रसंग आपण दैनिक वर्तमानपत्रे व प्रसार माध्यमाच्या द्वारे ऐकत असतो.

**क) कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक हिंसाचार :**

आज स्त्रिया विविध ठिकाणी शिक्षण घेणे नोकरी करणे बनवणे या कामात व्यस्त आहेत. उच्च जीवनमानाची अपेक्षा वाढती महागाई इत्यादी कारणामुळे आज शहरी स्त्रियांना मोठ्या प्रमाणात विविध कार्यालय, व्यवसाय व सेवा क्षेत्रात नोकरी करू लागल्या आहेत . कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक हिसाचार म्हणजे कामाच्या ठिकाणी आणि लैंगिक हिंसाचाराच्या बळी पडणे. या लैंगिक हिंसाचारात काम देणारा मालक, नियोकता, बॉस मंडळी, सहकारी पुरुष आपल्या महिला कर्मचाऱ्यांचा लैंगिक छळ करतात. नोकरी मध्ये भरती करताना बढती व अन्य सोयी सुविधा देताना ते महिला कडून लैंगिक संबंध ठेवण्याची अपेक्षा करतात. अशावेळी लैंगिक संबंधात नकार देणाऱ्या स्त्रीला कामात सहकार्य न करणे, मुद्दाम जास्त काम देणे, त्यांच्याविषयी वरिष्ठाकडे तक्रार करणे, रजा व इतर सुविधा नाकारणे, अशा मार्गाने सत्तेचा दुरुपयोग करून हाताखाली असणाऱ्या स्त्री कर्मचाऱ्यांना केबिनमध्ये बोलावणे, अनावश्यक गप्पा मारणे, आपल्याबरोबर चहा-कॉफी वा भोजन घेणे, नाटक वां चित्रपट पाहणे, कामाच्या ठिकाणी येण्यासाठी लिफ्ट देऊ करणे इत्यादीची ऑफर देतात. अधिकाऱ्यांच्या मागण्यांना प्रतिसाद न देणाऱ्या स्त्रियांना ते छळतात संधी मिळतात त्यांचा विनयभंग करतात. अनेक जण बलात्कारही करतात. बदनामीची भीती, कामाची गरज यामुळे बऱ्याच स्त्री असा हिंसाचार नाईलाजाने सहन करतात. हिंसाचार याविषयी लढणाऱ्या स्त्रियांना अनेकदा नोकरीसाठी मुकावे लागते.

**ड) कामूक प्रतिमेतून होणारा हिंसाचार**

आज शहरात स्त्री ही एक वस्तू व कामुकतेचे प्रतीक आहे. अशा प्रकारचा कनिष्ठ दृष्टिकोन बळावत चालला आहे. प्रसारमाध्यमे, जाहिराती, नाटक, चित्रपट, दूरदर्शन,मालिका, साहित्य इत्यादीतून स्त्रीची नग्नता, मादक नृत्य, रोमान्स, बलात्कार अशा घटनांचे चित्रण वर्णन केले जाते. यातून स्त्रीकडे लैंगिक दृष्टीने पाहण्याची विकृती बळावत चालली आहे. या प्रवृत्तीतून स्त्री यांच्या विरोधात लैंगिक हिंसाचार करण्यास उत्तेजन मिळत आहे.

**२) कौटुंबिक हिंसाचार :**

शहरी स्त्री सुद्धा कौटुंबिक हिंसाचार आला सामोरी जाते. ग्रामीण स्त्री च्या बाबतीत हा अतिशय सूक्ष्म असा फरक आहे.

**अ) पत्नीस मारहाण :**

ग्रामीण कुटुंबाप्रमाणे शहरी कुटुंब व्यवस्थित सुद्धा स्त्रियांना मारहाण होत असते. शहरी भागामध्ये स्त्री शिकलेली सुशिक्षित असल्या अनेक नोकरी-व्यवसाय यामध्ये गुरफटलेली असते. त्यांचे पती बहुतांशी शिक्षित असतात. असे सुशिक्षित पुरुष पत्नीस मारहाण करत नाही अशा प्रकारचा एक खूप मोठा गैरसमज समाजामध्ये आहे. झोपड्या व कामगार चाळीतील पती प्रमाणेच फ्लॅटमध्ये व उच्चभ्रू कॉलनीत बंगल्यामध्ये राहणारे डॉक्टर्स, इंजिनिअर्स, वकील,प्राध्यापक, बँक मॅनेजर, कार्पोरेट क्षेत्रातील, शासकीय सेवेतील उच्च पदाधिकारी, मोठे

व्यापारी, उद्योजक हे सुद्धा आपल्या पत्नीस मारहाण करताना दिसून येतात. एवढेच नव्हे तर पोलिस व न्यायाधीश अशा पदावर असलेल्या स्त्रियांना ही पतीकडून मारहाण होत असल्याच्या घटना समोर येत असतात. या मारहाणीत पुरुष श्रेष्ठ व स्त्री कनिष्ठ पितृसत्ताक मनोवृत्ती कारणीभूत आहे. शिवाय सुशिक्षित कमावती कर्तबगार उच्चपदस्थ पत्नी अनेक पुरुषांना डोईजड होईल असे वाटते. म्हणून तिला आपल्या नियंत्रणात ठेवण्यासाठी तो पत्नीस मारहाण करतो. नोकरीच्या ठिकाणी स्त्रियांना सहकारी पुरुषाबरोबर मनमोकळेपणाने वागावे लागते. मात्र काही पतीना ते आवडत नाही. ती पत्नीच्या चरित्र विषयी संशय घेतात व त्यातून तिला मारहाण करतात. शहरी जीवनात भौतिक सुख उपभोगाची भरपूर साधने असतात. रंगेल पुरुष हे मद्यपान जुगार परस्त्रीगमन इत्यादीत रमतात. पत्नीने त्यांच्या अशा वर्तनात विरोध केल्यास ती तिला मारहाण करतात शहरात नोकरी करणाऱ्या पती-पत्नीचे मुलाकडे काहीसे दुर्लक्ष होते. परिणामी अनेक जोडप्यांची मुले बिघडतात. यासाठी पती-पत्नी एकमेकांना जबाबदार धरतात. त्यातून संघर्ष होऊन पती पत्नीस मारहाण करतो.

**ब) आर्थिक हिंसाचार :**

शहरी स्त्री विविध उद्योगात व्यवसायात कार्यालयात काम करत असते. अशा कार्यातून त्या स्त्रीला अर्थाजन प्राप्त होत असते. परंतु सर्व स्त्रियांना मिळवलेल्या उत्पन्नामध्ये संपूर्ण वाटा नसतो. ते त्यांच्या मर्जीप्रमाणे ते उत्पन्न खर्च करू शकत नाही. एखादी वस्तू घेऊ शकत नाहीत. स्त्री जरी कमावती असली तरी तिच्या खर्चासाठी तिला आपल्या पतीकडून पैसे घ्यावे लागतात. तिला आपल्या कामाचा खर्चाचा हिशोब द्यावा लागतो. स्त्री कमावती असली म्हणजे स्वावलंबी असेलच असे नाही. अशा कमावत्या स्त्रीला तिच्या उत्पन्नाचा उपभोग घेता न येणे म्हणजे तिच्यावर झालेला हा आर्थिक हिंसाचाराची होय आणि यातूनच शेतीचे आर्थिक शोषण होते.

**क) दुहेरी भूमिकेतून होणारा हिंसाचार :**

शहरातील स्त्री स्वताची पत्नी ग्रहिनी त्याच बरोबर विविध नात्यांची भूमिका पार पडत असते. आपल्या जबाबदार्या आणि भूमिका पार पडत असताना ती अनेक संकटाचा सामना करत असते. या कमावते स्त्रीला काम धंदा करते घरकाम बालसंगोपन ही पत्नीची जबाबदारी असे बहुसंख्य पती मानतात व तिला मदत करत नाहीत. नोकरी करणे, घर काम करणे, मुलाकडे लक्ष देणे, पतीची सेवा करणे,सासरच्या मंडळींची मर्जी सांभाळणे, इत्यादी कामे करत असताना तिला प्रचंड मानसिकतेतून जावे लागते. अशा प्रकारे दुहेरी भूमिका पार पडत असताना तिचे आरोग्य ढासळते. तथापि अनेक स्त्रियांना पती व सासरच्या मंडळीकडून साधी सहानुभूती देखील मिळत नाही. उलट कुटुंबाची सेवा करणे हे त्यांचे कर्तव्य आहे असे मानून त्यांच्याकडे दुर्लक्षजाते. त्यामुळे अनेकदा स्त्रियांचे मानसिक खच्चीकरण होते त्या हताश होतात.

**ड) हुंडाप्रथेमुळे होणारा हिंसाचार :**

ग्रामीण स्त्रिया प्रमाणेच शहरी स्त्रियांचाही कुटुंबात छळ होतो. शहरातील अति निम्न आर्थिक स्तरातील अति उच्च आर्थिक स्तरातील कुटुंबापेक्षा मध्यमवर्गीय कुटुंबात हुंड्यासाठी होणाऱ्या छळाचे प्रमाण अधिक आहे. शहरांमध्ये तरुणाच्या शिक्षणा प्रमाणे उत्पना प्रमाणे हुंड्याची मागणी वाढते. हुंडा हा विवाह प्रसंगी मागीतला

जातो. हुंड्याची पूर्तता न झाल्यास सुनेच्या माता-पिता कडून वरचेवर पैसे, वस्त्रे,अलंकार, वाहन, फर्निचर, घरगुती वापराची महागडी उपकरणे, भेटवस्तू मागितल्या जातात. या मागण्यांची पूर्तता न झाल्यास अथवा विलंब झाल्यास सुनेस मारहाण, उपाशी ठेवणे, कष्टप्रद कामे देणे, पतीशी संपर्क ठेवू न देणे, घराबाहेर पडू न देणे,माहेरच्या नातलगांना भेटू न देणे किंवा तिला माहेरी पाठवून देणे या प्रकार फिल्म मार्ग अवलंबिले जातात. प्रसंगी तिची हत्याही केली जाते.

**इ) स्त्रीभ्रूण हत्येतून होणारा हिंसाचार :**

वंशाला दिवा, संपत्तीला वारस या भावनेतून शहरी कुटुंबात मोठ्या प्रमाणामध्ये स्त्रीभ्रूणहत्या घडून येते. मुलाच्या जन्मास प्राधान्य देऊन मुलीचा जन्म नाकारण्याची प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात दिसून येते. शहरांमध्ये गर्भलिंग निदान करण्याची सोय उपलब्ध नसल्याने मोठ्या प्रमाणात स्त्रीभ्रूणहत्येचा मार्ग अवलंबला जातो. शहरात अशी गर्भलिंग चाचणी सुविधा उपलब्ध आहे. कायद्याने गर्भलिंगनिदान बंद असले तरी पैशाच्या अमिषा पोटी अनेक डॉक्टर्स गर्भलिंग निदान चाचणी घडवून आणतात. यामध्ये अनेक प्रसंगी स्त्री तयार नसते. परंतु तिच्यावर याबाबत सक्ती केली जाते. वारंवार स्त्री गर्भाची हत्या केली जाते. त्याचे दुष्परिणाम या स्त्रीला भोगावे लागतात. तिचे मानसिक स्वास्थ्य बिघडते, शारीरिक स्वास्थ्य बिघडते, मृत्यू ओढवतो अशा प्रकारे गर्भवती स्त्रियांच्या विरोधातील शारीरिक व मानसिक हिंसाचाराची ती बळी ठरते.

**३) सामाजिक हिंसाचार :**

शहरी स्त्रियांच्या विरोधात लैंगिक व कौटुंबिक हिंसाचार प्रमाणेच सामाजिक हिंसाचार ही होतो. शहरी समाजात सुशिक्षित,बुद्धिवादी, पुरोगामी सुधारणावादी मानला जातो. असे असले तरी स्त्रियांच्या बाबतीत हिंसाचारास कारणीभूत ठरणार्या घटना पुढील प्रमाणे.

**अ) वेश्या व्यवसायातून होणारा हिंसाचार :**

वेश्याव्यवसायाला फार प्राचीन परंपरा आहे. हा व्यवसाय पूर्वीपासून चालत आलेला आहे. अशा व्यवसायामध्ये नवीन स्त्रियांची भरती करणे आवश्यक असते. त्यामुळे शहरात वेश्या व्यवसायाची संबंधित असणारी दलाल मंडळी अनाथ गरीब अडचणीत सापडलेल्या स्त्रियांना व तरुणींना फुस लावून, कधी बसून तर कधी जबरदस्तीने व्यवसाय करत असतात. वेश्या व्यवसायास नकार देणाऱ्या तरुणींना मारहाण करणे, बलात्कार करणे त्यांच्यावर हिसाचार करीत असतात. अनेकदा काम किंवा नोकरी देण्याचे आमिष दाखवून या तरुणींना दुसऱ्या शहरात परदेशात हा व्यवसाय करण्यास पाठवले जाते. तिथे त्यांची विक्री केली जाते तेथे गेल्यावर आपली फसगत झाल्याचे त्यांच्या लक्षात येते. पण परतीचा मार्ग सहसा उपलब्ध होत नाही व त्यांना उर्वरित आयुष्य अशा व्यवसायात घालवावी लागते.

**ब) दंगल प्रसंगी होणारा हिंसाचार :**

शहरी समुदाय हा विजातीय प्रकारचा असतो. येथील संबंध हे औपचारिक प्रकारच्या असतात. शहरामध्ये विविध धर्माचे,पंथांचे, प्रांतांचे, भाषेचे, जाती धर्माचे लोक राहतात. त्यांचे राहणीमान संस्कृती व हितसंबंध

परस्पराहून वेगळे असते. या विरोधातूनच प्रामुख्याने शहरात अधून मधून सांप्रदायिक किंवा जातीय किंवा जमातवादी दंगली उद्भवतात. अशा दंगलीच्या वेळी दंगलखोर मंडळी व काही संधीसाधू समाजकंटक हे स्त्रियांना हिंसाचाराचे शिकार बनवतात. स्त्रियांना मारहाण करणे, त्यांची संपत्ती लुटणे, शक्य झाला त्यांच्यावर बलात्कार करणे या गोष्टीचा प्रतिकार करणाऱ्या स्त्रियांना ठार केले जाते. इत्यादी हिंसक कृत्ये दंगल खोराकडून केली जातात. उदा. गुजरात मधील गोंध्रा दंगलीच्या वेळी अहमदाबादमधील सहा महिन्यांची गरोदर असलेल्या बिल्किस बानु नावाच्या स्त्री वर दंगलखोरांनी सामूहिक बलात्कार करून तिच्या कुटुंबातील १४ व्यक्तींची हत्या केली. भारतामध्ये अशा प्रकारच्या घटना प्राचीन कालखंडा पासून घडत आल्या आहेत. परंतु अशा घटना भाजप प्रणीत सत्तेत जास्त दिसून येतात या घटना देशामध्ये २०१४ पासून वाढल्या असून सर्वोच न्यालयाने यावर तत्काळ उपाय योजना राबल्या पाहिजेत असा आदेश देऊनही अध्याप अंमलबजावणी कोणत्याही केंद्र सरकारने अथवा राज्याने राबवल्याच्या दिसून येत नाहीत. अशा प्रकारच्या घटना ह्या नेहमी कट्टरवादी आणि हिंसक राजकीय सत्ता असलेल्या काळात होताना दिसतात.या घटना मधून राजकारणी आपले राजकीय हित साधतात आणि दंगली घडवून राजकीय हक्क मिळवतात. परिणामी ते कोणत्याही थराला जातात. भारतात हिंदू, मुस्लिम, हिंदू शीख, हिंदू ख्रिस्ती तसेच उच्च जातीं यांच्यात असलेल्या सांप्रदायिक व जातीय तिथून वेळोवेळी दंगली उद्भवल्या असून या दंगलीतील स्त्री यावर प्रचंड प्रमाणावर हिंसाचार झालेला दिसतो.

**क) ग्लॅमरच्या माध्यमातून होणारा हिंसाचार :**

शहरामध्ये नाटक, चित्रपट, दूरदर्शन मालिका, जाहिराती इत्यादीची निर्मिती. सौंदर्य स्पर्धा, क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतीक उपक्रम इत्यादीची रेलचेल असते. अशा उपक्रमात सहभागी होऊन यशस्वी होणाऱ्या स्त्री-पुरुषांना पैसा, प्रसिद्धी, मानसन्मान, प्रतिष्ठा मिळते. त्यामुळे अनेक स्त्रिया विशेषता सुंदर म्हणजे कलागुण असणाऱ्या तरुणी अशा उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रयत्न करत असतात. देशाच्या विविध भागातून अशा तरुणी वर उपक्रमांची केंद्र असलेल्या मोठमोठ्या शहरात. नशीब आजमावण्यासाठी येतात. परंतु अशा शहरात प्रचंड प्रमाणात स्पर्धा असते. त्यामुळे अशा तरुणींना नाटक, चित्रपट, दूरदर्शन मालिका, सौंदर्य व क्रीडा स्पर्धा इत्यादी संधी देण्याच्या निमित्ताने संबंधित पुरुष मंडळी दिग्दर्शक संयोजक व परीक्षक यांचे खरेखोटे दलाल त्यांच्याशी लैंगिक संबंध ठेवण्यासाठी भाग पाडले जातात. त्यांच्या असह्यतेचा गैरफायदा घेऊन त्यांचे लैंगिक मानसिक व आर्थिक शोषण केले जाते. या शोषणाचा विरोध करणाऱ्या तरुणींना विविध प्रकारे छळले जाते. यामध्ये बदनामी करणे, काम मिळू न देणे, विविध संकटात अडकवणे. सध्या 'मी टू'यासारख्या मोहिमानी या क्षेत्रातील स्त्री यांच्याविरोधात होणाऱ्या लैंगिक हिंसाचारास वाचा फोडली आहे. काही स्त्रिया मात्र पैसा व ग्लॅमरच्या हव्यासापोटी पुरुषाच्या अशा मागण्या पुरवण्यास तयार होतात. मात्र पुढे त्यांचे समस्येत अडकल्यासारखी अवस्था होते व पुढील आयुष्याच्या हिंसाचाराला बळी पडतात.

**ड) ब्लॅकमेलिंग :** शहरी लोकांचे परस्परसंबंध हे करार आत्मक व उपयुक्ततावादी असल्याने बहुसंख्य लोक हे इतरांच्या चुकांच्या उणिवांचा गैर त्याचा फायदा घेऊन आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करतात. ही एक शहरी जीवनातील सामान्य सामाजिक वृत्ती. या प्रवृत्तीतून काही पुरुष मंडळी स्त्रियांना ब्लॅकमेल करून

छळतात. काही स्त्रियांना यातून अनेक ती कृती करावी लागतात अथवा त्या बळी पडतात. यासंबंधीचा पूर्व मिळून त्याआधारे कलाकृतीने पुरुषी स्त्रियांना बदाम करण्याची भीती घालून त्यांच्याकडून पैसे काढतात. आपल्याशी लैंगिक संबंध ठेवण्याची सक्ती करतात. आपल्या मर्जीनुसार वागण्यास भाग पडतात. यालाच ब्लॅकमेलिंग असे म्हणतात. अशा ब्लॅकमेलिंग मुळे स्त्रियांचा मोठा मानसिक शारीरिक आणि आर्थिक कोंडमारा होतो. परिणामी स्त्रिया आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. कित्येक वेळा त्यांची हत्या केली जाते त्यांचे जीवन उद्धवस्त केले होते.

**ई) लुटमारीतून होणारा हिंसाचार :** शहरामध्ये स्त्रियांना गर्दी बाजारपेठ घरात घुसून लूटमार करण्याचे प्रमाण वाढले आहे. रस्त्यावरून, बसमधून, रेल्वेमधून हिसडा मारून मंगळसूत्र पळवण्याचे प्रकार वाढले आहेत किंवा चालत जाणाऱ्या स्त्रियांच्या अंगावर वाहन घालून त्यांचा अपघात अपघात घडवणे व मदतीचा बहाणा करून त्यांचे पैसे लुटणे. एकटी असणाऱ्या महिलेस  मारहाण करून दुखावणे अशा प्रकारच्या घटना घडतात. यामध्ये त्यांचा खून केला जातो. अनेकदा लुटारू स्त्रियावरती बलात्कार करतात. घरगडी, बनावट फिरते विक्रेते इत्यादी कडून अशा प्रकारची ही कृत्ये घडतात. याची उदाहरणे आपणास  ऐकण्यास मिळतात. या प्रकारे शहरात स्त्रियांच्या विरोधातील विविध प्रकारचा लैंगिक हिंसाचार होताना दिसून येतो

**नागरी महिला हिंसाचाराबाबत  उपाययोजना :**

आदिवासी ग्रामीण व शहरी स्त्रियांच्या विरोधात होणारे हिंसाचाराच्या स्वरूपात थोडे साम्य आहे. काही बाबतीत भिन्नता दिसून येते. त्यामुळे शहरी स्त्रियांच्या विरोधात होणाऱ्या  हिंसाचाराच्या स्वरुपात  केलेल्या व करावयाच्या उपाययोजनाचे स्वरूप संमिश्र दिसून येते. म्हणून शहरी स्त्रियांच्या संदर्भातील उपाय योजनाघ्या काही प्रमाणात आदिवासी व ग्रामीण स्त्रियांच्या संदर्भातील उपायोजना सारख्याच आहेत. तर काही उपाय योजना वेगवेगळ्या स्वरूपाच्या आहे.

**१)  घटनात्मक तरतुदीची प्रभावी अंमलबजावणी :**

आदिवासी व ग्रामीण स्त्री या प्रमाणेच नागरी स्त्री यांच्या विरोधात होणाऱ्या हिंसाचारास आळा घालण्यासाठी स्त्रियांच्या हक्कासाठी व संरक्षणासाठी घटनात्मक तरतुदीची अंमलबजावणी करणे ही काळाची गरज आहे. या तरतुदीचे विवेचन आदिवासी स्त्रियांच्या विरोधात होणारा हिंसाचार यावरील उपाययोजनेमध्ये आपण सविस्तर केलेले आहे. म्हणून सदरच्या विवेचनात आहे. त्याची पुनर्मांडणी येथे टाळली आहे. नागरी स्त्री शिक्षित कमावती स्वतःच्या हक्काविषयी जागृती असणारी आहे, तथापि शहरात झोपडपट्टी व कामगार वस्तीत राहणारे स्त्रियांमध्ये, आदिवासी व ग्रामीण त्याप्रमाणेच आपल्या हक्कांविषयी जाणीव जागृती याचा अभाव असतो. त्यामुळे शहरातील अशा निम्नस्तरातील स्त्रियांचे घटनात्मक हक्क बघण्यास मिळतील अशा प्रकारचे सामाजिक पर्यावरण निर्माण करणे गरजेचे बनते.

**२)  कडक कायद्याची अंमलबजावणी :**

महिलांच्या सबलीकरणासाठी संरक्षणासाठी व सुरक्षिततेसाठी आणि कायदे केले तसेच संरक्षण नियमावली बनवली गेली. पण तरीही अंमलबजावणीच्या पातळीवर आजही आपल्याकडे आव्हाने आहेत त्याची कारणे पुढील प्रमाणे.

ट स्त्रियांचे त्यांच्या अधिकाराविषयी अज्ञान

ट कायद्याची किचकट प्रक्रिया

ट कायद्यातील संधिग्धता

ट कार्यक्षम, मोफत कायदेशीर सल्ल्याची उणीव

ट वैद्यकशास्त्र, फॉरेन्सिक, पोलीस,सरकारी यंत्रणा, न्यायालय, स्वयंसेवी संस्था, मंत्रालयीन कामकाज इत्यादीचा महिलांशी परिणामकारक समन्वयाने सत्ता येणे. महिला साठी काही कायदे केले त्याचा उल्लेख आपण पूढील प्रमाणे करू

स्त्री विरोधी हिंसाचार रोखण्यासाठी शासनाने हिंसाचार विरोधी अनेक कायदे केले आहेत. त्यांची अंमलबजावणी कडकपणे होणे गरजेचे आहे. या संदर्भातील काही महत्त्वपूर्ण असे कायदे म्हणजे भारतीय दंड संहिता कलम ३५४ नुसार छेड काढणे हा गुन्हा असून तो करणाऱ्या दोन वर्षे कारावास व दंड अथवा दोन्हीही होऊ शकते. त्याचबरोबर स्त्रियांचा मुलींचा अनैतिक व्यापार करण्यास प्रतिबंध करणारा कायदा: १९५६ मध्ये करण्यात आला. हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१, हुंडा घेण्यास प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तीस ५ वर्षे कारावास व १५००० दंडाची शिक्षा होऊ शकते. कुटुंबातील हिंसाचार रोखण्यासाठी कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा. २००५. गर्भलिंग चाचणी प्रतिबंध करणारा कायदा १९९४, कार्यस्थळी होणाऱ्या लैंगिक छळास प्रतिबंध करणारा कायदा २०१३, त्याचबरोबर सांप्रदायिक दंगलींना आळा घालण्यासाठी सांप्रदायिक हिंसाचार निवारण कायदा २०१३, सदर सर्व कायदे या मधील तरतुदी अत्यंत योग्य असून या कायद्यांची याची काटेकोरपणे अंमलबजावणी होताना दिसून येत नाही. या कारणांमुळे शहरातील समाजकंटक, गुन्हेगार, गुंड, यांना त्यांची दहशत वाटत नाही. यातील गुंडांचे पोलिसांशी आर्थिक संबंध असतात. त्यामुळे अशा गुन्ह्यांकडे कित्येकदा पोलिस दुर्लक्ष करतात. असे गुन्हे गुन्हे नोंद झाल्यास आरोपी त्यातून सहीसलामत सुटण्याची शक्यता अधिक असते. महिलांची विशेषता दुर्बल, गरीब, निराधार महिलांची तक्रार नोंदवून घेण्यास पोलिस टाळाटाळ करतात. त्यांच्याकडे लाच मागितली जाते वरिष्ठांनी पैसे देण्यास सांगितले आहे असे पीडित महिला अथवा गरीब निराधार महिलेस सांगीतले जाते. त्याचबरोबर अनेक राजकारणी व्यक्ती अशा गुन्ह्यांना पाठीशी घालतात. त्यामुळे अशा गुन्ह्यांना प्रोत्साहन मिळते. राजकारणी व्यक्ती आपल्या सत्तेचा दुरुपयोग करतात. त्यामुळे गुन्हेगारावर कडंक कारवाई होत नाही. म्हणून पोलीस प्रशासनातील अशा प्रवृत्ती मोडून काढून एखादा लोकसेवक लाचेची मागणी करत असल्यास अँटी करप्शन ब्युरो (लाच लुचपत प्रतिबंधक विभाग) हेल्पलाइनवर तात्काळ संपर्क साधावा. पोलीस आणि राजकीय दबाव झुगारून योग्य कारवाई केल्यास अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा बसेल.

१) शहरी महिलांना लघु उद्योग व स्वयंरोजगारासाठी विशेष प्रशिक्षण दिले गेले पाहिजे.

२) शहरी महिला उद्योजकांना व्यवसाय करता आवश्यक संवाद कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले पाहिजे.

३) महिला उद्योजिका करिता स्वतंत्र विक्री महामंडळ स्थापन करण्यात आले पाहिजे. तसेच महिला पतसंस्थांच्या निर्मितीकरता प्रोत्साहन देण्यात आले पाहिजे व कमीत कमी दरात कर्ज उपलब्ध करून घेण्यात आले पाहिजे.

४) कौशल्य वाढीचे प्रशिक्षण प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांना कामाची संधी मिळेल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

३) कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण:

कौटुंबिक हिंसाचार हा सामाजिक प्रगतीच्या मार्गातील महत्त्वाचा अडसर. सरकारचे महिलांच्या कायदेशीर हक्काचे संरक्षण करण्याची जबाबदारी आहे. कलम ११ अन्वय या कायद्याच्या संदर्भात शासनाची कर्तव्य स्पष्ट केली पाहिजेत.

१. कौटुंबिक हिंसाचाराला आळा घालण्यासाठी शासनामार्फत कायद्याला व्यापक प्रसिद्धी करणे.

२. पोलीस अधिकारी व माननीय न्यायालय शेळी मधील सदस्यांना वेळोवेळी सचेतन केलें पाहिजे व महिलांच्या हक्काच्या संदर्भात प्रशिक्षण देण्यात यावे.

३. स्त्रियांच्या बाबतीत जे गुन्हे होतात त्या गुन्ह्यात वारंवार किंवा गुन्ह्याची तीव्रता पासून ज्या पुरुषाने गुन्हा केला असेल त्या पुरुषाचे नावे जाहीर करून पोलीस स्टेशनच्या फलकावर लावणे यासाठी गृह खात्याला आवश्यक ती सूचना दिल्या पाहिजेत.

४. बालकांवरील अत्याचार बालकांचे अपहरण हीसुद्धा अप्रत्यक्षपणे स्त्रियांवरील अत्याचार आहेत त्याबाबत कडक तरतूद करण्यात यावी.

**४) विविध संस्थांची स्थापना :**

हिंसाचाराला बळी पडलेल्या स्त्रियांना मदत मार्गदर्शन आधार देण्यासाठी विविध प्रकारच्या संस्था शहरात स्थापन केलेल्या आहेत. कौटुंबिक हिंसाचारामुळे निराधार झालेल्या, बलात्कारामुळे बदनाम झालेला, वेश्या व्यवसायातून सुटका झालेल्या इत्यादी स्त्रियांसाठी शहरात आधार केंद्र स्थापन केलेली आहेत. वरील पीडित स्त्रियांचे शारीरिक, मानसिक, आर्थिक व सामाजिक पुनर्वसन करण्याचे कार्य ही आधार केंद्रे करतात. त्याच बरोबर शहरात शिक्षण व नोकरी धंदा निमित्ताने येणाऱ्या पण निवासाची सोय नसणाऱ्या मुली व स्त्रियासाठी शासनाने तसेच सेवाभावी संस्थांनी निवारा केंद्रीय वसतिगृहे स्थापन केलेली आहेत. त्यामुळे अशा मुली स्त्रियांना शहरात सुरक्षितता प्राप्त होत आहे. याचबरोबर गरीब,निराधार, पीडित असलेल्या अठरा वर्षाखालील मुलींसाठी, ज्यांना काळजी व संरक्षणाची गरज असते, शासनामार्फत व सेवाभावी संस्था मार्फत बालग्रहे चालवले जातात. अशा बालपणात मुलींच्या निवासाची सोय, भोजनाची शिक्षणाची सोय, केली जाते. त्यामुळे अशा मुलींची संभाव्य अन्याय अत्याचारी व हिंसाचारापासून संरक्षण होण्यास काही प्रमाणात मदत होते. या प्रकारच्या संस्था प्रामुख्याने शहरात आढळतात म्हणून त्यांचा निर्देश शहरी संदर्भातील उपायोजनेत केलेला आहे.

**५) महिला संघटना :**

शहरामध्ये सुशिक्षित अर्थाजन करणाऱ्या,आपल्या हक्कांविषयी जागृत असणाऱ्या,स्वतःच्या प्रगतीसाठी

प्रयत्न करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे या स्त्रिया एकत्र येऊन संघटना स्थापन केलेल्या आहेत. या संघटना स्त्री यांच्या विरोधात होणार्या हिंसाचार विरुद्ध आवाज उठवतात. पीडित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी मदत करतात, मार्गदर्शन व प्रोत्साहन अर्थसहाय्य पुरवतात. विविध व्यवसायातील स्त्रियांनीहीकामाच्या ठिकाणी होणाऱ्या छळास प्रतिबंध करण्यासाठी आपापल्या संघटना स्थापन केल्या आहेत. मोलकरणीच्या संघटना, सफाई कामगार संघटना, बिडी कामगार संघटना. शिक्षक, वकील,डॉक्टर्स अशा विविध व्यवसायातील महिला कक्ष स्थापन केले असून हे कक्ष आपल्या सरकारी महिला यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचार विरुद्ध लढतात. महिला संघटनाच्या स्थापनेमुळे स्त्रियांच्या विरोधात हिंसाचार करू इच्छिणाऱ्या वर एक प्रकारचा दबाव येऊन ते हिंसाचार करण्यापासून परावृत्त होतात. महत्वाचे म्हणजे या संघटना स्त्रियांचे मेळावे, शिबिरे, परिषदा, अधिवेशने इत्यादीचे आयोजन करून स्त्रियांना आपल्या हक्कांविषयी जागृत करण्याचे व त्यांना आपल्याविरोधात होणार्या हिंसाचाराचा प्रतिकार करण्याचे त्याविरुद्ध लढण्याचे धैर्य निर्माण करतात.

### ६) इतर तरतुदी :

शहरी स्त्रियांच्या विरोधातील हिंसाचारास आळा घालण्यासाठी शहरामध्ये अनेक तरतुदी केलेल्या दिसतात. शहरात होणाऱ्या अनेक छेडछाडीच्या घटना रोखण्यासाठी पोलिसांची पथके स्थापन केली आहेत. अशी पथके शाळा-महाविद्यालय, बाजारपेठ, गर्दीची ठिकाणे, पर्यटन स्थळे इत्यादी ठिकाणी गस्त घालतात. अशी पथके गुंड, मवाली तरुणावर वचक ठेवतात. काही शहरात महिलांच्या तक्रारी नोंदवून घेऊन त्यांच्या तक्रारीचा तपास करण्यासाठी स्वतंत्र महिला पोलिस ठाणे व चौक्या स्थापन केलेल्या आहेत. त्याचबरोबर प्रत्येक पोलीस ठाण्यात स्वतंत्र पोलीस कक्षाची स्थापना केलेली आहे. साधारणत: पुरुष हे पोलीस स्त्रियांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करतात. स्त्रियांच्या तक्रारीकडे बहुदा दुर्लक्ष केले जाते. याचे आपण चर्चा केलीच आहे. पोलीस कक्ष स्थापन करण्यामागील उद्देश एक महिला दुसरे महिलेसाठी तिची तक्रार व्यवस्थित ऐकून घेऊन योग्य कार्यवाही करेल व त्या स्त्रीला न्याय मिळवून देईल ही आहे. याप्रकारे शहरी स्त्रीयांच्या विरोधात होणारे हिंसाचारावर अशा प्रकारच्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

### संयुक्त राष्ट्र महिला (United Nation-Women)

जगातील महिलांच्या समानतेच्या मुद्याला चालना देण्याच्या उद्देशाने ४ जुलै २०१० रोजी जागतिक संस्थेमध्ये एकल एजन्सी म्हणून संयुक्त राष्ट्र महिलांच्या निर्मितीला मान्यता देण्यात आली. त्याची स्थापना १ जानेवारी २०११ रोजी झाली. त्याचे मुख्यालय अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात आहे. महिलांवरील सर्व प्रकारचा भेदभाव दूर करून त्यांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणे हे संस्थेचे मुख्य कार्य असेल उल्लेखनीय आहे भारताच्या विजयालक्ष्मी पंडित यांना १९५३ मध्ये ८ व्या संयुक्त राष्ट्र महासभेच्या पहिल्या महिला अध्यक्ष होण्याचा मान मिळाला होता. युनायटेड नेशन्सच्या ४ संस्थांचे विलीनीकरण करून या नवीन घटकाला युनायटेड नेशन्स वुमन असे नाव देण्यात आले आहे. या संस्था खालीलप्रमाणे आहेत.

### युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन फॉर वुमन :

जगात स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करणे आणि हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे. हे संयुक्त राष्ट्र महिलां संघटनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. लैंगिक असमानता प्रत्येक समाजात आहे. लैंगिक असमानता केवळ महिलांच्या विकासात अडथळा आणत नाही, तर राष्ट्राच्या आर्थिक आणि सामाजिक विकासातही अडथळा आणते. अशा परिस्थितीत महिलांना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी आणि राष्ट्राच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांना पूर्ण संधी उपलब्ध करून देण्यासाठी महिलांवरील लैंगिक असमानता दूर करणे अत्यंत आवश्यक आहे. स्त्री-पुरुष समानता हा केवळ एक महत्त्वाचा मानवी हक्क नाही तर त्याच्या प्राप्तीवर मोठा सामाजिक-आर्थिक परिणाम आहेत म्हणन महिला सक्षमीकरणामुळे आर्थिक समृद्धी आणि विकास साध्य होईल..

### युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन फॉर वुमन : संक्षिप्त इतिहास

अनेक वर्षांपासून, युनायटेड नेशन्सला महिलांच्या समानतेला चालना देण्यासाठी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले, परिणामी, जुलै २०१० मध्ये लैंगिक समानता आणि महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या महासभेद्वारे महिलांसाठी संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना करण्यात आली. युनायटेड नेशन्सच्या ४ संस्थांचे विलीनीकरण करून या नवीन घटकाला युनायटेड नेशन्स वुमन असे नाव देण्यात आले आहे.

या संस्था खालीलप्रमाणे आहेत.

* संयुक्त राष्ट्र महिला विकास निधी १९७६
* महिला प्रोत्साहन विभाग १९४६
* लिंग आधारित समस्यांवरील विशेष सल्लागाराचे कार्यालय १९४६
* युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट फॉर द प्रमोशन ऑफ वुमन १९७६

### कमिशन ऑन द स्टेटस ऑफ वुमन (CSW) :

लिंग समानता आणि महिलांच्या सशक्तीकरणाच्या प्रचारासाठी केवळ समर्पित जागतिक आंतरशासकीय संस्था. हे आर्थिक आणि सामाजिक परिषद (ECOSOC) चे कार्यात्मक आयोग आहे, ज्याची स्थापना २१ जून १९४६ रोजी झाली. परिषदेची स्थापना ठराव ११(II) द्वारे करण्यात आली.

महिलांच्या स्थितीबाबत आयोग महिलांच्या हक्कांना चालना देण्यासाठी, जगभरातील महिलांच्या जीवनातील वास्तवाचे दस्तऐवजीकरण करण्यासाठी आणि लैंगिक समानता आणि महिला सक्षमीकरणावर जागतिक मानके तयार करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

### युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन फॉर वुमन : कार्य

आंतरराष्ट्रीय करार युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन फॉर वुमनच्या क्रियाकलापांना मार्गदर्शन करतात.

युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन फॉर वुमनची धोरणात्मक दिशा, उद्दिष्टे आणि दृष्टीकोन लिंग समानता साध्य करण्यासाठी आणि महिला सशक्तीकरणाला प्रोत्साहन देते.

कन्व्हेन्शन ऑन द एलिमिनेशन ऑफ ऑल फॉर्म्स भेदभाव विरुद्ध महिला (CDAW) आणि पर्यायी प्रोटोकॉल.

युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन फॉर वुमनची मुख्य कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

महिलांवरील अत्याचाराला विरोध.

महिला सक्षमीकरणाला चालना देणे.

महिला सुरक्षेचा प्रचार.

महिलांचा राजकीय सहभाग वाढवा

युनायटेड नेशन जनरल असेंबली : युनायटेड नेशन जनरल असेंबली ने २० डिसेंबर १९९३ च्या ठरावा मध्ये महिला विरोधात हिंसाचाराची निर्मूलनाची घोषणा करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने समानता, सुरक्षितता, स्वातंत्र्य, अखंडता या सर्व मानवाच्या प्रतिष्ठेच्या संदर्भात महिलांना हक्क आणि तत्वे लागू करण्याची गरज आहे. हे जाहीर करण्यात आले. मानवी हक्काच्या सार्वत्रिक घोषणा यामध्ये महिलांना समान अधिकार प्रदान करण्यात आले. सर्व महिलांना हिंसेपासून मुक्त राहण्याचा अधिकार आहे. या विचाराचा उदय. १९७० पासून दृष्टिक्षेपात आला. युनायटेड नेशन ची स्थापना झाल्यापासून युनायटेड नेशन्स कमिशन ओन स्टेट्स ऑफ वुमन यासारख्या संस्थाद्वारे महिलांच्या हक्काच्या संदर्भात विशेष लक्ष देण्यात आले. परंतु विशेषता सुरुवातीच्या काळापर्यंत शिष्टाचाराचे लक्ष असलेल्या स्त्रियांच्या उच्च दरांना लक्ष केले नाही. यामध्ये महिला विरुद्ध आणि अत्याचार व इतर अमानुष अपमानास्पद वागणूक किंवा शिक्षा विरुद्ध अधिवेशन, महिला वीर सर्व प्रकारचा भेदभाव निर्मूलन करणे, महिलांवरील हिंसाचाराचे उच्चाटन करण्यास हातभार लावणे, महिलांना सक्षम बनवणे त्याचबरोबर महिलावरील हिंसाचाराचे निर्मूलन, समानता, विकास आणि शांतता प्रस्थापित करणे. त्यांचे हक्क अबाधित ठेवणे हे निश्चित करण्यात आले.

दुसऱ्या महायुद्धाच्या नरसंहारानंतर संयुक्त राष्ट्रांनी मानवाधिकार अत्यंत महत्त्वाचे मानले. भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी महत्वाचा दृष्टीने १९४८ मध्ये महासभेने मानवाधिकारांची सार्वभौम घोषणा स्वीकारली. ही बंधनकारक घोषणा संपूर्ण जगासाठी समान दर्जा प्रस्थापित करते, ज्याचे समर्थन करण्यासाठी संयुक्त राष्ट्र प्रयत्नशील असेल.

१५ मार्च २००६ रोजी महासभेने संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोगाचा त्याग केला आणि संयुक्त राष्ट्र मानवाधिकार परिषद स्थापन केली.

## ३.४ सारांश :

प्रस्तुत घटकांमध्ये आपण विविध मुद्दे अभ्यासले आहेत देवदासी, वेश्या, नागरी स्त्री आदिवासी स्त्री, ग्रामीण स्त्री आणि त्यावरील उपाय योजना याचा सविस्तर आपण अभ्यास केला आहे. स्त्रीला समाजात असलेले दुय्यम स्थान, पुरुष प्रधान संस्कृतीमुळे घुटमळणारी समाजाची अवस्था या सर्व घटकावर समाजाची आर्थिक घडी बदलल्यामुळे होणाऱ्या उलथापालथ आर्थिक हितसंबंध, आर्थिक विषमतेतून निर्माण होणारे अन्यायकारक जीवनपद्धती या मुख्य कारणांचे आपण कारणमीमांसा जाणून घेतली. तिन्ही स्त्रियांचे स्वरूप समजून घेतल्यानंतर तर आपण नागरी देहविक्री करणाऱ्या महिलां विषयी काही चर्चा केली. त्यामध्ये आर्थिक विषमतेचे चटके सोसणाऱ्या महिलांचे प्रमाण शरीरविक्रय व्यापारात वाढताना दिसत आहे. हा प्रश्न स्त्रियांच्या लैंगिक शोषणाच्या परीसीमेचा तर आहेच, परंतु समाजातील सर्व प्रकारची विषमता संपत्ती व अधिकाराची समसमान वाटणी यातून तो उद्‌भवला असून हा मानवतेला अशोभनीय आहे. भाजीपाला,मुकेप्राणी,यांची व्हावी तशी विक्री हे मानवतेला आणि मानवी मूल्याचे उल्लघन करते. देह विक्री करणाऱ्या बाजारात खरीदल्या/ विकल्या जाणाऱ्या व्यक्तींना अत्याचार, हिंसा, अपमान, उपेक्षा, शास्वतीचा अभाव, कलंकित जीवन आपत्तीचा सामना करावा लागतो. नैराश्य असाध्य आजार लैंगिक संसर्गाचे आजार आणि गुप्तरोग यासारखी कमजोर करणारी दुखणे यातून मृत्यू ओढवतो. हिंसाचार मानवी हक्काचे उल्लंघन तसेच बाह्य जगातील गुन्हेगारीची असुरक्षितता यामुळे या महिलांना असाध्य रोगाचा धोका अधिक वाढतो. उपरोक्त प्रकरणांमध्ये स्त्रियांच्या विरोधातील हिंसाचार विविध मुद्यांच्या अनुषंगाने हिंसाचाराची पार्श्वभूमी स्वरूप आणि उपायोजना यांचे अध्ययन केले आहे. व त्याची तटस्थ वैज्ञानिक दृष्टिकोनातून मांडणी केली आहे त्याच बरोबर संयुक्त राष्ट्र महिला संघटन हिंसाचार विषयक धोरणे, त्यांची उद्दिष्टे याविषयी चर्चा केली आहे.

### ३.५ अ) स्वयं अध्ययन प्रश्न (खालील प्रश्नाची एका वाक्यात उत्तरे लिहा)

१. भारतीय राज्यघटनेतील कोणत्या कलमा नुसार घटनात्मक अधिकार दिले आहेत.

२. कोणत्या कलमा नुसार स्त्रियांनाही पुरुषांप्रमाणेच अभिव्यक्तिस्वातंत्र्य, मतप्रदर्शन करणे याचे स्वातंत्र्य दिले गेले आहे.

३. आदिवासी स्त्रियांच्या मानसिकतेचा गैरफायदा कोण घेते?

४. बाल विवाह करणाऱ्या जमातीमध्ये कोणत्या आदिवासी जमातीचा समावेश होतो?

५. कोणत्या आदिवासी समुदायामध्ये अनादर विवाह, घरगुशी विवाह प्रकार आढळतो?

६. कोणत्या आदिवासी जमातीमध्ये अपहरण विवाहाची प्रथा आहे?

७. कोणत्या स्त्रीचा शासकीय यंत्रणेतील कर्मचा-याकडून हिंसाचार होतो?

८. २०११ साली स्त्रियांचे प्रमाण प्रत्येक हजार पुरुषामागे किती होते ?

९. वेठबिगार प्रथा प्रतिबंध कायदा केव्हा अस्तित्वात आला ?

१०. अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा केव्हा अस्तिवात आला ?

११. कोणत्या भारतीय संविधानाच्या कलम नुसार अनुसूचित जमातीसाठी राष्ट्रीय आयोग स्थापन करण्यात आलेला आहे.

१२. हिंसाचार म्हणजे काय?

१३. संयुक्त राष्ट्र संघाने कोणते प्रथम वर्ष हे प्रथम आंतरराष्ट्रीय महिला वर्ष जाहीर केले ?

१४. समाजाच्या मुख्य प्रवाहातून कोणत्या समाज घटकांना बाहेर फेकले गेले आहे?

१५. युनायटेड नेशन जनरल असेंबली ने २० डिसेंबर १९९३ च्या ठरावा मध्ये कोणती घोषणा करण्यात आली?

१६. कोणाला १९५३ मध्ये ८ व्या संयुक्त राष्ट्र महासभेच्या पहिल्या महिला अध्यक्ष होण्याचा मान मिळाला होता?

**३.५ ब) स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे :**

१. कलम ३२ नुसार

२. १९ नुसार

३. खाण मालक, कारखानदार, चहा, कॉफी मळ्याचे मालक त्यांचे नोकर

४. संथाळ, मुंडा,उराव,भिल्ल इत्यादी.

५. बिरहोर, हो, संथाल, कमार, ऊरावं, मुंडा, वारली, कोलाम, कोरकु इ.

६. आज भारतातील मारिया गोंड, खारिया, संथाळ,बिरहोर,वारली इत्यादी जमातींमध्ये ही प्रथा अस्तित्वात आहे.

७. आदिवासी स्त्रीचा

८. ९४० इतके होते.

९. १९७६

१०. १९८९

११. ३३८ अ अन्वये

१२. कौटुंबिक हिंसाचार म्हणजे शारीरिक, शाब्दिक, लैंगिक, मानसिक किंवा आर्थिक छळ, हुंडा किंवा मालमत्ता देण्यासाठी महिलेला अपमानित करणे, तिला शिवीगाळ करणे, विशेषत: अपत्य नसल्यामुळे तिला हिणवणे किंवा धमकावणे, त्रास देणे, दुखापत करणे, जखमी करणे किंवा पीडित महिलेचा जीव धोक्यात आणण्यास भाग पाडणे.

१३. १९७५ हे वर्ष

१४. एकल स्त्रिया, देवदासी, देहविक्री करणाऱ्या महिला, लोक कलावंत महिला आणि तृतीयपंथी.

१५. महिला विरोधात हिंसाचाराची निर्मूलनाची घोषणा करण्यात आली.

१६. भारताच्या विजयालक्ष्मी पंडित यांना.

**३.६ अ) सरावासाठीचे प्रश्न :**

१. आदिम स्त्रीच्या हिंसाचाराचे स्वरूप या विषयी विश्लेषण करा.

२. ग्रामीण स्त्रीचा हिंसाचाराचे स्वरूप या विषयी चर्चा करा.

३. शहरी समुदायातील महिलांच्या हिंसाचाराचे स्वरूप यावर निबंध लिहा.

**३.६ ब) लघु उत्तरे लिहा.**

१. आदिवासी स्त्रीच्या हिंसाचारावर उपाययोजना सुचवा.

२. ग्रामीण स्त्रीच्या हिंसाचारावर उपाययोजना सुचवा.

३. शहरी समुदायातील महिलांच्या हिंसाचारावर उपाययोजना सुचवा.

**३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ :**


1. Kimmel, Michael S. The Gendered Society. New York: Oxford University Press, 2011. Chapter 13. Gender of Violence, Pp. 381-407.

2. Nashville, Tenn.: Vanderbilt Univ. Press, 2011. Chapter 1. Ethnographic Notes from the Frontlines of Gender Based Violence, Pp. 1-18.

3. Kannabiran, Vasanth and Kalpana Kannabiran, Caste and Gender: Understanding Dynamics of Power and Violence, Economic and Political Weekly, Vol. 26, No. 37 (Sep. 14, 1991), pp. 2130-2133.

4. Karlekar, Malavika. Domestic Violence, Economic and Political Weekly, Vol. 33, No. 27 (Jul. 4-10, 1998), pp. 1741-1751.

5. Chowdhry, Prem. Enforcing Cultural Codes: Gender and Violence in Northern India, Economic and Political Weekly, Vol. 32, No. 19 (May 10-16, 1997), pp. 1019-1028.

6. Tejani, Sheba. Sexual Harassment at the Workplace: Emerging Problems and Debates, Economic and Political Weekly, Vol. 39, No. 41 (Oct. 9-15, 2004), pp. 4491-4494

7. Omvedt, Gail, Violence against Women : New Movements and New Theories in India. Delhi: Kali for Women, 1990. Pp. 1-40.

8. Wall, Liz. "Gender equality and violence against women what's the Connection?' The Australian Center for the study of Sexual Assault Research Summary, 2014

९. लिंग भाव आणि हिंसाचार प्रा. चंद्रकांत खंडागळे, सुधारित अभ्यासक्रम, मिरर प्रिंटींग प्रेस कोल्हापूर.

* * *

# घटक – ४

# कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा होणारा छळ

# (Womens Harassment at Workplace)

**अनुक्रमणिका**

४.० प्रस्तावना

४.१ उद्दिष्ट्ये

४.२ विषय विवेचन

  ४.२.१ स्त्रियांच्या छळाचे स्वरूप Nature of Women's Harassment.

  ४.२.२ स्त्रियांच्या छळाचे प्रकार Types of Women's Harassment

  ४.२.३ उपाययोजना आणि विशाखा मार्गदर्शक कायदा, २०१३ (Remedies and Vishakha Guidelines Act, 2013)

४.४ सारांश

४.५ पारिभाषीक शब्द

४.६ स्वयं-अध्ययन प्रश्न

४.७ स्वयं-अध्ययन प्रश्नाची उत्तरे

४.८ सरावासाठीचे प्रश्न

४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० प्रस्तावना :

छळातून मुक्त जीवन हा प्रत्येक स्त्रीचा अधिकार आहे. पूर्वी जेव्हा स्त्रिया घराबाहेर पडत नव्हत्या तेव्हा स्त्रियांच्या लैंगिक छळ बहुदा स्त्री म्हणून कुटुंबात होत असे. त्यात प्रामुख्याने बालविवाह, सतीची चाल, विधवा विवाह बंदी, स्त्री-शिक्षण बंदी, चूल व मूल अशा स्वरूपात छळ होत असे. तथापि शिक्षण, अर्थार्जनासाठी स्त्री घराबाहेर पडली तरीही बुद्धीचातुर्य, निर्णयक्षमता असूनही तिचे विविध स्वरूपात शोषण होत राहिले आहे. पूर्वीचे छळाचे प्रकार जाऊन कौटुंबिक हिंसाचार, विनयभंग, बलात्कार, स्त्रीभ्रुणहत्या अशा स्वरूपात स्त्रीचा छळ होत आहे. अनेकवेळा स्त्रीवर मात करण्यासाठीतिचा लैंगिक छळ हे माध्यम होऊन गेले. म्हणजेच कुटुंबात व कुटुंबा बाहेरही स्त्रीला विविध प्रकारच्या छळाला सामोरे जावे लागत आहे.

परंपरागत समाजात पुरूषाने अर्थार्जन करावयाचे व स्त्रीने घरकामात बालसंगोपन असे लिंगभेदावर आधारलेले श्रमविभाजन प्रचलित होते. ग्रामीण समुदाय स्त्री पुरुषांच्या वर्चस्वासाठी घरकाम सांभाळून शेती आणि इतर पारंपारिज्ञक व्यवसायात अर्थार्जनासाठी काम करीत होती मात्र स्त्रीने स्वतःसाठी कमावणे कमीपणाचे मानले जाई. आधुनिक काळात स्त्री शिक्षणाला संधी, औद्योगिकरण, नागरीकरण, व्यक्तिस्वातंत्र्य, आधुनिक जीवनपद्धती, कुटुंबाचा आर्थिक भार तसेच स्त्रीला विविध क्षेत्रात मिळालेली संधी यामुळे स्त्री अर्थार्जनासाठी घराबेहर पडत आहे. मुलींचे पालक देखील मुलींचे शैक्षणिक व आर्थिक स्वावलंबन, चांगला वैवाहिक जोडीदार मिळवणे यासाठी प्रयत्नशील आहेत. परिणामी आज स्त्रीया पुरुषांच्या बरोबरीने समाजजीवनाच्या सर्वच क्षेत्रात सहभागी होश्रत आहेत. शहरी व ग्रामीण क्षेत्रात नोकरी किंवा व्यवसाय करू लागल्या आहेत. जगातील सर्वच देशात समाजाच्या एकूण कार्यशक्तीत काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे.

आधुनिक समाजात स्त्रीने कुटुंबाबाहेर पडणे व अर्थार्जन करणे सर्वमान्य होत चालले आहे. शहरी समाजाबरोबर ग्रामीण समाजातदेखील स्त्रीचे अर्थार्जन स्वीकारले जात आहे. यामुळे स्त्रीचे स्वावलंब वाढून तिचा सामाजिक दर्जा उंचावण्यास चालना मिळाली आहे. ही स्त्रीयांच्या दृष्टीने सकारात्मक बाब आहे. मात्र याला दुसरी नकारात्मक बाब म्हणजे घराबाहेर पडून काम करणाऱ्या स्त्रीयांच्या कामाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर छळ होत आहे. दर बारा मिनिटाला एक असा भारतामध्ये लैगिंक छळाचा आकडा नॅशनल क्राईम ब्युरो रेकॉर्ड नोंदविला आहे. स्त्रिया पुरुषांपेक्षा अबला आहेत. स्त्रियांना पुरुषांच्या संरक्षणाची गरज आहे. पुरुषांच्या संरक्षणाशिवाय महिला जगूच शकत नाहीत. अशी मानसिकता स्त्रियांच्या लैंगिक शोषनाला कारणीभूत आहे. पुरुषप्रधान समाजात वर्षानुवर्षे विविध प्रकाराने होत असलेल्या या शोषणामध्ये आज २१ व्या शतकातही बदल झालेला नाही उलट कामाच्या ठिकाणी व समाजाच्या सर्वच क्षेत्रात लैंगिक शोषणाचे प्रमाण वाढलेलेच आहे. त्यामुळे कामाच्या ठिकठिकाणी होणारा स्त्रियांचा छळ ही एक मोठी गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. या प्रकरणात आपण या समस्येचे स्वरूप अभ्यासणार आहोत. यात प्रामुख्याने छळाचा अर्थ, कामाच्या ठिकाणी होणाऱ्या स्त्रियांच्या छळाचे स्वरूप, छळ थांबविण्यासाठी केलेले व करावयाची उपाययोजना इत्यादी मुद्यांचा अभ्यास करणार आहोत.

## ४.१ उद्दिष्टचे : (Objectives)

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास

१) कामाच्या ठिकाणी स्त्रियांच्या होणाऱ्या छळाचे स्वरूप समजून घेता येईल.

२) कामाच्या ठिकाणी स्त्रियांच्या होणाऱ्या छळाचे विविध प्रकार माहिती होतील.

३) विशाखा मार्गदर्शक तत्त्वे अधिनियम २०१३ समजून घेता येईल.

४) कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ समजून घेता येईल या घटकांच्या अभ्यासामुळे वरील बाबी साध्य होणार आहेत.

## ४.२ विषय–विवेचन : (Presentation of Subject Matter)

भारतीय समाजात लिंगभाव विषयक दृष्टिकोनामुळे विविध क्षेत्रात स्त्रियांवर अत्याचार होत आहेत. पुरुषप्रधान समाज अवस्थेत स्त्रियांना एक 'स्त्री' म्हणून दिली जाणारी वागणूक अन्यायकारक आहे. स्त्रियांवर होणारा अन्याय समाजातील सर्वच क्षेत्रात होताना दिसून येतो. याला कामाचे ठिकाण देखील अपवाद राहिलेले नाही. आज शिक्षणाच्या संधीमुळे स्त्री कुटुंबाबाहेर पडून नोकरी व्यवसायाच्या माध्यमातून स्वावलंबी बनत आहे. कुटुंबाच्या अर्थार्जनात सहभागी होत आहे. तथापि कामाच्या ठिकाणी सहकारी पुरुषांच्याकडून स्त्रीचा मानसिक, शारीरिक व लैंगिक छळ होताना दिसून येत आहे. म्हणजे स्त्री शैक्षणिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्यास तिच्यावरील अन्याय कमी होईल हा आशावाद या ठिकाणी संपुष्टात येत आहे. या घटकात आपण कामाच्या ठिकाणी स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचे स्वरूप, प्रकार व उपाययोजनांचा आढावा घेणार आहोत. यामुळे स्त्रियांचा होणारा छळ ही संकल्पना स्पष्ट होईल.

### छळ या संज्ञेचा अर्थ : (Meaning of Concept Harasshament)

छळ किंवा छळवणूक हा एक वर्तनप्रकार आहे. एखाद्या व्यक्तीस शारीरिक, मानसिक त्रास देण्यासाठी केलेले कोणतेही वर्तन म्हणजे छळ होय. सर्वसामान्यपणे कायदेशीरदृष्ट्या एखाद्या व्यक्तीस त्रास देणारा, धमकावणारा, धाक दाखविणारा, घाबरवणारा किंवा सुरक्षिततेविषयी तिच्या मनात सतत भीती निर्माण करणारा वर्तन प्रकार म्हणजे छळ होय.

**केंब्रिज शब्दकोशानुसार**, 'एखाद्यास त्रास देणारे किंवा अस्वस्थ करणारे वर्तन म्हणजे छळ होय'.

वरील विवेचनावरून छळासंबंधी काही मुद्दे सांगता येतील–

१) छळ हा वर्तनप्रकार असून त्यात एक व्यक्ती जाणीवपूर्वक इतर व्यक्तीस त्रास होईल असे वर्तन करीत असते.

२) छळ हा जाणीवपूर्वक केला जात असल्याने त्यात त्रास देण्यासाठी अपमान, अवनती, मारहाण, धमकावणे, घाबरवणे, अस्वस्थ करणे, संकटात टाकणे, असुरक्षितता निर्माण करणे अशा विविध मार्गांचा अवलंब केला जातो.

३) छळ हा नेहमीच निषेधार्थ असतो ज्या व्यक्तीचा छळ होतो त्या व्यक्तीस छळ हे नकोसे वाटणारे वर्तन असते. कारण छळामुळे त्रास व दुःखाबरोबरच व्यक्तीचे हक्क, स्वातंत्र्य, सुरक्षितता धोक्यात येते.

४) छळाचे कृत्य कोणत्याही स्वरूपाचे असते ते सामाजिक, नैतिक व कायदेशीर दृष्टीकोनातून नेहमीच व्यक्तीचे अधिकार नाकारणारे असल्याने ते दंडनीय मानले जाते.

५) सर्वसाधारणपणे छळ हा वंश, धर्म, जात, संस्कृती, लिंगभाव अशा अनेक आधारे केला जातो.

### ४.२.१ कामाच्या ठिकाणी होणाऱ्या स्त्रियांच्या छळाचे स्वरूप :

सर्वसाधारणपणे एखाद्यास त्रास देणारे किंवा अस्वस्थ करणारे कोणतेही वर्तन म्हणजे छळ होय. पुरुषप्रधान समाजात लिंगभाव दृष्टीकोनातून अगदी प्राचीन काळापासूनच स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार नाकारले गेले. त्यातून स्त्री ही मालमत्ता, वस्तू, दासी या स्वरूपात मानली जाऊन तिचा शारीरिक, मानसिक छळ केला गेला. आधुनिक समाजातदेखील या छळाचे स्वरूप बदलत गेले आहे. मात्र छळ थांबलेला नाही. आज स्त्री पुरुषांच्या बरोबरीने नोकरी, व्यवसाय अशा क्षेत्रात काम करीत आहेत. मात्र कामाच्या ठिकाणी एक स्त्री म्हणून तिच्याकडे बघण्याच्या दृष्टीकोन, दिली जाणारी वागणूक, आणि प्रत्यक्ष केला जाणारा छळ याचा विचार करता स्त्रीचा कामाच्या ठिकाणी विविध प्रकारच्या छळाला सामोरे जावे लागते. यासंदर्भात आपण छळाचे स्वरूप समजावून घेणार आहोत.

**१) कामाचे ठिकाण / कार्यस्थळ :**

कार्यस्थळ म्हणजे ज्या ठिकाणी व्यक्ती अर्थार्जनासाठी किंवा अन्य काही उद्दिष्टांसाठी एखादे कार्य/काम/नोकरी करतात किंवा सेवा देतात ते ठिकाण होय. या ठिकाणावत शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, लहान-मोठे उद्योगधंदे, विविध व्यवसाय, शैक्षणिक संख्या, बँका, वित्तसंस्था, वैद्यकीय व आरोग्य सेवा पुरविणारी केंद्रे, वाहतूक व दळणवळण यंत्रणा, मनोरंजन केंद्रे, पर्यटन केंद्रे, हॉटेल व्यवसाय, बांधकाम व्यवसाय, एखाद्याच्या शेती व घरातील मोल मजुरीची कामे, ठेकेदाराने दिलेली कामे रोजगार हमीची कामे अशी अनेक ठिकाणे येतात ज्या ठिकाणी स्त्री व पुरुष एकत्रित काम करतात.

**२) अर्थार्जन करणारी स्त्री :**

जी स्त्री घराबाहेर जाऊन आपल्या कुटुंबाच्या अर्थार्जनासाठी काम करते तिला काम किंवा नोकरी करणारी स्त्री म्हटले जाते. विविध कामाच्या ठिकाणी स्त्रियांना इतर अनेक स्त्री-पुरुष सहकाऱ्यांच्या सोबत काम करावे लागते. अशावेळी काही पुरुष सहकाऱ्यांकडून कामाच्या ठिकाणी एक स्त्री म्हणून तिला त्रास वा दुःख देण्याच्या हेतूने अपमान करणे, लज्जा उत्पन्न होईल असे बोलणे, हावभाव करणे, स्त्रीत्वाचा अपमान करणे असे वर्तन केले जाते असे वर्तन हे छळ म्हणून ओळखले जाते.

**३) छळाचे विविध मार्ग :**

स्त्री ज्या ठिकाणी काम करते त्या ठिकाणी स्त्रियांचा छळ करण्यासाठी पुरुषांकडून अपमान, निंदा, टोमणे मारणे, टीका करणे, असभ्य भाषेत बोलणे, असहकार्य, अडवणूक करणे, संकटात टाकणे, धमकावणे, भीती घालणे, अस्वस्थ करणे, दहशत निर्माण करणे, आर्थिक व लैंगिक शोषण करणे, जास्त काम देणे व काम नाकारणे, कार्यालयात उशीरापर्यंत थांबण्यास सांगणे, अशा विविध मार्गाने कामाच्या ठिकाणी छळ केला जातो.

## ४) प्रामुख्याने पुरुषांच्याकडून छळ :

कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा छळ करणारे प्रामुख्याने पुरुष असतात. कशाही अपवादात्मक परिस्थिती स्त्री अधिकाऱ्याकडून छळ होऊ शकतो. मात्र स्त्रियांच्या छळात पुरुषांच्याकडून होणाऱ्या छळाचे प्रमाण सर्वाधिक आहे. स्त्रियांना छळणारे जे पुरुष असतात ते प्रामुख्याने कामाच्या व्यवस्थेत सत्ता व अधिकार धारण करणारे असतात. तसेच बरोबरीचे काम करणारे पुरुषी वर्चस्वाच्या छळ करण्याऱ्या व स्त्रियांना काम देणारे अथवा नोकरी देणारे, कामाचे व्यवस्थापन पाहणारे, कामाचे पर्यवेक्षण करणारे तसेच स्त्रियांच्या बरोबर काम करणारे वरिष्ठ व कनिष्ठ सहकारी अशा कामाच्या ठिकाणी असणाऱ्या पुरुषांपैकी काही पुरुष स्त्रियांचा छळ करीत असतात.

## ५) लिंगभावविषयक दृष्टीकोन :

भारतीय समाजात अगदी प्राचीन काळापासूनच लिंगभाव विषयक दृष्टीक्कोनामुळेच स्त्रीवर पुरुषांच्याकडून अन्याय-अत्याचार होताना दिसून येत आहे.

आजच्या आधुनिक काळात कामाच्या ठिकाणी स्त्रीचा होणारा छळ हा केवळ स्त्रीकडे पुरुषी वर्चस्वाच्या मानसिकतेतून बघण्याचा दृष्टीकोनामुळेच होत आहे. म्हणजेच कामाच्या ठिकाणी पुरुषाकडून स्त्रीयांचा होणारा छळाचा आधार हा लिंगभाव विषयक भेदभाव म्हणजेच स्त्री-पुरुष भेदभाव हा आहे. प्राचीन काळातील काही अपवाद वगळता सर्वच समाजात पितृसत्ताक किंवा पुरुषप्रधान समाजव्यवस्था आढळते. या व्यवस्थेत पुरुषांना सर्वच अधिकार दिले गेले व स्त्रीला अधिकारापासून वंचित ठेवले गेले आहे. त्यामुळे स्त्रीचे स्थान हे गौण बनलेले आहे. यातूनच स्त्रियांवर वर्चस्व गाजविणे हा पुरुषांचा जन्मसिद्ध अधिकार आहे अशी वर्चस्ववादी मानसिकता निलर्माण होत गेली आहे. त्यातून स्त्री-पुरुषांची विविध भूमिकेबाबत लिगंभाव विषयक दृष्टीकोन निर्माण झाला. परिणामी कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा छळ केला जात आहे.

## ६) पीडितांचे सहकार्य व उदासिनता :

कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा छळ करणाऱ्या पुरुषांना संबंधित पीडित स्त्रियांचे कळत नकळतपणे सहकार्य मिळत असते. अनेक वेळा कामाची गरज असणाऱ्या स्त्रिया ह्या आपणास कामावरून कमी केले जाईल, आर्थिक नुकसान होईल, आपलीच बदनामी होईल, कुटुंबात वाद निर्माण होतील अशा विविध कारणामुळे होणाऱ्या छळांकडे दुर्लक्ष करतात. तक्रार करण्याचे टाळतात. त्यामुळे मात्र छळ करणाऱ्यांना अधिकच प्रोत्साहन मिळते. साधारणपणे बहुसंख्य पीडित स्त्रीया छळास प्रतिकार करीत नाहीत. विशेषतः असंघटित क्षेत्रात कामावरून काढले जाईल या भीतीने तक्रार केली जात नाही. तर इतर क्षेत्रात बदनामी होईल म्हणून तक्रार केली जात नाही. अशा वेळी एकाद्या स्त्रीने प्रतिकार केला तरी तो दुबळा ठरतो. कारण इतरांची मदत व पाठींबा मिळत नाही. परिणामी कामाच्या ठिकाणी स्त्रीयांचा छळ होत राहतो.

### ७) कामाच्या ठिकाणी होणाऱ्या छळाचे दुष्परिणाम :

कामाच्या ठिकाणी स्त्रीयांवर होणारा छळ स्त्रीच्या जीवनात अनेक समस्यांना कारणीभूत ठरतो. काळाची गरज, अर्थार्जन, कौटुंबिक जबाबदारी, बदनामीची भीती यामुळे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे स्त्रीया छळाला सामोरे जातात. काही अपवाद सोडल्यास स्त्रीकडून या छळाला विरोध होत नाही मात्र यातून अनेक दुष्परिणामाला सामोरे जावे लागते. त्यात प्रामुख्याने -

१) छळामुळे स्त्रीयांचा अपमान होतो.

२) छळाविरुद्ध आपण आवाज उठवू शकत नाही व भावनेतून स्त्रियांच्यात न्यूनगंड निर्माण होऊ शकतो.

३) छळामुळे अपराधीवृत्ती निर्माण होते. त्यामुळे स्त्रीया सतत दबावाखाली राहतात. स्वतःला असुरक्षित समजू लागतात.

४) सततच्या छळामुळे स्त्रीयांचे मानसिक संतुलन बिघडू शकते छळ असहनीय झाल्यामुळे आत्महत्येसारखे टोकाचे पाऊलदेखील उचलले जाऊ शकते.

५) अनेक स्त्रीया छळामुळे नोकरी सोडतात त्यामुळे आर्थिक नुकसान होते. अनेक स्त्रीयांचे करिअर संपुष्टात येते.

६) अनेक वेळा कुटुंबाअंतर्गत ताण-तणावांना स्त्रीला सामोरे जावे लागते.

वरीलप्रमाणे कामाच्या ठिकाणी स्त्रीयांच्या होणाऱ्या छळाचे स्वरूप आहे.

### ४.२.२ स्त्रीयांच्या छळाचे प्रकार : (Types of Women's Harrassment)

समाजात अनेक प्रकारे स्त्रीयांचा छळ होताना दिसून येतो. अगदी जन्म घेण्यापूर्वी स्त्री-भ्रूणहत्या स्वरूपात छळाचा प्रारंभ होतो तो आयुष्याच्या अखेरपर्यंत कुटुंबातील व्यक्ती तसेच कुटुंबाबाहेरील व्यक्तीकडून होण्याच्या छळाला स्त्रीला सामोरे जावे लागते. स्त्रीचा छळ होत असताना जात, धर्म, वर्ग, प्रदेश असा कोणताही विचार न करता केवळ ती स्त्री आहे एवढ्या संकुचित भावनेतून छळ होत असतो. स्त्रीयांवरील अत्याचारामध्ये बलात्कार, विनयभंग, पत्नीस मारहाण, गुलामी, लैंगिक छळ अशा विविध प्रकारांचा समावेश करता येईल.

आजच्या आधुनिक समाजात स्त्री नोकरी व्यवसायासाठी घराबाहेर पडू लागली आहे. अशा वेळी ती ज्या ठिकाणी काम करते त्या ठिकाणी तिला विविध अन्यायाला सामोरे जावे लागते. कामाच्या ठिकाणी सहकाऱ्याकडून केवळ स्त्री आहे म्हणून विविध प्रकारे छळ केला जातो. त्यानुसार स्त्रीयांच्या छळाचेही विविध प्रकार पाडता येतात. साधारणतः अशा छळांचे मानसिक छळ, शारीरिक छळ, आर्थिक छळ व लैंगिक छळ असे चार प्रकार पाडता येतात.

१) **मानसिक छळ** : स्त्रीयांना मानसिक व भावनिक पातळीवर यातना किंवा वेदना होतील यासाठी केलेले वर्तन म्हणजे मानसिक छळ होय. कामाच्या ठिकाणी अनेक स्त्रीयांना मानसिक स्वरूपाचा छळ सहन करावा लागतो. यामध्ये कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष संपर्कात असणाऱ्या सहकारी पुरुषांकडून सतत टोचून बोलणे, निंदानालस्ती, अपमान व बेअब्रू होईल असे बोलणे, टोमणे मारणे, लज्जा उत्पन्न करणारे शब्द व हावभाव करणे अशा कृत्यांचा समावेश होतो. याशिवाय टेलिफोन, मोबाईलच्या माध्यमातून बोलणे, संदेश पाठविणे, सोशल मिडियाद्वारे संदेश, चित्रे पाठविणे अशा वारंवार होणाऱ्या गोष्टीमुळे स्त्रीयांना मानसिक ताण-तणावांना सामोरे जावे लागते. परिणामी सतत चिंताग्रस्त राहणे, वैफल्यग्रस्त बनणे, कामात लक्ष न लागणे अशा बाबींना सामोरे जावे लागते. अनेक वेळा मानसिक छळ प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे होत असतो. यामुळे त्यास पुरावा नसणे परिणामी स्त्रीयांना अशा छळाविरोधी तक्रार करता येत नाही. यामुळे स्त्रीया सतत मानसिक व भावनिक तणावाखाली राहत असतात.

२) **शारीरिक छळ** : जे वर्तन स्त्रीयांना शारीरिक त्रास यातना किंवा वेदना देते त्या वर्तनास शारीरिक छळ म्हणता येईल. स्त्रीयांना कामाच्या ठिकाणी शारीरिक छळास देखील सामोरे जावे लागते. यात प्रामुख्याने स्त्रीयांना अवघड अशी शारीरिक कष्टाची कामे देणे, जोखमीचे काम करावयास भाग पाडणे, स्त्रीयांना अशा कामात लागणारे सहकार्य न करणे, प्रत्येक कामाच्या बाबतीत स्त्रीला कामचुकार व अकार्यक्षम ठरविणे यासारख्या कृत्यांचा समावेश होतो. याबरोबरच कामाच्या ठिकाणी स्त्रीयांच्यासाठी पुरेशी स्वच्छतागृहे, विश्रामगृहे अशा सुविधा दिल्या जात नाहीत. यामुळे देखील शारीरिक त्रास स्त्रीला सहन करावा लागतो. साधारणपणे कामाची गरज असणाऱ्या स्त्रीया प्रामाणिकपणे काम करीत असतात मात्र सहकारी पुरुष मंडळींकडून दिलेले अतिरिक्त काम व असुरक्षिततेमुळे स्त्रीया शारीरिकदृष्ट्या कमकुवत होतात. कारण स्त्रीयांना काम करणारी स्त्री आणि गृहिणी अशा दुहेरी भूमिकेचा ताण सहन करावा लागतो. परिणामी अकाली वृद्धत्व, शारीरिक अजार, आयुर्मान कमी होणे अशा गोष्टींना सामोरे जावे लागते.

३) **आर्थिक छळ** : कामाच्या ठिकाणी स्त्रीयांचे आर्थिक नुकसान होईल, कामाचा मोठा मोबदला मिळणार नाही असे कोणतेही वर्तन म्हणजे आर्थिक छळ होय. साधारपणे स्त्री-पुरुषांना समान कामासाठी समान वेतन देण्याचे तत्व सर्वच देशांनी मान्य केलेले आहे. भारतीय राज्यघटनेत स्त्री-पुरुष समानतेचे तत्व मान्य केलेले आहे. तथापि प्रत्यक्ष व्यवहारात हे तत्व पाळले जात नाही. शासकीय सेवामधील स्त्रीयांचा अपवाद वगळता संघटीत व असंघटीत क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करूनही स्त्रीयांना पुरुषांइतके वेतन दिले जात नाही. औद्योगिक तसेच संघटीत क्षेत्रात वेतन, बढती, प्रशिक्षण, रजा, वैद्यकीय, सुविधा देताना पुरुष कामगारांना प्राधान्य दिले जाते. अनेक उद्योग व्यवसायात स्त्री कामगारांना नोकरीवर घेतले जात नाही. तसेच अनेक स्त्री कामगारांना वर्षानुवर्षे नोकरी करूनही नोकरीत कायम केले जात नाही. याबरोबरच स्त्री कामगारांना प्रसुतीसंबंधीचे लाभ देण्याचे टाळले जाते. असंघटित क्षेत्रात तर स्त्रीयांचा सर्वाधिक आर्थिक छळ होतो. शेती, गृहोद्योग, लघुद्योग, घरकाम, विडी उद्योग, मोलकरीण अशा असंघटीत क्षेत्रात अल्पमजुरीवर राबवून घेतले जाते. पगारी सुट्ट्या दिल्या जात नाहीत. अशा प्रकारे कामाच्या ठिकाणी

स्त्रीयांचा आर्थिक छळ होतो.

४) **लैंगिक छळ** : साधारणपणे मानसिक छळ, शारीरिक छळ व आर्थिक छळाच्या तुलनेत होणारा लैंगिक छळ सर्वांसाठी मानहानीकारक असतो. सार्वजनिक ठिकाणीच्या वर्तनविषयक सभ्यतेच्या किंवा नैतिकतेच्या नियमांचा भंग करून स्त्रीयांना दिली जाणारी वागणूक म्हणजेच लैंगिक छळ होय. साधारणपणे लैंगिक हेतूने स्त्रीयांची छेडछाड करणे, विनयभंग करणे, बलात्कार करणे ही कृत्ये लैंगिक छळ मानली जातात. जेव्हा एखादी व्यक्ती बोलणे, कृती, स्पर्श या स्वरूपात लैंगिक वर्तन अथवा उद्देशाने एखाद्या महिलेला त्रास देते तेव्हा त्याला लैंगिक छळ म्हटले जाते. लैंगिक छळ या संकल्पनेची व्याप्ती याहून अधिक विस्तृत आहे.

कामाच्या ठिकाणी अनेक पुरुष स्त्रीयांचा विविध मार्गांनी लैंगिक छळ करीत असतात. स्त्रीयांकडे सतत कामूक नजरेने पाहणे, अश्लिल हावभाव व इशारे करणे, स्त्रीयांना पाहून गाणे म्हणणे, शिट्टी वाजवणे, अश्लील चित्रे वा वस्तू दाखवणे, लगट करणे, शरीराला स्पर्श करणे, धक्का मारणे, केस व कपडे ओढणे, रस्ता अडवणे, शेरेबाजी करणे इत्यादी लैंगिक छळाचे मार्ग सर्रास वापरले जातात. याबरोबरच कामाच्या ठिकाणी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून स्त्रीयांना केबिनमध्ये बोलवणे, लगट करणे, चहा, कॉफी, सिनेमा-नाटक, लंच यासाठी आग्रह करणे, आर्थिक व इतर फायदे देताना काही असभ्य अटी घालणे, शरीरसुखाची मागणी करणे, अशा मागण्यांना विक्षरोध झाल्यास स्त्रीयांना बदनाम करणे इत्यादी मार्गाने स्त्रीयांचा लैंगिक छळ केला जातो. इतर प्रकारच्या छळापेक्षा लैंगिक छळांचे स्त्रीयांवर अधिक गंभीर दुष्परिणाम होतात.

कामाच्या ठिकाणी होणाऱ्या स्त्रीयांच्या छळाचे वरील विविध प्रकार आहेत. या विविध प्रकारात स्त्रीयांचा होणारा शारीरिक छळ संमिश्र असू शकतो. मानसिक छळ हा शारीरिक त्रासाला कारणीभूत ठरू शकतो तर आर्थिक आणि छळाचे भयंकर टोक म्हणून लैंगिक छळाकडे आपण पाहू शकतो. लैंगिक छळामुळे आर्थिक, शारीरिक, मानसिक पातळीवर स्त्रीचा छळ होतो त्यामुळे स्त्रीला कामाच्या ठिकाणी अशा विविध छळांना सामोरे जावे लागत आहे.

### ४.२.३ कामाच्या ठिकाणी होणाऱ्या स्त्रियांच्या छळावर केलेली उपाययोजना :

कामाच्या ठिकाणी होणारा स्त्रीयांचा छळ ही एक जागतिक समस्या आहे. कामाच्या ठिकाणी महिलांना छळाची घटना स्त्रीयांना कायद्याने दिलेला जगण्याचा, समानतेचा, स्वातंत्र्याचा किंवा कोणताही व्यवसाय करण्याच्या दिलेल्या हक्कांचे संरक्षण करणे. कामाच्या ठिकाणी वातावरण सुरक्षित आणि निकोप असणे गरजेचे आहे. त्यासाठी जगातील सर्वच देशात कायदेशीर तरतूदी केलेल्या आढळतात. भारतात देखील राज्यघटना, महिला आयोग, विशाखा मार्गदर्शक तत्त्वे व कार्यस्थळी स्त्रीयांच्या लैंगिक छळ अधिनियम २०१३ नुसार विविध उपाययोजना केलेल्या आहेत. त्याचा अभ्यास पुढीलप्रमाणे आहे.

### अ) राज्यघटनात्मक उपाय :

कार्यस्थळी होणाऱ्या स्त्रीयांच्या छळावर भारतीय राज्यघटनेत प्रत्यक्ष उपाययोजना केलेली नाही मात्र स्त्री-पुरुष समानतेसाठीच्या तरतूदी स्त्रीयांना समानतेचे हक्क प्राप्त करून देत आहेत. त्यातील काही तरतूदी पुढीलप्रमाणे -

**१) मुलभूत हक्क** : भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ अंतर्गत पुरुषाप्रमाणेच स्त्रीयांसाठी समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क, धार्मिक स्वातंत्र्य, सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क आणि घटनात्मक उपाय योजनांचे हक्क असे सहा मुलभूत हक्क दिले आहेत. त्यात कलम १४ नुसार कायद्यापुढे सर्व व्यक्तींना समान मानले आहे.

कलम १५ नुसार राज्य हे धर्म, वंश, जात, जन्मस्थळ आणि लिंग या आधारे नागरिकांत भेदभाव करणार नाही.

कलम २१ नुसार प्रचलित कायद्याने प्रस्थापित केलेल्या पद्धतीला सोडून इतर कोणत्याही पद्धतीने व्यक्तीचे जीवित व वैयक्तिक स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही.

कलम २३ नुसार मानवाला पूर्वापार -- करण्यास व वेठबिगारी करण्यास बंदी घातलेली आहे. या घटनात्मक तरतुदी स्त्रीयांच्या छळास प्रतिबंध करू शकतात.

**२) मार्गदर्शक तत्त्वे** : राज्यघटनेच्या चौथ्या भागात ३६ ते ५१ कलमांतर्गत जी मार्गदर्शक तत्त्वे दिलेली आहेत त्यात कलम ३९ नुसार स्त्री-पुरुषांना समान कामास समान वेतन, कलम ४२ नुसार राज्याने कायद्याच्या बाबतीत न्याय व माणुसकीचे वातावरण निर्माण करावे तसेच बाळंतपणासाठी स्त्रीयांना मदत द्यावी अशी तरतूद केलेली आहे. या तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी सरकारने समान वेतन अधिनियम १९७६ आणि प्रसुति लाभ अधिनियम १९६१ असे कायदे संमत केले आहेत वरील तरतूदी स्त्रीयांच्या छळास प्रतिबंध करण्यासाठी उपयुक्त आहेत.

**३) भारतीय दंडसंहितेतील तरतूदी :**

भारतीय दंडसंहितेत स्त्रीयांच्या छळास रोखण्यासाठी पुढील तरतूदी केलेल्या आहेत. त्यास भा.द.सं. कलम ३५४ नुसार स्त्रीयांची छेड काढणे हा दखलपात्र गुन्हा ठरवून शिक्षेची तरतूद केलेली आहे. कलम ३७६ नुसार बलात्कारासाठी किमान ७ वर्षे ते कमाल १० वर्षे कारावास किंवा जन्मठेप अशा शिक्षेची तरदूत केली आहे. या कलम ३७६ मध्ये फौजदारी कायदा (सुधारणा) अधिनियम १९८३ अन्वये काही बदल केले आहेत. त्यात ३७६ (ब) नुसार एखाद्या सार्वजनिक सेवकाने त्याच्या ताब्यातील स्त्रीशी तिच्या इच्छेविरुद्ध लैंगिक संबंध प्रस्थापित केल्यास तसेच कलम ३७६ (ब) नुसार दवाखान्यातील सहकारी पुरुषाने स्त्री तिच्या इच्छेविरुद्ध लैंगिक संबंध प्रस्थापित केपल्यास शिक्षेची तरतूद केलेली आहे. तसेच कलम ५०९ नुसार अश्लील शब्द, हावभाव किंवा कृतीद्वारे स्त्रीच्या शालीनतेचा अपमान करणाऱ्यास १

वर्ष कारावास किंवा दंड अशा शिक्षेची तरतूद केलेली आहे. या तरतूदी कामाच्या ठिकाणी स्त्रीयांच्या होणाऱ्या छळास प्रतिबंध करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत.

**(ब) महिला आयोग** : स्त्रीयांच्या सर्वांगिण संरक्षणासाठी केंद्र सरकारने १९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोग तसेच अनेक राज्यांनी महिला आयोग स्थापन केलेले आहेत. या आयोगाची प्रमुख कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

- स्त्रियांच्या संरक्षणासाठी केलेल्या घटनात्मक तरतूदींचा अभ्यास करून त्यावर देखरेख ठेवणे व त्याचे पुनरावलोकन करून त्यात दुरुस्त्या करणे.
- स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करण्यासंबंधीच्या बाबींचे संशोधन करणे.
- स्त्रियांच्या हक्कावर आक्रमण झाल्यास त्याची चौकशी करणे.
- स्त्रियांच्या तक्रारी व गाऱ्हाणी सोडविण्यासाठी केलेल्या अर्जाचा विचार करून त्यावर योग्य कारवाई करणे.
- **स्त्रियांचा सन्मान वाढविण्यासाठी जनजागृती करणे**

अशी अनेक कामे महिला आयोगाच्या माध्यमातून केली जातात. त्यामुळे स्त्रीयांना न्याय हक्कांचे एक व्यासपीठ मिळण्यास मदत झाली आहे. त्यामुळे महिला आयोग व त्यांना असणारे अधिकार कार्यस्थळी स्त्रीयांना होणाऱ्या छळास प्रतिबंध करण्यासाठी महत्त्वाचे आहेत.

**(क) विशाखा कायदा मार्गदर्शक तत्त्वे :**

कामाच्या ठिकाणी स्त्रीयांच्या होणाऱ्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी भारतातील सवोच्च न्यायालयाने १९९७ मध्ये जी मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली त्यांना विशाखा मार्गदर्शक तत्त्वे असे म्हणतात.

**पार्श्वभूमी** : ही मार्गदर्शक तत्त्वे घालून देण्याची पार्श्वभूमी पुढीलप्रमाणे -- राजस्थानमध्ये १९९० मध्ये भंवरदेवी नावाच्या ग्रामसेविकेने एक बालविवाह रोखण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे राजस्थानातील चिडलेल्या गुज्जर समुदायाने संबंधित जमीनदारांनी भंवरदेवीवर वारंवार बलात्कार केला. या पीडित महिलेने राज्यस्थान उच्च न्यायालयात खटला दाखल केला मात्र तिच्या दुर्दैवाने सर्व आरोपींना न्यायालयाने निर्दोष मुक्त केले. या निर्णयाच्या विरोधात काही व्यक्ती व स्वयंसेवी संस्थांनी 'विशाखा' या नावाने सर्वोच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल केली. हा खटला 'विशाखा' आणि इतर विरुद्ध राजस्थान राज्य म्हणून चालला. या केसच्या निमित्ताने सर्वोच्च न्यायालयाने कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक अत्याचाराबाबत १९९७ मध्ये काही मार्गदर्शक तत्त्वे सांगितली व त्याचा 'विशाखा' गाईडलाईन/ मार्गदर्शक तत्त्वे म्हटले जाते. ही तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत.

१) स्त्रीयांच्या सुरक्षेसाठी पर्याप्त उपाय योजना करणे ही केंद्र सरकार व राज्य सरकार यांची जबाबदारी आहे.

२) कार्यस्थळी स्त्रीयांच्या अस्मितेचे संरक्षण करणे हा त्यांचा घटनात्मक अधिकार आहे.

३) कार्यस्थळी होणाऱ्या स्त्रीयांच्या लैंगिक छळास प्रतिकार व्हावा या उद्देशाने केलेल्या नियमांबाबत लोकांना माहिती व्हावी यासाठी हे नियम प्रदर्शित करावेत.

४) स्त्रीयांना कामावर ठेवणारी व्यक्ती खाजगी अथवा सार्वजनिक क्षेत्रातील असो त्यांना विशाखा मार्गदर्शक तत्त्वे लागू राहतील.

५) स्त्रीयांच्या लैंगिक छळाची चौकशी करण्यासाठी तक्रार समिती स्थापन करणे आवश्यक आहे. या समितीचे अध्यक्षपद एका स्त्रीकडेच असावे तसेच निम्मे सदस्य स्त्रिया असल्या पाहिजेत.

६) ऑक्टोबर २०१२ मध्ये विशाखा मार्गदर्शक तत्त्वाचा विस्तार करण्यात आला. त्यानुसार '– –कौन्सिल ऑफ इंडिया' आणि 'मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया' या दोन्ही संस्थांनीही कार्यस्थळी होणाऱ्या स्त्रियांचा लैंगिक छळ थांबविण्यासाठी समिती स्थापन करण्यात असा आदेश दिला.

कार्यस्थळी होणारा स्त्रीयांचा छळ थांबविण्यासाठी सरकार जोपर्यंत कायदा करीत नाही तोपर्यंत 'विशाखा मार्गदर्शक तत्त्वे' प्रमाण मानावीत असे सर्वोच्च न्यायालयाने सुचविले. अलिकडच्या काळात मात्र लैंगिक छळासंबंधाच्या अनेक केलेल्या सातत्याने समोर आल्या तेव्हा पुन्हा एकदा कायदा करणे भाग पडले कारण विशाखा कायद्याला अनेक वर्षे उलटून गेली तरीही बऱ्याच ठिकाणी तक्रार निवारण समित्या स्थापन करण्यात  आलेल्या नाहीत किंवा समिती आहे पण त्या काय करीत नाहीत म्हणूनच शासनाने विशाखा मार्गदर्शक तत्त्वात काळानुसार सुधारणा करून त्यात काही गोष्टीची भर घालून आणि काही बाबी वगळून कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ हा संसदीय कायदा केला.

**(ड) कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध मनाई व निवारण अधिनियम –२०१३):**

**(Sexual Harassment at workplase (Prevention, Protibition and Redreseal Act 2013)**

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या विशाखा मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगाने कार्यस्थळी होणाऱ्या महिलांच्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठीचे विधेयक केंद्रशासनाने संसदेत सादर केले, त्यास लोकसभेने ३ सप्टेंबर २०१२, राज्यसभेने २६ फेब्रुवारी २०१३ रोजी मंजूरी दिली. राष्ट्रपतीने त्यावर २३ एप्रिल २०१३ रोजी स्वाक्षरी केली आणि हे विधेयक ''कामच्या ठिकाणी महिलांना लैंगिक छळ (प्रतिबंध मनाई व निवारण) अधिनियम २०१३'' या नावाने ९ डिसेंबर २०१३ पासून सर्व भारतभर लागू केले गेले. या कायद्यातील तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत.

**१) व्यथीत महिला** : या कायद्याने कामच्या ठिकाणी लैंगिक बळी पडल्याचे सांगणारी कोणत्याही वयाची महिला मग ती त्या ठिकाणी कामास असो वा नसो तिला व्यथीत महिला मानले आहे.

**२) समुचित सरकार** : या कायद्याअंतर्गात समुचित सरकार म्हणून केंद्र सरकार व राज्यसरकार यांना मानले आहे.

**३) नियुक्ती देणारा** : स्त्रीयांना कामावर ठेवणारा सरकारचा किंवा स्थानिक विभागाचा संघटनेचा, उपक्रमाचा, संस्था तसेच शाखेचा प्रमुख हा नियुक्ती देणारा (कामावार ठेवणारा) मानलेला आहे.

**४) कामाचे ठिकाण** : सरकारने वा स्थानिक प्राधिकरणाने वा सरकारी कंपनीने वा महामंडळाने वा सहकारी संस्थेने स्थापन केलेले, त्याच्या मालकीचे असलेले किंवा त्याच्या नियंत्रणात असलेले किंवा त्याच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष दिल्या जाणाऱ्या पूर्णतः वा अंशतः निधीवर चालविलेला असा कोणताही विभाग, संघटना, उपक्रम एंटरप्रायजेस, संस्था, शाखा, युनिट याबरोबरच शैक्षणिक, व्यावसायिक, औद्योगिक, आरोग्य, वाणिज्यीय, किंवा संस्था स्थळाचे ठिकाण, मनोरंजनाचे केंद्रे इत्यादींना कामाचे ठिकाण मानलेले आहे.

**५) मनाई** : कामाच्या ठिकाणी कोणतीही महिला लैंगिक छळास बळी पडणार नाही आहे. या कायद्याने कामाच्या ठिकाणी कोणतीही धमकी देणे वा धाक दाखवणे, तिच्या कामात हस्तक्षेप करणे व तिच्या आरोग्यास व सुरक्षिततेस बाधा आणणारे कृत्य करणे इत्यादीस मनाई केली आहे.

**६) लैंगिक छळ** : या कायद्याअंतर्गत लैंगिक अत्याचाराची व्याख्या करण्यात आली आहे ती अशी - जेव्हा एखादी व्यक्ती बोलून, न बोलता कृतीने किंवा स्पर्शाने लैंगिक अर्थाने ओतप्रोत कृत्य अथवा लैंगिक उद्देशाने एखाद्या महिलेला त्रास देते. ज्यामुळे त्या महिलेला मानसिक धक्का बसतो तेव्हा त्यास 'लैंगिक छळवणूक' होत आहे असे समजावे.

**७) समितीची स्थापना** : १० किंवा त्यापेक्षा अधिक कामगार असतील अशा ठिकाणी 'अंतर्गत तक्रार समिती' स्थापन केली पाहिजे तसेच ज्या ठिकाणी १० पेक्षा कमी कामगार आहेत अशा ठिकाणी स्थानिक तक्रार समिती नेमण्याची तरतूद या कायद्याने केलेली आहे.

**८) तक्रार व शिक्षा** : कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ झाल्याची लेखी तक्रार महिला छळाची घटना घडलेल्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत लेखी तक्रार अंतर्गत तक्रार समितीकडे करू शकते. संबंधित समिती आलेल्या तक्रारीची चौकशी करून योग्य वाटल्यास पुढे पोलिसांकडे पाठवू शकते. छळाच्या स्वरूपावरून गुन्हा सिद्ध झाल्यास शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. त्यात स्त्रीशी अश्लील व्यवहार सिद्ध झाल्यास तीन वर्षापर्यंतच्या तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. तसेच कामाच्या ठिकाणी लैंगिक छळामुळे स्त्रीचा मृत्यू झाल्यास दोषी व्यक्तीस आजन्म कारावस किंवा मृत्यूदंडाची शिक्षा होऊ शकते. याबरोबरच कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ होत असल्याची तक्रार मुद्दाम व द्वेषभावनेतून केली असल्यास व ती तक्रार खोटी सिद्ध झाल्यास तक्रार करणाऱ्या महिलेच्या विरोधात कारवाई करण्याची शिफारस समिती करू शकते.

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ अधिनियम २०१३ नुसार महिलांच्या सुरक्षिततेसाठी अनेक तरतूदी केलेल्या आहेत. यात कामच्या ठिकाणी महिलांना सुरक्षितता प्रदान करण्यासाठी काही कर्तव्ये सांगितली आहेत त्यात प्रामुख्याने

१) कामाच्या ठिकाणी स्त्रीयांना सुरक्षेचे वातावरण ठेवावे.

२) स्त्रीयांच्या लैंगिक छळाचे होणारे दंडनीय परिणाम सर्वांच्या निदर्शनास आणावे.

३) कार्यालयातील एखाद्या व्यक्तीचे वर्तन असभ्य असेल तर त्याला समज देणे गरजेचे आहे.

४) कामाच्या ठिकाणी अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणारा आदेश लावावा.

५) कार्यालयात एखाद्या महिलेची तक्रार आल्यास तर ती तक्रार निवारण समितीने योग्य प्रकारे नोंदवून ठेवणे महत्त्वाचे ठरते.

६) अंतर्गत तक्रार समितीत आवश्यक त्या सोयी सुविधा पुरवाव्यात तसेच त्यांना लैंगिक छळाच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी लागणारी माहिती पुरवावी.

७) तक्रारदाराची तक्रार समजून घ्या. हा कार्यालयातील थट्टेचा विषय होऊ नये याची काळजी घ्या.

८) छळवणूकीचा प्रकार घडत असल्यास कोणत्याही प्रकारे गाफील राहू नका व गोंधळून जाऊ नका.

९) कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाच्या विरोधात जागृती करणारे कार्यक्रम व कार्यशाळा आयोजित कराव्यात.

१०) सुसंवाद हाच कार्यक्रमाचा आणि वैयक्तिक प्रगतीचा पाया आहे हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे.

या कायद्यात कामच्या ठिकाणी महिलांचा होणारा छळ रोखण्यासाठी केलेल्या विविध तरतूदीमुळे पीडित महिलांना न्याय मिळाल्यास मदत होणार आहेत. या कायद्याचे परिक्षण केल्यानंतर त्यात काही त्रूटी आढळतात तरीदेखील या कायद्यांची पद्धतशीरपणे व तळमळीने अंमलबजावणी केल्यास कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळास प्रतिबंध होण्यास नक्कीच मदत होईल.

स्वतःसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याची वेळ आता महिलांवर आली आहे. यासाठी त्यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. स्वतःच्या क्षमता विकसित करणे, अवांछित गोष्टींना प्रतिसाद न देणे, परिस्थितीबाबत जागरूक राहणे, तसेच साशंक व्यक्तिपासून जपून राहणे याचा अवलंब महिलांनी करणे आवश्यक आहे. वेळ आल्यास समितीकडे धीटपणे तक्रार करून, स्वसंरक्षण करून निर्भिडपणे काम करणे ही आता स्त्रीयांचीही जबाबदारी आहे.

### ४.४ सारांश :

या घटकांमध्ये कामाच्या ठिकाणी स्त्रीयांच्या होणारा छळ या प्रमुख समस्येचा अभ्यास करणेत आला आहे. कामाच्या ठिकाणी स्त्रीयांना विविध प्रकारच्या अत्याचाराला सामोरे जावे लागते. या अत्याचाराचा

अभ्यास करताना  स्त्रीयांच्या छळाचे स्वरूप अभ्यासत असताना छळ म्हणजे काय? स्त्रीयांच्या छळाचे स्वरूप याचा विचार करणेत आला आहे. याशिवाय कामाच्या ठिकाणी स्त्रीयांच्या छळांच्या प्रकाराचा अभ्यास करताना मानसिक छळ, शारीरिक छळ, आर्थिक छळ व लैंगिक छळ या प्रकारांचा विचार करणेत आला आहे. कामाच्या ठिकाणी स्त्रीयांचा होणारा छळ रोखण्यासाठी काही घटनात्मक उपाय, महिला आयोग, विशाखा मार्गदर्शक तत्त्वे व कामाच्या ठिकाणी होणारा स्त्रीयांचा लैंगिक छळ अधिनियम २०१३ या विविध उपायांचा अभ्यास करणेत आला आहे. या प्रकरणात स्त्रियांच्या कामाच्या ठिकाणी होणारा छळ ही संकल्पना स्पष्ट करण्यात आली आहे.

### ४.५ स्वयं अध्यायनासाठीचे प्रश्न – १

१) छळ या संज्ञेचा अर्थ स्पष्ट करा.

२) कामाच्या ठिकाणी होणाऱ्या स्त्रीयांच्या छळाचे स्वरूप स्पष्ट करणारे मुद्दे सांगा.

**स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न – २**

१) स्त्रीयांचा मानसिक छळ म्हणजे काय?

२) स्त्रियांचा लैंगिक छळ म्हणजे काय?

**स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न – ३**

१) विखाशा मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे काय?

२) कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ-२०१३ या कायद्याअंतर्गत लैंगिक छळ म्हणजे काय?

### ४.६ पारिभाषिक शब्द :

**१) छळ किंवा छळवणूक –** एखाद्या व्यक्तीस शारीरिक व मानसिक त्रास देण्यासाठी केलेले कोणतेही वर्तन म्हणजे छळ होय.

**२) कार्यस्थळ / कामाचे ठिकाण –** कार्यस्थळ म्हणजे ज्या ठिकाणी व्यक्ती अर्थार्जनासाठी किंवा अन्य काही उद्दिष्टांसाठी एखादे कार्य/काम/नोकरी करते ते ठिकाण होय.

**३) लिंग भाव** : लिंगभाव म्हणजेच समाजाने स्त्रीयांची व पुरुषांची कामे निश्चित करणे, वर्तन निश्चित करणे व त्यानुसार वर्तनाची अपेक्षा करणे.

**४) समुचित सरकार** : केंद्र सरकार व राज्यसराकारांना उद्देशून हा शब्दप्रयोग करण्यात आला आहे.

### ४.७ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

*** स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे –१**

१) छळ किंवा छळवणूक हा एक वर्तनप्रकार आहे. एखाद्या व्यक्तीस शारीरिक, मानसिक त्रास देण्यासाठी केलेले कोणतेही वर्तन म्हणजे छळ होय.

२) छळाचे स्वरूप स्पष्ट करणारे मुद्दे - कामाचे ठिकाण, अर्थार्जन करणारी स्त्री, छळाचे विविध मार्ग, पुरुषांकडून छळ, लिंगभावविषयक दृष्टीकोन, पीडितींचे सहकार्य व उदासीनता, छळाचे दुष्परिणाम इ. आहेत.

**※ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे - २**

१) स्त्रीयांना मानसिक व भावनिक पातळीवर यातना किंवा वेदना होतील यासाठी केलेले वर्तन म्हणजे मानसिक छळ होय.

२) सार्वजनिक ठिकाणच्या वर्तनविषयक सभ्यतेच्या किंवा नैतिकतेच्या नियमांचा भंग करून स्त्रीयांना दिली जाणारी वागणूक म्हणजे लैंगिक छळ होय.

**※ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे - ३**

१) कामाच्या ठिकाणी स्त्रीयांच्या होणाऱ्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी भारतातील सर्वोच्च न्यायालयाने १९९७ मध्ये अशी मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली त्यांना 'विशाखा मार्गदर्शक तत्त्वे' असे म्हणतात.

२) जेव्हा एखादी व्यक्ती बोलून, न बोलता कृतीने किंवा स्पर्शाने, लैंगिक अर्थाने ओतप्रोत कृत्य किंवा लैंगिक उद्देशाने एखाद्या महिलेला त्रास देते, ज्यामुळे त्या महिलेला मानसिक धक्का बसतो तेव्हा त्यास 'लैंगिक छळवणूक' होते आहे असे कायद्याने समजावे.

## ४.८ सरावासाठीचे प्रश्न :

१) स्त्रीच्या छळाचे स्वरूप स्पष्ट करा.

२) स्त्रीच्या छळाचे प्रकार विशद करा.

३) विशाखा कायदा २०१३ आणि त्यावरील उपाययोजना सुचवा.

## ४.९ चिंतन व कृती (Reflection and Action) :

तुमचे गाव, तालुका, शहर तसेच राज्य व देशातील महिला अत्याचाराची आकडेवारी एकत्रित करा. महाविद्यालयाने, सरकारी आस्थापने या ठिकाणी 'अंतर्गत तक्रार समिती' व 'स्थानिक तक्रार समिती' आहे का ते पहा. त्यातील सदस्यांची माहिती देऊन त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न करा. समितीच्या बैठकांबाबत आढावा घ्या.

## ४.१० अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Reading Books)

* Ahuja Ram : Social Problems in India, Rawat Publication Jaipur (20--)

* Karkkar, Malavika, Domestic Violence, Ecconomic and Politicals Weekly. Vol-

33 No. 21 (--4-10, 1058). PP 1741-1751.

* Tejani, Sheba, Sexual Harassment at the Workplace : Emerging Problems and Debates, Economic and Political weekly vol. 39 No. 41 (Oct 0-15, 2004) Pp 4404.

* Omvedi,Gail, Violorice Againet Women : New Movement and Ne Theories in India Kelhi : Kali for womens, 1990 Pp -1-40.

* Loy, Pamela Hewitt and lea P. Stewart ' The Extent and Effects of the sexual Harassment of Working Womens, Socialolgical Foces 1701 (1984) : 31-43

✲ जी. एफ. शर्मा : सामाजिक मुद्दे, २०१६ रावत पब्लिकेशन जयपूर .

✲ समकालीन भारतातील सामाजिक समस्या, साळुंखे, जत्राटक, मारुळकर-नरेंद्र प्रकाशक, पुणे.

✲ खंडागळे चंद्रकांत 'लिंगभाव व हिंसाचार' - प्रकाशक सौ. खंडागळे, सांगली.

✲ ✲ ✲